13-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A



**(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. मोहन जोशी)**

**पृ शी.** : महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात केंद्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले प्रतिज्ञापत्र

**मु.शी** : महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात केंद्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले प्रतिज्ञापत्र या विषयावर श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

**तालिका सभापती** : आजच्या विशेष बैठकीमध्ये माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेसाठी 10.30 ते 12.30 पर्यंत वेळ देण्यात आली आहे. दुपारी 12.00 वाजता चर्चा थांबविण्यात येईल आणि त्यानंतर उत्तराचे भाषण सुरु होईल.

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, उत्तराच्या भाषणाकरिता 45 मिनिटे लागतील त्यामुळे आपण उत्तराचे भाषण 11.45 वाजता सुरु करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सत्ताधारी पक्षाकडील माननीय सदस्यांना आवरले तर वेळेत चर्चा संपेल.

**तालिका सभापती** : ठीक आहे, उत्तराचे भाषण 11.45 वाजता सुरु होईल. दोन्ही बाजूकडून सहकार्य मिळाले तर चर्चा वेळेत संपेल.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सोडविण्याच्या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करणे, त्या दाव्यामध्ये केंद्र शासनाने गेल्या आठवडयामध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करणे, या प्रतिज्ञापत्रातील म्हणणे महाराष्ट्रावर व सीमा भागातील मराठी जनतेवर अन्याय करणारे असल्याची भावना महाराष्ट्रातील तसेच सीमा भागातील जनतेमध्ये निर्माण होणे, केंद्र शासनाची ती मानसिकता याही पूर्वी वेळोवेळी स्पष्ट झाली होती, केंद्र शासनाने या प्रकरणी न्याय्य भूमिका घेणे आवश्यक असताना ती न घेणे केंद्र शासनाची महाराष्ट्र

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील....

शासनाविषयीची पक्षपाती भूमिका, यावर शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, मी काल सभागृहामध्ये नियम 289 अन्वये सीमा प्रश्नावर चर्चा घडवून आणावी याकरिता आग्रहाची मागणी करीत होतो त्यावेळी बेळगावमध्ये सीमावासिय जनता रस्त्यावर उतरुन केंद्र शासनाचा निषेध करीत होती. आणि त्यांच्यावर कर्नाटक शासनाचे पोलीस बेछूटपणे लाठीमार करीत होते. किंबहुना, त्याठिकाणी शांततेने आलेला मोर्चा आटोपल्यानंतर गल्ली-गल्लीमध्ये जाऊन ते मराठी जनतेला मारीत होते. एवढे करुन ते थांबले नाहीत तर त्याठिकाणी असलेल्या राज्य शासनाच्या एस.टी. बसेस जाळण्याची भूमिका कानडीभाषिक जनतेने घेतली. त्यामुळे तेथील वातावरण अत्यंत भीतियुक्त झाले आहे. त्या भागातील मराठीभाषिक जनतेचे संरक्षण कोण करील अशी भीती तेथील जनतेमध्ये निर्माण झाली आहे. आणि म्हणून मागील अधिवेशनामध्ये सीमा प्रश्नावर चर्चा करीत असतांना "जोपर्यंत सीमा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत तो केंद्रशासित ठेवावा" अशाप्रकारचा ठराव या सभागृहाने एकमताने पारीत केला. परंतु त्याबाबत केंद्र शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. सभापती महोदय, हे महाराष्ट्र राज्य निर्माण होत असतांना केंद्र शासनाची किंवा कॉंग्रेसची सुरुवातीपासून महाराष्ट्रविरोधी भूमिका होती. किंबहुना, महाराष्ट्रावर अन्याय करणारी होती हे मी याठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छितो. त्या संदर्भात माझ्याकडे अनेक दाखले आहेत. त्यावेळी मुंबई स्वतंत्र करुन "मुंबई राज्य" निर्माण करण्याचा कॉंग्रेसने प्रयत्न केला. कॉंग्रेस पक्ष याठिकाणी ही सांप्रत परिस्थिती दाखवीत असतांना यांचे "दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे" आहेत. एकीकडे अखंड महाराष्ट्र राहिला पाहिजे असे म्हणायचे आणि दुसरीकडे विदर्भामध्ये वेगळया विदर्भाची मागणी कॉंग्रेस सरकार आणि कॉंग्रेसचे नेतृत्व करीत आहे. हे महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यापासून या परिस्थितीला कॉंग्रेस पक्षच जबाबदार आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये कॉंग्रेस पक्षाने आणि त्यांच्या सरकारने आपली भूमिका स्पष्टपणे मांडली पाहिजे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, मी या ठिकाणी निश्चितपणे सांगेन की, सुरुवातीला पंडित नेहरुंनी अनेक वेळा महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेतली म्हणून सीमा प्रश्न तसाच राहिला आहे. ज्या वेळी हे राज्य निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झाली त्यावेळी कोकणातील सन्माननीय खासदार बॅ. नाथ पै यांनी पंडित नेहरुंना एक पत्र लिहिले आणि माननीय पंतप्रधान म्हणून पंडित नेहरुंकडे महाराष्ट्र हे नाव या राज्याला ठेवावे अशी मागणी केली. दि.31 जानेवारी,1960 ला बॅ. नाथ पै यांनी त्यांच्या पत्रात पंडित नेहरुना असे लिहिले आहे की,"महाराष्ट्र राज्य म्हणावे असे तुम्ही सूचविले आहे. राज्याच्या हिताच्या दृष्टीने नव्या राज्याला महाराष्ट्र म्हणावे असे सूचविल्याची मला कीव येते. उलट मुंबई हे नाव जगभर माहीत आहे. या नावाचा फायदा होणे महाराष्ट्रीयांना आवडेल." अखेर या प्रकरणी जनतेने निर्णय घेऊन मुंबई ऐवजी महाराष्ट्र असा नावात बदल झाला. महाराष्ट्राचे नामवंत या पुस्तकाच्या श्री. पेंडसे, यांच्या प्रस्तावनेच्या पान क्रमांक 19 ते 20 वर याबाबतचा उल्लेख आहे.

सभापती महोदय, पंडित नेहरुनी सतत महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेतली त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. गेली 40 वर्षे सीमावासीय लढत आहेत. त्यावर या सभागृहात चर्चा होते. आंदोलने होतात आणि प्रत्यक्षात काहीही होत नाही. भाषावार प्रांतरचना करताना जो न्याय आंध्रप्रदेशला मिळाला, जो न्याय केरळला मिळाला, जो न्याय राजस्थानला मिळाला, जो न्याय हरियाणाला मिळाला तो महाराष्ट्राच्या वाटयाला आला नाही. मला या ठिकाणी निश्चितपणे सांगावयाचे आहे की, महाराष्ट्राची जनता ज्यावेळी रस्त्यावर येते त्यावेळी वेगळी भूमिका घेतली जाते. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीला विरोध केला. महाराष्ट्र मोठा का पंडित नेहरु मोठे असा प्रश्न विचारले तर पंडित नेहरु मोठे आहेत असे श्री. यशवंतराव चव्हाण यांनी या सभागृहात सांगितले होते. यशवंतराव प्रतिष्ठानने छापलेल्या सहयाद्रीचे वारे या पुस्तकातील श्री. यशवंतरावाच्या भाषणात असे म्हटलेले आहे. मला त्या पुस्तकातील पान क्रमांक तसेच त्या वेळच्या भाषणाचे सगळे उतारे देता येतील. सभापती महोदय, मला या गोष्टीचा आंनद आहे की, आजच्या चर्चेला शासनाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. सीमा भाग महाराष्ट्रापासून वेगळा झाला त्यावेळी तेथे मराठी भाषिकांची संख्या 20 लाख होती. आज ती 50 लाखाच्या वर गेलेली आहे. बेळगाव, कारवार, निपाणी,बिदर या सर्व भागात जवळ जवळ 50 लाख मराठी बांधव रहात

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील....

आहेत. ज्या ठिकाणी बहुसंख्य मराठी भाषिक रहातात त्या ठिकाणी मराठी बांधवांची गळचेपी केली जात आहे. त्या ठिकाणचे सातबाराचे उतारे, शासकीय कागदपत्रे, शाळेचे दाखले, सरकारी कागदपत्रे जाणूनबुजून कन्नड भाषेत दिली जात आहेत. जी एकता आणि संघटीतपणा कर्नाटकात आहे ती महाराष्ट्रात दिसून येत नाही. कर्नाटकात सर्वजण पक्षभेद विसरुन या भूमिकेच्या बाबतीत एकत्र येतात आणि महाराष्ट्रात मात्र आपण फक्त ठराव करतो, शिष्टमंडळ घेऊन जातो. त्यावेळी केंद्र शासनाकडून फक्त होय, असे उत्तर मिळते पण प्रत्यक्षात काहीही कृती केली जात नाही.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/ पूर्वी कु. थोरात 10:40

श्री. जयंत प्र. पाटील ...

मी मघाशी श्री. यशवंतराव चव्हाण काय म्हणाले हे सांगत होतो. ते म्हणाले की, "व्दिभाषिक राज्याचा मुख्यमंत्री होणार असा उपप्रचार माझ्या विषयी केला जातो. माझी तशी इच्छा नाही. दोन वर्षापूर्वी झालेल्या भाषणात मी सांगितले होते की, महाराष्ट्र की पंडित नेहरु असा प्रश्न निर्माण झाला तर मी नेहरुंचे नेतृत्व डोळे झाकून स्वीकारीन. तेव्हा संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नात भावनेच्या आहारी जाण्यात अर्थ नाही." जी चळवळ सुरु होती त्यावेळी 3 डिसेंबर, 1955 रोजी 'लोकसत्ता' दैनिकाच्या अंकामध्ये नेहरु सभागृहात जे बोलले ते सगळे भाषण आलेले होते. हे कोठे तरी थांबले पाहिजे. या देशाचे नेतृत्व कॉंग्रेस करत आलेली आहे. तुम्ही काय केले आणि आम्ही काय केले हा प्रश्न नाही. देश स्वतंत्र झाल्यापासून किंवा 1960 साली महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यापासून पाच वर्षाचा आणि मधल्या दोन वर्षाचा अपवाद सोडला तर या ठिकाणी कॉंग्रेस सत्तेवर होती. कॉंग्रेसची भूमिका ही महाराष्ट्राच्या विरोधात आहे. केंद्रातील कॉंग्रेसचे सरकार आणि कॉंग्रेसचे नेतृत्व हे नेहमी महाराष्ट्राच्या विरोधात राहिलेले आहे. या दृष्टीकोनातून आपण सर्व पक्षांनी मतभेद बाजूला सारुन केंद्रावर दबाव आणण्याची गरज आहे आणि ती वेळ आलेली आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मुख्यमंत्र्यांना निश्चितपणे विनंती करीन की, या चर्चेच्या निमित्ताने एक वेगळी ठोस अशी भूमिका, कणखर भूमिका घेऊन बेळगावच्या जनतेला, सीमावासीय जनतेला आपला आधार वाटला पाहिजे. आजच्या या ठरावाच्या निमित्ताने सीमावासीय जनता वेगळ्या आशेने बघत आहेत. काल ठराव आल्यानंतर मी बेळगावमध्ये फोन केला. तेथे गल्लीगल्लीत घुसून पोलीस मराठी लोकांना मारत होते. त्या ठिकाणी शांततेने सत्याग्रहींचा मोर्चा विसर्जित झाल्यानंतर जी मराठी वस्ती होती आणि प्रामुख्याने चळवळीचा जो केंद्रबिंदू आहे त्या खडकाई असो किंवा इतर मराठी वस्त्या असो त्या ठिकाणी बेछूट मारहाण चालू आहे. या दृष्टीकोनातून या चर्चेच्या निमित्ताने केंद्र सरकारला आणि कर्नाटक सरकारला राज्य शासनाने सांगितले पाहिजे. याचे वेगळे पडसाद महाराष्ट्रात उमटण्याची शक्यता आहे. कर्नाटकमधील जनता तेथील मराठी जनतेला मारत असेल तर उद्या महाराष्ट्रातील जनता वेगळी भूमिका घेतल्याशिवाय राहणार नाही. यादृष्टीकोनातून आपण याबाबतीत काय धोरण घेणार, कोणती भूमिका जाहीर करणार की ज्यामुळे सीमावासीय जनतेला वेगळा आधार वाटेल. मी निश्चितपणे सांगेन की,

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. जयंत प्र. पाटील .....

महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे म्हणून श्रमिक लढले. त्यांनी मुंबई वाचवली. मुंबई केंद्रशासित करण्याचा प्रयत्न त्या वेळचे काँग्रेसचे नेतृत्व करीत होते. त्यावेळी महाराष्ट्राची मुंबई गुजरातला देण्याचा डाव चालला होता. त्यावेळी मुंबई आणि महाराष्ट्र कोणी वाचविला असेल तर तो या श्रमिकांनी वाचविला. मुंबईतील कष्टकरी, कामगार, शेतकरी यांनी लढा दिला. आपण हुतात्म्यांची यादी पाहिली तर त्यामध्ये 90 टक्के गिरणी कामगार आहेत. जे गरीब आहेत त्यांनी महाराष्ट्रासाठी बलिदान केले आणि ज्यांनी महाराष्ट्राला विरोध केला ते श्री. यशवंतराव चव्हाण मंगल कलश घेऊन आले, हा इतिहास आहे.

सभापती महोदय, सन्माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी सांगितले की, याबाबत विरोधी पक्ष राजकारण करीत आहे. मी सांगू इच्छितो की, याबाबतचा ठराव मी मांडला होता. त्यांचे आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे काय मतभेद आहेत, हे मला माहीत नाही. त्यांनीच त्यांना मोठे केले. त्यांचे काय आहे हे मला माहीत नाही. परंतु या ठिकाणी तीन पिढ्या आम्ही लढत आहोत. मी आठ वर्षाचा असताना सीमा प्रश्नासाठी जेलमध्ये गेलेला कार्यकर्ता आहे. माझ्या तीन पिढ्या सीमा प्रश्नासाठी लढत आहेत. माझे वडील, माझे काका हे 8-8 महिने बेल्लारीच्या तुरुंगामध्ये राहिलेले आहेत. माझे वडील आणि काका 1960 साली बेल्लारीच्या तुरुंगामध्ये होते. त्या ठिकाणी कर्नाटक पोलिसांची वागणूक बेछूट होती. त्या ठिकाणी आम्ही डबा सुध्दा देऊ शकत नव्हतो. आम्ही लहान असताना त्या ठिकाणी जात होतो. महाराष्ट्रातून आलेला डबा सुध्दा राजकीय कैद्यांना कर्नाटक सरकार देऊ देत नव्हते. त्यावेळी सत्याग्रह चालू असताना आम्ही गाडीमध्ये बसून बघत होतो. या ठिकाणी या विषयावर राजकारण करतात असे सांगण्यात आले. मला वाईट वाटले. सीमा भागाचा प्रश्न हे काही भांडवल आहे काय ? त्यामुळे राजकारण होणार आहे काय ? त्यामुळे काही मते मिळणार आहेत काय ? या ठिकाणी शासनाकडून वेगळी चर्चा अपेक्षित आहे. या ठिकाणी आपण वेगळी भूमिका मांडू शकतो. मतभेद जरुर आहेत परंतु या ठिकाणी या विषयाचे राजकारण करतात, भांडवल करतात असे म्हणणे बरोबर नाही. कोणी भांडवल करावयास लावले या दृष्टीकोनातून या ठिकाणी चर्चा अपेक्षित आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

वेगळया विदर्भासाठी वेगळी भूमिका घेतली जाते. विदर्भ वेगळा करण्यासाठी काँग्रेस पक्षाने वेगळी समिती स्थापन करुन आम्ही एकत्रित आहोत असे दाखविले आहे. परंतु काँग्रेस पक्ष बोलतो एक आणि कृती मात्र वेगळी करतो. त्यामुळे शासनाची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. सुदैवाने सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी पक्षाची भूमिका काय आहे, शासनाची भूमिका काय आहे ते सांगावे. या चर्चेच्या निमित्ताने सीभा भागातील जनतेला ते आधार देतील, धीर देतील अशी आशा व्यक्त करतो, माननीय मुख्यमंत्री सभागृहाला ठोस आश्वासन देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या 50 वर्षांपासून अनेक पिढया हा प्रश्न सुटण्यासाठी संघर्ष करीत आहेत, भरडल्या जात आहेत. साडेचार वर्षांची शिवशाहीची कारकीर्द सोडली तर महाराष्ट्रात कॉंग्रेसची सत्ता आहे. केंद्र सरकारमध्ये सुध्दा 5-7 वर्षांचा काळ सोडला तर तेथेही कॉंग्रेसच आहे. तरीही हा प्रश्न सुटत नाही. या प्रश्नाला मेरिट आहे किंवा नाही, हा प्रश्न अस्तित्वात आहे किंवा नाही, या प्रश्नाला काही महत्व आहे की नाही ? माझ्या हातामध्ये एक पुस्तक आहे. या प्रश्नाची जाणीव असलेले मुलभूत विचारवंत, ज्यांनी संपूर्ण आयुष्य या प्रश्नासाठी झोकून दिले, बाकी काही नाही, त्या श्री.वसंत भंडारे यांनी लिहिलेले हे पुस्तक आहे. त्यातील काही भागाचा मी उल्लेख करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी म्हटले ते खरे आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रापेक्षा नेहरु मोठे आहेत असे म्हटले होते. त्यांना महाराष्ट्राच्या मातीपेक्षा पक्ष मोठा वाटला. बरोबर आहे, कारण ते कराडचे पाणी आहे. नेहरु मोठे आहेत असे क्षणभर मानू. ते म्हणतात ते स्वीकारु. पण 1929 साली नेहरुंच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशात विभागवार रचना कशी असावी यासाठी समिति नेमली गेली. त्या समितीने त्यावेळी जो ठराव केला होता, त्या ठरावातील मजकूर प्रथम वाचतो, त्यानंतर श्री.भंडारे यांच्या पुस्तकातील उतारा मी वाचणार आहे. त्या समितीच्या ठरावात असे नमूद केले आहे की, "The question of re-distribution of Provinces was also examined by the Nehru Committee appointed by all parties conference, 1928. The Committee lent its powerful support to the linguistic principle in the following terms:

"If a Province has to educate itself and do its daily work through the medium of its own language, it must necessarily be a linguistic area. If it happens to be a polyglot area difficulties will continuously arise and the media of instruction and work will be two or even more languages. Hence

...3/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Divakar Ravte contd....

it becomes most desirable for Provinces to be re-grouped on a linguistic basis. Language as a rule corresponds with a special variety of culture, of traditions and literature. In a linguistic area all these factors will help in the general progress of the Province."" 1929 साली नेहरु कमिटी नेमली गेली त्याचे मूळ या सर्व प्रश्नामध्ये आहे. आपण सर्वजण या प्रश्नासाठी का उभे राहिलो आहोत ? केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात जे शपथपत्र दाखल केले त्या शपथपत्रात असे ठामपणे म्हटले आहे की, बेळगांव, कारवार व निपाणी या भागावर महाराष्ट्र राज्याचा कोणताही अधिकार नाही, हा भाग कर्नाटक राज्याचा आहे. देशाचे गृह खाते श्री.चिदंबरम यांच्या अधिपत्याखाली काम करीत आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 10:50

(श्री. दिवाकर रावते...

यापुढे जर महाराष्ट्राने हा प्रश्न पुन्हा कोर्टात नेला तर त्यांना दंड ठोका असे प्रतिज्ञापत्र केन्द्राने केले. अशा प्रकारच्या भूमिकेमुळे आमच्या भावना अत्यंत तीव्र असून त्या व्यक्त करण्याकरिता मी अपशब्द वापरुन सभागृहाची अप्रतिष्ठा करु इच्छित नाही. सभापती महोदय, केन्द्र सरकारने आपले भान सोडले तर मग आम्ही आमचे भान ठेवून का वागावे ? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून या प्रश्नाच्या मूलभूत गाभ्यामध्ये शिरुन कॉंग्रेसचे पूर्वापार असलेले मत आहे त्याबाबत कोणताही अपशब्द न वापरता,निर्लज्ज असे न म्हणता त्यांनी लाज सोडून दिलेली आहे असे मी म्हणेन. त्यामुळे महाराष्ट्राला अत्यंत लाजिरवाणे वाटणारे अशा प्रकारचे शपथपत्र त्यांनी कोर्टाला सादर केलेले आहे आणि त्याबाबत संताप व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे. 125 वर्षाची कॉंग्रेस इतर सर्व राज्यासाठी भाषावार प्रांतरचना लागू करते आणि महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र आकसाने वागते त्यावेळी हा विषय येतो. मिनिस्टी ऑफ होम अफेअर्स च्या 29 डिसेंबर, 1953 चे एक रिझोल्युशन आहे. त्यामध्ये 10 निर्णय घेतलेले आहेत. त्यात निर्णय क्रमांक 4 मध्ये असे म्हटलेले आहे की, "The language and culture of an area have an undoubted importance as they represent a pattern of living which is common in that area." 1953 साली मिनिस्टी ऑफ होम अफेअर्सच्या ठरावामध्ये हे म्हटलेले आहे.

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर देशामध्ये महाराष्ट्रापेक्षा नेहरु मोठे असे समजणारे यशवंतराव चव्हाण यांनी मंगल कलश आणल्यानंतर बेळगाव कारवारचा हा विषय तेथून सुरु झाला. त्यावेळी सेनापती बापट सीमा लढ्याचे नेतृत्व करीत होते. श्री.साईनाथ, श्री. बाबूराव ठाकूर ही सीमा भागातील मंडळ आंदोलने करीत होती. त्यावेळी आंदोलन करणे हा लोकशाहीचा सन्मान होता. त्यावेळी कॉग्रेसची जी नेते मंडळी होती ती सुसंस्कृत असावीत. म्हणून त्यावेळी आंदोलकांचा सन्मान होत होता. कोणाला कुठे टाकावे, कुणाचे काय करावे, याला एक वेगळी झालर होती. त्यावेळी सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली श्री. बाबूराव ठाकूर, श्री.साईनाथ ही मंडळी उपोषणाला बसली. त्यावेळी सीमाभागातून 7 आमदार निवडून आले आणि त्याची नोंद श्रीमती इंदिरा गांधी यांनी घेतली. 1966 नंतर श्रीमती इंदिरा गांधी यांचे पर्व सुरु झाले. त्यांनी या गोष्टीची इतक्या गंभीरपणे नोंद घेतली की त्या स्वत: त्या भागात आल्या. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक आणि गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

यांच्या बरोबर त्या सीमा भागामध्ये फिरल्या आणि लोकांशी संपर्क साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. त्या सात आमदारांनी श्रीमती इंदिरा गांधी यांना पत्र लिहिल्यानंतर त्या पत्राची नोंद त्यांनी घेतली. आम्ही या सभागृहामध्ये एकमताने ठराव करतो आणि त्या ठरावाला कोणीही भीक घालत नाही. त्यावेळी श्रीमती इंदिरा गांधी यांनी 7 आमदारांनी लिहिलेल्या पत्राची नोंद घेतली. हा इतिहास आहे. या पुस्तकामध्ये असे म्हटलेले आहे की, "On 1st May, 1966, all the Seven M.L.A.s elected from the "border areas," by their letter addressed to the Prime Minister Smt. Gandhi,...." आणि श्रीमती इंदिरा गांधी यांनी 7 आमदारांच्या पत्राचा सन्मान ठेवून त्यांना पत्र लिहून सांगितले की, मला ताबडतोब मे महिन्याच्या 16 तारखेला येऊन भेटा. या पुस्तकात पुढे असे म्हटलेले आहे की, "Smt. Gandhi immediately replied informing them that she had been longing to solve the dispute and that they should come and see her in Delhi on 16th May, 1966."

...नंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 10:55

श्री.दिवाकर रावते.........

मागील अधिवेशनात आम्ही या सभागृहात ठराव मंजूर केला त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय पंतप्रधानांना भेटायला जाणार आहेत. त्यावेळच्या पंतप्रधान स्व.इंदिराजी गांधी म्हणजे "The iron lady of India" होत्या. त्यांनी तारीख निश्चित करुन भेटायला बोलावले होते. मी माननीय मुख्यमंत्र्यांना दोष देणार नाही. पण दिल्ली दरबारी महाराष्ट्राबद्दल किती आकस आहे हे सातत्याने जाणवायला लागले आहे. या प्रश्नाबाबत माननीय मुख्यमंत्र्यांच्या सोबत आम्ही सर्वजण आहोत. हा एकमेकाच्या वादाचा विषय नाही. परंतु आम्हाला पंतप्रधानांच्या भेटीची तारीख मिळविण्याकरिता नाकदुऱ्या काढाव्या लागतात. कधी येऊ, कधी वेळ देता याची वाट पहावी लागते. याबाबत लोकशाही पध्दतीमधील आदर्श तुम्ही सांभाळणार आहात की नाही? महाराष्ट्राच्या विरोधात शपथपत्र दाखल केले जाते. हा महाराष्ट्राचा अवमान आहे. महाराष्ट्रातील जनतेचा अपमान आहे. हा पक्षीय विषय नाही. ज्यावेळेला 20 मे नंतर सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली साईनाथ व सुकथनकर आणि अन्य मंडळींनी उपोषण सुरु केले त्याचा फार मोठा दणका बसला. त्या काळापर्यंत काँग्रेस पक्ष महात्मा गांधीजींचा आदर करीत होते. उपोषण म्हटले की, चाकू आणि तलवार बाहेर काढल्यावर जसे घाबरतात तसे काँग्रेसवाले उपोषणाला घाबरायचे. हाणामारी करा परंतु उपोषण करु नका. एवढा सन्मान होत होता.

सभापती महोदय, तत्कालीन पंतप्रधान स्व.इंदिराजी गांधी यांनी या उपोषणाचा आधार घेऊन वन मॅन कमिशन नेमले. ज्या कमिशनमुळेच हा प्रश्न इरेला पेटला आहे. कमिशन नेमण्याचा प्रश्न आला त्यावेळेला काँग्रेस पक्षाच्या कोअर समितीची दिल्ली येथे बैठक झाली. त्यावरुन सीमा प्रश्नाला किती महत्व होते हे आपल्या लक्षात येईल. त्यावेळी म्हटले गेले की, "Congress Leaders interested in resolving the Dispute." आम्हाला हा प्रश्न संपवायचा आहे असे दिल्लीमध्ये जाहीर केले गेले. केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात दाखल केलेल्या शपथपत्राने महाराष्ट्राच्या अस्मितेला घायाळ केले आहे. महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, कोअर समितीमध्ये काय ठरले? "On 23rd May, 1966 Smt. Gandhi informed Satyagrahis that they (Congress Leaders) were interested in resolving the dispute in a just and peaceful manner and that the Congress

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

Working Committee was meeting that night to consider the question of setting up the suitable machinery for that purpose and they should break the fast and end the suffering. Shri Senapati Bapat by his letter dated 23rd May, 1966 informed her that they were awaiting the decision of the Congress Working Committee." या सीमा प्रश्नासंबंधी स्व.इंदिराजी गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष किती संवेदनशील होता त्याचे हे बोलके उदाहरण आहे. त्यानंतर महाजन कमिशन नेमण्यात आले. महाजन कमिशनने सुध्दा सीमा भाग निश्चित करीत असताना महाराष्ट्रावर अन्याय केला. अमुक गावे तुम्हाला देऊ, बेळगाव अर्धा वाटून देऊ असा विचित्र अहवाल सादर केला. तो अहवाल महाराष्ट्र सरकारने स्वीकारला नाही.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यावेळचे महाराष्ट्राचे बहाद्दर मुख्यमंत्री बॅ. ए.आर.अंतुले यांनी महाजन कमिशनची चिरफाड केली तेही कॉंग्रेस पक्षाचेच होते. महाजन कमिशनने महाराष्ट्र राज्यावर कसा अन्याय केला हे संपूर्ण जगासमोर त्यांनी मांडले. ते म्हणाले होते की, हे कमिशन कर्नाटकला विकले गेले. त्यानंतर जो उद्रेक झाला तो आपल्याला माहितच आहे. या पुस्तकात पुढे असे म्हटले आहे की, "On 1st November, 1969, Shri Bal Thackeray, the Shiv Sena Pramukh visited Belgaum, addressed a meeting at Union Gymkhana and assured the border people that Shiv Sena will take up the issue. Pursuant to that assurance, on 8th February, 1969........."हा सगळा इतिहास माझ्या डोळ्यासमोर आहे. कारण मी त्याच्यामध्ये होतो. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मोरारजींची गाडी अडवून त्यांना फक्त निवेदन द्यायचे होते. पण हा माणूस एक प्रकारचा कसाईच होता. महाराष्ट्राचे 105 हुतात्मे घेणारा कसाई दुर्दैवाने आपला मुख्यमंत्री होता. आम्ही निवेदन देण्यासाठी माहीमला त्यांची वाट पाहत बसलो असताना बेदरकारपणे अंगावर गाडी घालून ते निघून गेले. त्यानंतर मात्र या आंदोलनाने पेट घेतला. तेव्हा संपूर्ण मुंबई जळत होती. पहिल्या दिवशी मला आंदोलन केले म्हणून अटक झाली होती परंतु योगायोगाने जामिनावर सुटलो आणि चार दिवस आंदोलनातच होतो. तेव्हा सीआरपीच्या जवानांनी या आंदोलनकर्त्यांवर प्रचंड गोळीबार केला आणि अनेक हुतात्मे झाले. सुदैवाने महिला मध्ये पडल्या म्हणून नाही तर मी सुध्दा आज सभागृहात दिसलो नसतो. अशा प्रकारे शिवसेनेने 69 हुतात्मे या बेळगांव सीमा प्रश्नासाठी आजपर्यंत दिलेले आहेत. त्याचा परिणाम म्हणून स्व. इंदिरा गांधींनी सन 1970 मध्ये हा विषय पार्लमेंटमध्ये ताबडतोब चर्चेसाठी घेतला होता. त्यावेळेस काय चर्चा झाली हे मांडण्यासाठी मी उभा नाही. महाजन कमिशनसमोर 814 गावे आणि शहरे आपली आहेत असा जो क्लेम होता परंतु त्यांनी फक्त 264 गांवेच मान्य केली आणि निपाणी, खानापूर तसेच नानघर ही तीनच शहरे तुम्हाला देतो परंतु त्याच्या बदल्यात महाराष्ट्राचा काही भाग मागितला. हा विषय सोडविण्यासारखा नव्हता म्हणून ही परिस्थिती निर्माण झाली होती. याच कमिशनने नंतर हे सर्व मान्य केले, महाराष्ट्र राज्यावर अन्याय केला हे देखील मान्य केले यात 'The Commission Admits Failure' म्हणून एक वेगळे चॅप्टरच आहे. त्यात

श्री. दिवाकर रावते .......

असे म्हटले आहे की, "Firstly while enumerating "claims" in chapter III, Secondly while evolving "Methods of Approach" Chapter IV, the Commission expresses its failure to ascertain wishes of Marathi majorities in general, and thirdly while dealing with Maharashtra's claim to the Belgaum city." ज्या कमिशनने आमच्या विरोधात रिपोर्ट दिला तेच कमिशन मराठी माणसांचे अस्तित्व आम्ही स्वीकारले पाहिजे आणि हा अन्याय आमच्याकडून झाला हे देखील मान्य करते. तरी सुध्दा केंद्र सरकार राज्याच्या विरोधात बेळगांव-कारवारचा प्रश्नच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयात जे शपथ पत्र दाखल करते ते चुकीचे करते. आपण केवळ बेळगांवसाठी लढा देत नाही तर केंद्रशासनाची जी वागणूक मिळते त्यासाठी सुध्दा हा लढा आहे. कालच सभागृहात बोलताना आमच्या बाबतीत सांगितले गेले की, आम्ही आता धंदा सुरु केला आहे. परंतु मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आमच्या दुकानातून सोनियाजींच्या दुकानावर जाऊन बसलेले माननीय महसूल मंत्री काल सभागृहात बोलले. तसेच सभागृहात कोणत्याही विभागाचा विषय असला तरी तेच उठून उभे राहतात आणि मीच बोलणार असे त्यांचे म्हणणे असते. याचा अर्थ तुमच्याकडील सर्व नाकाम झाले असा त्यांचा आविर्भाव असतो. आपल्या बाबतीत ते अजून उभे राहिले नाहीत परंतु संबंधित खात्याचे मंत्री, राज्यमंत्री सभागृहात हजर असताना संपूर्ण सरकार चालविण्याची जबाबदारी जणू त्यांचीच आहे असे समजून तेच उभे राहतात. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडून निश्चित खुलासा होणे आवश्यक आहे. ते काल सीमा प्रश्नावर एक सर्वेक्षण समिती कार्यरत असून त्या समितीच्या सूचनेनुसार आम्ही काम करतो, असे म्हणाले आणि ते रेकॉर्डवर आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

परंतु या ठिकाणी मी दाव्यानिशी सांगतो की, अशा प्रकारची सर्व पक्षीय समिती आज तरी अस्तित्वात नाही. सर्वपक्षीय समिती अगोदर अस्तित्वात होती परंतु आता ही समिती अस्तित्वात राहिलेली नाही. आपले शासन अंधारात चाचपडते व त्यामुळे शासनाला कोर्टात फटके खावे लागतात ही वस्तुस्थिती आहे. आम्ही काल सभागृहात अतिशय शांतपणे बसलो होतो कारण आम्हाला विधी व न्याय मंत्र्यांकडूनच उत्तर पाहिजे होते. तुम्ही यासंदर्भात जे काही विधेयक या सभागृहात आणाल तेव्हा आपण काय काय चुका केलेल्या आहेत, या सभागृहात आपण किती असत्य माहिती देता हे त्यावेळेस आम्ही दाखवून देऊ. आम्हाला यासंदर्भातील संपूर्ण सत्य माहिती आहे परंतु काल त्यासंदर्भातील वेळ नसल्यामुळे आम्ही ती माहिती काल सभागृहात दिली नाही परंतु विधेयकाच्या वेळेस आम्ही सर्व सत्य माहिती सभागृहाला सादर करणार आहोत. जेम्स लेनच्या प्रकरणात तुमच्या वकिलाने तेथे काय धिंडवडे काढलेले आहेत ते सुध्दा आम्ही विधेयकाच्या वेळेस मांडणार आहोत व त्यावेळेस हक्कभंग सादर करण्यात येईल. शासन म्हणून शासनाची काही जबाबदारी आहे की, नाही ? केवळ सभागृहात यायचे आणि मुळमुळीत उत्तर देऊन निघून जायचे हे काही बरोबर नाही. शासनाची काही जबाबदारी आहे की, नाही असे विचारल्यानंतर काल माननीय महसूल मंत्री श्री नारायण राणे असे म्हणून गेले की, "सीमा प्रश्नाच्या संदर्भात सर्व पक्षीय समिती असून त्यांच्या सूचनेनुसार आम्ही सर्व कामकाज करीत असतो." त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तराच्या संदर्भात माझा दावा आहे की, अशा प्रकारची सर्वपक्षीय समिती आज तरी अस्तित्वात नाही.

कर्नाटक सीमा प्रश्नाच्या संदर्भात केंद्रशासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन महाराष्ट्राच्या जनतेच्या भावना तीव्र झाल्या व त्यामुळेच या ठिकाणी ही चर्चा उपस्थित झालेली आहे. 4 नोव्हेंबर, 1996 च्या आदेशानुसार शिवसेनेचे युती शासन असतांना युती शासनाने सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखाली श्री. व्ही.टी.वालावलकर आणि श्री. वसंतराव भंडारे यांची समिती नेमलेली होती व हीच ख-या अर्थाने तज्ञांची समिती होती. आमचे सरकार गेल्यापासून आपण सत्तेच्या खुर्चीत बसलेला आहात. आपल्या दुकानावर मोजण्यासाठी कमी पडत होते त्यामुळे आमच्याकडील एक माणूस तुमच्याकडे मोजण्यासाठी, दुकानदारी करण्यासाठी पाठवून दिला आहे.

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

तुमच्याकडे धंदा करण्यासाठी माणसे पाठविल्यानंतर आमच्या तुमच्याकडून काही अपेक्षा आहेत. युती शासनाच्या काळात सीमा प्रश्नाच्या संदर्भात कायदेशीर बाजू तपासण्याकरिता समिती नेमली होती. ही समिती नंतर आपल्या कार्यकाळातही सुरु राहिली. त्यानंतर सीमा प्रश्नाबाबत व्यापक माहितगार असलेले व सदरहू प्रश्नावर कायद्याच्या दृष्टीने निष्णात असलेले असे जाणकार व विधि तज्ज्ञ यांची समिती गठीत करण्याचा निर्णय दि. 12 फेब्रुवारी 2003 रोजी मंत्रिमंडळाने पुन्हा घेतला. व त्यानुसार योग्य तो कायदेशीर सल्ला देण्यासाठी प्रा. एन.डी पाटील, ज्येष्ठ वकील ॲड. वसंतराव भांडारे व ज्येष्ठ वकील ॲड. व्ही.टी.वालावलकर यांची तज्ज्ञ समिती गठीत केली. या विषयाच्या संदर्भात श्री.एन.डी.पाटील हे रात्रंदिवस धडपडत असतात. महाराष्ट्राच्या वतीने ते सगळीकडे धावत असतात. वरील तिघांपैकी ॲड. भांडारे व ॲड. वालावलकर हे अनुभवी व निष्णांत कायदेपंडित असल्याबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती. मात्र प्रा. एन.डी.पाटील यांच्याजवळ वकिलीची पदवी किंवा वकिली व्यवसायाचा अनुभव नसतांनाही ते तज्ज्ञ कायदेपंडितांच्या समितीचे अध्यक्ष झाले. सीमा प्रश्नाचे माहितगार व जाणकार म्हणून प्रा. पाटील यांच्याबद्दल पूर्ण आदर बाळगूनही सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडणा-या ज्येष्ठ वकिलांना युक्तिवादाचे टाचण देऊन त्यांची पूर्व तयारी करुन घेण्याचे काम करणा-या तज्ज्ञ वकिलांच्या समितीचे अध्यक्षपद प्रा. एन.डी.पाटील यांना कसे काय देत येईल ? मॉनिटरींगच्या भूमिकेत श्री. एन.डी.पाटील काम करीत असतील तर आम्हाला त्यात आनंदच आहे.

समितीच्या भोंगळ कारभाराला कंटाळून ॲड.वालावलकर यांनी राजीनामा दिला. त्यानंतर ॲड. भांडारे यांना समितीच्या कामकाजातून वेळोवेळी डावलण्यात आले. त्यांनी याचिकेचा मसुदा तयार करण्यासाठी व अन्य कामकाजासाठी दोन सहाय्यक वकिलांची केलेली मागणीही फेटाळण्यात आली. दि.18 नोव्हेंबर, 2006 साली हे सर्व घडले.या कोअर ग्रुप मधून ही सर्व मंडळी बाहेर पडली. आपल्या चीफ सेक्रेटरींनी सांगितले श्री. भांडाकर यांच्याशिवाय कोणीही चांगले काम करु शकणार नाही म्हणून त्यांना तयार केले. त्यांच्यामध्ये काय वादविवाद असतील तर ते सीमा प्रश्नासाठी बाजूला ठेवले पाहिजे व महाराष्ट्र जिंकला पाहिजे अशी आपली सर्वांची भावना असली

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

पाहिजे. नंतर माननीय सुभाष देसाई हे भांडारकांना तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुश यांच्याकडे घेऊन गेले. त्यावेळी माननीय श्री.विलासराव देशमुख म्हणाले की, "वा वा हे खूप तज्ञ आहेत यांच्याशिवाय आपण काहीच करु शकत नाही." माननीय श्री. विलासराव देशमुख बोलले व नेहमी प्रमाणे ते विसरले. माननीय श्री. विलासराव देशमुखांकडे गेले की, ते खुषीत बोलतात आणि विसरुन जातात त्याप्रमाणे या विषयाच्या संदर्भात सुध्दा तसेच झाले.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ KGS/ जुन्नरे.... 11:10

श्री.दिवाकर रावते.....

समोर आलेल्या व्यक्तिशी फक्त गोड बोलायचे. आपणही खूश आणि ते ही खूश. हा गंभीर विषय आहे. मी येथे भांडारे यांची शिफारस करण्यासाठी उभा नाही. आज सर्वोच्च न्यायालयामध्ये महाराष्ट्राची बाजू कोण मांडत आहे. मी वकिलांबद्दल शंका घेत नाही. परंतु, काल श्री.जयंत प्र.पाटील म्हणाले की, ज्यांना शिवाजी महाराजांबद्दल तळमळ आहे, आत्मियता आहे, शिवाजी महाराज मनापासून माहिती आहेत असे वकील केस लढण्यासाठी असले पाहिजेत. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न ज्यांच्या अंगामध्ये मुरलेला आहे, जिरलेला आहे, जे चार पिढ्या लढत आहेत, ती माणसे तेथे लढण्यासाठी असली पाहिजेत. मराठीचा स्वाभिमान, अस्मिता ज्यांच्या अंगी आहे असा वकील कोर्टामध्ये असला पाहिजे. आता कोण आहे ? श्री.हरिश साळवे बद्दल माझे काहीही म्हणणे नाही. ते फार मोठे वकील आहेत. ते सध्या लंडनमध्ये वकिली करतात. ते या केससाठी किती वेळ देतील हे मला माहीत नाही. पण त्यांच्या वकिलीच्या ज्ञानाबद्दल दुमत नाही. ॲड.पराशर, ॲड.तिवारी, ॲड.अपराजित सिंग, ॲड.राजू रामचंद्रन अशी वकिलांची नावे आहेत. महाराष्ट्राच्या मातीतील वकीलच नाहीत. आता सन्माननीय सदस्य ॲड.गुरूनाथ कुलकर्णी उपस्थित नाहीत. पण वंदनाताई येथे उपस्थित आहेत. महाराष्ट्राच्या मातीतील वकील सीमा प्रश्न लढण्यासाठी मिळत नाही ही हास्यास्पद बाब आहे. विधि खात्याचे सन्माननीय मंत्री आल्यानंतर त्यांना विचारावे की, किती जुन्या वकिलांना घरी पाठविले ? नवीन किती वकील आणले, त्यातील नगर मधील किती आहेत ? ज्यांना प्रतिज्ञापत्र करता येत नाही असे वकील नेमले आहेत काय ? याचा देखील आपण शोध घ्यावा. नसेल तर आम्ही देऊ. आपल्या लोकांची वर्णी लावण्याकरिता असा प्रयत्न केला जात असेल तर हे अत्यंत गंभीर आहे. हे महाराष्ट्राच्या मूळावर येणारे आहे. वेळ पडली तर नावे पण देऊ. महाराष्ट्राच्या इज्जतीकरिता, इभ्रतीकरिता, अस्मितेकरिता कायदेशीर लढे लढायचे असतात. मी जी नावे सांगितली आहेत ते वकील कोणत्या पद्धतीने महाराष्ट्राचा लढा लढणार आहेत ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

हे चार वकील कोण आहेत ? ते महाराष्ट्राच्या लढयासंबंधातील माहिती मुख्य वकिलांना देणार. म्हणजे हे वकील वाचून त्यांना सांगणार. मग त्यांना महाराष्ट्राचा लढा आत्मसात होणार. आज कोर्टामध्ये अशी परिस्थिती आहे की, सुनावणीच्या वेळी कर्नाटक राज्याचे 8 ते 10 वकील अधिकाऱ्यांसह उपस्थित असतात. महाराष्ट्रातर्फे फक्त एकच वकील उभा असतो. एकही अधिकारी कोर्टात उपस्थित नसतो. हे सत्य आहे. मी आरोप करीत नाही. या लढ्याची एवढी आबाळ करीत आहात. मी टीका करण्यासाठी उभा नाही. आपल्या सर्वांना एकत्र लढायचे असेल तर लढावू वृत्तीने लढले पाहिजे. लढावू वृत्ती ही महाराष्ट्राची शान आहे.

आज कुठलीही कमिटी अस्तित्त्वात नाही. मला खात्री आहे की, कुठलीही सर्वपक्षीय कमिटी नाही. मी माझ्या पक्षातील नेत्यांना विचारले. त्यांनी सांगितले की, आम्ही कुठल्याही कमिटीमध्ये नाही. अन्य पक्षांचे मला काही माहिती नाही. प्रत्येक वेळी हा विषय असतो. माझे भाष्य थांबवत असताना असे म्हणेन की, जे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे, ते महाराष्ट्राचे घात करणारे आहे. महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसणारे आहे. महाराष्ट्राचा द्वेष करणारे आहे. त्यावेळच्या नेत्यांनी भाषावर विचार केला पाहिजे असा विचार मांडलेला असताना भाषा हा विषय असू शकत नाही असे प्रतिज्ञापत्र दाखल झाले असेल तर चार पिढ्यांची कॉंग्रेस मेली आहे आणि नवीन अविचारी कॉंग्रेस निर्माण झाली आहे काय असा प्रश्न निर्माण होतो. यासाठी आपणा सर्वांना प्रबळपणाने विरोध करावा लागेल. काल बेळगावमध्ये शांतता मोर्च्यावर कर्नाटक सरकारने पाशवी हल्ला आणि अत्याचार केला. त्याचा तीव्र निषेध करतो. हा निषेध करीत असताना माननीय मुख्यमंत्र्यांना नम्र विनंती करतो की, आपण उत्तर दिल्यानंतर अशा प्रकारचा निषेधाचा ठराव मांडणे आवश्यक आहे. तो एकमुखाने या विधान परिषदेमध्ये संमत झाला पाहिजे. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

....................

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/ 11:15

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सीमा प्रश्नाच्या संदर्भात चर्चा करण्याकरिता याठिकाणी प्रस्ताव मांडला आहे. त्या संदर्भात याठिकाणी माझे मत व्यक्त करीत असतांना एका वर्तमानपत्रामध्ये "सीमा प्रश्न दावा कलम 131" या कलमाखाली जे मत व्यक्त करण्यात आले आहे त्याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. याठिकाणी असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र सीमा प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे सबळ कारण असल्याचे चंद्रचूड समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांच्या कायदेशीर हक्काच्या प्रस्थापनेसाठी घटनेच्या 131 कलमानुसार भारत सरकार व कर्नाटक सरकार यांच्याविरुध्द दावा दाखल करावा असे मत या समितीने व्यक्त केले आहे. भारताचे सरन्यायाधीश श्री. यशवंत चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने घटनेच्या 132 कलमाखाली सर्वोच्च न्यायालयात विनंती अर्ज दाखल करणे ही औचित्याची बाब नाही असे म्हटले आहे. या 132 कलमामध्ये केवळ मूलभूत हक्काच्या अंमलबजावणीच्या उपाय योजनेची तरतूद आहे. सीमा वादामध्ये कोणत्याही मूलभूत हक्कांचे उल्लंघन अंतर्भूत नाही. याकडे समितीने लक्ष वेधले. समितीमध्ये व्ही.टी. वालावलकर व व्ही.आर. भंडारे हे अन्य दोन कायदेपंडीत असून या दोघांची आता राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यासंदर्भात नियुक्त केलेल्या त्रिसदस्य समितीमध्ये फेरनियुक्ती केली." याठिकाणी पुढे म्हटलेले महत्वाचे आहे. "कलम 3 अन्वये अशाप्रकारचा दावा करण्यासाठी कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नाही" असे याठिकाणी म्हटलेले आहे. महाराष्ट्र शासनाने कलम 131 खाली सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत सीमा प्रश्न मिटावा, महाराष्ट्र व कर्नाटकचा हा प्रश्न मिटावा अशाप्रकारची हा दावा दाखल करण्यामागील महाराष्ट्र शासनाची भूमिका आहे. खरे म्हणजे केंद्र शासनाची कलम 3 प्रमाणे यामध्ये जबाबदारी असली तरी दोन राज्यांमध्ये सीमा प्रश्न निर्माण झाला असेल तर त्या दोन्ही राज्यांना विश्वासात घेऊन तो प्रश्न केंद्र शासनाने सोडवावयाचा आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु तरीही कलम 131 प्रमाणे सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यामध्ये महाराष्ट्र शासनाने चूक केली आहे असे आपल्याला वाटत नाही. फक्त त्यासंदर्भात महाराष्ट्राचे नेते, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांनी सर्व पक्षाच्या लोकांना विश्वासात घेऊन एकत्रितरित्या महाराष्ट्र शासनाची भूमिका सर्वोच्च न्यायालयामध्ये आणि केंद्र शासनाकडे भक्कमपणे मांडणे गरजेचे आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

सभापती महोदय, याठिकाणी साप्ताहिक "सप्तरंग" मध्ये "पुनश्च संयुक्त महाराष्ट्र" अशाप्रकारचे शीर्षक असलेले वृत्त छापून आले आहे. यामध्ये लेखकांनी काही गोष्टींची आपल्याला आठवण करुन दिली आहे. त्यामध्ये बेळगाव सीमा प्रश्न संक्षिप्त स्वरुपामध्ये त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, "राज्य पुनर्रचना कायदा 1956 अन्वये बेळगाव जिल्हा तत्कालीन म्हैसूर राज्यामध्ये समाविष्ट करण्यात आला. मात्र त्याहीवेळी बेळगाव हा मराठीबहुल आहे याकडे महाराष्ट्राने लक्ष वेधले होते. या प्रश्नामध्ये लक्ष घालण्यासाठी 5 जून 1960 रोजी केंद्र सरकारने तत्कालीन चार जणांची समिती गठीत करण्यात आली होती. बेळगाव सीमा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे तृतीय न्यायमूर्ती मेहेरचंद महाजन यांच्या अध्यक्षतेखाली 25 ऑक्टोबर 1966 रोजी महाजन आयोग स्थापन करण्यात आला होता. बेळगाव वगळून इतर गावे महाराष्ट्रामध्ये घ्यावीत असे महाजन आयोगाने सुचविले. त्यावेळी महाराष्ट्राने बेळगावची आग्रही मागणी केली असता महाजन आयोगाची अंमलबजावणी करण्यासाठी कर्नाटक सरकारने दबाव आणला. बेळगावमधील मराठी भाषिक जनतेच्या सुरक्षिततेबाबत आणि सीमा प्रश्नाबाबत चिंता व्यक्त करणारी एक याचिका महाराष्ट्र सरकारने 15 मार्च 2006 रोजी सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केली. या संदर्भात केंद्र सरकारने जे शपथपत्र दिले आहे त्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अत्यंत तीव्र स्वरुपाचा संताप उमटला आहे याबद्दल वाद नाही. एक बाब निश्चित आहे की, ज्या पध्दतीने आपण संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लढविली, कै.यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आपण संयुक्त महाराष्ट्र स्थापन केला. पं. जवाहरलाल नेहरु यांच्या विषयी या सभागृहामध्ये अनादराची भावना व्यक्त होणे बरोबर नाही. याचे कारण देशाच्या स्वातंत्र्याप्रती इंग्रजांच्याविरुध्द ज्यांनी लढे दिले आहेत त्यामध्ये पं. जवाहरलाल नेहरु आणि त्यांच्या संपूर्ण घराण्यांचा जो काही त्याग आहे, त्याविषयीचा सन्मान या सभागृहामध्ये राखला गेला पाहिजे. त्यांच्याविषयी अनादराची भूमिका असू नये. त्यावेळी कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या संदर्भात कै.यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आपण लढा उभा केला होता. आपण संयुक्त महाराष्ट्र मिळविला. परंतु मराठी बहुल....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कै. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे नेतृत्व कधीही केले नाही तर त्यांनी केवळ महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेतली. माननीय सदस्यांच्या चुकीच्या वक्तव्याची नोंद सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये होता कामा नये अशी माझी विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : परंतु संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश कै. यशवंतराव चव्हाण यांनी आणला, आणि तो कलश पं. जवाहरलाल नेहरु यांनी त्यांना दिला.  कोणताही इतिहास मांडीत असतांना तो अर्धवट माहितीवर आधारीत मांडला जाऊ नये.

(यानंतर श्रीमती थोरात)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (बसून) : 105 हुतात्मे झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश दिला यामध्ये काही मेहरबानी केलेली नाही.

ॲड. उषा दराडे : 105 हुतात्मे झालेले आहेत त्यांच्या हौतात्म्या विषयी कुठलाही संशय नाही.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदस, विरोधी पक्षातील सन्मानीय सदस्य भाषण करीत असताना सत्ताधारी पक्षातील कोणाही सन्माननीय सदस्यांनी त्यामध्ये व्यत्यय आणलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी या ठिकाणी जी काही विधाने केलेली आहेत ती फार आक्षेपार्ह आहेत तरी सुध्दा आम्ही ऐकून घेतले. उत्तराच्या भाषणात जरुर त्याबाबतचा खुलासा करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे बसून काही तरी बोलत आहेत. सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील सन्मानीय सदस्यांना बोलू दिले पाहिजे. अशा प्रकारे चूकीच्या पध्दतीने हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, 105 जणांचे हौतात्म्ये झाल्या नंतर त्यांच्या विषयी नतमस्तक होण्याची भूमिका या सभागृहाने आणि संपूर्ण महाराष्ट्राने ठेवलेली आहे. हौतात्म्ये झाले हे कोणीही नाकारु शकत नाही. संयुक्त महाराष्ट्राची चळवळच काय पण या जगातील कुठलाही लढा चळवळीशिवाय पूर्ण झालेला नाही. त्या सर्व लढयांविषयी माझी सन्मानाची भूमिका असेल आणि ती या सभागृहाचीही सुध्दा असेल. परंतु याचा अर्थ चळवळीचा सन्मान करत असताना कोणाचा अनादर करु नये याकडेही आपल्याला लक्ष देण्याची गरज आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये निश्चितच नेहरु घराण्याचे योगदान या देशासाठी मोठे आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये कामगारांनी लढा दिला. शेतकऱ्यांनी लढा दिला. सर्व डाव्या विचारांच्या पक्षांनी लढा दिला. त्यांचे योगदान कोणीही नाकारु शकत नाही. तो इतिहास आहे. परंतु श्री. यशवंतराव चव्हाणांनी मंगल कलश आणला ही गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही. यासंदर्भात आज भाजपची वेगळी भूमिका आहे. भाजप आज कर्नाटकात वेगळी भूमिका घेत आहे आणि महाराष्ट्रात वेगळी भूमिका घेत आहे. याचीही दखल घेण्याची गरज आहे. याचा अर्थ आपण आपसात भांडत बसण्यात काही अर्थ नाही. या महाराष्ट्रातील सर्व पक्षांची भूमिका बेळगाव, कारवार आणि सर्व मराठी बहुल भाषिक प्रदेश महाराष्ट्राला मिळाला पाहिजे अशा प्रकारची आहे. तेव्हा या संपूर्ण सभागृहाने आणि संपूर्ण

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

महाराष्ट्राने या संदर्भात एक मोठी चळवळ उभी करुन महाराष्ट्र शासनाच्या पाठीशी स्वत:चा खंबीर पाठिंबा उभा करावा. ज्यायोग्य महाराष्ट्र शासन केंद्र सरकारमध्ये आणि सर्वोच्च न्यायालयात आपली भूमिका चांगल्या पध्दतीने मांडू शकेल. ज्याची दखल केंद्र सरकारला घ्यावी लागेल. ज्याची दखल सर्वोच्च न्यायालयाला घ्यावी लागेल. सभापती महोदय, ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी एके ठिकाणी स्वत:चे मत व्यक्त केलेले आहे त्यांनी असे म्हटलेले आहे की,"न्यायालयात जाण्याची आवश्यकता नव्हती. केंद्र सरकारने निकाली काढण्याचा हा प्रश्न आहे." पण आता तो प्रश्न जर आणि तरचा झालेला आहे. आता शासन न्यायालयात गेलेले आहे. केंद्र सरकारने फेर प्रतिज्ञापत्र दाखल करण्याच्या दृष्टिकोनातून काय करता येईल आणि कुठल्याही परिस्थितीत हा मराठी बहुल प्रदेश महाराष्ट्राला कसा मिळेल यासाठी महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात स्वत:चे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र सरकारला भाग पाडावे आणि यासंदर्भात महाराष्ट्रातील संपूर्ण विरोधी पक्षांनी शासनाबरोबर रहावे आणि हा प्रश्न मार्गी काढावा. त्या दृष्टीने जे प्रयत्न करायचे असतील त्यासाठी पुन्हा महाराष्ट्रात एक संयुक्त चळवळ उभी करावी लागली तरी हरकत नाही. सर्व पक्षांनी मिळून केंद्र सरकारवर जेवढे प्रेशर आणता येईल तेवढे आणण्याचा प्रयत्न करावा. या मध्ये राजकीय क्रटिसिझम महत्वाचा नाही. या विषयात आर्ग्युमेंट महत्वाची नाही तर कुठल्याही परिस्थितीत त्या भागात आज मराठी भाषिक लोकांवर जो अन्याय होत आहे त्यांचा हक्क डावलला जात आहे. त्यांना महाराष्ट्रात यायचे आहे. त्यांना महाराष्ट्रात स्वतंत्रपणे श्वास घ्यायचा आहे. यादृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. तेव्हा या संपूर्ण लढयासाठी महाराष्ट्राला जी किंमत द्यावी लागेल ती द्यावी आणि सर्वांनी एकत्र येऊन केंद्र सरकारच्या लक्षात आणून द्यावे. अशा प्रकाकरची भावना व्यक्त करुन मी आपली रजा घेते. धन्यवाद.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/ 11:25

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, कल से आज तक महाराष्ट्र कनार्टक सीमावाद के संदर्भ में केन्द्र शासन द्वारा सुप्रिम कोर्ट में दायर शपथपत्र के बारे में काफी चर्चा हुई है. महाराष्ट्र के किसी भी पक्ष के लोग हों, चाहे किसी भी क्षेत्र के लोग हों, चाहे विदर्भ के बिल्कुल आखिरी जिले के लोग हों, इन सभी की भावनाएं सीमा विवाद पर मराठी भाषी लोगों के साथ हैं. हमारे माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटिल और श्री. दिवाकर रावते ने अपने भाषण में सही बात रखी है, लेकिन ऐसा करते समय वे पॉलिटिकल और हिस्टोरीकल बॅक ग्राउन्ड में चले गए.

सभापति महोदय, हमें यह बात माननी चाहिए कि यह दो राज्यों के बीच का सीमा विवाद है, यह कोई हिन्दुस्तान और पड़ोसी राज्य के बीच का सीमा विवाद नहीं है. यह हमारे देश के दो राज्यों के बीच का सीमा विवाद है, इसलिए भावनात्मक रूप से इसका समाधान ढूंढना संभव नहीं है. पिछले 50 साल में इस विषय का समाधान नहीं निकल सका है. कल महाराष्ट्र की बस में बैठे हुए यात्रियों के साथ कनार्टक में कुछ घटना हुई और उसके बाद महाराष्ट्र में भी ऐसा कुछ हुआ है. मेरा सभी माननीय सदस्यों से एक ही अनुरोध है कि इस विषय को हल करने के लिए भावनात्मक रुप से बहुत से लोगों ने संघर्ष किया है, लेकिन उसका परिणाम हम सब को मालूम है. मैं माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटिल से कहना चाहता हूँ कि किसी एक व्यक्ति ने क्या लिखा, उसके आधार पर आप 125 साल पुरानी कॉंग्रेस पार्टी के योगदान को नकार नहीं सकते हैं. देश को आजादी कॉंग्रेस पार्टी ने दिलवाई है. देश को आजादी मिलने से पहले अंग्रेजों ने इस देश को बांटकर रखा था. कॉंग्रेस पार्टी ने पूरे देश को एकजुट किया. पूरे देश में शासन प्रणाली अच्छी तरह से चले, इसके लिए भारतीय संविधान के अन्तर्गत कई राज्यों का गठन हुआ. भाषा के आधार पर कई राज्यों का पुनर्गठन हुआ. आज जो विषय हमारे सामने है, वह कॉन्स्टिट्यूशनल इन्टरप्रिटेशन का है. इस बारे में महाराष्ट्र शासन ने अपने कर्तव्य पालन में एक दिन की भी देरी नहीं की. केन्द्र शासन ने सुप्रिम कोर्ट में जो शपथपत्र दाखिल किया है, उससे पूरे महाराष्ट्र में एक गलत भावना फैली है और इस बात से हमें भी दुख हुआ है. केन्द्र शासन ने सुप्रिम कोर्ट में जिस तरह का शपथपत्र दाखिल किया है, उससे ऐसा लगता है कि मानो केन्द्र शासन ने जजमेंट पास कर दिया हो. जबकि जजमेंट देने का काम सुप्रिमकोर्ट का है. केन्द्र शासन ने अपने शपथपत्र में लिखा है कि प्रदेशों का पुनर्गठन करते समय और सीमा विवाद का

. . . L-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

निपटारा करते समय अन्य विषयों के साथ भाषा भी एक आधार हो सकता है. इससे ऐसा लगता है कि केन्द्र शासन ने जजमेंट दे दिया कि महाराष्ट्र का कोई क्लेम ही नहीं है. 1960 में स्टेट रिआगर्नाइजेशन कमीशन के द्वारा भाषा के आधार पर राज्यों का पुनर्गठन किया गया है. जबकि केन्द्र शासन ने अपने शपथपत्र में कहा है कि भाषा के साथ और भी बहुत सारे विषय हैं. मैं केन्द्र शासन के शपथपत्र के बारे में इससे अधिक और कुछ नहीं कहना चाहता हूँ, क्योंकि यह शपथपत्र मुझे पढ़ने को नहीं मिला है. अगर हमें उसकी कॉपी उपलब्ध कराई जाएगी तो उसे पढ़कर हम और अच्छी तरह से अपनी राय दे सकते हैं. केन्द्रीय सरकार ने यह निष्कर्ष कैसे निकाला कि महाराष्ट्र का क्लेम ही नहीं है. इसमें बेलगांव शहर और 4 जिले के लोगों की भावनाएं जुड़ी हुई हैं और एक शपथपत्र से इसको समाप्त नहीं किया जा सकता है.

,. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा....

इसलिए महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमेटी के अध्यक्ष श्री माणिकराव ठाकरे ने तुरन्त माननीया सोनिया गांधी को चिट्ठी लिखकर तीव्र भावना व्यक्त की है. मैं इस संबंध में माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे जी का अभिनंदन करना चाहता हूं. इसके साथ ही साथ महाराष्ट्र शासरन ने भी तुरंत कार्यवाही शुरु की और कल ही महाराष्ट्र सरकार की ओर से सुप्रिम कोर्ट में लीगल सूट दाखिल की गई है. एक अमेंडमेंट पेश की गई जो सुप्रिम कोर्ट ने मान ली है. सुप्रिम कोर्ट ने एडिशनल ग्राउण्ड देने के लिए चार सप्ताह का समय दिया है. अगर सरकार एडिशनल ग्राउण्ड देना चाहती है तो दे सकती है. इस तरह से कर्नाटक सरकार को भी उत्तर दिया है. इसलिए मैं यह कहना चाहता हूं, जैसा कि विरोधी पक्ष के साथियों ने और सम्माननीय सदस्या श्रीमती दराडे ने भी कहा है कि एक संयुक्त समिति बनाई जाए जिसमें वकील भी हो. वकीलों की इण्टेग्रिटी पर संदेह करना ठीक नहीं होगा. उनकी अपनी प्रोफेशनल एथिक है. वे किसी राज्य के है इसलिए उनकी इण्टेग्रिटी के प्रति संदेह करना ठीक नहीं है.

श्री दिवाकर रावते : आपको गलतफहमी हो गई है. हमने किसी वकील के प्रति संदेह व्यक्त नहीं किया है. हमने यह कहा है कि सालवे साहब को इन्फर्मेशन देने के लिए चुना गया है, कानूनी लड़ाई लड़ने के लिए नहीं चुना है.

श्री सय्यद ज़मा : मैं मराठी अच्छी तरह से समझ लेता हूं. लेकिन बोल नहीं सकता.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्यांना मराठी भाषा समजत नाही त्यांना विधिमंडळामध्ये बसण्याचा अधिकार आहे काय, मला मराठी भाषा बोलता येत नाही असे सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जामा हे उघडपणे मान्य करीत आहेत. मग मराठीच्या नावाने येथे कशाला बोंबा मारता ?

श्री.सय्यद ज़मा :मैं सम्माननीय सदस्य श्री रावते जी का सम्मान करता हूं. मुझे जरा अनऑफिशियली बोलने का मौका दिया जाए....

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बोलत असताना 'बोंबा' असा शब्दप्रयोग केला आहे. 'बोंबा' हा शब्द कामकाजातून काढून टाकावा.

श्री.दिवाकर रावते : 'बोंबा' हा अस्सल मराठी शब्द आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद ज़मा : 'बोंबा' हा अस्सल मराठी शब्द आहे की नाही, इस संबंध में माननीय सभापती निर्णय लेंगे. " बोंब मारना " मराठी शब्द है ये मुझे मालूम नहीं है. सॉरी. मुझे मराठी भाषा बोलना आना चाहिए, यह बात सही है. मराठी भाषा प्यारी भाषा है, स्वीट भाषा है. मुझे मराठी भाषा का गर्व है. मैं यह बताना चाहता हूं कि मैं इस देश का सम्मानित नागरिक हूं. मैं 41 साल पहले बिहार से नागपुर में कोयला खदान में नौकरी करने के लिए आया था. उस समय महाराष्ट्र राज्य बने 9 साल हो गए थे. इस प्रकार से महाराष्ट्र मेरी कर्म भूमि है. इसलिए मुझे मराठी भाषा के बारे में सम्मान है, गर्व है. जब मैं नागपुर में आया तो मुझे पृथक विदर्भ के आंदोलन के बारे में पता चला. मैं विदर्भ में रहता हूं इसलिए कट्टर विदर्भवादी हूं. यह कहा जाता है कि विदर्भ के बारे में कॉंग्रेस डबल स्टेण्डर्ड करती है, कॉंग्रेस पार्टी ने पृथक विदर्भ की मांग नहीं मानी है. लेकिन मैं यह नहीं मानता. हम अपने नेताओं से लड़ रहे हैं कि पहले विदर्भ को समर्थन दो.

सभापति महोदय, मैं यह कह रहा था कि मराठी भाषा न बोल पाने का मुझे खेद है. चूंकि मैं खदान में नौकरी करता था इसलिए मुझे मराठी सीखने का समय ही नहीं मिला. मैं यह अर्ज कर रहा था कि हमारे सम्माननीय साथियों ने और सम्माननीया श्रीमती दराडे जी ने जैसा कहा कि महाराष्ट्र-कर्नाटक सीमा विवाद हल करने के लिए एक संयुक्त समिति गठित करनी चाहिए, जिसमें वकीलों का भी समावेश हो. वकीलों की अपनी प्रोफशनल एथिक पर हम शंका नहीं कर सकते हैं. कर्नाटक के वकील श्री नरीमन साहब सम्माननित व्यक्ति है. महाराष्ट्र के किसी नेता को इस संबंध में कोई सुझाव देना है, कोई लीगल सुझाव देना चाहते हैं तो वे लिए जाए. माननीय मुख्यमंत्री जी से मैं अनुरोध करुंगा कि महाराष्ट्र के पक्ष में सारी बातें कोर्ट के सामने रखी जाती है या नहीं, वह देखें और ट्रांसपरेंसी से काम करें. अच्छे वकील अपने सुझाव देना चाहते हैं तो उनके सुझाव स्वीकार किए जाए. संयुक्त समिति बनाना जरुरी हो तो वह बनाई जाए. सुप्रीम कोर्ट ने 4 सप्ताह का समय दिया है. महाराष्ट्र सरकार अपना क्लेम पूरी तरह से स्थापित करें. महाजन आयोग ने महाराष्ट्र पर अन्याय किया है. इस बात को सुप्रीम कोर्ट में रखने के लिए महाराष्ट्र सरकार जो भी करना चाहती है वह जरुर करें. यह केवल विपक्ष का सवाल नहीं है बल्कि महाराष्ट्र की सारी जनता का, मराठी भाषियों की अस्मिता का सवाल है. महाराष्ट्र शासन ने उचित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कदम उठाया है. महाराष्ट्र  शासन  सुप्रीम  कोर्ट में अपना पक्ष मजबूती से रखकर कानूनी लड़ाई ईमानदारी और ट्रांसपरेंसी के साथ लड़ेगी, ऐसा मुझे विश्वास है. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

यानंतर श्री शिगम

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : 11.45 वाजता ही चर्चा आपल्याला संपवायची आहे. त्या दृष्टीने मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सन्माननीय सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा जवळ जवळ 1956 सालापासून सुरु आहे. या सर्व कालावधीमध्ये वारंवार सीमा भागातील मराठी भाषिकांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार सर्व ठिकाणी चालू आहे. सुरुवातीलाच मी केन्द्र सरकारचा निषेध व्यक्त करतो. मराठी माणसाच्या भावना समजून न घेता बेळगाव, गुलबर्गा आणि बिदर या तीन जिल्ह्यातील एकूण 865 मराठी बहुल गावे ही कर्नाटकची गावे आहेत अशा प्रकारचे जे प्रतिज्ञापत्र केन्द्र सरकारने दिलेले आहे त्याचा मी निषेध व्यक्त करतो. केन्द्र सरकारच्या या प्रतिज्ञापत्रावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी सीमा भागातील जे लाखो मराठी भाषिक रस्त्यावर उतरले होते त्यांच्यावर कर्नाटक सरकारने अमानुष लाठी हल्ला केला त्या लाठी हल्ल्याचा मी निषेध करतो. कर्नाटकमध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे आणि ते मराठी भाषिकांवर अन्याय करीत आहे असे वारंवार या सभागृहामध्ये बोलले गेले. भारतीय जनता पार्टी ही दुटप्पी भूमिका घेणारी नसल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी वारंवार कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे की, अशा प्रकारे मराठी भाषिकांवर होणारा अन्याय आम्ही सहन करणार नाही. म्हणून काल आंदोलकांवर जो अमानुष लाठीमार कर्नाटक सरकारकडून करण्यात आला त्याचा मी निषेध करतो. ही वेळ, ही परिस्थिती केन्द्र सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने आणलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे झाली. इतक्या वर्षात पहिल्यांदा कर्नाटकमध्ये बिगर काँग्रेसचे म्हणजे भारतीय जनता पार्टीचे सरकार आलेले आहे. हे सरकार येऊन दोन-तीन वर्षे झालेली आहेत. एक स्थिती अशी होती की, केन्द्रामध्ये काँग्रेसचे सरकार होते. महाराष्ट्रामध्ये काँग्रेसचे सरकार होते आणि कर्नाटकमध्येही काँग्रेसचे सरकार होते. त्यावेळी हा प्रश्न सुटण्यास काहीच अडचण नव्हती. तर आता कर्नाटकमध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार असताना मराठी भाषिकावर अन्याय होतो असे म्हणून भारतीय जनता पार्टीच्या बाबतीत आरडाओरडा करण्यात काही अर्थ नाही. कर्नाटक सरकार जे काही करीत आहे ते निषेधार्हच आहे. परंतु जेव्हा तीनही ठिकाणी काँग्रेसची सरकारे होती त्यावेळी काँग्रेसने हा प्रश्न का सोडवला नाही ? काँग्रेसला असा कुठलाही प्रश्न सोडवायचा नसतो तर त्याचे भिजत घोंगडे ठेवायचे असते.

मी कोल्हापूर जिल्ह्यातील अतिशय छोट्या गावामध्ये राहाणारा आहे. माझे आजोळ सीमा भागातील आहे. निपाणीमध्ये माझे एक मामा आहेत. मचिवड्यामध्ये एक मावशी आहे. चिकुडीला

..3..



MSS/ SBT/ KTG/ 11:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. चंद्रकांत पाटील...

एक मामा आहे. त्यावेळी सुट्टीमध्ये जेव्हा आम्ही आमच्या आजोळला जात होतो त्यावेळी असे वाटायचे की जणूकाही आम्ही दुस-या देशामध्ये चाललो आहोत. जेथे महाराष्ट्र-कर्नाटकची सीमा सुरु होते त्याठिकाणी असे वाटायचे. त्याठिकाणी मराठी माणसाला दुय्यम भूमिकेतून वागविले जाते. त्या भागातील मराठी भाषिकांवर कानडीची सक्ती केली जाते. ही गावे महाराष्ट्रात असावीत की कर्नाटकात असावीत यापेक्षाही कर्नाटकामध्ये राहून जर मराठी माणसे सुखी राहाणार असतील, त्यांच्या भाषेवर अन्याय होणार नसेल, त्यांच्या अस्मितेला ठेच पोहोचणार नसेल तर त्यांनी कर्नाटकात रहायचे की महाराष्ट्रात राहायचे हा विषय होणार नाही. त्या ठिकाणी अतिशय भीषण वागणूक दिली जाते. मग दुकानावरच्या पाट्या काढण्याचा विषय असेल, एस.टी.वरच्या पाट्या काढण्याचा विषय असेल किंवा शाळांमधून कन्नड भाषा शिकण्याची सक्ती असेल अथवा सरकारी नोक-यांमध्ये सर्व ठिकाणी कन्नड भाषेला प्राधान्य असेल आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ज्याला आपण बॉडी लँग्वेज म्हणतो त्यामधून दुय्यम नागरिकासारखी वागणूक तेथील मराठी भाषिकाला अनुभवायला मिळते. आर्थिक स्थिती अतिशय चांगली असणारा असा हा आंदोलनकर्ता नाही. सर्वसामान्य माणूस 1956 पासून तग धरुन आंदोलन करीत आहे. त्याला सर्व असह्य झाल्यामुळेच तो संघर्षाला सामोरा जात आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील........

वारंवार अनेक सीमा परिषदा कोल्हापूरमध्ये झाल्या. त्या परिषदांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील तर कधी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ हे उपस्थित राहिले होते. त्यांनी या प्रश्नासंबंधी लोकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. हा एक निकराचा लढा आहे असे सांगितले गेले. दोन वर्षापूर्वी पाच हजाराच्या संख्येने सीमा भागातील मराठी बांधव कोल्हापूरमधील केशवराव भोसले नाट्यगृहामध्ये परिषदेसाठी जमले होते. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ हे त्यावेळी उपस्थित होते. या प्रश्नावर महाराष्ट्रातील सर्व आमदार आणि खासदारांनी मिळून राजीनामे देऊ असे त्यांनी जाहीर केले. मी त्या सभेत ताडकन उठून म्हणालो की, माझ्या आमदारकीच्या राजीनाम्यापासून सुरुवात करतो. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मला सांगितले की, अशा गोष्टी फक्त सभेत मांडायच्या असतात. वेळ आल्यावर बघू. किती वेळ आपण हा अन्याय सहन करायचा? आपण अनेकदा स्व.सी.डी.देशमुख यांच्या राजीनाम्याचा दाखला देतो. त्यांनी बाणेदारपणा दाखविला व अन्यायाबद्दल आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. काँग्रेस पक्षाला हा इतिहास जाणवत असेल. महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली जे शिष्टमंडळ माननीय पंतप्रधानांच्या भेटीसाठी दिल्लीला जाणार आहे त्या भेटीच्या वेळी हे ठासून सांगण्याची आवश्यकता आहे की, महाराष्ट्राबद्दल सातत्याने दुजाभाव दाखविला जातो. महाराष्ट्रातील मराठी माणसे आता स्वस्थ बसणार नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत भारतीय जनता पक्ष, शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षासहित शिष्टमंडळात जे जे लोकप्रतिनिधी सहभागी होणार आहेत त्यांनी केंद्र सरकारला हे सांगितले पाहिजे की, हा प्रश्न सुटला नाही तर आम्ही सगळे मिळून राजीनामे देऊ.

सभापती महोदय, आंध्रप्रदेशमध्ये तेलंगणा राज्य निर्माण व्हावे म्हणून आंदोलन झाले. त्या भागातील आमदारांनी एकत्रितपणे राजीनामे सादर केले. ताबडतोब केंद्र सरकारने तेलंगणा राज्य निर्माण करण्याची घोषणा केली. केंद्र सरकारच्या या घोषणेनंतर आंध्रप्रदेश राज्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी तेलंगणा राज्याच्या निर्मितीला विरोध केल्याबरोबर एका दिवसात केंद्र सरकारने जाहीर केलेला आपला निर्णय रद्द केला. विरोध झाल्याबरोबर केंद्र सरकार एका दिवसात निर्णय रद्द करु शकते. म्हणून आम्ही सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी रस्त्यावर आलो, पक्ष बाजूला ठेवून मराठी माणसांच्या बाजूने उभे राहिलो तर हा प्रश्न फार काळ तग धरणार नाही. महाराष्ट्रातील सर्व आमदारांनी राजीनामे देऊन आम्ही महाराष्ट्राच्या बाजूने उभे आहोत हे दाखवून देण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. --------

..2..

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, यापूर्वीच्या वक्त्यांनी इतिहासात काय घडले याबद्दल उहापोह केला आहे. खरोखरच कर्नाटक राज्य सरकारची ही 865 गावे महाराष्ट्रात सामील करण्याची मानसिकता आहे का? हा प्रश्न महत्वाचा आहे. आज त्या भागात जो हिंसाचार चालू आहे तो शासन पुरस्कृत आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. आपल्या सर्वांना माहिती आहे की, 'कन्नड वेदिका' या नावाची एन.जी.ओ. त्या भागामध्ये काम करीत आहे. त्या संस्थेकडून प्रचंड प्रमाणात मराठी बांधवांना त्रास देण्याचे काम केले जाते. शिवसेना पक्षाचा संपर्क प्रमुख या नात्याने ज्या ज्यावेळी बेळगाव, निपाणी, धारवाड या भागात जायचा योग आला त्या त्यावेळी मी स्वत: हे अनुभवले आहे. मराठी बांधवांवर अत्याचार केले जात आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणुका असोत, आमदार किंवा खासदारकीच्या निवडणुका असोत, नगरसेवक पदाच्या निवडणुका असोत, प्रत्येक निवडणुकीत शिवसेना आणि इतर पक्षांच्या मराठी उमेदवारांचे फॉर्म कसे रद्द होतील याकडे त्या राज्याचे सातत्याने लक्ष असते. छोट्या छोट्या चुका काढून निवडणूक फॉर्म रद्दबातल ठरविले जातात. हा विषय केंद्र सरकारचा आहे. निवडणूक आयोगाकडे आम्ही वारंवार तक्रारी करुनही या विषयाबाबत लक्ष दिले जात नाही. म्हणूनच हे सर्व प्रकार शासन पुरस्कृत आहेत असे आमचे म्हणणे आहे. 8 फेब्रुवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून साजरा करण्यासाठी सीमा भागात जायचे असेल तर कर्नाटक राज्याच्या सीमेवर महाराष्ट्र राज्यात नोंदणी झालेले वाहन बदलावे लागते. कर्नाटक राज्यात नोंदणी झालेल्या वाहनातूनच त्या भागात जावे लागते. त्या भागामध्ये एस.आर.पी.च्या तीन-तीन प्लॅटून नेमलेल्या असतात. दंगल विरोधी पथकाची नेमणूक केली जाते. एका छोट्या गल्लीमध्ये हुतात्मा दिनाचा कार्यक्रम साजरा केला जातो. त्या भागाला लष्कराच्या छावणीचे स्वरुप आलेले असते. जणू काही अतिरेकीच हुतात्मा स्मारकाला पुष्पहार अर्पण करण्यासाठी येणार आहेत.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले.... 11:45

डॉ. दीपक सावंत ........

महोदय, मराठी माध्यमाच्या शाळा बंद होण्यासाठी कशा प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत हे सांगत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे की, या भागात डी.एड. च्या परीक्षेत मराठी मुलांचा फक्त दोन टक्के निकाल लावला जातो. यासंदर्भात आम्ही कर्नाटकच्या शिक्षणमंत्र्यांना भेटलो होतो तेव्हा त्यांनी आम्हाला सांगितले होते की, यावर आम्ही विचार करु. पण अजुनही या प्रश्नावर विचार झालेला दिसत नाही. केवळ दोन टक्केच मुले डी.एड. मध्ये पास होऊ शकतात ही अशक्य गोष्ट आहे. अशा प्रकारे ही एक प्रोसेस सुरु केली आहे ती म्हणजे orsenic poisoning intraspection. अशा प्रकारे जसे माणसाला हळुहळु मारले जाते त्याप्रमाणे तेथील मराठी भाषिक एक दिवस कंटाळून महाराष्ट्र राज्यात जाण्याचा नाद कसा सोडेल याकडेच ते शासन लक्ष देत आहे. आज या भागात बेळगांवपासून 16 किलोमीटर अंतरावर जवळपास 16 मोठ्या इंडस्ट्रीज आहेत पण त्यामध्ये युनियन करावयाचे म्हटले तरी त्याला परवानगी मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. आज त्या भागात भारतीय कामगार सेनेच्या फक्त तीनच ठिकाणी युनियन आहेत बाकीच्या ठिकाणी कुठलीही युनियन करायला देत नाही. या भागात वास्तविक 90 टक्के मराठी इंडस्ट्रीज आहेत पण त्यांना काय सोसावे लागते हे त्यांनाच माहीत. आजही आपण पाहिले तर 235 मराठी माध्यमाच्या शाळा आणि विद्यालये तेथे उपलब्ध आहेत. या भागात कार्यरत असलेली महाराष्ट्र एकीकरण समिती काय काम करते हे पाहिले तर दुर्दैवाने मला सांगावेसे वाटते की, या महाराष्ट्र एकीकरण समितीमध्ये सुध्दा दुफळी पडलेली आहे, एकी राहिलेली नाही. या समितीमध्ये एकी असती तर इतकी वर्षे या प्रश्नाचे घोंगडे भिजत पडले नसते, त्यांची तोंडे चारी दिशांना आहेत. त्यांना एकत्र करावयाचे म्हटले तर आपल्यामध्येच एकी नसेल तर काय लढणार हा प्रश्न आहे. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण या प्रश्नासाठी दिल्लीला जात आहात पण जोपर्यंत यासंबंधीचा निकाल लागत नाही तोपर्यंत निदान हा सीमाभागाचा प्रदेश केंद्रशासित तरी करावा एवढे तरी करुन घ्यावे. जेणेकरुन त्याला केंद्राचे नियम लागू होतील. अन्यथा असे अनेक ठराव विधानसभा आणि परिषदेत आणले तरी या प्रश्नाला न्याय मिळणार नाही. आणि एवढे प्रयत्न करुनही या प्रश्नाला न्याय मिळाला नाही तर त्यातला गरिमा कमी होईल म्हणून मला सांगावयाचे आहे की, हा प्रदेश निदान केंद्रशासित तरी कसा होईल यादृष्टीने तरी प्रयत्न करावेत. एवढे बोलून वेळेअभावी माझे भाषण संपवितो.

------

( ....2.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/

श्री. अशोक चव्हाण (मुख्य मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. या चर्चेत भागत घेत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी अत्यंत प्रखरतेने सीमावासियांविषयी आपल्या राज्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत. यातील काही राजकीय भाग बाजूला सारला तर सर्वांचीच भूमिका अशी आहे की, हा प्रश्न तातडीने सुटला पाहिजे आणि मराठी भाषिकांवर जो अन्याय होत आहे तो दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेच्या अनुषंगाने आपली बाजू शासनाच्या वतीने भक्कमपणे मांडण्यात येत आहेच. तसेच हा निकाल आपल्या बाजूने लागावा अशा प्रकारचा युक्तीवाद करण्याचाही आपण प्रयत्न करीत आहोत. पण त्याचबरोबर या परिसरात सध्या जी परिस्थिती निर्माण झालेली आहे या सगळ्या विषयांवर सखोल चर्चा या सदनात झालेली आहे. चर्चेच्या ओघाने सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी काही विषय देखील येथे उपस्थित केले. काही लोकांनी असे म्हटले की, आपल्यामध्येच एकी नाही. मला मुद्दाम येथे नमूद करावयाचे आहे की, हा राजकीय प्रश्न नाही किंवा राजकीय दृष्टीकोनातून याकडे पाहणेही योग्य नाही. त्यात काँग्रेस पक्षाने काय केले किंवा शिवसेनेने काय केले अशा प्रकारची चर्चा करणेही योग्य होणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

यासर्वांचे एक चित्र महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशात जाणार आहे. केवळ पक्षीय दृष्टिकोनातून क्रेडिट कोणी घ्यावे किंवा डिसक्रेडीट कोणाला करावे अशा पध्दतीने या चर्चेला रंग येणार असेल तर ते दुर्दैवाने फार चुकीच्या मार्गाने जात आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. त्यामुळे मला या चर्चेच्या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांना एवढीच विनंती करावयाची आहे की, कृपया या प्रश्नाला राजकीय बगल न देता मेरीटवर आपली भूमिका कशी योग्य आहे हे दाखवून दिले पाहिजे. मग ही भूमिका सर्वोच्च न्यायालयात असो किंवा केंद्रशासनाच्या समोर असो त्या पध्दतीनेच या प्रश्नाकडे आपण लक्ष दिले पाहिजे अशी मला सुरुवातीलाच आग्रहाची विनंती करावयाची आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, वर्षानुवर्षे केंद्रामध्ये काँग्रेसचे शासन आहे मग आपण या विषयाच्या संदर्भात काय केले ? केंद्रामध्ये आमचे शासन आहे ही वस्तुस्थिती आहे परंतु आपलेही शासन काही काळ केंद्रामध्ये होते त्यावेळेस आपल्या शासनाने हा विषय का सोडविला नाही असे मी म्हणणार नाही. परंतु 50 वर्षापासून प्रलंबित असणा-या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आम्ही प्रयत्न केलेले आहेत, शिष्ट मंडळ सुध्दा घेऊन गेलेलो आहोत व शेवटी आपण न्यायालयात गेलो ही वस्तुस्थिती आपल्याला विसरता येणार नाही. ज्यावेळेस या राज्याचे मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी होते व केंद्रामध्ये पंतप्रधानपदी श्री. वाजपेयी होते तेव्हा त्यांनी सुध्दा हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले होते हे आम्ही नाकारीत नाही. एक गोष्ट चांगली झालेली आहे की, महाराष्ट्राच्या वतीने काल सुप्रीम कोर्टात यासंदर्भातील अर्ज दाखल करुन घेतलेला आहे व त्यासंदर्भातील डिटेल रिप्लाय देण्यासाठी आपल्याला कालावधी वाढवून दिलेला आहे. केंद्रशासनाने आपली भूमिका आयएएल मध्ये व्यक्त केली होती व त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने जे भाष्य केले त्याबाबत महाराष्ट्रात तीव्र संताप व्यक्त केला गेला. केंद्रशासनाने असेही स्पष्ट भूमिका घेतली आहे की, आम्ही सन 2006 मध्ये जी भूमिका घेतली होती तीच आमची भूमिका कायम आहे व सर्वोच्च न्यायालयात यासंदर्भात अंतिम तोडगा निघावा अशा प्रकारची भूमिका केंद्रशासनाची आहे. केंद्र शासनाने कोणाची बाजू घेऊन ही भूमिका घेतली असे मी म्हणणार नाही. केंद्रशासनाची संपूर्ण भूमिका महाराष्ट्राच्या बाजूने होती असेही मी म्हणणार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

नाही. त्यामुळेच काल आपण सुप्रीम कोर्टात आपल्या वतीने अर्ज दाखल केलेला असून व त्या अनुषंगाने आपल्याला जो काही कालावधी देण्यात आलेला आहे त्याला आपल्या बाजूने पॉझीटीव्ह दिशा मिळते आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. सीमा भागातील 865 गावांवर आपला हक्क आहे अशी आपल्या सर्वांची भूमिका आहे. त्या ठिकाणी लोकशाहीच्या मार्गाने मोर्चे काढण्याचा प्रयत्न, आंदोलन करण्याचा प्रयत्न, निवेदन देण्याचा प्रयत्न झाला तरी त्या लोकांवर कर्नाटक सरकारकडून अमानुषपणे लाठी हल्ला होतो ही वस्तुस्थिती आहे. कालच श्री. एन.डी.पाटील यांनी त्या ठिकाणी मोर्चा काढला असता त्यांच्यावर सुध्दा लाठी हल्ला करण्यात आला होता. सीमा भागातील गावांची नावे बदलण्याचा सातत्याने कर्नाटक सरकारकडून प्रयत्न होत आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकांही लोकशाही मार्गाने न होऊ देता त्या मध्ये सुध्दा हस्तक्षेप करण्याची भूमिका कर्नाटक सरकारने स्वीकारली आहे. कर्नाटक सरकारची भूमिका निषेधार्ह आहे, चुकीची आहे त्यामुळे राज्य शासन सीमा भागातील जनतेवर कधीही अन्याय होऊ देणार नाही. महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात कडक भाषेत आपली भूमिका व्यक्त केलेली आहे. सीमा भागातील जनतेवर अन्याय होऊ देणार नाही यासंदर्भात राज्य शासनाने केंद्रशासनाकडे व कर्नाटक शासनाकडे आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. यासंदर्भात कर्नाटक सरकारच्या मुख्यमंत्र्यांकडे सीमा भागाच्या संदर्भात पत्रव्यवहार केलेला आहे. हा पत्रव्यवहार 1988,1998,2001,2002 केलेला आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांवर जो अन्याय सुरु आहे तो एका प्रकारे म्हाराष्ट्रावर अन्याय करणारा आहे याबाबत राज्य शासनाने केंद्रशासनाशी आणि कर्नाटक शासनाशी पत्र व्यवहार केलेला आहे. कर्नाटक सरकारची भूमिका कशी अयोग्य आहे हे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दाखवून दिलेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

माननीय पंतप्रधानांना सुद्धा सन 1998, 2002, 2008, 2009 मध्ये पत्र पाठवून आपण आपली भूमिका विषद केली आहे. स्टेट रिऑर्गनायझेशन कमिशन नेमला गेला. राज्य पुनर्रचना आयोगाच्या 1956 मधील शिफारशी नुसार बॉम्बे, महाराष्ट्र व म्हैसूर राज्याची स्थापना झाली. त्यावेळी शिफारशी केल्या गेल्या. बेळगाव, विजापूर, धारवाड व कारवारचा समावेश म्हैसूर राज्यात करण्यात आला. एकंदरीत जी काही पुनर्रचना करण्यात आली, ती चुकीची आहे, ही भावना आम्ही त्यावेळेस व्यक्त केली. ती भूमिका आम्ही सर्वोच्च न्यायालयामध्ये व्यक्त केली. महाजन आयोग नेमण्यात आला. महाजन आयोगाचा अहवाल आम्ही मान्य केला नाही. आपली मागणी 865 गावांची होती. पण महाजन आयोगाने निष्कर्ष काढला की, 264 गावांचा समावेश महाराष्ट्र राज्यामध्ये करावा व त्याप्रमाणे महाजन आयोगाने शिफारस केली. त्यामुळेच आम्ही महाजन आयोगाचा अहवाल स्वीकारला नाही. आमचा आजही दावा आहे की, 865 गावे महाराष्ट्रमध्ये असली पाहिजेत. मी ज्याअर्थी आज महाजन आयोगाचा उल्लेख करीत आहे, त्याअर्थी निश्चित मान्य करावे लागेल की, राज्य पुनर्रचना आयोगाचा निर्णय पूर्ण चुकला. ती गावे महाराष्ट्रात समाविष्ट केली असती तर आज हा प्रश्न निर्माण निर्माण झाला नसता. महाजन आयोग नेमले त्याअर्थी काही तरी चूक झाली आहे, हे स्पष्ट होते. ती चूक सुधारावी म्हणून महाजन आयोग नेमण्यात आला. आम्ही महाजन आयोगाचा अहवाल मान्य केलेला नाही. त्या दिशेने केंद्र शासनाची पावले पडावीत किंबहुना सर्वोच्च न्यायालयामध्येसुद्धा आमची अशीच भूमिका आहे. महाजन आयोग आपण नेमला. महाजन आयोगाने ज्या काही शिफारशी केल्या, त्याच्या अगेन्स्ट आमचा 865 गावांचा दावा आहे. राज्य पुनर्रचना आयोगाची काही तरी चूक झालेली आहे म्हणून महाजन आयोग नेमण्याची त्यावेळी भूमिका घेण्यात आली. जे सूत्र स्वीकारले गेले पाहिजे होते, ते स्वीकारले गेले नाही. त्या सूत्राप्रमाणे पुढचे झाले पाहिजे. अशी भूमिका आजही आमची आहे. सूत्रामध्ये आम्ही असे म्हटले आहे की, खेडे हा घटक असावा. भौगोलिक सलगतेच्याबाबतीत आम्ही उल्लेख केला आहे. भाषिक आणि सांस्कृतिक साधर्म्यता असावी. सर्वात मोठे म्हणजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

लोकेच्छा असावी. त्या परिसरातील लोकांची इच्छा काय आहे ? कारण नसताना दंडेली करून त्या भागातील लोकांवर जबरदस्तीने लाठीमार करून तो सगळा परिसर कर्नाटकमध्ये राहिला पाहिजे ही जी ऑर्ग्युमेंट आज सुरू आहे, किंबहुना ज्या पद्धतीने सुरू आहे, याबाबत महाराष्ट्राला तीव्र आक्षेप आहे.

हा प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयात आहे. हा प्रश्न न्यायालयाच्या चौकटीत राहून मार्गी लागावा, याकरिता आपण सिनिअर कौन्सिल अपॉईंट केलेले आहेत. मघाशी श्री.रावते साहेबांनी उल्लेख केला की, महाराष्ट्रातून कोणी चांगले वकील मिळत नाही काय ? देशातील सर्वात चांगले कौन्सिल आपण या केससाठी नियुक्त केले आहेत. श्री.हरिश साळवे यांच्याकडे जबाबदारी निश्चित केली आहे. श्री.विनोद बोबडे हे काम करीत आहेत. श्री.के.आर.पराशरन काम पहात आहेत. आपण एखादा सिनिअर कौन्सिल सुचविला तर तो ही लावण्याची आमची जबाबदारी आहे. त्यात कुठलाही मतभेद नाही. त्याने महाराष्ट्राची बाजू प्रभावीपणे मांडली पाहिजे. आम्ही जे नेमले आहेत ती सिनिअर मंडळी आहेत. सर्वोच्च न्यायालयामध्ये त्यांचा नावलौकिक आहे. महाराष्ट्राची बाजू ते अतिशय प्रभावीपणे मांडू शकतात. अशी मंडळी आपण नियुक्त केली आहेत. नियुक्ती करण्यामध्ये चूक आहे किंवा लॉ डिपार्टमेंटचे याकडे लक्ष नाही असे जे विरोधी पक्षाचे म्हणणे आहे, त्याच्याशी मी सहमत नाही. जो कोणी सिनिअर कौन्सिल आपल्या मनामध्ये असेल तो सांगावा. त्याचीही नियुक्ती करण्यासाठी आम्ही निश्चितच तयार आहोत. हे मला येथे मुद्दाम नमूद करावयाचे आहे. येथे तज्ज्ञ समितीचा देखील उल्लेख करण्यात आला. काल सभागृहामध्ये चर्चा करण्यात आली की, समिती आहे काय, समितीमध्ये कोण-कोण आहेत ? सर्वोच्च न्यायालयात दाखल करावयाच्या याचिके संदर्भात सल्ला देण्यासाठी एक तज्ज्ञ समिती गठित करण्यात यावी असा निर्णय मंत्रिमंडळाने 12 फेब्रुवारी 2003 रोजी घेतला आणि सर्वोच्च न्यायालयामध्ये पुरावे मांडण्यासाठी व त्याची जुळवाजुळव करून समन्वय करण्यासाठी विशेष कार्यकारी अधिकाऱ्याची निवड सन 2003 मध्ये करण्यात आली.

यानंतर श्री.गायकवाड....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण .....

2003 साली जी समिती नियुक्त करण्यात आली होती त्या समितीमध्ये प्रा.एन.डी.पाटील, ॲड.भंडारे, ॲड.वालावलकर यांच्यासारख्या जाणकार आणि विधी तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानंतर 5 जानेवारी 2005 मध्ये पुन्हा प्रा.एन.डी.पाटील याच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्या समितीमध्ये उच्च न्यायालयातील वकील श्री. राम आपटे, बेळगावमधील ज्येष्ठ वकील श्री.रवी पाटील, ॲड.माधव चव्हाण या सर्व तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश करुन एक तज्ज्ञ समिती नेमण्यात आली आहे. या संदर्भात त्यांचे जे काही विचार असतील वा त्यांच्याकडे जे काही कागदपत्रे असतील वा काही सूचना असतील त्याबाबतीत या तज्ज्ञ समितीच्या माध्यमातून पुढील कामकाज व्हावे अशी या समितीकडून अपेक्षा आहे.प्रा.एन.डी.पाटील कालसुध्दा तेथे गेले होते. राज्यामध्ये सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी महाराष्ट्राचा हा लढा सातत्याने सुरु राहणार आहे. राज्याच्या विधिमंडळातील दोन्ही सभागृहामध्ये या विषयाच्या बाबतीत कोणीही तडजोड स्वीकारली नाही आणि ही तडजोड स्वीकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सीमेवरील सगळी 865 गावे महाराष्ट्रात जोपर्यत सामील होत नाही तोपर्यत महाराष्ट्राचा हा लढा सर्व लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून कायम सुरु राहील .या प्रश्नाच्या बाबतीत सरकारसुध्दा आपल्या बरोबरच आहे यामध्ये कोणताही पक्षीय मतभेद वा कोणतीही पक्षीय भूमिका अजिबात राहणार नाही ही बाब मला मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सीमा प्रश्नाच्या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीच्या बाबतीत काही तरी गडबड झाली असावी असे मला वाटते. काल असे सांगितले की या बाबतीत सर्व पक्षीय समिती काम करीत आहे.

श्री.अशोक चव्हाण :सभापती महोदय, या कामासाठी तज्ज्ञ समिती नेमण्यात आलेली आहे.माननीय पंतप्रधानांना भेटण्यासाठी उद्या वेळ मागितली आहे त्यावेळी सर्व पक्षीय शिष्टमंडळ आपण तेथे नेत आहोत. औपचारिक समितीच्या बाबतीत माझी काहीही तक्रार नाही.सीमा प्रश्नाचा विषय आपण ज्या ज्या वेळी केन्द्र सरकारकडे वा माननीय पंतप्रधानांकडे नेतो त्या त्या वेळी सर्व पक्षीय चर्चा करीत असतो. या विषयाच्या बाबतीत केवळ सत्ताधारी पक्षच चर्चा करीत नाही. तर सगळे मिळून चर्चा करीत असतो तशा प्रकारे येथून पुढेही सगळे मिळून आपण या बाबतीत काम करु या. सभागृहामधील चर्चेच्या वेळीसुध्दा याच पध्दतीने या विषयाकडे पाहिले गेले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण .....

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी काही पुस्तकांचा उल्लेख केला आणि काही मागचे संदर्भ दिले होते. अशा प्रकारचे जुने संदर्भ देऊन वाद विवाद निर्माण करता कामा नये. कै. पंडित जवाहरलाल नेहरु हे महाराष्ट्राच्या विरोधी होते असे आपले म्हणणे आहे काय ? अशा प्रकारची चुकीची विधाने करुन महाराष्ट्रामध्ये क्लेश करुन भांडणे लावण्याचा कोणी प्रयत्न करणार असेल तर ते आम्ही कदापि सहन करणार नाही. महाराष्ट्र राज्याच्या आणि देशाच्या अस्मितेचा हा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात बोलत असतांना काही तरी विश्लेषणे लावावयाची आणि कै. पंडित जवाहरलाल नेहरु आणि कै. यशवंतराव चव्हाण यांच्या बाबतीत अवमानकारक भाषा बोलावयाची हे बरोबर नाही. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश महाराष्ट्रात आणण्याचे काम कै. यशवंतराव चव्हाण यांनी सुरुवातीला हाती घेतले होते त्यांना महाराष्ट्रातील कोणतीही व्यक्ती विसरणार नाही . जो कोणी विसरेल तो कृतघ्न ठरेल हे मला मुद्दाम या ठिकाणी सांगितले पाहिजे. अशा प्रकारे या सभागृहात चुकीचे संदर्भ दिले गेले असेल तर ती चुकीची बाब आहे. महाराष्ट्रामध्ये येथून पुढे वाद विवाद निर्माण करुन अनेक नवीन चुकीच्या गोष्टी पुन्हा सांगता कामा नयेत कारण जे काही सांगितले जाते ते रेकॉर्डवर येत असते. म्हणून चुकीच्या गोष्टी पुन्हा सांगण्यात येऊ नयेत अशी मला या ठिकाणी विनंती करावयाची आहे .

सभापती महोदय, महाराष्ट्रातील कोण्त्याही राज्यकर्त्याने राज्याच्या विरोधात कधीही काम केलेले नाही. तेव्हा या संदर्भात आपण सभागृहात चुकीचा उल्लेख करु नये अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे.त्याचबरोबर मी समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना अशीही विनंती करतो की, महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादाच्या अनुषंगाने जे काही प्रश्न निर्माण झालेले आहेत त्याही बाबतीत आपल्या स्तरावरही जरुर प्रयत्न करावेत.हा प्रश्न सुप्रीम कोर्टात गेलेला आहे त्यामुळे त्या ठिकाणी माघार घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही परंतु समोपचाराने काही मार्ग काढण्याची तयारी असेल तर आपण मला सुचवावे की, हा मार्ग यातून निघू शकेल. आपल्या पक्षाच्या सरकारच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्याचा आपणही प्रयत्न करावा अशी माझी समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. महाराष्ट्राच्या हिताची ही बाब असल्यामुळे महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने आपणही जरुर प्रयत्न करावेत व त्याकरता आपणही मदत करावी. अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो.

3..



VTG/ KTG/ SBT/ प्रथम भारवि 12:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण .....

सभापती महोदय, शेवटी मला एका महत्वाच्या गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे.आज हा प्रश्न न्यायप्रविष्ठ असतांना हा परिसर केन्द्र शासित व्हावा ही भूमिका बिलकूल योग्य आहे.आज त्या ठिकाणच्या गावांची नावे बदलली जात आहेत, दुस-या ठिकाणी अधिवेशन घेण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

नंतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

आणि त्यानंतर या सभागृहामध्ये रोज त्या संदर्भात बोलण्याची वेळ आपणावर येते. शेवटी त्या भागातील मराठी माणूस हा तिथून निघाला की, थेट मुंबई गाठतो. काल मला बेळगावमधील मराठी भाषिकांचे एक शिष्टमंडळ भेटले. ते लोक या गोष्टी रोज माननीय पंतप्रधानांना सांगतात, त्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना सांगतात, विनंती करतात. हे प्रकार फिल्डवर सुरु आहेत हे आपण पहात आहोत, गावो गावी घडत आहेत हे आपण पहात आहोत. तेथील 865 गावांमध्ये हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामध्ये शिक्षणाचा प्रश्न आहे, भाषेचा प्रश्न आहे. याशिवाय आणखी नव्याने प्रश्न निर्माण करण्यात येत आहेत. त्यामध्ये राजकीय दृष्टीकोनातून तेथील जनतेचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. म्हणून तूर्तास तेथील सर्व प्रदेश हा केंद्रशासित केल्याशिवाय आपल्याला मार्ग दिसत नाही. या प्रश्नाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयामध्ये लवकर लागावा असा आमचा निश्चितपणे प्रयत्न आहे. तोपर्यंत तेथील लोकांना सुखाने रहाता यावे याकरिता उद्या माननीय पंतप्रधानांना भेटण्यासाठी आपण सर्वजण जाऊ या. त्यांच्या भेटीची वेळ घेण्यात आलेली आहे. सर्वपक्षिय शिष्टमंडळाच्या माध्यमातून आपण त्यांना भेटू या. कारण या प्रश्नाचे गांभीर्य माननीय पंतप्रधानांना आहे. या प्रश्नाच्या बाबतीत त्यांचे सहकार्य रहावे, महाराष्ट्राची न्याय्य बाजू सुप्रिम कोर्टामध्ये मांडण्यासाठी केंद्र सरकारने सुध्दा आपल्याला सहकार्य करावे अशाप्रकारची विनंती आपण त्यांना करु. सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने माननीय सदस्यांनी जे जे विषय याठिकाणी मांडले आहेत, त्याच्या बाबतीत निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेऊन हे सरकार न्यायालयामध्ये आपली बाजू मांडील असे सभागृहाला आश्वासित करुन मी आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची विशेष बैठक दु.12.06 वाजता स्थगित झाली. )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे,संजय केळकर आणि भगवान साळुंखे या चार सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये एक प्रस्ताव दिलेला आहे परंतु हे चारही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत.

----

**हरकतीच्या मुद्याबाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात आणि भविष्यात या पध्दतीने कामकाज चालावे यासंदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. तो मांडण्याची आपण परवानगी द्यावी. सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा फार मोठा नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासात हरकतीचा मुद्दा मांडता येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : मला याची कल्पना आहे. म्हणूनच पुढील कोणतेही कामकाज जाहीर करण्याच्या अगोदर मला माझा महत्वाचा हरकतीचा मुद्दा मांडण्याची परवानगी द्यावी.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपण तो मांडावा.

श्री.दिवाकर रावते : प्रश्नोत्तराच्या तासात हरकतीचा मुद्दा मांडता येत नाही हे मलाही माहीत आहे. यासंबंधात आपले तसे आदेश आहेत. परंतु प्रश्नोत्तराला सुरुवात होण्याच्या अगोदर महत्वाचा मुद्दा आहे म्हणून मला तो मांडावयाचा आहे.

**सभपती** : आपल्याला अपवाद म्हणून बोलण्याची परवानगी दिली तर अनेक सन्माननीय सदस्य अन्य वेळी अशा पध्दतीने हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याची शक्यता आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रश्नोत्तरे**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**राज्य कामगार विमा योजनेतील 33 कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याबाबत**

(1) * 7159 श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.मोहन जोशी, श्री.उल्हास पवार, श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजन तेली : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य कामगार विमा योजनेतील 33 कर्मचाऱ्यांना राज्याच्या आरोग्य विभागाने माहे मे 2010 च्या तिसऱ्या आठवड्यात अचानक कामावरुन निलंबित केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त कामगारांना कामावरुन निलंबित करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(3) तसेच उक्त कामगारांना पुर्ववत नोकरीवर घेण्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

**प्रा. फौजिया खान,श्री.सुरेश शेट्टी यांच्या करिता**: (1) हे खरे नाही.

(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड :सभापती महोदय, उत्तरामध्ये "हे खरे नाही". असे म्हटले आहे. या 33 कर्मचाऱ्यांनी काही कालावधीकरिता तरी या कार्यालयात काम केलेले आहे काय? त्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आलेले आहे. तेव्हा त्यामध्ये काही गैरव्यवहार झालेला आहे काय? ज्यांनी चुकीच्या पध्दतीने नोकर भरती केली त्याचा परिणाम या तरुण मुलांच्या आयुष्यावर होणार असेल तर नोकरी भरती करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करुन त्या कर्मचाऱ्यांना परत नोकरीत घेण्यात येईल काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, प्रश्नामध्ये 33 कर्मचारी असे म्हटले आहे ते चुकीचे आहे. 103 कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली आहे.आणि विभागाला ती भरती मान्य नाही.कारण त्यामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. डॉ. नंदकुमार सबनीस दंत चिकित्सक गट (अ) राज्य कामगार विमा योजना, औरंगाबाद यांनी आयुक्त कार्यालयाच्या उप संचालक या पदाचा अतिरिक्त कारभार हाताळत असतांना या पदाचा दुरुपयोग केलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी गैर पध्दतीने नेमणुका केल्या. कमिशनर रजेवर असताना त्यांनी हे सगळे काम केले आणि ज्यावेळी कमिशनर कामावर रुजू झाले त्यावेळी त्यांनी ही तक्रार केली. त्या नेमणुका बरोबर नव्हत्या म्हणून त्यांना काढण्यात आले आणि त्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. अशा प्रकारची ॲक्शन यामध्ये घेतलेली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, यामध्ये त्या कामगारांचा काय दोष आहे ? शासनाच्या कोणत्या अधिकाऱ्याने चुकीच्या पध्दतीने भरती केली असेल तर त्या अधिकाऱ्याला निलंबित केले, हे ठीक आहे परंतु यामध्ये त्या कामगारांचा काय दोष आहे ? असे अनेक वेळा होते. त्यांना परत घेण्याच्या बाबतीत किंवा त्यांना रेग्युलर करण्याच्या बाबतीत शासन काय करणार आहे ? या तरुण कामगारांना रोजगारापासून वंचित ठेवण्यात येत आहे त्यांना रेग्युलर करण्याच्या बाबतीत शासन काही विचार करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या सर्व नेमणुका रेग्युलर प्रोसेसने झालेल्या नाहीत. त्यामुळे त्यांचा विचार करता येणार नाही. परंतु त्या अधिकाऱ्याची फास्ट ट्रॅक विभागीय चौकशी करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे काम शासन जरुर करणार आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन ही सगळी बाब क्राईम ब्रँचकडे सोपविण्याचे काम शासन करणार आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : या प्रश्नाला लेखी उत्तर देताना बरोबर उत्तर दिलेले नाही. यामध्ये प्रश्न असा विचारलेला आहे की, राज्य कामगार विमा योजनेतील 33 कर्मचाऱ्यांना राज्याच्या आरोग्य विभागाने माहे मे, 2010 च्या तिसऱ्या आठवड्यात अचानक कामावरुन निलंबित केले, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला 'हे खरे नाही' असे उत्तर दिले आहे. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी कामगारांना काढल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे या प्रश्नाला 'होय' असे उत्तर द्यावयास पाहिजे होते. दुसरा प्रश्न असा विचारलेला आहे की, असल्यास, उक्त कामगारांना कामावरुन निलंबित करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत. या प्रश्नाचे उत्तर देत असताना कारणे द्यावयास पाहिजे होती. त्यामुळे या प्रश्नाला दिलेले उत्तरच मुळात चुकीचे आहे. यामुळे शेवटचा जो तिसरा प्रश्न आहे त्याला न्याय मिळू शकत नाही. म्हणून या प्रश्नाचे नीट उत्तर देण्याचा प्रयत्न माननीय मंत्रिमहोदयांनी केला तर बरे होईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

ता. प्र. क्र.7159.....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने मान्यच केलेले नाही, रेकग्नाईज केलेले नाही. त्यामुळे हा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी पहिला प्रश्न सुस्पष्ट विचारला आहे की, राज्य कामगार विमा योजनेतील 33 कर्मचाऱ्यांना राज्याच्या आरोग्य विभागाने माहे मे, 2010 च्या तिसऱ्या आठवड्यात अचानक कामावरुन निलंबित केले आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाच्या बाबतीत आता माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, त्यांना निलंबित केले आहे, त्यांना कामावरुन काढून टाकले आहे कारण ते अनियमित होते. पुढचे कारण आपण सांगितले. हा प्रश्न महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी प्रश्न विचारला. मूळ जो प्रश्न विचारला आहे त्याला खरे म्हणजे या प्रश्नाला होकारार्थी उत्तर द्यावयास पाहिजे पण या ठिकाणी 'हे खरे नाही' असे उत्तर दिलेले आहे. या उत्तरामध्ये सुधारणा करतो असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावयास पाहिजे होते. या उत्तरामध्ये सुधारणा करणार काय असे सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी विचारावयास पाहिजे होते. आता उत्तर देत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी बरोबर सांगितले. त्यांचा उत्तर देण्याचा प्रामाणिकपणा मला मान्य आहे परंतु अधिकाऱ्यांनी या ठिकाणी उत्तर देत असताना सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. सभागृहाची दिशाभूल करण्याचा हा विषय आहे. अधिकारी अशा प्रकारे सभागृहाची दिशाभूल करतात त्यासंदर्भातील हा प्रश्न आहे. ज्यांनी सभागृहाची दिशाभूल केली त्यांना कारणे दाखवा नोटीस देणार काय ? हा विषय गंभीर आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, खरे म्हणजे ही तांत्रिक बाब आहे. 33 लोकांच्या बाबतीत प्रश्न विचारला होता. राज्य कामगार विमा योजनेतील 33 कर्मचाऱ्यांना राज्याच्या आरोग्य विभागाने माहे मे, 2010 च्या तिसऱ्या आठवड्यात अचानक कामावरुन निलंबित केले आहे, हे खरे आहे काय असा प्रश्न विचारलेला आहे. यामध्ये 33 हा आकडा चुकीचा होता त्यामुळे तांत्रिक उत्तर दिलेले आहे. पण उत्तरामध्ये आमच्या खात्याने असे सांगावयास पाहिजे होते की, ही संख्या 33 नव्हे तर 103 आहे. यासाठी मी सभागृहाची दिलगिरी व्यक्त करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

ता. प्र. क्र.7159.....

श्री. भाई जगताप : तांत्रिक बाबीमध्ये न जाता त्यांना रेग्युलर करणार काय हा प्रश्न महत्वाचा आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, राज्य कामगार विमा योजनेमध्ये 1 हजाराच्या वर रिक्त पदे आहेत. ज्या 33 कामगारांना काढले त्यापैकी 11 कामगार अपंग आहेत. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्यांना शासनाने मान्यता दिलेली नव्हती. शासनाने मान्यता दिल्याशिवाय काही कामगारांना 11 महिन्याचे पत्र देण्यात आले तर काही कामगारांना तात्पुरती म्हणून ऑर्डर देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ प्रथम श्री.बरवड 13:10

ता.प्र.क्र.7159.... श्री.किरण पावसकर....

शासनाच्या अधिका-यांमुळे ही वेळ आली आहे. त्यामुळे जे दोषी अधिकारी असतील त्यांच्याविरुध्द शासनाने कारवाई करावी. हे 33 कामगार वेगवेगळया भागातून खाजगी नोकरी सोडून तेथे रुजू झाले होते. त्यामुळे त्यांना त्याची शिक्षा देऊ नये. तातडीची गरज असल्यास नियुक्त्या केल्या जाव्यात असे सा.प्र.विभागाच्या जी.आर.मध्ये नमूद केलेले आहे. त्यानुसार या सर्व लोकांना शासन नोकरीत सामावून घेणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी मी थोडेसे विस्ताराने सांगू इच्छितो. डॉ.नंदकुमार सबनीस हे दिनांक 19.12.2009 ते दिनांक 14.5.2010 पर्यंत प्रभारी संचालक होते. संचालकपदी काम करीत असताना त्यांनी 113 पदांवर नियुक्त्या केल्या होत्या. त्यापैकी 94 पदे ॲडहॉक पध्दतीने व 9 लोकांना बढती देऊन ही पदे भरली होती. त्यानंतर आयुक्त कामावर रुजू झाल्यावर डॉ.सबनीस यांनी स्वत:हून 86 लोकांच्या नियुक्त्या रद्द केल्या. म्हणजे डॉ.सबनीस यांनी या लोकांच्या नियुक्त्या केल्या आणि त्या रद्दही केल्या आहेत. त्यामुळे आयुक्तांमार्फत हा विषय शासनाकडे आल्यावर विभागाने डॉ.सबनीस यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे. ज्या लोकांना कामावरुन कमी केले होते ते सर्व लोक मॅटमध्ये गेले आहेत. मॅटमध्ये त्यांना स्टे मिळालेला नाही. तेथे हे प्रकरण सुरु आहे. त्यानंतर डॉ.सबनीस हे देखील मॅटमध्ये गेले. त्यांचे प्रकरण मॅटने नाकारले आहे. कारण त्यांनी स्वत: हया नियुक्त्या केल्या होत्या. कोणाकडून तक्रार अर्ज आला नव्हता. केवळ एका सहीने त्यांनी या नियुक्त्या रद्द केल्या आहेत. त्यामुळे याप्रकरणी शासनाने कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या लोकांना मदत करण्याची शासनाची मानसिकता आहे. परंतु यासंबंधी कोणतीही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नसल्यामुळे कोणालाही शासन नोकरी देऊ शकत नाही.

श्री.राजन तेली : राज्य कामगार विमा योजनेची राज्यात जवळजवळ 14 हॉस्पिटल्स आहेत. या सर्व हॉस्पिटल्समध्ये जवळपास 5,500 कामगारांची आवश्यकता आहे. परंतु सध्या 1000 पेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे शासन केव्हा भरणार आहे ?

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंबंधीची निश्चित आकडेवारी माझ्याजवळ आता उपलब्ध नाही. परंतु मागील अधिवेशनात राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयासंबंधी सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी मी असे सांगितले होते की, राज्य शासन ही हॉस्पिटल्स केंद्र सरकारकडे वर्ग करणार आहे. त्यापूर्वी सर्व सन्माननीय सदस्यांबरोबर बसून चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार मी मंत्रालयात एक बैठक बोलविली होती. त्या बैठकीला या क्षेत्रात काम करणारे सदस्य उपस्थित होते. काही खासदार सुध्दा बैठकीला आले होते. या हॉस्पिटल्ससंबंधी शासन मंत्रिमंडळात निर्णय घेणार आहे. सध्या 3 हॉस्पिटल्स राज्य सरकार केंद्र सरकारला देण्याचा विचार करीत आहे. केंद्र सरकारला त्याप्रमाणे विनंती केलेली आहे. यासंदर्भात हायकोर्टाने देखील निर्णय दिलेला आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय घेणार आहे. केंद्र सरकारने सुध्दा या कामासाठी 25 हजार कोटी रुपये खर्च करुन ही हॉस्पिटल्स अपग्रेड करण्यात येतील असे आश्वासन दिलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नातील काही महत्वाचा भाग राहून जात आहे. याप्रकरणी कठोर कारवाई केली जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु डॉ.नंदकुमार सबनीस यांना सध्या निलंबित केले आहे का की ते सेवेत आहेत हा प्रश्न उपस्थित होता. शासन किती दिवसामध्ये त्यांच्याविरुध्द कारवाई करणार आहे ? हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपविण्यात येणार आहे असे सन्माननीय राज्यमंत्र्यांनी आता सांगितले आहे. परंतु एकदा प्रकरण सी.आय.डी.कडे गेले की तेथे चौकशी पूर्ण होण्यासाठी अनेक दिवस लागतात. या 103 कामगारांना काढल्यामुळे तेथे व्हॅक्यूम तयार झाला आहे. रिक्त झालेली पदे केव्हा भरणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या कामगारांना निलंबित केलेले आहे. डॉ.सबनीस यांच्याविरुध्द पोलीस खात्यातर्फे गुन्हा दाखल करणार आहे असे मी मघाशीच सांगितले आहे. हे प्रकरण लवकर निकाली निघण्यासाठी फास्ट ट्रॅक पध्दतीने एक महिन्याच्या आत डी.इ.पूर्ण केली जाईल. त्यानंतर पुढे त्यांना डिसमिस किंवा रिमूव्ह करावे का हा पर्याय उपलब्ध आहे.

अग्रेषित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:15

(प्रा. फौजिया खान ता.प्र.क्र.7159....

त्याशिवाय एसीबी कडून डिसप्रपोशनेट ॲसेट किती आहे याचा शोध घेऊन त्याबाबत शासन गुन्हा दाखल करणार आहे.

श्री. भाई जगताप : त्या कर्मचा-यांचा रोजगार बुडालेला आहे हा या प्रश्नाचा मूळ आशय आहे. या संबंधी जेव्हा माननीय मंत्री महोदयांनी बैठक घेतली होती त्यावेळी त्या बैठकीला मी हजर होतो. ही ईएसआयएसची रुग्णालये केन्द्राकडे हॅण्ड ओव्हर केली जाणार आहेत. परंतु या प्रक्रियेला दोन वर्षे लागतील. कदाचित ही प्रक्रिया लवकर सुध्दा होऊ शकेल. तो पर्यन्त आता या योजनेमध्ये कर्मचारी कमी असल्यामुळे या काढलेल्या कर्मचा-यांना पुन्हा सेवेत सामावून घेऊन त्यांना दिलासा देण्यात येणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : भरती प्रक्रियेची विहीत पध्दती आहे. ओपन कॉम्पिटीशनमधून भरती प्रक्रिया केली जाते. त्यामुळे या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्याचे काम शासन करु शकणार नाही.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकणातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या स्थानिकांना प्रकल्पात सामावून घेण्याबाबत**

**(२) * ७४४० श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.राजन तेली :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पास विरोध असतानाही जंगली झाडासह आंबा, काजू, नारळ व फणस अशा सुमारे २५ हजाराहून अधिक झाडांची कत्तल करण्यात येऊन हा प्रकल्प उभारण्याच्या हालचाली मोठया प्रमाणात सुरु असल्याचे माहे मे, २०१० मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पात भरती करण्यासाठी स्थानिकांना फक्त कामगारांची संधी देण्यात येणार आहे व ते ही त्यांच्यात योग्य ती अर्हता असल्यास संधी देण्यात येणार असल्याची माहिती उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पांतर्गत स्थानिकांना प्राधान्याने व त्यांच्या पात्रतेप्रमाणे नोकरीत समावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२) प्रकल्पातील बाधित कुटुंबातील व्यक्तिला त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पातील नोकरीमध्ये भरती प्रक्रियेचे निकष पूर्ण करत असल्यास सामावून घेताना प्राधान्य दिले जाईल. तसेच कॉन्ट्रॅक्टर किंवा संस्थेमार्फत स्थानिक लोकांना त्यांच्या पात्रतेप्रमाणे विविध स्तरावरील कामे उपलब्ध करुन दिली जातील.

(३) प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर स्थानिकांना नोकरीत सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : कोकणामध्ये जैतापूर आणि अन्य ठिकाणी 6 छोटेमोठे अणुऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. ते कार्यान्वित झालेले आहेत काय ? नसल्यास, त्यांची सद्य:स्थिती काय आहे ? या प्रल्पासाठी कोकणातील एकूण किती एकर जमीन संपादित करण्यात आलेली आहे ? किती स्थानिक लोकांना या प्रकल्पामध्ये कामगार म्हणून आणि उच्चपदाच्या नोक-यामध्ये सामावून घेण्यात आलेल आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : या प्रकल्पासाठी 935 हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. 22 जानेवारीला न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला ही जमीन हस्तांतरित करण्यात आलेली आहे. तसेच "क" आणि "ड" दर्जाच्या 400 ते 450 लोकांना यामध्ये रोजगार मिळणार आहे. अशी या प्रकल्पासंबंधीची सद्य:स्थिती आहे.

..3..



MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7440...

श्री. राजन तेली : मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो की त्यांनी प्रश्न भाग 2च्या उत्तरामध्ये भरती प्रक्रियेचे निकष पूर्ण करणा-या प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये प्राधान्याने सामावून घेण्यात येईल असे म्हटलेले आहे. आता या प्रकल्पाची छोटी-मोठी कामे सुरु झालेली आहेत. त्या कामांवर बिहार आणि उत्तर प्रदेश येथील लोक असून स्थानिक लोक आणि त्यांच्यात वाद सुरु झालेला आहे. तेव्हा काम देण्याच्या बाबतीत स्थानिक लोकांना डावलण्यात येते काय ?

श्री. अजित पवार : सध्या प्रकल्पस्थळी कोणतेही बांधकाम सुरु झालेले नाही. टेस्ट बोअर घेण्याची वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे. कंपाऊंड वॉल धेण्याबाबत निविदा काढण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पाहजे. या एकूण प्रकल्पामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे 400 स्थानिक लोकांना रोजगार मिळू शकेल. 10वी आणि 12वी झालेल्या उमेदवारांसाठी कंपनी आयटीआय कोर्स देखील देणार आहे. हे सर्व करीत असताना प्रकल्पाच्या ठिकाणी असलेली किरकोळ कामे ही प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे समूह किंवा सहकारी संस्था यांना प्राधान्याने देण्यात येतील. त्यांनी एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन केली पाहिजे किंवा प्रकल्पग्रस्तांचे समूह असले पाहिजेत.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7440......... श्री.अजित पवार.........

आम्ही त्यांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. ज्यावेळी एखादा मोठा प्रकल्प उभारण्यात येतो त्यावेळी तेथील स्थानिकांना रोजगार मिळालाच पाहिजे, तरच तेथील वातावरण शांत होण्यास मदत होणार आहे. म्हणून याबाबतीत राज्य सरकारचे तशा प्रकारचे लक्ष आहे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, 937 हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी लागणार आहे. या प्रकल्पाबाबत स्थानिक जनतेमध्ये मोठा असंतोष निर्माण झालेला आहे. 937 हेक्टर जमीन न्यूक्लिअर पावर कार्पोरेशनला कोणत्या दराने देण्यात आली? सुप्रीम कोर्टाच्या नवीन नियमाप्रमाणे प्रकल्पासाठी जमीन घेत असताना त्या भागातील बाजारभाव हा बेस धरुन जमिनीची खरेदी केली पाहिजे. असे असताना 937 हेक्टर जमीन कोणत्या दराने विकत घेण्यात आली? तेथील शेतकऱ्यांचे त्या दराबद्दल समाधान झाले आहे काय?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, 48 हजार ते 1.60 लाख प्रती एकर एवढ्या किंमतीनुसार जमीन खरेदी करण्यात आली आहे. या विभागाचा मंत्री या नात्याने जो जमिनीला दर देण्यात आला आहे तो मला अजिबात मान्य नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीबाबत यापेक्षा अधिक दर मिळाला पाहिजे. जवळपास 9900 मे.वॅट वीज निर्मितीचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पातून 9600 मे.वॅट वीज ग्रीडला मिळणार आहे. त्यातील 33 ते 50 टक्के म्हणजे अंदाजे 3500 ते 4500 मे.वॅट वीज महाराष्ट्राला मिळण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प 90 हजार कोटी रुपयांचा आहे. जमिनी घेत असताना ती कातळ जमीन, 3000 फळझाडे असलेली जमीन असली तरी एकही फळझ ाड तोडण्यात आलेले नाही. केंद्र सरकारशी संबंधित न्यूक्लिअर पावर कार्पोरेशनने हा प्रकल्प उभारण्यासाठी पुढाकार घेतला. फ्रान्सची एक कंपनी या प्रकल्पामध्ये सहभागी झालेली आहे. हा प्रकल्प उभारला जात असताना पर्यावरण आणि कोकणातील निसर्ग सौंदर्यावर परिणाम होणार नाही याची खबरदारी राज्य शासन घेत आहे. जमिनीला जो दर दिला गेला आहे त्याची रक्कम काही सन्माननीय शेतकरी व खातेदारांनी स्वीकारली आहे. असे असले तरी 90 हजार कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाचा विचार करता 937 हेक्टर जमीन घ्यावी लागणार आहे. त्यामुळे रायगड जिल्हयातील टाटा कंपनीच्या वीज प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी तेथे बऱ्यापैकी पॅकेज दिले गेले. यासाठी माननीय पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नेमलेली आहे. ऊर्जामंत्री या नात्याने मी देखील त्या समितीचा सदस्य आहे. या प्रकल्पासाठी जमीन घेत असताना त्या भागातील शेतकऱ्यांचे आणि लोकप्रतिनिधींचे देखील समाधान होईल अशा प्रकारची रक्कम देण्याचा निर्णय राज्य सरकार निश्चितपणे घेईल.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, जमीन संपादित करीत असताना वाढीव रक्कम दिली जाणार आहे. ही अत्यंत चांगली बाब आहे. रायगड व रत्नागिरी जिल्हयामध्ये वीज प्रकल्प उभारताना तंत्रशिक्षण संस्था उभारुन स्थानिकांना प्रशिक्षण दिले गेल्यास रोजगार उपलब्ध होऊ शकतो. अन्यथा तांत्रिक कर्मचारी बाहेरुन आणावे लागतात. नागोठणे येथील प्रकल्पाबाबत आयपीसीएल कंपनीला टेक्नीकल इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यास सांगितले होते. त्याच धर्तीवर न्यूक्लिअर पावर कार्पोरेशनला टेक्नीकल इन्स्टिट्यूट स्थापन करुन प्रकल्पग्रस्तांना तंत्रशिक्षण देऊन त्यांना नोकरीमध्ये सामावून घेतले जाईल काय?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, प्रत्येक प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीला गट क आणि ड मधील पदावर कायमस्वरुपी नोकरी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. प्रकल्पग्रस्त उमेदवार शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यास कंपनीच्या खर्चाने त्यांना प्रशिक्षण देऊन नोकरीत सामावून घेण्यात येईल. प्रकल्पग्रस्त नोकरी करणार नसल्यास त्याच्या कुटुंबाला किमान 3 लाख रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय झालेला आहे. हे अर्थसहाय्य 3 लाखाऐवजी 5 लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचा किंवा त्यापेक्षा अधिक देण्याचा प्रयत्न राज्य सरकार करेल.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. भोगले..... 13:25

ता.प्र.क्र. 7440........ श्री. अजित पवार ......

अप्रशिक्षीत प्रकल्पग्रस्तांना एक वर्षात आत प्रशिक्षण देण्याचे आयोजन करुन प्रकल्पाचे काम प्रत्यक्ष सुरु झाल्यापासून दोन वर्षाच्या आत नोकरीत सामावून घेतले जाईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त मदत तेथील प्रकल्पग्रस्त आणि गावकऱ्यांना कशी करता येईल यासाठी शासन जातीने लक्ष घालणार आहे.

श्री. किरण पावसकर : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, गावकऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल. मी मुद्दाम यानिमित्ताने असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, न्युक्लिअर पॉवर कार्पोरेशनचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी सांगितले होते की, असे प्रशिक्षण केंद्र चालू केले जाईल. पण सध्या त्यांच्या जागेवर श्री. जैन म्हणून अध्यक्ष आलेले आहेत त्यांच्याकडे अशा गोष्टींकडे लक्ष देण्यासाठी वेळ सुध्दा नाही. म्हणून अशी भीती वाटते की, शासन यासंदर्भात जे नियम करणार ते फक्त कागदावरच राहतील आणि "क" आणि "ड" वर्गात ज्या शेतकऱ्यांची मुले काम करतील ती थोड्या दिवसांनी सोडून जातील अथवा त्यांना कामावरुन काढून टाकण्यात येईल आणि त्यांच्या जागेवर बाहेरचेच लोक येऊन काम करतील, असे होऊ नये म्हणून शासन काय दक्षता घेणार आहे ?

श्री. अजित पवार : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मागचा अनुभव असेल परंतु तोच अनुभव लक्षात घेऊन शासन काळजी घेणारच आहे. त्यांची अशी भीती आहे की, स्थानिक लोकांना रोजगार देणार नाही, त्यांना नोकरीवरुन काढून ते दुसरीकडे जातील व त्या जागांवर बाहेरचे लोक येऊन नोकरी करतील पण असे प्रकार होणार नाहीत याची शासन खबरदारी घेणारच आहे. एवढेच नव्हे तर त्या अनुषंगाने स्वतंत्र बैठक लावून सन्माननीय सदस्यांनी न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांची जी नावे सांगितली त्याचीही काळजी घेण्यात येईल व कोणत्याही स्थानिक प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, या प्रकल्पामध्ये सर्वसाधारणपणे किती वृक्ष तोडावे लागणार आहेत ? अथवा इतरत्र त्या वृक्षांचे प्लांटेशन करण्याचा अथवा हलविण्याचा संकल्पित आराखडा तयार आहे काय ?

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7440........

श्री. अजित पवार : महोदय, या परिसरात एकूण 3 हजार फळ झाडे असून आतापर्यंत तरी एकही झाड तुटलेले नाही. तेथे वॉल कंपाऊंडचे टेंडर काढलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या अनुषंगाने नवीन तंत्रज्ञान विकसीत झाले आहे त्याचा वापर करुन ज्याप्रमाणे मोठी झाडे सुध्दा इतरत्र रिप्लांट करता येतात त्याप्रमाणे या परिसरातील झाडे इतर ठिकाणी रिप्लांट करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने समाधानकारक जबाब दिया है. मेरा स्पेसिफिक प्रश्न है. भारत सरकार ने अक्टूबर 2007 में नई आर.एन.आर. पॉलिसी बनाई है जो सभी राज्यों और केन्द्रीय सरकार के पब्लिक सेक्टर के लिए लागू है. इसके मुताबिक महाराष्ट्र शासन ने अभी तक आर.एन.आर. पॉलिसी नहीं बनाई है. इसके अन्तर्गत केन्द्रीय शासन के 2 आदेश हैं. एक आदेश यह है कि मार्केट रेट से किसानों को मुआवजा दिया जाए और दूसरा आदेश यह है कि परिवार में से एक व्यक्ति को नौकरी देने का प्रावधान हो. मेरा प्रश्न यह है कि क्या इस बारे में शासन ने कोई नीतिगत निणर्य लिया है ?

श्री. अजित पवार : त्याबद्दलचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याकरिता करावयाची उपाययोजना**

**(3) * 7208 श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात वाढत असलेली स्त्री भ्रूणहत्या रोखली गेली नाही तर समाजाचा मोठा घात होण्याचा धोका निर्माण झाल्याचे डॉ.रेखा डावर यांनी माहे मे, 2010 मध्ये वा त्या दरम्यान इशारा दिल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सध्या वाढत असलेली स्त्री भ्रूणहत्या कायमस्वरुपी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही. मुलाबाबत अट्टहास या विषयासंदर्भात समाजाची मानसिकता बदलण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या महिला मेळाव्यात डॉ.रेखा डावर यांनी समाजाची मानसिकता न बदललस समाजाचा मोठा घात होण्याचा धोका निर्माण होईल, असे वक्तव्य केले आहे.

(2) स्त्री भ्रूणहत्या कायमस्वरुपी रोखण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम - 2003 ची अंमलबजावणी करण्यात येते. या अधिनियमांतर्गत राज्यात 7,373 सोनोग्राफी केंद्राची नोंदणी करण्यात आलेली आहे. कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे राज्यात एकूण 125 सोनोग्राफी केंद्रधारकांविरुध्द न्यायालयात दावे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी 33 प्रकरणी न्यायालयाने अंतीम निर्णय दिला असून 92 प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा समूचित प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून जिल्ह्यातील प्रत्येक सोनोग्राफी केंद्राची तपासणी दर तिमाहीतून करण्यात येते. तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सकांनी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम - 2003 च्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कामाचा आढावा घेऊन त्याबाबत त्याच्या गोपनिय अहवालामध्ये नोंद घेण्यात येईल अशा सूचना राज्यातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सकांन दिले आहेत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मोहन जोशी : महोदय, राज्यातील अत्यंत महत्वाचा हा प्रश्न असून महाभारतामध्ये श्रीकृष्णाच्या जन्माच्या वेळेस कंस मामाने श्रीकृष्णाच्या जन्माअगोदर ज्याप्रमाणे देवकीच्या सर्व बाळांचा वध केला होता त्याप्रमाणेच या राज्यात सुध्दा मूल जन्माला येण्यापूर्वीच त्याचा खून करणारे राक्षस कार्यरत आहेत. या राक्षसांना थांबविण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी होत नाही. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, अशी एकूण 125 प्रकरणे न्यायालयात असून त्यापैकी 33 प्रकरणांचा निकाल झालेला आहे व 92 प्रकरणे अद्याप न्यायालयातच प्रलंबित आहेत. माझा प्रश्न असा आहे की, ज्या 33 प्रकरणांमध्ये निकाल दिलेला आहे त्या निकालात काय म्हटले आहे ? तसेच उर्वरित 92 प्रकरणे किती दिवसांपासून प्रलंबित आहेत आणि ती प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7208....

श्री. मोहन जोशी...

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात जिल्हा समुचित प्राधिकारी किंवा शल्य अधिका-यांकडे या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जी संवेदनशीलता पाहिजे किंवा त्यासंदर्भातील ज्ञान पाहिजे ते नसल्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होऊ शकत नाही. त्यामुळे अशा अधिका-यांना, प्राधिका-यांना यशदा संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची योजना शासनाकडे आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विचारलेला प्रश्न खूप महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्यांनी 33 प्रकरणाच्या संदर्भात न्यायालयाने अंतीम निर्णय काय दिलेला आहे असा त्यांनी पहिला प्रश्न विचारलेला आहे. मी सांगू इच्छीतो की, मुंबईमध्ये एक कन्व्हीक्शन झालेले असून संबंधित डॉक्टरांना तुरुंगवासाची शिक्षा झालेली आहे. पुण्यामध्ये 15 केसेसमध्ये कन्व्हीक्शन झाले आहे त्या ठिकाणी प्रत्येकी 1000 रुपयांचा दंड झालेला आहे. अशा प्रकारे निकाल 33 केसेसमध्ये लागलेला आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी विचारले की, अधिकारी किंवा प्राधिका-यांना यशदामध्ये प्रशिक्षण दिले जाईल काय ? त्यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने ॲथॉरिटीज निर्माण केली असून त्यांना ट्रेनिंग सुध्दा दिले जाते. यामध्ये डॉक्टरांना आणि सिटीझन्सला प्रिव्हेंट करणे असे दोन भाग आहेत. लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. या कायद्याची अंमलबजावणी करणा-या अधिका-यांना ट्रेनिंग दिलेले असून ॲप्रोप्रिएट ॲथोरिटीजसाठी ट्रेनिंग घेण्याचे प्रावधान सुध्दा आहे. शासनाने पीएनडीटी ॲक्ट लागू करण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच शासनाने यासंदर्भात ट्रेनिंग वर्कशॉप सुध्दा दिलेले आहेत. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य पातळीवर एक बॉडी निर्माण केलेली आहे. तसेच या कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी फ्लाईंग स्क्वॉड तयार करण्याचा शासनाचा विचार आहे. ज्या भागात मुलींचे प्रमाण कमी आहे त्या ठिकाणी इन्कम टॅक्स सारख्या महिन्यातून चार धाडी टाकण्याचा विचार शासनामार्फत सध्या सुरु आहे.

श्रीमती वंदना चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी एक महत्वाचा सामाजिक प्रश्न उपस्थित केलेला आहे. मुलींचे प्रमाण आपल्या देशात कमी होत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वंदना चव्हाण...

चालले आहे. आर्थिक दृष्टया प्रगत असलेली राज्य म्हणजे हरियाणा, पंजाब तसेच पुरोगामी महाराष्ट्र राज्यात मुलींच्या संख्येचे प्रमाण कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. भ्रूण हत्येच्या संदर्भात महाराष्ट्रात कायदा झालेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होते की नाही हा मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, ज्या भागात सोनोग्राफी सेंटर्स आहेत त्या ठिकाणी मुलींचा जन्म दर फार कमी आहे ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे यावर आपण कोणते नियंत्रण ठेवणार आहात ? मुलींची संख्या का कमी होत आहे यासंदर्भात पुणे शहरात एक चर्चा सत्र आयोजित केले होते त्याचर्चेमध्ये श्रीमती विद्या बाळ, श्रीमती जया सागडे, श्रीमती रजिया पटेल असे दिग्गज वक्ते उपस्थित होते. या चर्चेमध्ये मुलगी का नको असे लोकांना विचारले असता लोकांनी सांगितले की, मुलींचा सिक्युरीटीचा मुद्दा असल्यामुळे लोकांना मुली नको आहेत. पुणे शहरात मोठया प्रमाणात रेप केसेस होत आहेत. मुलीला सुरक्षा नसते असे लोकांना वाटते त्यामुळे लोकांना मुली नको असतात. तसेच आपल्या समाजात अलिखित रुल झालेला आहे की, लग्नाचा खर्च हा मुलीच्या बाजूनेच झाला पाहिजे. त्यामुळे लग्नाच्या बाबतीत सुध्दा कडक कायदा होण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. अनेक देशात यासंदर्भात कायदा आहे. टेनीसपटू सानिया मिर्झाचे लग्न झाले तेव्हा जास्त प्रमाणात वीज वापरली गेली तसेच जास्त फूड आयटेम सर्व्ह केले म्हणून तिच्यावर केस दाखल केली गेली. त्यामुळे यासंदर्भातील कायदा महाराष्ट्र राज्यात करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय असे मला माननीय मंत्रीमहोदयांना विचारावयाचे आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7208....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न असा होता की, जेथे जास्त प्रमाणात सोनोग्राफी होते तेथे स्त्रीभ्रूण हत्या जास्त आहे काय ? हे खरे आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. काही माणसे सोनोग्राफी करण्यासाठी ग्रामीण भागात जातात. स्त्रीभ्रूण हत्या होऊ नये, त्यास प्रतिबंध बसावा म्हणून PNDT Act आहे. या कायद्यानुसार कडक अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न होत आहे. स्त्रीभ्रूण हत्या ही मोठी सामाजिक समस्या झाली आहे. जो पर्यंत मुलगाच पाहिजे अशी मानसिकता समाजामध्ये राहणार आहे, तो पर्यंत ही समस्या राहणारच आहे. त्यामुळेच शासन स्तरावर मुलींचे महत्त्व कशाप्रकारे वाढविता येईल यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून योजना आखत आहोत. यासाठीच शासनाने आरोग्य विभागाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले योजना आणली असून पहिली मुलगी झाल्यानंतर दहा हजार रूपयाचे अनुदान कुटुंबाला देण्यात येते. अशा प्रकारे महिला व बालकल्याण विभागासह सर्व विभाग स्त्रीभ्रूण हत्या होऊ नये यासाठी पुढाकार घेत आहे. जो पर्यंत सामाजिक मानसिकता बदलत नाही तो पर्यंत आपण काही करू शकत नाही. यासाठी आरोग्य विभागाचे प्रयत्न पुरेसे नाहीत, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा विषय सामाजिक जागरूकतेचा आहे हे बरोबर आहे. त्याप्रमाणे शासन काळजी घेत आहे, असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. आज राज्यात 7372 सोनोग्राफी केंद्र आहेत. कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे 125 सोनोग्राफी केंद्रावर आपण कारवाई केलेली आहे, असे उत्तर दिलेले आहे. दर तीन महिन्यांनी सर्व केंद्रांची तपासणी होते. आता आपण भरारी पथकाची देखील स्थापना करणार आहात. हे ऐकायला गोड वाटते. मूळात येथे प्रश्न असा आहे की, या 7373 केंद्रांची दर तीन महिन्यांनी तपासणी होते काय ? त्याचा तपशील या ठिकाणी मंत्रिमहोदय देऊ शकतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7208....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, संबंधित विषयावर गेल्या अधिवेशनामध्ये खूप मोठी चर्चा झालेली आहे. त्यावेळी कोल्हापूर पॅटर्नसंबंधी लक्षवेधी सूचनेद्वारा चर्चा केली होती. या दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये विभागाच्या अधिकाऱ्यांनी अभ्यास करून संपूर्ण राज्यात कोल्हापूर पॅटर्न लागू करण्याचा विचार केला आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, या विषयासंबंधी आपण अर्धा तास चर्चा घ्यावी. आम्ही या विषयासंबंधी चर्चा करण्यासाठी तयार आहोत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर आहे, गहन आहे. जनगणनेमध्ये असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, महिलांची हजार पुरूषांच्या मागे 912 वर संख्या येऊ शकते. अशा प्रकारची भीती निर्माण झालेली आहे. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. जिल्ह्यातील समुचित प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून जिल्ह्यातील प्रत्येक सोनोग्राफी केंद्राची तपासणी दर तीन महिन्यातून करण्यात येते. हे बरोबर आहे. प्रत्यक्षात असे होत नाही. जिल्हा शल्य चिकित्सक दवाखान्याच्या बाहेर पडत नाही. त्याला शासनाच्या विविध बैठकांना जावे लागते. त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक दोन केंद्रांची सुद्धा तपासणी करू शकत नाही. सध्या जो कायदा आहे, तो पाहिजे तेवढा कठोर नाही. त्यामुळे सदर कायदा कठोर करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7208...

श्रीमती शोभा फडणवीस.....

त्याचबरोबर दुसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की,या संदर्भात शासनाने ज्या समित्या नियुक्त केल्या आहेत त्या समित्यांना नेमके कोणते काम करावयाचे आहे, हेच समजत नाही. एका समितीचा अध्यक्ष मला भेटला होता व त्याने असे सांगितले की, सोनोग्राफी करण्यासाठी जे येतात त्यांना आम्ही एकत्र करतो आणि त्यांची दरमहा बैठक घेत असतो. यावेळी त्याने काय केले यासबंधी आम्ही त्यांना विचारणा करतो. जी महिला स्त्री भ्रूण हत्या करण्यासाठी सोनोग्राफी करीत असते ती महिला अमुक इतक्या वेळेला स्त्री भ्रूण हत्या केली होती या सबंधी या समितीला खरी माहिती देणार आहे काय ? या समितीने नेमके काय काम केले पाहिजे, हे सांगण्याची आज गरज आहे. जिल्हा शल्य चिकित्सकाच्या भरवशावर हे काम करता येणार नाही. त्यामुळे यामध्ये बदल करण्यात येणार आहे काय, त्याचबरोबर कठोर कायदा करण्यात येणार आहे काय ?

डॉ.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते अत्यंत खरे आहे. संपूर्ण राज्यात जेवढी सोनोग्राफी सेन्टर्स आहेत त्या बाबतीत दररोज नियंत्रण ठेवणे शक्य नाही. त्यासाठी मी मघाशी सांगितले की, शासनाने कोल्हापूर मध्ये पायलट प्रोजेक्ट राबविला होता. या जिल्हयात प्रत्येक सोनोग्राफी मशिनमध्ये सायलेंट ऑब्जर्व्हर ही यंत्रणा बसविण्यात आली आहे.त्या यंत्रणेव्दारे दररोज किती रुग्णांची सोनोग्राफी करण्यात आली होते आणि त्याचे रिझल्टस् काय आहेत, यासंबंधीचा रिपोर्ट दररोज मिळणार आहे. त्या रिपोर्टमध्ये कोणीही काहीही गैरप्रकार करु शकत नाही. म्हणून मी या सभागृहात असे सांगितले की, कोल्हापूर सारखा प्रोजेक्ट आपण संपूर्ण राज्यामध्ये राबविणार आहोत. त्यानंतर सोनोग्राफी सेंटरमधील गैरप्रकार थांबविले जातील.

**सभापती** : हा विषय अत्यंत महत्वाचा असून या विषयाच्या संदर्भात या पूर्वीच मध्यवर्ती सभागृहामध्ये एक चर्चा सत्र आयोजित केले होते. माननीय मंत्रिमहोदयांना माझी अशी विनंती आहे की, या अधिवेशनामध्ये या संदर्भात एक दीड तासाची चर्चा ठेवली आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी त्रोटक प्रश्न विचारले तर या विषयाला खरा न्याय मिळू शकेल. आता यानंतर पुढचा प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**हातेड (ता.चोपडा, जि. जळगाव) येथील सबस्टेशनचे नूतनीकरण करण्याबाबत**

**(४) * ६९३३ श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातेड (ता.चोपडा, जि. जळगाव) येथील सन १९८३ मध्ये उभारण्यात आलेल्या ११ के.व्ही. च्या सबस्टेशन बाबत अनेक तक्रारी असूनही तेथे अद्यापपावेतो त्यात कोणतीही सुधारणा झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे वारंवार अडचणी निर्माण होत असल्यामुळे वीज पूरवठा खंडीत होऊन शेतकरी व ग्राहकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) अंशत: खरे आहे. हातेड (ता.चोपडा, जि.जळगांव) उपकेंद्रातील उपकरणे खूप जुनी असल्यामुळे तांत्रिक बिघाडामुळे वीज पुरवठ्यात येणारा व्यत्यय वेळोवेळी त्वरीत दुरुस्त करुन वीजपुरवठा सुरळीत करण्यात येत आहे.

(२) तांत्रिक बिघाड होताच वेळोवेळी तो दूर करुन वीज पुरवठा सुरु करण्यात आलेली आहे. शेतकरी व ग्राहकांचे मोठ्या प्रमाणांत नुकसान झाल्याची तक्रार आढळून आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, पहिल्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की अंशत: खरे आहे आणि दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,शेतकरी व ग्राहकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाल्याची तक्रार आढळून आलेली नाही. अशा प्रकारे दोन्ही उत्तरामध्ये विसंगती आढळून आली आहे. हातेड, तालुका चोपडा जिल्हा जळगाव येथे 11 के.व्ही. चे सब स्टेशन 1983 साली उभारण्यात आले होते . त्या ठिकाणची उपकरण् जुनी झालेली असल्यामुळे वारंवार तांत्रिक बिघाड होत असतो. त्यामुळे या ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होतो. त्या उपकरणांची दुरुस्ती केली जाते. परंतु त्यासाठी विलंब होतो. कधी डी.पी.नादुरुस्त होतो तर कधी ट्रान्सफर आणि वायर जळते. त्यामुळे दर पाच पाच मिनिटांमध्ये वीज पुरवठा खंडीत होत असतो. त्यामुळे उन्हाळयामध्ये बागायती शेतक-यांचे आणि ग्राहकांचे नुकसान होत असते. त्या भागातील केळी पिकाचे आणि पपईचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असते. त्याचबरोबर वीज ग्राहकांचे टी.व्ही, फ्रीज, कॉम्प्युटर, सबमर्सिबल पंप अशा प्रकारच्या महागडया उपकरणाचे नुकसान होत

..3...



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असते. या बाबतीत अनेकदा तक्रारी करण्यात येतात आणि काही वेळा संतप्त प्रतिक्रिया उमटून तोडफोड केली जाते. वस्तुस्थिती अशी आहे की, त्या ठिकाणी पाच एम.व्ही.ए.चे दोन ट्रान्सफॉमर्स असून त्यात सहा फिडर्स आहेत. एका ट्रान्सफॉर्मवर तीन फिडर्स चालतात. एका फिडरवर जर तांत्रिक बिघाड झाला तरी तिन्ही फिडर्स बंद पडतात. त्या उपकेन्द्रावर 25 ते 26 गावे असल्यामुळे पाच एम.व्ही.ए.चे ट्रान्सफॉर्मर कमी पडतात. त्या ठिकाणची उपकरणे जुनी असल्यामुळे ती वारंवार बंद पडतात. त्यामुळे वीज पुरवठा अनियमित होत असतो. त्यामुळे शेतक-यांमध्ये आणि ग्राहकामध्ये मोठया प्रमाणावर असंतोष् पसरलेला आहे. या बाबतीत माझा असा प्रश्न आहे की पाच एम.व्ही.ए.चा तिसरा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार आहे काय, त्याचबरोबर त्या ठिकाणची जुनी उपकरणे त्वरित बदलण्यात ोणार आहेत काय ? कन्ट्रोल रुममधील लिकेज त्वरित दूर करण्यात येणार आहे काय तसेच या विलंबास जबाबदार असलेल्या अधिका-याविरुध्द त्वरित कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, 1983 साली हे उपकेन्द्र कार्यान्वित करण्यात आले होते आणि या उपकेन्द्रामध्ये इनडोअर ब्रेकर्स होते. परंतु ते आता आऊट डेटेड झालेले आहेत. त्यामुळे त्याचे स्पेअर पार्टस सुध्दा मिळत नाहीत. त्यामुळे या उपकेन्द्रात आऊट डोअर ब्रेकर्स करण्याचे काम पायाभूत सुविधामध्ये हाती घेण्यात आले असून हे काम करण्यासाठी 2 कोटी रुपये खर्च केला जाणार आहे.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6933...

श्री. अजित पवार....

या प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, 15 ऑगस्ट 2010 पर्यंत हे संपूर्ण काम व्यवस्थितपणे पूर्ण केले जाईल. आणि तेथील 14 गावांच्या 980 कृषी ग्राहकांना व 2956 इतर ग्राहकांना त्याचा फायदा होईल. अजून आपल्या हातामध्ये एक महिना असल्यामुळे माननीय सदस्यांनी जे जे प्रश्न विचारले असतील व त्यामधील कोणकोणत्या गोष्टी त्यामध्ये अंतर्भूत करण्याची गरज असेल तर त्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातील. आणि त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांची तक्रार राहणार नाही याची खबरदारी घेतली जाईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, मागील महिन्यामध्ये इनडोअर ब्रेकर्स नसल्यामुळे वीजपुरवठा बंद पडला, त्यानंतर पुन्हा उप केंद्र सुरु करण्यात आल्यानंतर आऊटडोअर ब्रेकर्स नसल्यामुळे वीज पुरवठा बंद पडला. अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या जागरुकतेमुळे त्याठिकाणी होणारे नुकसान टळले. याबाबत मंत्रिमहोदयांनी आता सांगितल्याप्रमाणे त्या संदर्भात तात्काळ उपाय योजना करण्यात येत आहे. तेथील उपकरणांची करावयाची दुरुस्ती आणि नवीन उपकरणांची उपलब्धता लक्षात घेता माननीय सदस्य श्री. सोनवणे यांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी 5 एमव्हीएचे नवीन ट्रान्सफॉर्मर वाढविण्यासंदर्भात आपण विचार करणार काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, त्याठिकाणी आवश्यक असणारा खर्च आपण करीत आहोत. माननीय सदस्य सर्वश्री दिलीपराव सोनवणे व अरुण गुजराथी यांनी विचारल्याप्रमाणे त्याठिकाणी अतिरिक्त 5 एमव्हीएचा एक ट्रान्सफर दिला पाहिजे. सद्या त्याठिकाणी दोन ट्रान्सफर असतांना व ही सर्व उपाय योजना करुन सुध्दा जर लोड जास्त असेल तर एक 5 एमव्हीएचा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर त्याठिकाणी बसविण्याचा निर्णय घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शासनाचे ऊर्जा खाते या उपकरणाचे आयुष्यमान किती आहे हे न ठरविता ते संपेपर्यंत बदलण्याची वाट पाहणार आहे काय? ही उपकरणे बंद पडल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. याकरिता प्रत्येक उपकरणाचे आयुष्यमान ठरवून ते तात्काळ बदलण्याची प्रक्रिया पार पाडणार काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, तत्कालीन ऊर्जामंत्र्यांनी या गोष्टीकडे जेवढे लक्ष दिले पाहिजे तेवढे दिले नाही. म्हणूनच आज फिडर, सेपरेशन इ. हजारो कोटींची वेगवेगळया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र. 6933...

श्री. अजित पवार....

प्रकारची इन्फ्रास्ट्रक्चरची कामे मोठया प्रमाणात हाती घेतली आहेत. त्यामध्ये सद्या बसविण्यात आलेल्या उपकरणांचे आयुष्यमान लक्षात घेऊन ते बदलण्याचे काम सुरु आहे. या सर्व कामांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी आपल्याला नवीन अर्थमंत्री लाभले आहेत. त्यामुळे या कामांना कोणत्याही प्रकारे निधी अजिबात कमी पडू दिला जाणार नाही अशी त्यांनी खात्री दिली आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती जिल्ह्यातील वीज पुरवठा बंद असूनही शेतकऱ्यांना हजारो रुपयांची वीज बिले दिल्याबाबत**

**(५) * ७५३५ श्रीमती अलका देसाई, प्रा.सुरेश नवले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.एम.एम.शेख :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १२ वर्षापासून वीज पुरवठा खंडीत असताना तसेच सध्या शेतातील विद्युत पुरवठा बंद असूनही शेतकऱ्यांना महावितरण कंपनी हजारो रुपयांची विद्युत बिले देत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र संताप पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांना योग्य विद्युत बिले देण्याबाबत तसेच वाढीव विद्युत बिले देणाऱ्या महावितरण कंपनीचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) एका अल्पभूधारक शेतकऱ्यासंदर्भात अशा आशयाचे वृत्त दै. लोकमतच्या दिनांक ४.१.२०१० च्या अंकात प्रसिध्द झाले, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर ग्राहकाने दिनांक २८.२.२००४ रोजी वीजेचा वापर नसल्याबाबतची तक्रार तत्कालीन कनिष्ठ अभियंता, चांदूरबाजार यांच्याकडे केली होती. तथापि या अर्जानुसार तत्कालीन कनिष्ठ अभियंता यांनी सदर तक्रारीबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. तसेच सन १९९७ मध्ये कृषी संजीवनी योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक रक्कम भरल्यावरही उर्वरित देयक माफ केल्याची सुधारणा करण्यात आली नाही. परिणामत: त्या ग्राहकास दि. ३०.७.२००९ पर्यंतचे रु. ६५,९५०.०० एवढ्या रक्कमेचे बिल गेले. सदर ग्राहकास दिनांक १.६.२०१० रोजी रु. १८,५२१/- एवढ्या रक्कमेचे सुधारित बिल देण्यात आले. सदर तक्रारीवर वेळेत कार्यवाही न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र. ७५३५...श्री. विजय वडेट्टीवार...

केल्याबद्दल तत्कालीन संबंधित कनिष्ठ अभियंता हे दोषी दिसून येतात. परंतु सन २००५-०६ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. कृषि संजीवनी योजनेचा लाभ सदर ग्राहकास न देण्याऱ्या संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यासाठी महावितरणने संबंधितांना आदेशीत केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांना १२ वर्षापासून न्याय मिळालेला नाही. उत्तरामध्ये म्हटल्याप्रमाणे आज त्यांना रु.६५,९५०/- चे बिल देण्यात आले. त्या संदर्भात अधिकाऱ्यांनी वेळीच कारवाई न केल्यामुळे तो शेतकरी मरण पावला. यामध्ये शेतकऱ्याचे झालेले नुकसान कोण भरुन देणार आहे? याबाबतीत शासनाचे निश्चित धोरण कोणते असेल?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या शेतकऱ्यांना ६५ हजार रुपयांचे बिल पाठविण्यात आले होते. त्या अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे १९८७ मध्ये ३ एचपीचे कनेक्शन होते.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/ प्रथम श्री. सरफरे.... 13:50
ता.प्र.क्र.7535.....

श्री. विजय वडेट्टीवार ............

सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी जो प्रश्न विचारलेला आहे ती वस्तुस्थिती आहे. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे हा प्रकार घडलला आहे. संबंधित शेतकऱ्यांने दिनांक 28/2/2004 ला कनिष्ठ अभियंत्याकडे निवेदन देऊन असे सांगितले होते की, मी या पंपाचा वापर करीत नाही. परंतु बिलिंग करणाऱ्या सहायक अभियंत्यांच्या कार्यालयात हे पत्र गेले नाही. हे पत्र कनिष्ठ अभियंत्यांकडे गेल्यानंतर त्यांनी उप विभागीय अधिकाऱ्याकडे हे पत्र पाठवून त्या पंपाचे परमनन्ट डिस्कनेक्शन करावयास पाहिजे होते ते केले गेलेले नाही. सन 2004 मध्ये पत्र दिले तेव्हा पासून आता पर्यंतचे बिल दिले गेले आहे ही चूक निश्चितपणे झालेली आहे. पण संबंधित कनिष्ठ अभियंता श्री. देशपांडे यांचा मृत्यु झालेला आहे. त्यामुळे त्या बिलामध्ये दुरुस्ती करुन दुसरे बिल देण्याचा किंवा संबंधितांने ते बिल भरण्याची आवश्यकता नाही अशा प्रकारची आता परिस्थिती आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शिक्षक -कर्मचारी यांना वाढीव 8 टक्के महागाई भत्ता लागू करणेबाबत**

**(6) * 7240 श्री.व्ही.यु. डायगव्हाणे, श्री.जयंत प्र.पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्रीमती उषाताई दराडे** : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाने त्यांचे कर्मचारी व निवृत्ती वेतन धारकांच्या महागाई भत्त्यात दिनांक 1 जानेवारी, 2010 पासून 8 टक्के वाढ करण्याचे आदेश दिनांक 26 मार्च, 2010 व 31 मार्च 2010 अन्वये निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यातील सर्व पात्र शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक 1 जानेवारी, 2010 पासून 8 टक्के महागाई भत्ता वाढ मंजूर करावी यासाठी विदर्भ माध्यमिक संघाने दिनांक 26 एप्रिल, 2010 रोजी केलेल्या धरणे/निदर्शनांच्या अनुषंगाने मा. वित्त मंत्री यांनी त्यांचे दिनांक 26 एप्रिल, 2010 चे पत्राद्वारे कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले असे एका लोकप्रतिनिधीला कळविले आहे, हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केलेली आहे,

(4) अद्यापही कार्यवाही केली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) व (4) दिनांक 22 जून. 2010 च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय व पात्र कर्मचाऱ्यांना तसेच निवृत्ती वेतनधारकांना दिनांक 1 जून, 2010 पासून महागाई भत्त्याच्या दरात 8% वाढ मंजूर करण्यात आली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, शासनाने दिनांक 1 जून,2010 पासून महागाई भत्याच्या दरात 8% वाढ मंजूर केलेली आहे त्याला एकूण किती खर्च अपेक्षित आहे?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, खरे म्हणजे यासाठी वर्षाला रुपये एक हजार ते अकराशे कोटीचा खर्च अपेक्षित आहे. दिनांक 01 जून,2010 पासून हा महागाई भत्ता लागू करण्यात आलेला आहे आणि त्यामध्ये 8% टक्के दरवाढ मंजूर करण्यात आलेली आहे.

श्री. कपिल पाटील: सभापती महोदय, बऱ्याचदा प्रश्न विचारल्याशिवाय कोणताही निर्णय शिक्षकांना लागू होत नाही अशी या राज्यामध्ये स्थिती आहे. तेव्हा त्या तारखेपासून हा निर्णय शिक्षकांना लागू झालेला आहे काय? सभापती महोदय,महागाई भत्ता मिळणे तर दूरच पण शिक्षकांचे पगारही वेळेवर होत नाहीत. आजही या राज्यातील शिक्षकांचे पगार झालेले नाहीत. कॅश फ्लो अपुरा असल्यामुळे शिक्षकांचे पगार होत नाहीत हे खरे आहे काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय महागाई भत्यात जी वाढ मंजूर करण्यात आलेली आहे ती राज्य शासकीय व इतर शिक्षक कर्मचाऱ्यांसह मंजूर करण्यात आलेली आहे आणि नियमितपणे सर्वांना वेतन दिले जाते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7240...

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शासन कशा पध्दतीने कर्मचाऱ्यांच्या हातावर तुरी देऊन बचत करीत आहे हे या प्रश्नातून दिसून येते. केंद्र शासनाने त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांना 01 जानेवारी, 2010 पासून महागाई भत्यात 8% दरवाढ केलेली आहे परंतु राज्य शासनाने मात्र केंद्रा प्रमाणे महागाई भत्ता लागू न करता 01 जून,2010 पासून हा महागाई भत्ता लागू केलेला आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, राज्यातील शिक्षकांबरोबरच सर्व कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न आहे. त्यासाठी मंत्रालयातसुध्दा अनेक वेळा आंदोलने झालेली आहेत. त्यामुळे हा महागाई भत्ता केंद्र शासनाप्रमाणे दि.01 जानेवारी,2010 पासून देण्यात येईल काय आणि याबाबतीत राज्यातील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांमध्ये जो असंतोष पसरलेला आहे तो दूर करण्यात येणार आहे काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, उत्तरात नमूद केल्या प्रमाणे दि.01 जून, 2010 पासून महागाई भत्याच्या दरात 8% वाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी या महिन्यापासून सुरु होईल. (अडथळा) सभापती महोदय, महागाई भत्यात दिनांक 01 जानेवारी,2010 पासून 08% टक्के वाढ लागू होईल काय असा प्रश्न विचारण्यात आला होता. महागाई भत्यातील ही दर वाढ दि.01 जानेवारी,2010 पासून लागू न होता ती दि.01 जून,2010 पासून लागू होईल.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शहापूर उपजिल्हा रुग्णालय (जि.ठाणे) येथे एका आदिवासी महिलेच्या नवजात अर्भकाचा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झालेला मृत्यू**

**(७) * ७३२४ श्री.हेमंत टकले, श्री.अरुण गुजराथी, ॲड. उषाताई दराडे, श्री.विक्रम काळे, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.रमेश शेंडगे, श्री.सतीश चव्हाण, श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर उपजिल्हा रुग्णालयात कोठारे गावातील आदिवासी महिलेस माहे मे, २०१० च्या सुमारास प्रसूतीसाठी दाखल केल्यानंतर सदर महिलेच्या प्रसूतीनंतर नवजात अर्भकाचा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे दिनांक ७ मे, २०१० रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अर्भकाच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या डॉक्टरवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री. सुरेश शेट्टी यांच्याकरिता** : (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत कर्तव्यार्थ असलेल्या स्त्री वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारीका या जबाबदार असल्याचे आढळून आले आहे. अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात आली असून अधिपरिचारीका यांना इतरत्र प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे व त्यानंतर पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यामध्ये जर आरोग्य विभागाने आढावा घेतला तर नवजात अर्भकांचे मृत्यू होण्याचे प्रमाण तसेच आदिवासी व डोंगराळ भागात राहणाऱ्यांना जी आरोग्य सेवा दिली जाते त्या ठिकाणी होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण रोखण्याचा प्रश्न हा केवळ बदली करुन किंवा तेथील अधिकाऱ्यांना सस्पेंड करुन सुटेल अशी शक्यता नाही. यासाठी शासन निश्चित स्वरुपात काही ठोस उपाययोजना पुढे आणणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, बालमृत्यूवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाकडून पुष्कळ योजना राबविण्यात येतात. शासनाचा हा प्रयत्न आहे आणि डिलिव्हरी केंद्रात व्हावी यासाठी योजना आहे. तसेच शासनाची जननी सुरक्षा योजना आहे. हे करण्याचे शासनाचे मूळ लक्ष्य आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7324 .....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तेथील अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्याला निलंबित केले आहे. एका अर्भकाचा मृत्यू होणे यामध्ये कायदेशीर क्रिमिनल केस करुन त्यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा शासन दाखल करणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाचा घटनाक्रम असा आहे की, 4 मे रोजी ही 20 वर्षाची महिला दाखल झाली आणि संध्याकाळी तिची डिलिव्हरी झाली. ही डिलिव्हरी इंड्यूस करण्यात आली होती. सायंकाळी 5.45 वाजता ती महिला टेबलावरुन उठून उभी राहिली आणि जराशी चालली आणि तशातच तिची डिलिव्हरी झाली. बाळ खाली पडले आणि त्याची कॉड सुध्दा तुटली. सिव्हिल सर्जन यांनी तीन डॉक्टरांची चौकशी समिती नेमली. आरएमओ, पेडियाट्रिशियन आणि गायनॉकॉलॉजिस्ट यांची चौकशीसाठी नेमणूक केली होती. त्यांनी जो रिपोर्ट सादर केला त्यामध्ये बाळ पडल्यामुळे मृत्यू झाला असे मृत्यूचे कारण दिलेले नाही. पडल्यामुळे बाळाचा मृत्यू झालेला नाही. त्या बाळाला इंज्युरी नाही. कॉज ऑफ डेथमध्ये "Muconium aspiration Syndrome with birth aspheria" असे नमूद केले आहे. त्यामुळे त्या डॉक्टरला सेवेतून कमी करण्यात आले आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी अर्भकाचा मृत्यू झाला त्याबद्दल कोणाला शिक्षा केली तर कोणाला रजेवर पाठविले. त्या जिल्ह्यामध्ये फार वाईट अवस्था आहे. माननीय मंत्रिमहोदया विक्रमगडला आल्या होत्या आणि त्यांनी ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन कले. त्यावेळी त्या ठिकाणी कर्मचारी आणून बसविले होते परंतु माननीय मंत्रिमहोदयांची पाठ फिरल्यावर ते परत गेले. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. त्या डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे अर्भकाचा मृत्यू झाला. त्या ठिकाणी औषधाचा साठा चार दिवस पुरेल एवढाच आहे अशा प्रकारची आमची माहिती आहे. त्यामुळे औषध मिळाले नाही म्हणून माणसे मेली अशा प्रकारची स्थिती निर्माण होण्यासारखी शक्यता त्या जिल्ह्यामध्ये आणि बाकीच्या भागामध्ये आहे. मागच्या वर्षी 16 जण सर्पदंशाने मेले. त्यांना वेळेवर ॲम्ब्युलंसने नेता आले नाही आणि वेळेवर उपचार झाले नाहीत. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील आश्रम शाळेतील 16 मुले मयत झाली. म्हणून त्या ठिकाणी पुरेसा औषधाचा साठा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7324 ..... श्री. संजय केळकर ...

करणार काय ? प्राथमिक आरोग्य केंद्र जाऊ द्या पण ग्रामीण रुग्णालयामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या, डॉक्टरांची संख्या 80 टक्के नव्हे तर 20 टक्के आहे. त्या ठिकाणी पुरेसे डॉक्टर भरणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न खूप जनरल स्वरुपाचा आहे. या ठिकाणी स्पेसिफिक शहापूरबद्दल प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : यामध्ये तिसरा प्रश्न असा विचारलेला आहे की, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर अर्भकाच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या डॉक्टरवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे ? या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत कर्तव्यार्थ असलेल्या स्त्री वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारीका या जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7324..... ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

अस्थायी वैद्यकीय अधिका-यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात आली असून अधिपरिचारीका यांना इतरत्र प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे व त्यांचेवर पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे. सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरवस्था निर्माण झाली आहे. जो कर्मचारी वर्ग असेल मग नर्सेस असतील इतर कर्मचारी असतील त्यांच्यामध्ये बेपवाई दिसत आहे. याप्रकरणी डॉक्टरांना जबाबदार धरले आहे. परंतु अधिपरिचारीका यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ते मंत्री महोदयांनी सांगावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, डॉक्टरांची नेमणूक कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर करण्यात आली होती. त्यामुळे त्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच तेथील अधिपरिचारीकांना दुसरीकडे पाठविले आहे. चौकशी समितीच्या अहवालात असे नमूद केले आहे की, त्यांनी हे जाणुनबुजून केलेले नाही, अधिपरिचारीका थोडया वेळासाठी तेथे नव्हत्या कदाचित त्या बाजूला डिलिव्हरी पेशंट अटेंड करत असतील. त्यामुळे ही कारवाई केलेली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------

2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ KTG/ SBT/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

प्रधान सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 12 जुलै, 2010 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : सोमवार, दिनांक 12 जुलै, 2010 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी. )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3......

NTK/ MMP/ KGS/ KTG/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: उपसभापतींची निवड व अभिनंदनपर भाषणे

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"श्री.वसंत शंकरराव डावखरे यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती म्हणून निवड करण्यात यावी."

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी मांडलेल्या प्रस्तावास मी अनुमोदन देतो.

डॉ.वसंत पवार ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"श्री.वसंत शंकरराव डावखरे यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती म्हणून निवड करण्यात यावी."

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी मांडलेल्या प्रस्तावास मी अनुमोदन देतो.

श्री.कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"श्री.वसंत शंकरराव डावखरे यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती म्हणून निवड करण्यात यावी."

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मांडलेल्या प्रस्तावास मी अनुमोदन देतो.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ KTG/ SBT/

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"श्री.किरण जगन्नाथ पावसकर यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती म्हणून निवड करण्यात यावी."

सभापती महोदय, हा प्रस्ताव मी एवढयासाठी मांडत आहे की, सबंध हिंदुस्थानामध्ये विधानसभा आहेत, काही ठिकाणी विधानपरिषदाही आहेत. लोकशाहीच्या माध्यमातून राज्यसभा व लोकसभा या सर्व ठिकाणी......

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : निवडणूक प्रक्रिया सुरु आहे....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी प्रस्ताव मांडत आहे. प्रस्ताव मांडत असताना त्याबाबतची कारणमिमांसा मी देऊ इच्छितो.

**सभापती** : निवडणूक प्रक्रियेनुसार सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रस्ताव मांडावा आणि त्यास माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अनुमोदन द्यावे. मी बोलण्यासाठी कुणालाही परवानगी देणार नाही.

श्री. दिवाकर रावते : उप सभापती पदाच्या संदर्भात तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शब्द दिला तो या सभागृहाला समजायला नको काय ? हा प्रस्ताव आम्ही का मांडतोय हे आम्ही सांगायचे नाही काय ? तसे असेल तर मी माझा प्रस्ताव मागे घेतो.

श्री. भाई जगताप : निवडणुकीची प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना कारणमिमांसा कशी काय देता येईल ?

श्री. दिवाकर रावते : हे सर्वथा चुकीचे होत आहे. प्रस्ताव मांडताना आमचे म्हणणे मांडण्याची संधी आम्हाला मिळालीच पाहिजे.

**सभापती** : या प्रस्तावाला सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अनुमोदन द्यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तावाला अनुमोदन देत असताना आमच्या भावना या ठिकाणी मांडण्याची संधी आम्हाला मिळाली पाहिजे. प्रथा आणि परंपरानुसार सर्व देशभर विरोधी पक्षाला उपसभापती पद दिले जाते. या राज्यामध्ये मात्र विधानसभा आणि विधानपरिषदेमधील उपाध्यक्ष आणि उपसभापती पद हे विरोधी पक्षाला दिले गेले नाही. ..

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या प्रस्तावाला अनुमोदन द्यावे. उपसभापतीच्या निवडणुकीनंतर ज्यावेळी भाषणे होतील त्यावेळी सन्माननीय सदस्यांना त्यांच्या व्यथा मांडायला हरकत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मला बोलू देत नसल्यामुळे मी माझा प्रस्ताव मागे घेतो.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची परवानगी देतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानपरिषदेचे उपसभापती पद हे विरोधी पक्षाला देण्याची प्रथा-परंपरा आहे. विरोधी पक्षाचे एकूण संख्याबळ किती आहे हा प्रश्न येथे नाही. जो पक्ष अल्प मतात असतो तो विरोधी पक्ष म्हणून बसतो. परंतु संपूर्ण हिन्दुस्थानामध्ये, सर्व राज्यामध्ये देशातील राज्यसभेमध्ये ज्या प्रथा परंपरा पाळल्या जातात त्या या राज्यात पाळल्या जात नाहीत. ज्यावेळी शिवशाही सत्तेवर होती त्यावेळी उपसभापती पद हे विरोधी पक्षाला देण्यात आले आणि त्यावेळी श्री. वसंतराव डावखरे हे विरोधी पक्षाचे म्हणून उपसभापती झाले. त्यानंतर सत्तांतर झाले आणि आमच्याकडे असलेल्या त्यावेळच्या विरोधी पक्षनेत्यांनी सक्षमतेने छातीवर हात ठेवून सांगितले की, आपण यांना सभापती पदाच्या निवडणुकीमध्ये आडवे करु आणि तेथे आम्ही निवडणूक लढविली आणि आज ते तुमच्याकडे आहेत. त्यांचे राजकीय आडाखे चुकले असतील. परंतु प्रथा परंपराना आपण जागले पाहिजे. हा विषय श्री. मधुकर सरपोतदार यांनी लावून धरला होता. सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये जेव्हा बैठक झाली होती त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी सांगितले होते की, पुढच्या वेळी प्रथा परंपरा नक्की पाळली जाईल. विरोधी पक्षाला उपसभापती पद देण्याच्या बाबतीत विचार करु. असा शब्द आम्हाला तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी दिला होता. त्यानुसार या निवडणुकीमध्ये आम्ही सहभागी झालो होतो. लोकशाहीच्या प्रथा परंपरा आपल्याला पाळायच्या नसतील, लोकशाहीमध्ये ह्या पध्दती तुम्हाला अवलबायच्या नसतील आणि या लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा जो सन्मान केला गेला आहे तो डावलून केवळ बहुमताच्या जोरावर निभावून न्यावयाचे असेल तर तो अधिकार तुम्हाला आहे. परंतु लोकशाहीच्या गमजा मारताना भविष्यामध्ये आपण या विधिमंडळामध्ये लोकशाही कशी कायम पायदळी तुडवित असतो हेही आपण लक्षात ठेवावे.

..नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

आणि म्हणून या पध्दतीने विरोधी पक्षाचा जो अधिकार आहे त्या अधिकारानुसार उपसभापती पद विरोधी पक्षाला मिळणार नसेल तर निवडणुकीच्या माध्यमातून ही जाणीव करुन देण्याकरिता मी बोलण्यासाठी उभा आहे. याठिकाणी स्पष्ट दिसून येते की, अशा पदाच्या निवडणुकीबाबत सत्तारुढ पक्षाकडून आणि सभागृहाच्या माननीय नेत्यांकडून तसेच सरकारचे नेतृत्व करणाऱ्या माननीय मुख्यमंत्र्यांकडून या संदर्भात विरोधी पक्षाच्या नेत्यांना बोलावले जाते, चर्चा केली जाते हे लोकशाहीतील सौजन्य याठिकाणी दाखविले गेले नाही हे मुद्दाम येथे नमूद करु इच्छितो. उपसभापती पदाचे उमेदवार म्हणून सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव डावखरे सर्वांना भेटले, ते त्यांचे कर्तव्य होते. प्रथा आणि परंपरेनुसार उपसभापती पद विरोधी पक्षाला तुम्ही देणार आहात की नाही यापेक्षा निवडणुकीत उमेदवार उभा केल्यानंतर या संदर्भात विरोधी पक्षाशी चर्चा केली जाते. विरोधी पक्षाच्या नेत्यांना माननीय मुख्यमंत्री चर्चेसाठी निमंत्रण देतात, विनंती करतात. ही प्रथा आणि परंपरा पाळली गेली नाही. एवढा बहुमताचा अहंपणा असेल तर तो तुमचा अहंपणा तुम्हाला लखलाभ होवो. या हिंदुस्थानामध्ये काही प्रथा आणि परंपरा आहेत. म्हणूनच काल स्व.भैरोसिंह शेखावत यांना आदरांजली वाहत असताना आम्ही सांगितले की, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य असताना स्व.भैरोसिंह शेखावत यांना राज्यसभेत सुध्दा सभापती/उपराष्ट्रपती पद मिळाले. म्हणूनच आम्ही नम्र विनंती केली होती. आपण ती मान्य केली तर ठीक आहे. अन्यथा विरोधी पक्ष अल्पमतात आहे. लढण्याकरिता आम्ही निवडणुकीत उमेदवार उभा केलेला नाही. याचा निर्णय आपणच घ्यावयाचा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रस्ताव उपसभापती पदाच्या संदर्भात मांडला आहे, त्या प्रस्तावाला आम्ही अनुमोदन दिलेले आहे. प्रस्ताव मांडत असताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनांशी मी सहमत आहे. प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव डावखरे यांचा नाही. गेली काही वर्षे महाराष्ट्राच्या या विधीमंडळामध्ये लोकशाहीच्या प्रथा आणि परंपरा बहुमताच्या जोरावर अशा पध्दतीने पायदळी तुडविल्या जात असतील तर त्याची दखल घेण्याची गरज आहे, त्याची नोंद घेण्याची गरज आहे. मागील वेळी सभापती पदाच्या निवडणुकीच्या संदर्भात या राज्याच्या तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी सभापती पदाची निवड बिनविरोध व्हावी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

यासाठी विरोधी पक्षाच्या नेत्यांना बोलावून महाराष्ट्रामध्ये सन्मानाच्या असलेल्या सभापती पदाची निवडणूक होऊ नये अशा प्रकारची विनंती केली होती. ती विनंती आम्ही मान्य केली होती. त्यावेळी तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, पुढील वेळी जेव्हा उपसभापती पदाची निवडणूक होईल त्यावेळी या देशामध्ये विरोधी पक्षाच्या दृष्टीने ज्या प्रथा आणि परंपरा आहेत त्याचा विचार निश्चितपणे केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या संदर्भातील उदाहरण सांगितले आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. संपूर्ण देशाला दिशा देणारे हे राज्य आहे. अशा राज्यामध्ये जर बहुमताच्या जोरावर या प्रथा आणि परंपरा पायदळी तुडविल्या जात असतील तर महाराष्ट्राच्या दृष्टीने ते योग्य नाही, या भावना व्यक्त करण्यासाठी आम्ही हा प्रस्ताव आणलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव डावखरे यांच्या विरोधात निवडणूक लढविण्याचा आमचा मुळीच उद्देश नव्हता. आमच्या ज्या भावना आहेत त्या व्यक्त केल्या गेल्या पाहिजेत. बहुमताच्या जोरावर ज्या पध्दतीने हे सरकार काम करीत आहे त्याची नोंद या सभागृहाने घेतली पाहिजे या उद्देशाने हा प्रस्ताव आणला आहे. प्रस्तावक सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना आपला प्रस्ताव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माझा प्रस्ताव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी अशी मी विनंती करतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव मांडला आणि मागे घेतला त्याबद्दल खरोखरच मी त्यांचा आभारी आहे. त्यांनी प्रस्तावावर आपल्या भावनाही व्यक्त केल्या की, यापूढे सुध्दा तसेच आजही निवडणूक न होता उप सभापती निवडून द्यावा. कारण माननीय श्री. वसंतराव डावखरे साहेब यांना सर्व पक्षांनीच ......येथे एकमताने पाठविलेले आहे म्हणून त्यांना कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. त्यांनी फक्त त्यांचा कॉन्शस क्लिअर केलेला आहे. माननीय श्री. डावखरे साहेबांना सर्वांनी पाठिंबा दिल्याबद्दल मी मनापासून आभार मानतो.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय गट नेते श्री. दिवाकर रावते यांनी येथे ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांच्या भावना मी समजू शकतो. आपल्याला कल्पना आहेच की आपण म्हटल्याप्रमाणे चर्चा होणे अपेक्षित होते. त्याचबरोबर माननीय उप मुख्य मंत्री श्री. भुजबळ साहेब यांच्या मताशीही मी ठामपणे सहमत आहे की, माननीय श्री. वसंतराव डावखरे यांना आपण सर्वांनी एकत्र मिळून उपसभापती करावे. डावखरे साहेब यांचे व्यक्तिमत्वच एवढे पॉप्युलर आहे की, विरोधी पक्षाच्या भावना त्यांच्यापर्यंत जास्त पोहचतात म्हणूनच ते सर्वमान्य असे उमेदवार आहेत, अशी माझी धारणा आहे. त्याचबरोबर आपण सर्वांनीच सहकार्य केल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपला प्रस्ताव मागे घेतला असल्यामुळे व फक्त एकाच सन्माननीय सदस्याचे नामनिर्देशन पत्र राहिले असल्यामुळे आता निवडणूक घेण्याची आवश्यकता नाही.

माननीय श्री. वसंतराव डावखरे हे बिनविरोध निवडून आलेले आहेत. तसेच माननीय श्री. वसंतराव डावखरे यांची उपसभापतीपदी निवड होण्यासंबंधीच्या प्रस्तावाला दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी एकमताने पाठिंबा दिल्यामुळे माननीय श्री. वसंतराव डावखरे हे उपसभापती पदावर निवडून आले असे मी जाहीर करतो.

माननीय मुख्यमंत्री व माननीय विरोधी पक्षनेते यांनी श्री. वसंतराव डावखरे यांना उपसभापतीस्थानी सन्मानपूर्वक बसवावे अशी मी त्यांना विनंती करतो.

( सन्माननीय श्री.वसंतराव डावखरे यांनी उप सभापतीस्थान ग्रहण केले. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण (मुख्य मंत्री) : महोदय, विधानपरिषदेच्या उप सभापतीपदी माननीय श्री. वसंतराव डावखरे यांची बिनविरोध निवड झाली त्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि श्री. वसंतराव डावखरे यांचेही मनापासून अभिनंदन करतो. उपसभापती पदावर त्यांची आताच निवड झालेली असून ही निवड झाल्यानंतर मी, माननीय उप मुख्य मंत्री तसेच माननीय विरोधी पक्षनेते आम्ही सर्वांनी त्यांना त्यांच्या जागेवर स्थानापन्न केलेले आहे. तसेच चुकून बाजूच्या बाकावर जाऊ नये अशी काळजी घेण्याचीही विनंती मी त्यांना केली. माननीय श्री. वसंतराव डावखरे हे विधान परिषदेवर चवथ्यांदा निवडून आले असून उपसभापती पदावर त्यांची हॅट्ट्रिक झालेली आहे. त्यांचे व्यक्तिमत्वच असे आहे की, राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना सर्वच पक्षांशी त्यांचे चांगले व सौहार्दाचे संबंध आहेत. त्यामुळे सभागृह सुध्दा नि:पक्षपातीपणे चालवितात आणि अतिशय चांगल्या प्रकारे प्रश्न मार्गी लावण्याचे त्यांनी यापूर्वीही प्रयत्न केले आहेत....

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

सन्माननीय श्री.वसंत डावखरे यांची पुन्हा उपसभापती म्हणून निवड होण्यासाठी आपण सर्वांनी संधी दिली त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. श्री. वसंत डावखरे हे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करीत असतांना त्यांनी सर्वपक्षीय संबंध स्थापीत केलेले आहेत. सर्व पक्षांशी त्यांचे चांगले संबंध आहेत. महत्वाचे विषय या सभागृहात मार्गी लावण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केलेले आहेत. सभागृहात ज्या ज्यावेळी अडचणीचे प्रश्न निर्माण झाले त्या त्या वेळी त्यांनी आपल्या चेंबर्समध्ये दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांना बोलावून प्रश्न मार्गी लावलेले आहेत. गावच्या सरंपचापासून त्यांनी आपल्या राजकीय क्षेत्राला सुरुवात केली होती तसेच नगरपालिकेचे अध्यक्ष पद, महानगरपालिकेचे महापौर पद आणि विधान परिषदेचे उपसभापती पद असा त्यांचा आजपर्यंतचा राजकीय प्रवास राहिलेला आहे. माननीय वसंत डावखरे यांनी स्तुत्य आणि कार्यक्षमपणे उपसभापती म्हणून काम केलेले आहे. त्यांनी आपल्या कार्याने चांगला इतिहास घडविला आहे त्यांची पुन्हा एकदा उपसभापती पदी निवड झाल्याबद्दल मी शुभेच्छा देतो आणि आपली रजा घेतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ( उप मुख्यमंत्री ) : सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी माननीय श्री. वसंत डावखरे यांची उपसभापतीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. पक्षाचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली होती. त्यांच्या आयुष्यामध्ये कोणीही मोठा गॉड फादर नसतांना देखील काम करीत करीत त्यांनी नगर सेवक, महापौर पद तसेच विधान परिषदेचे उपसभापती अशी पदे भूषवली आहेत. माननीय श्री. वसंत डावखरे यांनी 1998 पासून विधान परिषदेचे उपसभापती म्हणून काम पाहिलेले आहे. आज पासून ते पुन्हा सहा वर्षे विधान परिषदेचे उपसभापती म्हणून काम पाहणार आहेत. उपसभापती म्हणून सभागृहाने त्यांना पुन्हा एकदा संधी दिलेली आहे. श्री. वसंत डावखरे हे सर्व पक्षामध्ये लोकप्रिय आहेत हे मी मघाशीच सांगितलेले आहे. माननीय श्री. वसंत डावखरे हे बिन विरोध निवडून आले असून त्यांची उपसभापती पदी एकमताने निवड झालेली आहे.

सभापती महोदय, आपले आणि उपसभापतींचे काम हे फार कठीण काम आहे. खरे म्हणजे ती तारेवरची कसरतच असते. दोन्ही बाजूंना सांभाळूनच आपल्याला काम करावे लागत असते. सभागृहात शांतता ठेवून शासकीय कामकाज आपल्याला करावे लागत असते. काही वेळा कठोर निर्णय सुध्दा आपल्याला घ्यावे लागतात त्यामुळे नाराजीही निर्माण होत असते. त्यामुळे शासनाला आणि विरोधी पक्षाला सांभाळून सर्वांना न्याय देऊन आपल्याला सभागृहाचे कामकाज करावे लागते. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना म्हणणे मांडण्याची संधी मिळावी यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतात तसेच याबरोबर शासकीय कामकाज सुध्दा आपल्याला पार पाडावे लागते. हे सर्व करीत असतांना आपल्या कर्तृत्वाची कसोटी लागत असते. माननीय श्री. वसंत डावखरे यांच्या बाबतीत मला भितीयुक्त आदर आहे .कारण विरोधी पक्षाचे सदस्य जोरात जरी बोलले तरी सुध्दा ते आपल्या बाजूने निदेश देत असतात. श्री. वसंत डावखरे यांना उपसभापती पदी बसविण्यासाठी विरोधी पक्षाने सुध्दा पूर्णपणे पाठिंबा दिलेला आहे. विनोदाचा भाग जरी सोडला तरी आपल्याला जे उपसभापती पद मिळालेले आहे ते आपल्या कर्तृत्वाने मिळालेले असून उपसभापती पद मिळणे हे परमभाग्य आहे असे मी तरी समजतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...........

. माननीय श्री.वसंत डावखरे यांच्या सारखी इम्पार्शल व्यक्ती उपसभापती झाली याचा आनंद ज्याप्रमाणे सत्ताधारी पक्षाला आहे, त्याचप्रमाणे विरोधी पक्षालासुध्दा निश्चितपणे आनंद झाला आहे. भविष्याामध्ये त्यांची उत्तरोत्तर प्रगती होईलच. कोणताही गॉड फादर नसतांना आपल्या कर्तृत्वाच्या भरवशावर सरपंच पदापासून ते उपसभापती पदापर्यंत त्यांनी प्रगती केलेली आहे. यापुढे सुध्दा ते आपल्या कर्तृत्वाच्या जोरावरच पुढे जातील, अशा प्रकारच्या आमच्या शुभेच्छा त्यांच्या पाठीशी आहेत. माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांना परमेश्वराने उदंड आयुष्य द्यावे आणि गोरगरीब तसेच कष्टकरी माणसांची सेवा करण्याची संधी त्यांना या पदाच्या माध्यमातून द्यावी,अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो आणि पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन करुन माझे दोन शब्द येथेच संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधान सभेने निवडलेले ) सभापती महोदय, श्री.वसंत डावखरे यांची उपसभापती पदावर निवड झाली,त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.वसंत डावखरे यांची उपसभापती पदावर निवड झाल्यामुळे विरोधी पक्षाला सर्वात जास्त आनंद झाला आहे. मनापासून जो आनंद झालेला असतो तो कधीही लपत नाही. माननीय श्री.वसंत डावखरे यांच्या कर्तृत्वाबद्दल आपण नेहमीच ऐकत आलो आहोत. त्यांचे कोडकौतुक आपण नेहमीच करीत आलो आहोत. ठाण्याचे महापौर असतांना त्यांनी हे पद इतके गाजवले होते की, त्या बाबतीत अजूनही त्यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. उपसभापती म्हणून ते आम्हाला नेहमीच आनंददायी वाटतात, आणि यापुढे देखील ते आम्हाला आनंददायी वाटतील. सभापती महोदय, पीठासीन अधिका-याच्या स्थानावर सभापती म्हणून आपण बसल्यानंतर तसेच उपसभापती म्हणून श्री. वसंत डावखरे बसल्यानंतर सभागृतील विरोधी पक्षाचे सदस्य असो वा सत्ताधारी पक्षाचे सदस्य असो या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सन्मानित केले जाते. त्यामुळे या पदाची आम्हाला आकृष्टता आहे, आवड आहे तसेच आनंदही आहे. परंतु समोरच्या बाजूला बसलेल्या सन्माननीय सदस्यांकडून जेव्हा त्यांचे अभिनंदन केले जाते, त्यावेळी कोठे तरी आमच्या मनामध्ये श्ंका येते. माननीय श्री.वसंत डावखरे हे चार वेळा विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले आहेत आणि तिस-यांदा ते उपसभापती होत आहेत. याचा कितीही आनंद सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य मानत असले तरी श्री. वसंत डावखरे जर उपसभापती झाले नसते तर मंत्री पदावर त्यांची निवड झाली असती. यामुळे श्री वसंत डावखरे यांची उपसभापती या पदावर निवड झाल्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांच्या मनात आनंद व्यक्त होत असतांना आम्हाला पहावयास मिळतो आहे. श्री. वंसत डावखरे जर उपसभापती झाले नाही तर ते मंत्री नक्की होतील आणि यामुळे अन्य कोणाची तरी मंत्री होण्याची संधी जाईल. म्हणून श्री. वसंत डावखरे उपसभापती झाले या बद्दल सरकार पक्षातील सन्माननीय सदस्य आनंद व्यक्त करीत असतांना त्यांना ज्या गुदगुल्या होत आहेत त्या आम्हाला जाणवत आहेत. श्री वसंत डावखरे लाल दिव्याची गाडी धेऊन फिरणार आहेत. ते आपल्या कर्तृत्वाने लाल दिवा घेऊन आलेले आहेत. ते आज उपसभापती झाल्यामुळे, आम्हाला आनंद झाला आहे. याचे कारण असे की, आमच्यासाठी ते आमचे सभापती आणि आमचे उपसभापती आहेत अशीच आमची भावना असते. परंतु तुमच्या दृष्टीने

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

माननीय श्री वसंत डावखरे यांची उपसभापती पदावर निवड झाल्यामुळे ते आज मंत्री होणार नाहीत. यामुळे लाल दिवा वाचला आणि कोणाला तरी मंत्री होण्याची संधी मिळाली, अशी भावना असते. याबाबतीत आपल्याला ज्या गुदगुल्या होत असतात त्या गुदगुल्या आम्हाला आपल्या अभिनंदनातून जाणवत आहेत.

सभापती महोदय, श्री वसंत डावखरे ज्यावेळी पीठासीन अधिकारी म्हणून बसतात त्यावेळी ते सभागृहापुढील कामकाज लवकर उरकतात. त्यामुळे कधी कधी आम्हाला त्यांची भीती वाटते. सभागृहासमोर प्रचंड कामकाज आहे, त्यामुळे आता काय करावयाचे ? असा प्रश्न आल्यानंतर श्री वसंत डावखरे यांना त्या खुर्चीवर बसविले जाते. त्यांना खुर्चीवर बसवले की ते भराभर सभागृहाचे कामकाज उरकून टाकतात. कामकाज संपविण्याच्या बाबतीत त्यांचा आम्हाला एवढा आग्रह असतो की, आम्ही त्यांच्यावर कधीही रागवू शकत नाही. काही वेळेस माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे पीठासीन अधिकारी म्हणून बसल्यानंतर सन्माननीय सदस्यांचा जो हक्क आणि अधिकार असतो ते हक्क आणि अधिकार पूर्णत्वास नेण्यास ते माननीय मंत्री महोदयांना भाग पाडतात. तेव्हा कामकाज लवकर उरकणे आणि सत्ताधारी बाजूच्या मंत्र्यांना सांगून सभागृहातील सन्माननीय सदस्यांना न्याय देणे या दोन्ही गोष्टी पार पाडण्यास श्री. वसंत डावखरे हे पारंगत असल्यामुळे त्यांची पुन्हा उपसभापती पदी निवड झाल्यामुळे, आम्हाला ख्रोखर खूप आनंद झाला आहे.

सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ हे आता सभागृहाच्या बाहेर गेलेले आहेत. श्री. वसंत डावखरे यांना विरोध करण्यासाठी आम्ही श्री.किरण पावसकर यांची उपसभापती पदावर निवड करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडलेला नाही. श्री वसंत डावखरे यांना विरोध म्हणून हा प्रस्ताव मांडला नाही. श्री.नारायण राणे आमच्या पक्षात असतांना त्यांनी केलेल्या एका चुकीतून विरोधी पक्षाच्या दोन सन्माननीय सदस्यांचे कायमचे नुकसान झाले होते. खालच्या सभागृहातील उपाध्यक्ष पदाच्या बाबतीत आणि वरच्या सभागृहातील उपसभापती पदाच्या बाबतीत नुकसान झाले होते. एका राजकीय हेतूतून निर्माण केलेल्या चुकीतून दोन सन्माननीय सदस्यांचे कायमचे नुकसान झाले होते. ते आता तुमच्याकडे आलेले आहेत तेव्हा तुमच्याकडे आल्यानंतर ते काय परिस्थिती निर्माण करतात ते आता तुम्हीच पहा.

यानंतर श्री. सरफरे...

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आणि म्हणून एका चुकीमुळे एवढे नुकसान झाले ते सांगण्यासाठी आम्हाला उमेदवारी अर्ज भरावा लागला. आम्ही माननीय श्री. डावखरे साहेबांच्या विरोधात नव्हतो हे सांगण्यासाठी आम्ही उमेदवारी अर्ज भरला. मला याठिकाणी एक गोष्ट नम्रपणे सांगितली पाहिजे की, माननीय श्री. वसंत डावखरे हे यापूर्वी दोन वेळा उपसभापती म्हणून आमच्यासमोर होते आणि आता तिसऱ्यांदा ते उपसभापती होत आहेत. परंतु ही पहिली वेळ होती की, माननीय श्री. डावखरे यांना विचारावे लागले की, डावखरे साहेब तुमचे उमेदवारीचे नक्की आहे काय? आणि म्हणून याठिकाणी आनंद व्यक्त करीत असतांना आमच्या मनामध्ये तो निर्मळ आनंद नाही. आणखी कुणाला संधी मिळू नये म्हणून माननीय श्री. डावखरे साहेब त्या आसनावर बसत आहेत हे सुध्दा त्यामध्ये आहे हे आपण समजून घ्यावे. म्हणून या निवडणुकीकडे पहात असतांना याठिकाणी आमचा अधिकार मागण्यासाठी निर्माण झालेली उमेदवारी होती. ती माननीय श्री. डावखरे साहेबांना विरोध करण्याकरिता नव्हती. आदरणीय शिवसेनाप्रमुखांचा आशिर्वाद घेऊनच ते या सदनामध्ये बिनविरोध निवडून आलेले आहेत त्यामुळे त्यांना आमचा विरोध असेलच कसा? ते कधीही लपून सांगत नाहीत तर जाहीरपणे ते उतराई होतात व आशिर्वाद घ्यायला जातात. आणि मला खात्री आहे की, उपसभापती झाल्यानंतर ते आदरणीय शिवसेना प्रमुखांचा आशिर्वाद घ्यायला जातील. या महाराष्ट्रातील दोन प्रबळ नेत्यांचा त्यांच्या पाठीवर आशिर्वाद असल्यानंतर त्यांना मागे हटविण्याची कुणाची टाप आहे? मला याठिकाणी एकच गोष्ट सांगावयाची आहे की, तुम्हाला मनापासून आनंद झाला असेल. या आसनावर बसून सभापती या नात्याने गोरगरीबांकरिता माननीय श्री. डावखरे साहेब त्या दिवशी जे म्हणाले ते ऐकून त्यावेळी माझ्या डोळयात अश्रू आले. ते म्हणाले होते की, माझी आई स्टेशनवर भाजी विकायला बसत होती त्यामधून मी मोठा झालो आहे. आणि म्हणून झुणका भाकर केंद्रे तुम्ही उडवू नका असे माननीय श्री. डावखरे साहेबांनी त्याठिकाणी बसून सांगितले होते. त्यांच्या भावना त्यावेळी काय असतील हे मला माहीत नाही, परंतु गरिबांचे अश्रू त्यांच्या डोळयामध्ये होते. माननीय श्री. डावखरे साहेबांच्या उपसभापतीपदाबद्दल सरकारला मनापासून आनंद झाला असेल तर तो आनंद व्यक्त करण्याकरिता तुम्ही गेली 5 वर्षे रखडून ठेवलेली 750 झुणका भाकर केंद्राची मान्यता देण्याकरिता तातडीने पावले उचलावीत . आमच्या गरिबांकरिता ज्यांनी आपल्या आईची

DGS/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते....

गरीबी पणाला लावली, त्याची जाण तुम्ही ठेवणार की नाही हा प्रश्न आहे? हे याठिकाणी सांगत असतांना एका गोष्टीची खंत वाटते की, माननीय श्री. डावखरे साहेब आपण मागील वेळी निवडून आलात त्या आनंदामध्ये सामील होण्याकरिता वहिनी होत्या. परंतु आज मात्र तुमच्या या आनंदामध्ये सामील होण्याकरिता वहिनी नाहीत. ही खंत मात्र मनाला कुठेतरी चाटून जाते. मी पुनश्च एकदा आपले मनापासून स्वागत करतो, आपले अभिनंदन करतो व आनंद व्यक्त करतो . आपले सहकार्य आम्हाला मिळणारच आहे, ते वेगळे सांगण्याची गरज नाही. पुन्हा एकदा आदरणीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे आणि श्री. उध्दवजी यांच्या वतीने आपणाला मनापासून शुभेच्छा देतो जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या सभागृहाचे उपसभापती म्हणून माननीय श्री. वसंतराव डावखरे निवडून आल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करण्यासाठी उभा आहे.

पीठासीन अधिकारी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिच्या अंत:करणामध्ये एक यंत्र सतत जीवंत असावे लागते, ताजे असावे लागते, कार्यरत असावे लागते, सक्षम असावे लागते. आणि ते म्हणजे एका बाजूला सत्ताधाऱ्यांच्या अडचणी समजून घेत असतांना दुसऱ्या बाजूला प्रश्न मांडणाऱ्या विरोधकांच्या व्यथा समजावून घेणे या दोन्ही गोष्टींचे फेअर कॉंबिनेशन सतत पीठासीन अधिकाऱ्यांना करावे लागते. माननीय श्री. वसंतराव डावखरे यांचे हे यंत्र अत्यंत शाबूत आणि व्यवस्थित असल्याचे आम्ही अनेक वर्षे पाहिले आहे. त्यामुळे मी मनापासून त्यांचे अभिनंदन करीत आहे. प्रश्न मांडणाऱ्या सदस्यांच्या व्यथा लक्षात आल्यामुळे होणाऱ्या वेदना, आणि शासनाच्या अडचणी लक्षात आल्यामुळे निर्माण होणारा ओलावा याचे कॉबिनेशन सतत पीठासीन अधिकाऱ्यांना करावे लागते. त्यामधून प्रश्न सुटण्याचा प्रमोद सतत पुढे पुढे जात असतो. माननीय श्री. डावखरे साहेब ज्या परिस्थितीमधून आपल्या संपूर्ण जीवनाचा प्रवास करीत आहेत, त्यांनी तो केला आहे. त्यामुळे त्यांच्याजवळ हा गुण अत्यंत विपुल प्रमाणात आहे याची कितीतरी उदाहरणे आपल्याला देता येतील. माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी दिलेल्या उदाहरणाप्रमाणे अनेक उदाहरणे देता येतील. परंतु त्या गोष्टींचे ढोबळमानाने वर्णन करावयाचे झाले तर मी असे म्हणेन की, गरीब परिस्थितीशी सामना देत देत मोठया पदावर गेल्यानंतर सुध्दा मनाची श्रीमंती आणखी वाढवीत त्या पदाला न्याय देण्याचे काम त्यांनी केले आहे. त्या जागेवरुन खरोखरच अत्यंत उत्तम अशाप्रकारच्या कामाचा ठसा त्यांनी उमटविला आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

मला सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव डावखरे यांचा संबंध प्रवास जवळून माहीत असल्यामुळे ज्या वेळेला ते स्थानिक स्वराज्य मतदारसंघामधून अविरोध निवडून आले त्यावेळी मला श्री. बाळासाहेब देसाई यांची आठवण झाली. महाराष्ट्राच्या इतिहासात विधानसभेवर अविरोध निवडून जाण्याचा मान पाटण मतदारसंघातून सन्माननीय बाळासाहेब देसाईंना मिळाला होता. दुर्मिळ अशी ही गोष्ट आहे. फार कमी लोकांना अशा प्रकारची संधी मिळते. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडेंनी सन्माननीय श्री. नितीन गडकरी यांचे नांव सांगितले. श्री. बाळासाहेबांचा आणि त्यांचा ऋणानुबंध लक्षात घेता मला असे वाटते की, त्यांनी आपल्या गुरुंना त्यांच्यापासून घेतलेल्या धडयांची पावती दिली असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. मी मनापासून श्री. वसंतराव डावखरे यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेब हे मनाने श्रीमंत आहेत. ते जेवढे मनाने श्रीमंत आहेत तेवढेच मित्रपरिवाराने सुध्दा श्रीमंत आहेत. म्हणून आज त्यांची पुन्हा एकदा विधानपरिषदेच्या उपसभापती या पदावर बिनविरोध निवड होऊ शकली. त्यांची अनेकदा या सभागृहातील शेवटच्या सदस्याला न्याय देण्याची भूमिका असते, याचा अनुभव मी अनेकवेळा घेतलेला आहे. ठाणे जिल्हयाचे राजकारण असो किंवा राज्याचे राजकारण असो लोकांच्या प्रश्नाबाबत आपला मित्रत्वाचा अधिकार वापरत गरिबाला न्याय देण्याची आणि सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची भूमिका आहे त्यामुळेच आज त्यांची बिनविरोध निवड झालेली आहे. त्याबद्दल मी पुन्हा एकदा आनंद व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सगळयांचे अतिशय जवळचे मित्र असलेले श्री. वसंत डावखरे हे पुन्हा एकदा उपसभापती या पदावर नियुक्त झालेले आहेत. आपल्या सगळयांच्या पाठिंब्याने ते आता आसनस्थ होतील. या पदाला पीठासीन अधिकारी असे म्हटले जाते. मला हे पीठासीन अधिकारी पद म्हणजे एखाद्या उत्तम अन्न पुरविणाऱ्या गिरणीचे मालक आहेत की काय असा संशय येतो. कोणीही श्री. डावखरे यांच्याकडे गेल्यानंतर त्यांची भूक केवळ त्यांच्या चेहऱ्यावर जरी व्यक्त झाली तरी तो माणूस समाधानाने परत येतो. अशा प्रकारे हा लोकांशी मैत्री करण्याचा पोटातून जाणारा मार्ग श्री. डावखरें यांनी अतिशय चतुराईने आणि अतिशय चांगल्या पध्दतीने त्यांच्या आजपर्यंतच्या राजकीय कारकिर्दीमध्ये अवलंबिलेला आहे. मैत्र आणि संवाद घडण्याला जे वातावरण आवश्यक असते ते निर्माण करण्यासाठी हा सगळा प्रयोग असतो. अतिशय कुशलतेने आपला मित्रपरिवार कुठल्याही एका पक्षापुरता सीमित न ठेवता सर्व पक्षांना एकत्र घेऊन आपली विचारांची देवाण-घेवाण चांगल्या पध्दतीने व्हावी अशा प्रकारचे वातावरण तयार करुन त्या वातावरणात माननीय उपसभापती श्री. डावखरे हे या सभागृहाचे कामकाज चालवितात. सभागृहामध्ये घडणाऱ्या वेगवेगळया प्रसंगामध्ये तणावाची जी बाजू असते ती हलकी करण्याचे त्यांचे कौशल्य या पूर्वी वारंवार प्रकट झालेले आहे. अनेक क्षेत्रामध्ये वावर असलेले सगळयांचे सन्मित्र माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे यांची या सभागृहाचे कामकाज चालविण्याची हातोटी आणि त्या निमित्ताने त्यांनी निर्माण केलेले वातावरण हे सगळयाच सदस्यांच्या नेहमी लक्षात राहते त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांना ते आपले एक हक्काचे ठिकाण आहेत असे वाटते. कोणत्याही सन्माननीय सदस्यांना काही मांडावयाचे असेल तर ते माननीय उप सभापती श्री. डावखरे यांच्या माध्यमातून मांडले तर आपला विषय सभागृहाच्या पटलावर नक्की येऊ शकतो आणि त्या विषयाला न्याय मिळू शकतो, असे वाटते. अशी न्यायाची भूमिका बजावणारे, सर्वांचे मित्र असलेले आणि सभागृहाचे वातावरण प्रफुल्लीत ठेवणारे सन्मित्र माननीय श्री. डावखरे यांची पुन्हा या उपसभापती पदावर नियुक्ती झालेली आहे. हा सगळा आनंद आपण सगळयांनी एकत्र मिळून साजरा करण्याचा आनंद आहे.मी त्यांना पुढच्या वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये उपसभापती पदासाठी ज्यांची निवड झाली त्या श्री. वसंत डावखरे साहेब यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. मी श्री. डावखरे साहेबांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांच्या कारकिर्दीसाठी सुयश चिंतितो. पण त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब तसेच माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब यांनी जे विचार मांडले त्यावर या सभागृहाने विचार करण्याची गरज आहे. कदाचित ही एक परंपरा असू शकेल. प्रथा आणि परंपरेनुसार माननीय उपसभापती यांना त्यांच्या जागेवर आणून बसविले जाते. हे सर्व सोपस्कार आपण करतो. परंतु या सभागृहामध्ये उजवीकडील जी बाजू आहे ती सरकारी पक्षासाठी आहे आणि डावीकडील बाजू ही विरोधी पक्षासाठी आहे. यामध्ये एक परंपरा लक्षात येते आणि ती सांगण्याची गरज नसावी. आपल्यातील एक व्यक्ती डावीकडील भागात आणून बसवावयाची पण डावीकडील व्यक्तीला ते पद द्यावयाचे नाही. हे या ठिकाणी दाखवून दिलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि सर्वांनी आपल्या भाषणात सांगितले की, श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना दालनामध्ये बैठक झाली आणि त्या ठिकाणी चर्चा झाली की, यासंदर्भात विचार केला जाईल आणि उपसभापती पद पुन्हा विरोधी पक्षाकडे देण्याचा विचार करु. परंतु खरे म्हणाल तर महाराष्ट्रात ही सुध्दा एक परंपरा असू शकेल की, दिलेला शब्द पाळावयाचा नाही. माजी मुख्यमंत्री असोत किंवा आजी मुख्यमंत्री असोत त्यांनी जे शब्द जनतेसाठी दिलेले असतात किंवा सभागृहासाठी दिलेले असतात ते शब्द पाळावयाचे नाहीत ही परंपरा सुध्दा असू शकेल. त्यासंदर्भात आमच्या सर्व नेत्यांनी आपले विचार या ठिकाणी सांगितले. मी आणखी एका परंपरेविषयी सांगेन की, सभागृहाच्या परंपरेचे भान ठेवत विरोधी पक्षाने आपला प्रस्ताव मागे घेतला परंतु सभागृहाचे नेते तसेच माननीय संसदीय कार्य मंत्री हे हा प्रस्ताव पारित होईपर्यंत सुध्दा सभागृहात थांबलेले नाहीत. ही एक नवीन परंपरा पडलेली आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, उपसभापती पद हे आपल्या पक्षाला किंवा आपल्या व्यक्तीला मिळावे म्हणून सर्व राजकीय पक्ष प्रयत्न करतात. परंतु सर्व सदस्यांची भाषणे होईपर्यंत आणि हा प्रस्ताव पारित होईपर्यंत या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री आणि संसदीय कार्य मंत्री सभागृहात

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. किरण पावसकर .....

थांबू शकत नाहीत ही एक प्रथा आणि परंपरा पडलेली आहे. यासाठी आपण मुद्दाम माननीय संसदीय कार्य मंत्री यांच्याशी बोलावे आणि पुढील सहा वर्षानंतर होणाऱ्या अशा निवडणुकीमध्ये ही प्रथा आणि परंपरा मोडावी. माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील आता सभागृहात उपस्थित झालेले आहेत. त्यांचे स्वागत करण्यास हरकत नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, हा प्रस्ताव पारित होईपर्यंत आपण आणि सभागृहाचे नेते सभागृहात थांबला नाहीत हे मी मुद्दाम निदर्शनास आणून देत होतो. पुन्हा एकदा मी श्री. डावखरे साहेबांचे अभिनंदन करतो. याचे कारण म्हणजे माननीय शिवसेनाप्रमुखांवर विश्वास दाखविणारी आणि त्यांच्यावर प्रेम करणारी दुसऱ्या पक्षातील व्यक्ती म्हणजे श्री. डावखरे साहेब आहेत असे म्हटले तर ते असत्य ठरणार नाही. मी पुन्हा श्री. डावखरे साहेबांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री सय्यद ज़मा (विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, महाराष्ट्र विधान परिषद के उप सभापति पद पर श्री वसंत डावखरे जी के निर्विरोध चुने जाने पर सब ने मुबारकबाद दी है. मेरी भी उन्हें बहुत बहुत मुबारकबाद और शुभकामनाएं. मैं मजदूरों और अल्पसंख्यकों का प्रतिनिधि हूं इसलिए उनकी तरफ से और व्यक्तिगत रुप से माननीय श्री वसंत डावखरे जी को मुबारकबाद देता हूं. आज मुझे यह बात समझ में आई है कि हाउस में कभी जब हम बोलने के लिए हाथ उठाते है तो उपसभापति महोदय श्री डावखरे जी इधर के सदस्यों की तरफ कम और उधर के सदस्यों की तरफ क्यों ज्यादा ध्यान देते हैं. वे सर्वमान्य है. माननीय श्री शरद पवार, कॉंग्रेस पार्टी और अन्य सभी पार्टियों ने उन्हें निर्विरोध चुना है. आज फिर उन्हें उप सभापति के पद पर निर्विरोध चुनने का मौका दिया है. उनमें एक बहुत अच्छी बात है और वह बात सीखने जैसी है. वे सत्तारुढ़ पार्टी के हो कर भी विरोधी दल के नेताओं के साथ अच्छा सम्पर्क बनाए रखते हैं. यह आसान काम नहीं है, कठिन काम है. वे न्यायप्रिय, इंसाफपरस्त और सच्चाई के साथ कार्य करते हैं. उनका यह कैरेक्टर भी अभिनंदनीय है. मैं माननीय श्री वसंत डावखरे जी को फिर से मुबारकबाद देता हूं. शुक्रिया.

......

इसके बाद श्री हर्षवर्धन पाटील का भाषण.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवधन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, आज या सदनामध्ये उपसभापती पदासाठी सन्माननीय सदस्य श्री.वसंत डावखरे यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल मी संसदीय कार्य मंत्री म्हणून त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्ष व शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य, गट नेत्यांचे व विरोधी पक्ष नेते यांनी मनाचा मोठेपणा दाखवून ही निवड बिनविरोध होण्यासाठी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचेही आभार व्यक्त करतो. सन्माननीय श्री.वसंत डावखरे यांचा राजकीय प्रवास जर पाहिला तर ते माझ्या जिल्हयातील आहेत आणि मी त्यांच्या जिल्हयातील आहे. म्हणजे जवळचे शेजारी आहेत. गावच्या सरपंच पदापासून त्यांची राजकीय कारकीर्द सुरु झाली आहे. ठाण्यासारख्या एका औद्योगिक नगरीमध्ये आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी कठीण परिस्थितीत आपला राजकीय प्रवास सुरु केला आणि बघता बघता विधानपरिषदेच्या उपसभापती पदापर्यंत ते आलेले आहेत. त्यांची काम करण्याची पध्दत वेगळी आहे. या सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बरोबर घेऊन जाण्याचे काम त्यांच्या माध्यमातून सातत्याने झालेले आहे. मी एवढीच अपेक्षा व्यक्त करतो की, पुढील काळात उपसभापती म्हणून पीठासीन अधिका-यांच्या आसनावर बसतील त्यावेळी ते सर्व बाजूंकडे लक्ष देतील. कारण अनेक सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, ते डावीकडे जास्त पाहतात, उजवीकडे पहात नाही. पुढील काळात डावीकडे, उजवीकडे आणि समोरच्या बाजूला सुध्दा त्यांनी अधिक लक्ष द्यावे अशी विनंती करतो. कारण पीठासीन अधिका-यांच्या समोरच्या बाजूला सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख बसलेले असतात. मी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करतो आणि सभागृहाच्या माध्यमातून जनतेचे अधिकाधिक प्रश्न सोडविण्याचे कार्य त्यांच्या हातून घडो अशी मनापासून शुभेच्छा देतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुमंत गायकवाड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय श्री.वसंत डावखरे यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल मी आरपीआय पक्षाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. कारण या निवड प्रक्रियेमध्ये आरपीआय हा पक्ष त्यांच्याबरोबर होता. श्री.वसंत डावखरे हे ठाणे जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेमधूनही बिनविरोध निवडून आले आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व असे आहे की, त्यांना सहसा कोणाचाही विरोध नसतो आणि विरोध असेल तर ते त्यांना जाऊन भेटतात. अशी त्यांची खासियत आहे. सभागृहाचे कामकाज करीत असताना ते डावीकडे व उजवीकडेही पाहतात. म्हणून त्यांच्यावर सगळयांचे प्रेम आहे. त्यांनी पुढेही असेच कामकाज करावे व सगळयांना सांभाळून घ्यावे अशी आशा व्यक्त करतो व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देऊन मी माझे भाषण संपवितो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, उपसभापती म्हणून आदरणीय श्री.वसंतराव डावखरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.वसंत डावखरे यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्व आहे. सगळयांना बरोबर घेऊन जाण्याचा त्यांचा सातत्याने प्रयत्न असतो. कधीही समोरुन येणारा माणूस हाच माझा पक्ष आहे, समोरुन येणारा माणूस हीच माझी जात आहे अशी भूमिका त्यांनी घेतल्याचे पहावयास मिळते. माणूस पैशाने श्रीमंत असून भागत नाही तर मनाने श्रीमंत असावा लागतो. हा गूण श्री.वसंत डावखरे यांच्याकडे आहे. श्री.वसंत डावखरे यांच्या दानशूरपणाचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. त्यांची दानत तर प्रत्येक नागपूर अधिवेशनामध्ये पहात आहोत. श्री.वसंत डावखरे यांचा संगीत रजनीसह भोजनाचा कार्यक्रम झाला नाही असे नागपूरचे एकही अधिवेशन झालेले नाही. त्यांच्याकडे आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा योग्य तो पाहुणचार केला जातो. हा त्यांच्यामध्ये गूण आहे. भोजनाच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी एकत्र यावे, एकमेकातील स्नेह वाढवावा हा गूण आमच्या सारख्या तरुण कार्यकर्त्यांने घेण्यासारखा आहे. मी तमाम शिक्षकांच्या वतीने त्यांचे हार्दीक अभिनंदन करतो.

------

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ SBT/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:55

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतरावजी डावखरे यांची उपसभापती पदी बिनविरोध निवड झाली त्याबद्दल मी आणि माझ्या पक्षाच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करते. खरे म्हणजे या चार वर्षामध्ये ब-याच गोष्टी शिकायला मिळाल्या. त्यामध्ये उपसभापती म्हणून त्या खुर्चीवर बसल्यानंतर कशा पध्दतीने सभागृह सांभाळावे याची शिकवण श्री. वसंतराव डावखरे साहेबाकडून प्रत्येक सदस्याला मिळत आहे. सभागृहामध्ये जेव्हा गोंधळ उडालेला असतो आणि विरोधी पक्ष जेव्हा आक्रमक झालेला असतो त्यावेळी श्री. वसंतराव डावखरे साहेब हे स्वत:च्या केबिनमध्ये बैठक बोलावतात आणि त्यानंतर जेव्हा सभागृह सुरु होते त्यावेळी ते सभागृह शांत झालेले असते. ते असे म्हणतात की, "अमर्याद मित्रा तुझी थोर वीण" या ओळी त्यांच्या आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या आणि श्री. शरद पवारसाहेबांच्या संदर्भात लागू होतात. त्यामुळे ते या विधानपरिषदेमध्ये बिनविरोध निवडून आले आणि उपसभापती पदी देखील त्यांची बिनविरोध निवड झाली. या सभागृहाचे कामकाज ते लोकशाही पध्दतीने अत्यंत सुरेखपणे चालवितात आणि पुढेही चालवतील. त्यांच्या पुढील वाटचालीस आमच्या शुभेच्छा. वहिनी साहेब आज नाहीत याची सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी व्यक्त केलेली खंत या सभागृहालाही जाणवते. त्यांच्या वैयक्तिक दु:खामध्ये आम्ही सर्वजण सहभागी आहोत. त्यांच्या उपसभापती म्हणून पुढील कार्यास शुभेच्छा देते आणि माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सदनाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. वसंतराव डावखरे साहेब हे एक अत्यंत चैतन्यशील अशा पध्दतीचे व्यक्तिमत्व आहे. कितीही कठीण प्रसंग मग तो सभागृहामध्ये असला किंवा सभागृहाच्या बाहेर जरी असला तरी तो आपल्या कौशल्याने सोडवितात. अशा प्रकारचे अनेक प्रश्न ते लिलया सोडवितात आणि या दृष्टीने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना त्यांचे सातत्याने सहकार्य रहाते. सन्माननीय श्री. वसंतराव डावखरे साहेब हे चौथ्या वेळी विधानपरिषद सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत. 1998 पासून ते या सदनाचे उपसभापती पदी आहेत. माझे सहकारी या दृष्टीने विधानपरिषदेच्या कामकाजामध्ये त्यांचे मला सातत्याने सहकार्य आहे. तसेच याठिकाणी उल्लेख केल्या प्रमाणे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विधायक प्रश्नाच्या वेळी मदत करतात, सहकार्य करतात. अशा प्रकारे सभागृहातील सर्वांना विश्वासात घेऊन ते सभागृहाचे कामकाज करतात. श्री. वसंतराव डावखरे हे ग्रामीण भागातून तयार झालेले, अत्यंत कठीण परिस्थितीला तोंड देणारे असे व्यक्तिमत्व. भयानक गरिबी असताना त्यांनी ठाण्यामध्ये, मुंबईमध्ये ज्या पध्दतीने काम केले आणि यश संपादन केले त्याला तोड नाही असे मला वाटते. माझ्या सर्व शुभेच्छा श्री. वसंतराव डावखरे साहेबांना आहेत. या पुढच्या काळात आपल्या सर्वांच्या सहकार्याने विधानपरिषदेमध्ये ते अत्यंत चांगल्या पध्दतीने काम करतील. तसेच विधानपरिषदेच्या कामकाजात यापूर्वी त्यांनी मला ज्या पध्दतीचे सहकार्य केले त्याच पध्दतीच्या सहकार्याची त्यांच्याकडून मी अपेक्षा करतो. श्री. वसंतराव डावखरे साहेबांच्या बाबतीत मी एवढेच सांगेन की, स्वर्गीय बाळासाहेब देसाई यांच्या कुशल नेतृत्वाखाली तयार झालेला हा एक हिरकणीचा खडा आहे असे मला स्वत:ला वाटते आणि त्यामुळेच जीवनामध्ये कितीही कठीण प्रसंग आले तरी त्यावर मात करणे त्यांना सहज शक्य होते. आज आपण सर्वांनी एकमताने श्री. वसंतराव डावखरे यांची उपसभापती म्हणून निवड केली त्याबद्दल मी त्यांचे पुनश्च अभिनंदन करतो, त्यांना शुभेच्छा देतो.

--

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ KGS/ MMP/ 15:00

श्री.वसंतराव डावखरे (उपसभापती) : आदरणीय सभापती महोदय, या विधानपरिषद सभागृहाने आज एकमताने माझी विधानपरिषदेचे उपसभापती म्हणून निवड केली त्याबद्दल प्रथमत: मी याठिकाणी सर्व पक्षांचे मन:पूर्वक आभार मानतो. ग्रामीण भागापासून काम करीत असलेला मी एक कार्यकर्ता आहे. मी नेहमी एक विचार माझ्या मनाशी करीत आलो की, शून्याचा आपण कितीही गुणाकार केला तरी त्याचे उत्तर शून्यच येते. त्या शून्याच्या पाठीमागे भक्कमपणे कोणी उभे राहिले तर त्या शून्याला किंमत येते. आज या सभागहातील सर्वच मान्यवर, आपण स्वत:, सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उपमुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते या सर्वांचे याठिकाणी आभार मानताना मला एक गोष्ट सांगावीशी वाटते की, आपण जो बहुमान मला प्राप्त करुन दिला त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. मी हे कधीच विसरु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे देखील मी आभार मानतो. त्यांनी याठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यात त्यांनी एक बाब नमूद केली, त्या बाबीचा अनेकांनी पुनरुच्चार देखील केला. उजवा आणि डाव्याचा तो भाग होता. एक गोष्ट माझ्या कार्यप्रणालीमध्ये मी नेहमीच पाळली आहे. मी कधी उजवे किंवा डावे केले नाही. जे काही केले ते खरे केले. जे जे खरे आहे ते मी करीत आलो. त्यामुळे डावा किंवा उजवा हा भेद माझ्याकडून होणे शक्य नाही. तसे झाले तर या सभागृहात माझ्यापेक्षाही अनेक अनुभवी मंडळी आहेत, ती मंडळी निश्चितपणे माझ्या निदर्शनास आणून देऊ शकतील. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचा मला उल्लेख करावासा वाटतो. वास्तविक पाहता मी मागील लोकसभेच्या निवडणुकीसाठी सर्वांचे आभार मानून निघालो होतो. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे काय भविष्यवेत्ते आहेत याची मला कल्पना नाही. उपसभापती पदाच्या दुसऱ्या वेळी आणि मागील वेळीही त्यांनी सांगितले की, पुन्हा या. म्हणून यावेळी पुन्हा निवड झाली. आता सगळ्यांच्या साक्षीने त्यांना याठिकाणी विनंती करतो. पुन्हा वेळ येणार नाही. परंतु अशी भविष्यवाणी करु नका. माझ्या पाठीशी आपल्या सदिच्छा आणि शुभेच्छा राहू द्याव्यात. त्या नेहमीच आहेत. मी याठिकाणी अधिक काही न बोलता खास करुन पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो. आजचा प्रसंगच असा आहे की, मनात खूप इच्छा असून सुध्दा मला याठिकाणी जास्त बोलता येणार नाही. आपण सर्वांनी मिळून मला बिनविरोध निवडून दिले त्याबद्दल मन:पूर्वक आभार मानतो. यापुढील काळात सन्माननीय सभापती महोदयांनी जी अपेक्षा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव डावखरे..........

माझ्याकडून व्यक्त केली ती अपेक्षा पूर्ण करण्याकरिता मी स्वत: कटिबध्द राहीन. याठिकाणी माझे सहकारी, ज्यांचा खास करुन मला उल्लेख करावाच लागेल. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, ॲड.गुरुनाथ कुळकर्णी, डॉ.वसंतराव पवार आणि श्री.उल्हास पवार यांना देखील मी मन:पूर्वक धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

..3..

अधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कोल्हापूर शहराला शुध्द पाणीपुरवठा व्हावा यासाठी माननीय सदस्यांनी विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर सुरु केलेले उपोषण

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विधानभवनाच्या पोर्चमध्ये आज सकाळी 10.00 वाजल्यापासून दोन्ही सभागृहाचे काही सन्माननीय सदस्य कोल्हापूर शहराला शुध्द, मुबलक व कायमस्वरुपी पाणी पुरवठा व्हावा यासाठी उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या गावीही धरणे आदोलन व उपोषण सुरु आहे. विधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना अशाप्रकारे माननीय सदस्यांनी विधानभवन इमारतीमध्ये उपोषणास बसणे योग्य वाटत नाही. याठिकाणी संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहेत. उपोषणकर्त्या माननीय सदस्यांना मंत्रीमहोदयांनी प्रत्यक्ष भेटून या प्रश्नाच्या संदर्भात आश्वासित केले तर हे उपोषण सुटू शकते.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय संसदीय कामकाज मंत्री कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, त्यांना या प्रश्नाची संपूर्ण जाण असावी असे मला वाटते.

श्री. हर्षवर्धन पाटील : मी त्या दोन्ही सन्माननीय सदस्यांना भेटून सांगितले की, ज्या दोन योजनांच्या बाबतीत त्यांनी उपोषण सुरु केलेले आहे त्यापैकी एका योजनेचे काम ऑलरेडी झालेले असून दुसऱ्या योजनेचे लवकरच काम पूर्ण होणार आहे. तसेच सभागृह चालू असताना सभागृहात असे प्रश्न मांडता येतील अशीही मी त्यांना भेटून विनंती केली आहे. यासंबंधीची चर्चा मागे देखील सभागृहात झाली होती.

**<u>हरकतीच्या मुद्यासंबंधी</u>**

श्री. दिवाकर रावते : महोदय, या सभागृहातील कामकाजाच्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या सभागृहात सन्माननीय सदस्य आपापले प्रश्न विचारतात आणि माननीय मंत्री महोदयांकडून त्याचे उत्तर अपेक्षित असते. आमचा असा ठाम समज आहे की, जे मंत्री उत्तर देतात ते शासनाचेच उत्तर असते. मग ते मंत्री असोत अथवा राज्यमंत्री असोत, असा संबंध नसतो तर सर्व उत्तरे शासनाच्या वतीनेच असतात असे समजले जाते. परंतु या सदनात एक नवीन प्रथा निर्माण होऊ पाहत आहे आणि ती प्रथा भविष्यात घातक आहे असे म्हटले तरी चालेल. ते म्हणजे मागील वेळेस फयान वादळामुळे ज्या मच्छिमारांचे नुकसान झाले त्यांच्या मासे पकडण्यासाठी उपयोगी पडत असलेल्या जाळ्यांसंबंधीचा प्रश्न निर्माण झाला असता सभागृहात त्या विभागाचे मंत्री उत्तर देत होते, परंतु अधिकृत मंत्री उत्तर देत असताना त्यांचे उत्तर खोडून काढून दुसरेच मंत्री महोदय उभे राहिले आणि उत्तर द्यायला लागले. त्याचप्रमाणे एका प्रसंगी तर माननीय राज्य मंत्री श्री. रमेश बागवे यांनी उत्तर दिल्यानंतर माननीय गृह मंत्री नंतर म्हणतात की, "राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले ते तसे नाही" कारण त्यांनी माझी मान्यता घेतली नव्हती. आपले आपापसात काय आहे याच्याशी आम्हाला देणे-घेणे नसते. त्या भानगडी आपण मिटविल्या, माननीय राज्य मंत्री श्री. बागवे यांना संरक्षण सुध्दा दिले पण या सभागृहात मंत्री अथवा राज्यमंत्री म्हणून जे उत्तर दिले जाते ते शासनाच्या वतीनेच असते. असे प्रकार पुढे होऊ नयेत म्हणून आपण अगोदरच विचारुन सभागृहात उत्तर द्यावे. अशा प्रकारच्या नवीन प्रथा आम्हाला मान्य नाहीत. या सदनात कुठलेही मंत्री उभे राहिल्यानंतर मध्येच आपले माननीय महसूल मंत्री उठून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2...

श्री. दिवाकर रावते .....

उभे राहून सांगतात की मी उत्तर देणार आहे. मला हे समजत नाही की, खात्याचे मंत्री अथवा राज्य मंत्री हजर असताना सामुहिक जबाबदारी म्हणून ते जे उत्तर देतात तो अधिकार माझ्या माहितीप्रमाणे तसा नाही. सामुहिक जबाबदारी म्हणून मंत्री अथवा राज्यमंत्र्यांनी फक्त टिप्पण घेणे हीच असते पण खात्याचे मंत्री आणि राज्यमंत्री उपस्थित असताना सुध्दा सामूहिक जबाबदारी म्हणून उत्तर देणे अशा प्रथा निर्माण होणार असतील तर कामकाजाच्या दृष्टीने योग्य नाही म्हणून आपल्या माध्यमातून मला अशी विनंती करावयाची आहे की, सदनात जे चालले आहे त्याबाबत शासनाला कामकाजाच्या प्रथा समजावून सांगाव्यात.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या सभागृहात माननीय राज्य मंत्री व मंत्री यांनी दिलेले उत्तर हे शासनाचेच उत्तर समजण्यात येते. पण त्या खात्याचे राज्यमंत्री व मंत्री हजर असताना देखील एखाद्या दुसऱ्या मंत्र्याने उठून उत्तर दिले जाते त्याची नोंद घेऊन पुढील कामकाज करताना काळजी घेण्यात येईल.

**सभापती** : मी सभागृहाची बैठक दुपारी 3.40 पर्यंत मध्यंतरासाठी स्थगित करतो.

**(दुपारी 3.09 ते 3.40 पर्यंत मध्यंतर)**

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.**:नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** :सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "शासनाने कायम विनाअनुदानित शाळांचा कायम हा शब्द वगळतांना मराठी माध्यमांच्या शाळांचे सर्व प्रलंबित प्रस्ताव रद्द करुन फक्त इंग्रजी माध्यमाच्या शाळांनाच परवानगी देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या विरुध्द मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार मराठी शाळेचे प्रस्ताव रद्द न करण्याबाबत शासनाने अद्याप कारवाई न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र यावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी"शहापूर(जि.ठाणे)तालुक्यातून जाणा-या मुंबई आग्रा महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात येत असल्याने प्रवाशांचा वेळ व अपघातांचे प्रमाण कमी होत असले तरी या महामार्गालगतच्या परिसरातील नागरिकांचे जिवीत, वित्त व पशू हानी मोठया प्रमाणात होत असल्याने आवश्यक त्या ठिकाणी संमातर पर्यायी रस्ते/भुयारी रस्ते/उड्डाण पूल इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात शासनाचे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र यावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री किरण पावसकर, डॉ. दीपक सावंत यांनी "शीव, कोळीवाडा परिसरातून मुदत न संपलेल्या औषधांचा साठा केंद्रीय गुप्तचर विभागाच्या (सीबीआय) अधिका-यांनी जप्त केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र यावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, रामनाथ मोते यांनी "राज्यातील ग्रामीण रुग्णालयातील सिव्हील सर्जन व ग्रामीण वैद्यकीय अधीक्षक यांचेकडून औषध खरेदी करण्याचे अधिकार शासनाने काढून घेतल्याने ग्रामीण रुग्णालयामध्ये औषध टंचाई, इंजेक्शन्स उपलब्ध नसल्याने रुग्णांना औषध खरेदीसाठ भरमसाठी पैसे मोजावे लागत असल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र यावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ......

यानंतर सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी "कोकणातील चार जिल्हयामध्ये वृक्षतोडीस कायमस्वरुपी बंदी घालण्याबाबत सभागृहात दिलेल्या आश्वासानुसार मा. मंत्री वने यांच्या दालनात बैठक होऊनही उक्त जिल्हयातील सरसकट वृक्षतोड बेसुमार होत असल्याने पर्यावरणाचा समतोल ढासळला जात असल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र यावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, गुरुमुख जगवानी यांनी "दि. 10 जुलै, 2010 रोजी सिंधुदुर्ग जिल्हयातील मुंबई-गोवा महामार्गावरील श्री. दीपक मालवणकर यांच्या सोन्याच्या पेढीवर दरोडा टाकून 2 लाख 63 हजार किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्यानंतर लगेच दुस-या दिवशी दि.11 जुलै, 2010 रोजी कणकवली शहरातील बाबा भालचंद्र अपार्टमेंट मधील घरे व दुकाने फोडून चोरटयांनी सुमारे 3.50 लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेल्या प्रकरणी व्यापा-यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र यावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सूचनांना मी माझ्या दालनातच अनुमती नाकारली आहे.

----

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :सेवाग्राम (वर्धा) परिसरात दरोडा घालून अल्पवयीन मुलीवर केलेला बलात्कार

**मु. शी.** :सेवाग्राम (वर्धा) परिसरात दरोडा घालून अल्पवयीन मुलीवर केलेला बलात्कार यासंबंधी ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री रमेश शेंडगे, हेमंत टकले, विक्रम काळे, सतीश चव्हाण, अरुण गुजराथी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 16 जून, 2010 रोजी वा त्यासुमारास वर्धा (जि.वर्धा) येथील सेवाग्राम परिसरात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा घालून रोख रक्कम व मौल्यवान ऐवज लुटून नेणे, घरातील व्यक्तींना मारहाण करुन एका अल्पवयीन मुलीवर केलेला बलात्कार, अद्यापही दरोडेखोरांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, सेवाग्रामसारख्या पावनभूमीत झालेल्या या घटनेमुळे तेथील नागरीकांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, दरोडेखोरांना त्वरीत अटक करुन त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्याबाबत तेथील जनतेची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

महोदय, असे करीत असतांना मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो.

"आरोपी 3 निष्पन्न झाले होते याऐवजी 4 आरोपी निष्पन्न झालेले आहेत असे वाचावे."

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, बलात्काराच्या घटनांत वाढ झालेली आहे ही गंभीर घटना आहे. आपण वृत्तपत्र किंवा टीव्हीवरील बातम्या पाहिल्यातर त्यामध्ये आपल्याला बलात्काराच्या किती तरी घटना आढळून येतात हे मला दुर्दैवाने येथे सांगावे लागत आहे. आज अल्पवयीन मुलीवर मोठया प्रमाणात बलात्कार होत आहेत. बलात्कार हा आता रेग्युलर फ्यूचरच झालेला आहे. त्यामुळे यासंदर्भात आपल्या यंत्रणेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा तुमच्या यंत्रणेवर तुमचा अंकुश राहिलेला नाही असे म्हणावे लागेल. आज संपूर्ण राज्यात गोरगरीब आणि दलित मुलींवर अत्याचार आणि बलात्कार होत आहेत. आपल्या राज्याच्या दृष्टीने या घटना अतिशय गंभीर आहेत. महात्मा गांधीच्या स्पर्शाने पावन झालेल्या जागेवर आज बलात्कार होत आहेत. ज्या महात्मा गांधीनी शांततेचा संपूर्ण जगाला संदेश दिला त्यांच्या पावन स्पर्शाने पावन झ ालेल्या जागेवरच आज लहान मुलींवर बलात्कार होत आहे ही फार दुर्दैवाची गोष्टी आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात आताच माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, या प्रकरणात 3 नाही तर 4 गुन्हेगार आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी...

ही घटना दिनांक 16 जून 2010 रोजी घडली असून या घटनेतील सर्व गुन्हेगारांना आपण पकडू शकलो नाही. दोन गुन्हेगार मिळाले आहेत. उर्वरित गुन्हेगारांचा तपास करण्यासाठी आपण काय कारवाई केलेली आहे ? सदर घटना ही गंभीर आहे. या बाबत शासनाची कोणती भूमिका आहे ? सदर आरोपी हे स्थानिक आहेत की बाहेरचे आहेत ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यासंबंधी मी आपल्या माध्यमातून असे सांगू इच्छितो की, सदर घटना ही 16 जून 2010 रोजी घडली असून 27 तारखेला आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी हे अनोळखी होते. पोलिसांनी तत्परतेने मोबाईल ट्रॅक करून गुन्हेगारांचा सुगावा लागल्यानंतर लगेच पकडले आहे. या गुन्हेगारांना अटक केली असून 11 दिवसांची पोलीस कस्टडी घेतली आहे. या घटनेमध्ये अजून 2 आरोपी असल्याचे निष्पन्न झालेले आहेत. त्यांचा पोलीस शोध घेत आहे. ज्या दोन गुन्हेगारांना पोलिसांनी अटक केली आहे, त्यांच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या घटनेमध्ये जे दोन आरोपी आहेत त्यांचा तपास सुरू आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, येथे प्रश्न चोरी, दरोड्याचा नाही. चोरी करायला आलेल्या गुन्हेगारांनी अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला आहे, हे मान्य मान्य केले आहे. महाराष्ट्रामध्ये अल्पवयीन मुलींवर बलात्कार करण्याचे प्रमाण 19 टक्क्यांनी वाढले असल्याचे क्राईम रिपोर्ट म्हणतो. दोन आरोपी पकडले आहेत, त्यांच्याकडून किती रूपये वसूल केले हा मुद्दा नाही. ज्या मुलीवर बलात्कार झालेला आहे तिची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे काय ? उर्वरित दोन आरोपींना पकडण्यासाठी एक महिन्याचा कालावधी का लागत आहे, याचे स्पष्टीकरण येथे मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे. उर्वरित दोन आरोपींना शासन किती दिवसांमध्ये पकडणार आहे ? ज्या गुन्हेगारांना पकडण्यात आले आहे ते आता पोलीस कस्टडीमध्ये आहेत काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, भा.दं.वि.कलम 457, 380, 376 (2)(ग), 34 सह गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कपड्यावरील डाग, व्हॅजिनल सॅब, प्युबिक हेअर फोरेन्सिक लॅबमध्ये दिनांक 18.6.2010 रोजी तपासणीसाठी पाठविले आहे. सदर प्रकरणाचा कसून तपास सुरू आहे. या प्रकरणात अनोळखी व्यक्ती होत्या. श्वान पथक,मोबाईल ट्रॅकिंगच्या माध्यमातून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झालेला आहे. महिन्याभरात दोन आरोपी का सापडत नाही ? सदर आरोपींना शोधण्यासाठी अजून किती दिवस लागणार आहेत ? सदर आरोपींना शोधण्यासाठी एक महिना का लागत आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, या घटनेतील आरोपी हे अनोळखी होते. मोबाईल ट्रॅकिंग आणि आय.एम.ई.आय.द्वारे दोन आरोपींना पकडण्यात आले असून दोन आरोपी फरारी आहेत. या आरोपींना पकडण्यासाठी पोलीस पथक रवाना झाले असून त्यांना लवकरात लवकर त्यांचा तपास करण्यात येईल.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, हा गुन्हा किती वाजता घडला होता ? पोलीस घटनास्थळी किती वाजता पोहोचले ? ज्या मुलीवर बलात्कार झाला त्या मुलीला वा तिच्या कुटुंबियांना शासनाकडून मदत करण्यात आली आहे काय ? जर मदत करण्यात आली नसेल तर ती करण्यात येणार आहे काय ? तसेच ही मदत केव्हा करण्यात येणार आहे ?

श्री.रमेश बागवे :सभापती महोदय, पीडित मुलगी तिच्या मावशीकडे रहात होती व ती नववीमध्ये शिकत होती. जेवण केल्यानंतर रात्री 11.30 वाजता या कुटुंबातील सर्वजण झोपले होते त्यानंतर मध्यरात्री 3.00 च्या सुमारास खिडकीतून एका चोराने घरात प्रवेश केला आणि दरवाजा उधडून बाकीच्या दोघांना आतमध्ये बोलावले होते. पहाटे 3.00 वाजता ही दुर्देवी घटना घडली. या प्रकाराबद्दल सदरहू मुलीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर पंधरा मिनिटात पोलीस घटनास्थळी पोहोचले होते.

श्री.रमेश शेंडगे : ही घटना किती वाजता घडली होती ?

श्री.रमेश बागवे : मुलीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर पंधरा मिनिटांमध्ये पोलीस घटना स्थळी पोहोचले होते.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. त्या प्रश्नाच्या उत्तराला बगल दिली जाते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी असा प्रश्न विचारला होता की, दोन आरोपींना किती दिवसात अटक करणार आहात ? त्या प्रश्नाला उत्तर देण्यात आले नाही त्याचबरोबर या मुलीला वा तिच्या कुटुंबियांना काय मदत करण्यात येणार आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला होता परंतु या प्रश्नाला देखील उत्तर देण्यात आले नाही. या दोन्ही प्रश्नांची उत्तर मिळणे आवश्यक आहे.मुलीच्या पुनर्वसनासाठी शासन काय मदत देणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला होता की, पीडित मुलीला कोणती मदत करण्यात आली होती. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, कायद्यात तरतुद नसली तरी मदत करण्याच्या बाबतीत शासन माणुसकीच्या दृष्टीने नक्की गांभीर्याने विचार करील आणि तिला मदत देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : या मुलीचे पुनर्वसन कशा पध्दतीने करण्यात येणार आहे ?

( उत्तर दिले नाही )

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण : सभापती महोदय,पुण्यामध्ये एका मुलीवर झालेल्या बलात्काराच्या संदर्भात मध्यंतरी सभागृहात चर्चा झाली होती त्यावेळी झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी मी एक मुद्दा मांडला होता . ज्याने बलात्कार केला त्याला अटक करणे, पोलीस कस्टडी किती दिवसांची देणे तसेच त्याबाबतीत काही इनव्हेस्टीगेशन केले होते काय इत्यादी मुद्दे असतातच परंतु बलात्काराचे प्रकार वारंवार का होतात याबाबतीत महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन संशोधन करण्याची गरज आहे.सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने एक बाब मला माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, आज इंटरनेटचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो . त्याचबरोबर मोबाईलवरसुध्दा इंटरनेट सहजगत्या उपलब्ध होत असते.त्यामध्ये ब्ल्यू फिल्म्स सारख्या अनेक फिल्म्स इंटरनेटवर सहजगत्या फ्री डाऊनलोडेबल आहेत . महाविद्यालयात शिक्षण घेणा-या प्रत्येक मुलाच्या मोबाईलवर या फिल्म्स डाऊन लोड केलेल्या आहेत असे निदर्शनास आलले आहे. अशा प्रकारे या फिल्म्स सहजगत्या उपलब्ध होत आहेत ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.युवकांना जर अशा प्रकारच्या फिल्म्स सहजगत्या उपलब्ध होत असतील तर या युवकांची मानसिकता निश्चितपणे खराब होणार आहे तेव्हा असे होऊ नये या दृष्टीने शासन ही बाब गांभीर्याने घेणार आहे किंवा नाही ? हा मुद्दा मला पुन्हा एकदा उपस्थित करावयाचा आहे. मध्यंतरी असेच एक प्रकरण घडले होते त्यासबंधीचे वर्तमानपत्रातील कात्रण आज माझ्याकडे नाही. मी ते कात्रण उद्या आणीन त्या प्रकरणत सुध्दा ब्ल्यू फिल्म्स पाहूनच बलात्कार करण्यात आला होता तेव्हा असे प्रकार येथून पुढे घडू नयेत यासाठी या प्रकारावर शासन बंदी केव्हा आणणार आहे व कशी आणणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड वंदना चव्हाण यांनी अतिशय चांगला मुद्दा मांडलेला आहे. मी आपल्या मार्फत सांगू इच्छितो की,वर्धा जिल्हयातील पीडित मुलीला माननीय मुख्यमंत्र्यांच्या निधीतून जरुर लवकरात लवकर मदत करु त्याचबरोबर या प्रकारांना आळा बसावा या दृष्टीने शासन देखील गंभीर आहे. बलात्काराच्या प्रकरणातील निर्णय शीघ्र न्यायालया मार्फत लवकरात लवकर लागावेत यासाठी प्रत्येक जिल्हयात 12 विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक आयुक्त आणि जिल्हा पातळीवर...

3..



VTG/ KGS/ MMP/ प्रथमश्री.भारवि 15.50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण : सभापती महोदय, या प्रकरणी माझा प्रश्न नसून जनरल स्वरुपाचा माझा प्रश्न आहे. ब्ल्यू फिल्मस् सहजगत्या उपलब्ध होत असून त्या पाहूनच युवकांची मानसिकता बिघडली जाते त्या दृष्टीने शासन या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहणार आहे किंवा नाही ? तसेच हे प्रकार थांबविण्यासाठी शासन नक्की कोणती उपाययोजना करणार आहे ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अशाप्रकारच्या क्लिप्स मोबाईलवर दाखविल्या जातात, डाऊनलोड केल्या जातात त्याबाबत सरकार काय करणार आहे? असा प्रश्न विचारला. त्याबाबत कडक कायदा करुन अशा प्रकारावर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी कोणती गंभीर पावले उचलली आहेत ते सांगावे. आज इंटरनेटवर ब्लू फिल्म्स दाखविल्या जातात, त्या मोबाईलवर डाऊनलोड केल्या जातात. त्यामुळे आजची तरुण पिढी उद्ध्वस्त होत चालली आहे, वहात चालली आहे. त्याविरुध्द आपण कोणती कारवाई करणार आहात? त्याला प्रतिबंध करणार आहात काय? याचे आपण उत्तर द्यावे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, लहान मुलीवर बलात्कार करण्याच्या गंभीर घटना घडत आहेत . त्यामधून त्या मुलींना मानसिक धक्का बसत आहे. त्याकरिता त्यांचे कौन्सिलिंग करणारी कायम स्वरुपी यंत्रणा महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून राबविली जाणार आहे काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, कौन्सिलिंग करण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये एक विभाग निर्माण करण्यात येऊन त्याठिकाणी कौन्सिलिंग करण्यात येईल. त्याचप्रमाणे माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी विचारल्याप्रमाणे इंटरनेटवर ब्लू फिल्म्स दाखविल्या जातात. त्या संदर्भात प्रचलित कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल. ज्या ज्याठिकाणी ब्लू फिल्म्स दाखविल्या जात असतील त्या ठिकाणी पायरसी कायद्यानुसार कडक कारवाई करुन व त्याला प्रतिबंध करण्यासाठी गृह विभगामार्फत धाडी टाकण्यात येतील व ब्लू फिल्म्स दाखविल्या जाणार नाहीत याबाबत दक्षता घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या घटनेतील आरोपींना पकडले आहे. प्रश्न असा आहे की, अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्यामुळे तिचे पुनर्वसन कशाप्रकारे करणार आहात याचे उत्तर मिळाले नाही?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, या प्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन त्या ठिकाणी जास्तीत जास्त मदत देण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अंध, कर्णबधिर, मतिमंद व शारीरिक अपंग विद्यार्थ्यांच्या शाळा व कार्यशाळांना शासनाकडून वेळेवर निधी न मिळणे

**मु. शी.** : अंध, कर्णबधिर, मतिमंद व शारीरिक अपंग विद्यार्थ्यांच्या शाळा व कार्यशाळांना शासनाकडून वेळेवर निधी न मिळणे यासंबंधी श्री दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहर आणि उपनगरातील अंध, कर्णबधिर, मतिमंद व शारीरिक अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाअंतर्गत असलेल्या 60 शाळा व कार्यशाळांना शासनाकडून वेळेवर निधी न मिळणे, परिणामी, तेथील शिक्षकांना गेल्या तीन महिन्यांपासून वेतन न मिळणे, शाळा व कर्मशाळांतील शिक्षक व त्यांच्या कुटुंबियांवर आलेली उपासमारीची वेळ,विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम, विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागण्याची निर्माण झालेली परिस्थिती, उक्त शाळा व कार्यशाळांना नियमित वेळेवर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

श्री.सचिन अहिर ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये एप्रिल महिन्याचे पूर्ण वेतन दिले गेले असे सांगितले आहे. तसेच, मे महिन्याचे वेतन दिले जाईल असेही सांगितले आहे. त्यानंतर जून महिन्याचे वेतन देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे असे सांगितले आहे, ते केव्हा अदा करण्यात येईल? एकूण तीन महिन्यांचा हिशेब याठिकाणी मांडला आहे. या सभागृहामध्ये पुरवणी मागण्या मंजूर करता व त्यामधून पैश्याची तरतूद करता. कारण नसतांना अडवणूक करणाऱ्या अकार्यक्षम अधिकाऱ्यांमुळे सरकारवर रोष ओढवतो. आणि म्हणून यामध्ये जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार? याठिकाणी आपण तीन महिन्यासाठी लागणारी तरतूद उपलब्ध केली असल्याचे म्हटले आहे.परंतु आपण संपूर्ण तरतूद केली पाहिजे. या अपंग, कर्णबधिर, मतिमंद मुलांच्या शाळा असून त्या शाळांमध्ये ज्या पध्दतीने शिकविले जाते ते फार क्ठीण काम आहे. साध्या मुलांना शिकविणे आणि या मतिमंद मुलांना शिकविणे हे शिक्षकांच्या दृष्टीने कठीण काम आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम श्री. सरफरे.... 16:00
श्री. दिवाकर रावते...

तेव्हा खास या शिक्षकांना न्याय मिळेल या दृष्टिकोनातून या विषयाकडे पहावे. जूनचे वेतन त्यांना कधी देण्यात येईल? त्यानंतर पुढील वेतन वेळेवर होईल काय? तसेच याबाबतची जबाबदारी कोणावर रहाणार आहे? याचा खुलासा करण्यात यावा.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब खरी आहे. या विषयाकडे फार महत्वपूर्ण दृष्टिकोनातून आपण पाहिले पाहिजे. मुळात ही चूक कशी झाली तर सहावा वेतन आयोग लागू करण्याची भूमिका घेतली गेली त्यावेळी एका वर्षाची आर्थिक तरतूद करण्याचे काम केले गेले.त्यावेळी सहावा वेतन आयोग धरुन ती तरतूद केली गेली नव्हती. त्यावेळी त्यांना प्रपोर्शनेटली दिले गेले. शासनाचे म्हणणे असे आहे की, प्रपोर्शनेटली देत असताना दुसरी एखादी योजना थोडीशी मागे पडली असती तरी हरकत नव्हती पण या शिक्षकांना वेतन मिळणे गरजेचे होते, शासनाने हे मान्य केलेले आहे. म्हणून मी सांगितल्याप्रमाणे दहा दिवसाच्या आत जून महिन्याचे पेमेंन्ट इमिजिएटली रीलीज करण्यात येईल.सन्मानीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बिलाची भरण्याची तरतूद तीन-तीन महिन्याची असल्यामुळे शासनाने पुढच्या तीन महिन्याची तरतूद केलेली आहे. परंतु शासनाने ज्या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू गेलेला आहे त्यांची या पुढच्या काळात वेतनश्रेणी थांबणार नाही किंवा वेतन देणे थांबणार नाही, ही जबाबदारी शासन निश्चितपणे घेईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये दोन प्रश्न विचारण्यात आले होते. अपुऱ्या तरतुदीमुळे दरवेळेला पगार लांबणे हे शिक्षकांच्या बाबतीत वारंवार होत आलेले आहे. अशी स्थिती जेव्हा निर्माण होते तेव्हा मायनस बिलातून पगार करावेत अशा प्रकारचे आदेश शालेय शिक्षण विभागात झालेले आहेत. तसे आदेश समाजकल्याण विभाग देईल काय? हा पहिला प्रश्न आणि विद्यार्थ्यांच्या तरतुदीचे काय करण्यात आले? हा दुसरा प्रश्न. आणि तिसरा प्रश्न असा की, तीन महिन्याच्या ऐवजी पूर्ण वर्षाचा कॅश फ्लो वितरित करणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितल्याप्रमाणे तीन-तीन महिन्याची बिलाची पध्दत आहे त्यामुळे तीन-तीन महिन्याचा अंदाज घेऊन तरतूद करावी लागते ती आपल्याला वर्षभराची करता येईल. सन्माननीय सदस्यांनी मांडलेली पहिली बाब निश्चितपणे तपासून पाहिली जाईल. कारण एन.जी.ओ. मार्फत हे काम केले जाते. त्यामुळे ती बाब तपासून पाहिली जाईल.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, समाजातील ज्या वर्गातील मुलांच्या शाळांबद्दलचा हा प्रश्न आहे. त्यांच्या शैक्षणिक दर्जाच्या बाबतीत शिक्षण खात्याने काय बघायचे आणि समाजकल्याण खात्याने काय बघायचे या विरोधाभासामुळे हा प्रश्न कायम अडचणीचा झालेला आहे. तेथे दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा हा बऱ्याच वेळेला आपल्याला अपेक्षित असलेल्या स्पेशल एज्युकेशनच्या धर्तीवर असतो काय असा प्रश्न पडावा अशी सगळी परिस्थिती असताना त्या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांना पगारच मिळणार नसेल तर मुळात दुर्दशा असलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांना कुठलेही शिक्षण योग्य प्रकारे मिळू शकत नाही. योग्य शिक्षण न मिळाल्यामुळे आणि मुळातच ती मुले अपंग असल्यामुळे ती इतर विद्यार्थ्यांच्या मानाने काही प्रमाणात मागे रहात असतात. ती आणखी मागे जातील. दुर्दैवाने त्यांचे पुढचे सर्व शैक्षणिक जीवन अंधकारमय होईल. त्यामुळे या संदर्भामध्ये विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. चौकटीत बसणारे कायदे असतील, त्या संदर्भातील जी कार्यवाही असेल त्याबाबतीत खूप वेगळया प्रकारे विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच मानवी दृष्टिकोनातून समाजातील हा एक विशेष घटक आहे पण तो दुर्लक्षित आहे. उपेक्षित आहे. इतरांसाठी जे करण्यात येते त्यापेक्षा अधिकचे काही त्याच्यासाठी करण्याची आवश्यकता आहे. या भूमिकेतून शासनाने या प्रश्नाकडे बघावे. वेतन असेल किंवा इतर काही गोष्टी असतील त्याची पूर्तता शासन निश्चितपणे वेळेवर करील काय? हा प्रश्न आहे. यासंदर्भातील खात्याची भूमिका माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावी.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. शासन या विषयी सुध्दा गंभीर आहे. म्हणूनच लोकांची किंबहुना त्या शिक्षकाची मागणी येण्याच्या अगोदरच प्रोॲक्टीव्हली पुढाकार घेऊन शासनाने त्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याची भूमिका घेतली. जेणेकरुन या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला चालना मिळेल आणि मेंन्टली हॅन्डिकॅप असतील किंवा मेंन्टली रिटार्डेड असतील अशा विद्यार्थ्यांना शिकविणारा जो शिक्षक वर्ग आहे तो टिकून राहिला पाहिजे. कारण आज अशी अवस्था आहे की, एखाद्या व्यक्तीने या क्षेत्राचे शिक्षण घेतले तर तो या देशामध्ये न रहाता परदेशामध्ये जाण्यात जास्त रुची दाखवितो.म्हणून सन्माननीय सदस्यानी सांगितल्याप्रमाणे विशेषत: मतीमंद मुलांसाठी लवकरात लवकर एक वेगळी योजना आणण्याचा राज्य शासनाचा विचार आणि मानस आहे. त्यामध्ये या सर्व गोष्टीचा बारकाईने विचार केला जाईल.

यानंतर श्री. बरवड....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, मुंबई शहर व उपनगरात स्वयंसेवी संस्थांमार्फत मान्यता व अनुदान प्राप्त एकूण 42 अपंगांच्या विशेष शाळा चालविल्या जात आहेत. परंतु यामध्ये कर्णबधीर, मतिमंद आणि अंध या विषयावर कोणत्याही प्रकारचा प्रकाश टाकलेला नाही. मुंबईमध्ये एकंदर आपल्या खात्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या एकंदर शाळा किती आहेत ? अपंग, कर्णबधीर मुलांची समाजातील संख्या लक्षात घेता या शाळांची संख्या अपुरी आहे असे शासनाला वाटत नाही काय ? अनेक एनजीओमार्फत अशा मुलांसाठी शाळा चालविल्या जातात. ऑटिस्टीक मुलांसाठी सुध्दा शाळा चालविल्या जातात. एनजीओमार्फत चालविल्या जाणाऱ्या अशा शाळांना विशेष अनुदान देण्याची योजना शासन राबविणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या ठिकाणी लक्षवेधी सूचनेमध्ये मुंबई शहर आणि उपनगराच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मुंबई शहरात एकूण 710 अनुदानित शाळा असून उपनगरात 451 शाळा आहेत. अशा एकूण 1160 शाळा चालविल्या जातात. त्यामध्ये अंध, कर्णबधीर, मतिमंद, शारीरिक अपंग अशा सर्वांचा समावेश आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे पगार देण्यामध्ये उशीर झालेला आहे. सहाव्या वेतन आयोगामुळे ते झालेले आहे. जेवढा निधी होता त्याला 12 ने भागल्यामुळे निधी कमी पडला. पुढच्या काळात रिशेड्युल करुन शेवटचे दोन महिने सप्लीमेंटरीमध्ये घेऊन पूर्ण पगार होईल या दृष्टीकोनातून आम्ही प्रयत्न करु. राज्यामध्ये एकूण 710 शाळा आहेत. कर्मशाळा 85 असून विशेष शाळा 685 आहेत आणि 33 हजार विद्यार्थी त्या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. त्या ठिकाणी 11 हजार 151 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत.

डॉ. दीपक सावंत : एनजीओ ज्या शाळा चालवितात त्यांना अनुदान देण्याची योजना राबविणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : आपण हे एनजीओमार्फतच करतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, अनुदानित शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचा प्रश्न सातत्याने सभागृहामध्ये येतो. माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केले की, हिशेब चुकल्यामुळे वेळेवर पगार देऊ शकलो नाही. पण हिशेब करणारे जे संबंधित अधिकारी आहेत त्यांची चौकशी करुन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

कारवाई करण्याबाबत निवेदनामध्ये म्हटले आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे विशेष शाळांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन मिळू शकत नाही. त्यामुळे अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई करुन सभागृहात जाहीर करणार काय ? या शाळांमध्ये जी इनटेक कॅपॅसिटी आहे त्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले त्याप्रमाणे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. त्यांना या शाळेत यावयाचे आहे. संस्थाचालक त्यांना प्रवेश देण्यास तयार आहेत. शासनाचे अनुदान मिळत नाही म्हणून आपण त्यांना परवानगी देत नाही. काही संस्था स्वत:च्या पैशावर या अपंग विद्यार्थ्यांना सामावून घेण्यास तयार आहेत. आपण त्यांना 10-15 जादा विध्यार्थी घेण्यास परवानगी देण्याची आवश्यकता आहे. ती परवानगी तातडीने देणार काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, त्यांना परवानगी देण्यास हरकत नाही. कारण शासनावर कोणतीही लायबिलिटी पडणार नसेल आणि अधिकचा वर्ग द्यावयाचा असेल तर निश्चितपणे देऊ. यामध्ये कोणतेही कॉम्प्रमाईज केले जाणार नाही. अगोदरच्या प्रश्नात सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण मान्यच केले आहे की मुळामध्ये विभागीय दृष्टीकोनातून किंवा अधिकाऱ्याच्या चुकीमुळे तीन महिन्याचा पगार देण्याचे थांबलेले आहे. अशा संबंधित लोकांची एक महिन्याच्या आत चौकशी करण्याचे काम करु.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, राईट टू एज्युकेशन ॲक्ट एप्रिल पासून लागू झालेला आहे. त्यामध्ये चाईल्ड बिलॉंगीन्ग टू डिसॲडव्हॅन्टेज्ड ग्रुप याबद्दल राज्य शासनाने किंवा ॲप्रोप्रिएट शासनाने कायदेशीर तरतुदी, निधी आणि कार्यक्रम यासबंधीचे नोटिफिकेशन काढणे आवश्यक आहे. ही तरतूद राज्य सरकारने केली आहे काय ? केली नसेल तर कधी करणार ? या सर्व बाबी विधिमंडळापुढे आणणे कायद्याने बंधनकारक आहे. शासन ते कधी करणार ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, केंद्र शासनाने जे धोरण स्वीकारलेले आहे तीच राज्य शासनाची मानसिकता आहे. आपण विभागाच्या माध्यमातून ज्यावेळी व्हिजन डॉक्युमेंट तयार करतो त्यावेळी प्लॅनिंग स्टेजवर पुढच्या काळामध्ये अशा शाळा, फक्त अपंगांपुरत्याच नाही तर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. सचिन अहिर .....

मागासवर्गीय असतील किंवा विभागाच्या माध्यमातून चालणाऱ्या शाळा असतील या सर्व शाळांचा विचार करुन प्लानिंग स्टेजला आणण्याचे काम केलेले आहे. राज्य शासनाने प्लानिंग करुन सर्व विभागांनी धोरण घेतल्यानंतर या विभागाच्या माध्यमातून धोरण करण्याची मानसिकता विभागाने केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, शासनाने अनेक शाळांना निधी उपलब्ध करुन दिला आहे येथ पर्यंत ठीक आहे. परंतु जिल्हा पातळीवर हा निधी पोहोचून महिन्याच्या महिन्याला पगार होणे यामध्ये प्रचंड तफावत आहे. कारण 6-6 महिने या अपंग शाळांच्या शिक्षकांचे पगार होत नाहीत. त्यांना दादही दिली जात नाही, हा कटू अनुभव सर्वच ठिकाणी येत आहे. यादृष्टीने शासन काही पावले उचलणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, जिल्हा प्रशासनाच्या वतीने हा निधी वितरित केला जातो. विकेंद्रीकरणाची शासनाची भूमिका आहे. सन्माननीय सदस्यांची स्पेपिफिक तक्रार असेल तर त्याची दखल घेण्यात येईल. अनेकदा असे होते की, संस्थेला पैसे दिले जातात, परंतु संस्था त्या विद्यार्थ्यांसाठी असते. विद्यार्थ्यांसाठी शासनाने नवीन धोरण स्वीकारले आहे. ई-स्कॉलरशिप आणण्याचा प्रयत्न केला आहे. या शिक्षकांबाबत असा निर्णय घेता येईल काय असा विचार भविष्य काळात करु. परंतु तूर्त जिल्हा परिषदेच्या माध्यमातून या निधीचे वितरण होत आहे. तिकडे यासंबंधी तक्रार असेल तर त्याची निश्चितपणे दखल घेण्यात येईल.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यामध्ये 800 अनुदानित व 400 विना अनुदानित अपंग शाळा आहेत. या शाळांबाबत शासनाचे योग्य धोरण बरोबर नाही. या शाळेतील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग दोन वर्षांनी लागू करण्यात आला. मंत्री महोदय सांगत आहेत ती वस्तुस्थिती नाही. सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी त्यांना झगडावे लागले. आजही अशी परिस्थिती आहे की, अपंग शाळांमधील शिक्षकांचे वेतन वेळेवर कधीही होत नाहीत. जिल्हा परिषदांच्या शाळेतील शिक्षकांसाठी पे युनिट लागू केलेले आहे त्याप्रमाणे या शाळेतील शिक्षकांना पे युनिट लागू केले जाईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, अपंग शाळांच्या शिक्षकांच्या पगाराच्या बाबतीत दुरवस्था आहे असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. 3 नोव्हेंबर, 2009 रोजी हे शासन सत्तेवर आले. 3 डिसेंबर रोजी अपंग दिवस होता त्याचे औचित्य साधून 4 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने अपंग शाळांमधील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी व्हीजन डॉक्युमेंटचा उल्लेख केला आहे. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये एक कल्पना मान्य झालेली आहे, सर्व शिक्षा अभियानामध्ये सुध्दा त्याला स्थान मिळालेले आहे. इन्क्ल्यूझिव्ह एज्युकेशनची ही कल्पना आहे. या विशेष शाळांमध्ये शिकणारी मुले ही केव्हा तरी एका ठराविक टप्प्यानंतर नॉर्मल शाळेमध्ये गेली पाहिजेत. अशा त-हेने त्यांना सक्षम होण्यासाठी या शाळांमधील मुलांचे मुख्य शाळांमध्ये स्थलांतर होणार आहे त्यावेळी त्या शाळांमध्ये अशाप्रकारचे शिक्षक उपलब्ध होणार आहेत की नाही यासंबंधी सरकार व्हीजन डॉक्युमेंटमध्ये विचार करणार आहे का ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, राईट टू एज्युकेशन संबंधी शासन वेगळा प्रस्ताव तयार करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मी पुण्यातील एका संस्थेला भेट देण्यासाठी गेलो होतो. मूक,बधिर मूल जन्माला आल्यापासून त्याला ट्रिटमेंट देऊन जी मूळ शाळा आहे त्यामध्ये दाखल करण्याचे काम तेथे करण्यात आलेले आहे. त्यादृष्टीकोनातून राज्य शासन विचार करीत आहे. शासन आज काहीच करीत नाही. या कामासाठी अनेक एनजीओज पुढाकार घेत आहेत. व्हीजन डॉक्युमेंटमध्ये हा सुध्दा विचार करीत आहोत. मंत्रिमंडळाने यासंबंधी निर्णय घेतलेला आहे. ज्या विशेष शाळा आहेत किंवा अशी जी विशेष मुले आहेत त्यांना पाठिंबा देणे किंवा त्यांना प्रोत्साहन देण्याचा शासनाचा विचार आहे. तो दृष्टीकोन व्हीजन डॉक्युमेंटमध्ये ठेवण्याची तयारी आहे. या शिक्षकांना शासनाने प्रो-ॲक्टीव्हली सहावा वेतन लागू केलेला आहे. सभापती महोदय, अशा मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक पुढे येत नाहीत. कारण त्यांनी विशेष प्रशिक्षण घेतलेले नसते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनीच शिक्षक म्हणून शिकवावे यासाठी काही संस्था पुढाकार घेत आहेत. पालकाला त्या विद्यार्थ्यांच्या वेदना कळतात त्या वेदना शिक्षकाला पगार देऊन सुध्दा कळू शकत नाहीत. यादृष्टीकोनातून शासन काही करु शकतो का याबाबतही विचार करण्याची शासनाची मानसिकता आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक-3 संबंधी**</u>

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक-3 पुढे ढकलण्यात येत आहे.

-------

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक-4 संबंधी**</u>

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, जयप्रकाश छाजेड, मोहन जोशी सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला या लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारण्याची संधी मिळावी.

**उपसभापती** : ठीक आहे. लक्षवेधी सूचना पुकारण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे उपस्थित करण्यात यावयाच्या प्रश्नाला उत्तर कोण देणार आहे?

**उपसभापती** : ठीक आहे. आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : टप्पानिहाय अनुदान मंजूर झालेल्या शाळांना व वर्ग तुकड्यांना वेळेवर अनुदान मिळणे

**मु. शी.** : टप्पानिहाय अनुदान मंजूर झालेल्या शाळांना व वर्ग तुकड्यांना वेळेवर अनुदान मिळणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, शासनाच्या अनुदान मंजूर करण्याच्या धोरणानुसार विनाअनुदानित शाळांना व तुकड्यांना पाचव्या वर्षापासून 20 टक्के अनुदान दिले जाते. प्रत्येक वर्षी टप्प्याटप्प्याने अनुदानात वाढ होऊन साधारणत: नवव्या वर्षापासून 100 टक्के अनुदान मंजूर होते. आदिवासी क्षेत्रातील शाळांसाठी व विनाअनुदानित तुकड्यांसाठी साधारणपणे पाचव्या वर्षापासून 100 टक्के अनुदान मंजूर केले जाते.

टप्पानिहाय अनुदान मंजूर झालेल्या शाळांना व वर्ग तुकड्यांना कधीही वेळेवर अनुदान न दिल्याने शिक्षक व शिक्षकेतरांना वेतन मिळत नाही. एक वर्षापूर्वी 100 टक्के अनुदान प्राप्त वर्गांना अद्यापही नियमित वेतन मिळत नाही. वाजे हायस्कूल, वाजे, ता.पनवेल, जि.रायगड या शाळेतील पाचवी ते सातवीच्या वर्गांना 100 टक्के अनुदान मंजूर असूनही काही महिने वेतन दिल्यानंतर जुलै, 2009 पासून वेतन मिळाले नाही. वेतनाअभावी शिक्षकांची व त्यांच्या कुटुंबियांची उपासमार होत असून ते कर्जबाजारी झाले आहेत. अनुदान मंजूर झालेल्या शाळांना अनुदान सुरु झाल्यानंतर त्यामध्ये खंड न पाडता नियमित वेतन मिळावे अशी मागणी व विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई ते गोवा जलवाहतूक सुरु करणे

**मु. शी.** : मुंबई ते गोवा जल वाहतूक सुरु करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरु असलेली कोकणातील प्रमुख जल वाहतूक मुंबई ते गोवा बोट सेवा गेली 25 वर्षापासून बंद आहे. मुंबई-गोवा जलमार्गावर यापूर्वी चौगुले शिपिंग, कोकण सेवक, कोकण शक्ती या बोटीद्वारे जल वाहतूक सेवा सुरु होती. 1989 मध्ये ही सेवा बंद झाली. त्यानंतर दमानिया शिपिंगची सेवा दोन वर्षे गोव्यासाठी सुरु झाली. मात्र त्यानंतर या मार्गावर बोट सेवा कायमचीच बंद झाली. ही बोट सेवा सुरु झाल्यास निसर्गाच्या सुंदर रमणीय वातावरणातून पर्यटन व इतर स्थानिक प्रवासी रत्नागिरी, सिंधुदूर्ग व गोव्यातील प्रवाशांना फायदा होईल. तसेच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होऊन रस्त्यावरील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी मदत होईल आणि पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. मुंबई-गोवा मार्गावर सध्या एस.टी. व कोकण रेल्वेद्वारे प्रवासी वाहतूक होते. त्यावरील ताण कमी होईल. या सर्व बाबींचा विचार करुन ही मुंबई-गोवा बोटीची जल वाहतूक सेवा पुन्हा सुरु करावी अशी शिफारस राज्य शासनाने केंद्र सरकारच्या नौकानयन मंत्रालयाला करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात करीत आहे.

---------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहात मंत्री उपस्थित नसणे**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेचा प्रस्ताव मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. हा विषय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मंजूर करुन घेतलेला आहे. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्यापूर्वी शिक्षणमंत्री महोदयांना सभागृहात हजर राहणे आवश्यक आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करण्यात यावी.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक सायंकाळी 4.30 वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे. तोपर्यंत माननीय शिक्षणमंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्यास सांगण्यात यावे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.19 ते 4.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम

**मु.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हुसेन दलवाई, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, उल्हास पवार, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री विनोद तावडे, जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री रामनाथ मोते, कपिल पाटील, परशुराम उपरकर, संजय दत्त, भगवान साळुंखे, किरण पावसकर, चरणसिंग सप्रा, चंद्रकांत पाटील, रामदास कदम, राजन तेली, धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 1.30 तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :--

"महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणात वांरवार होणारे बदल, विशेषत: गेल्या तीन वर्षात अकरावी प्रवेशासाठी प्रत्येक वर्षी जाहीर करण्यात आलेली वेगवेगळी धोरणे, सन 2007-2008 मध्ये प्रवेशाचे टक्केवारी प्रमाणे सूत्र "70:30 चे धोरण", सन 2008-2009 मध्ये "90:10 चे धोरण" व नुकतेच जाहीर केलेले "उत्कृष्ट पाच" (बेस्ट ऑफ फाईव्ह) हे नवीन प्रवेश सूत्र, त्यातून निर्माण होणारी महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेतील अनिश्चितता व होणारा विलंब, त्याचप्रमाणे इयत्ता 8 वी पर्यंत परिक्षेची आवश्यकता नसणे अशा प्रकारचे नवीन शैक्षणिक धोरण, या धोरणांचा भविष्यात राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक उपक्रम इत्यादींवर होणारा दुरगामी परिणाम, या सर्व बाबी गंभीर असून अशा बदलत जाणाऱ्या शैक्षणिक धोरणांमुळे शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांमध्ये गैरसमजाचे व संभ्रमाचे पसरलेले वातावरण, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम

**मु.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हुसेन दलवाई, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, उल्हास पवार, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री विनोद तावडे, जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री रामनाथ मोते, कपिल पाटील, परशुराम उपरकर, संजय दत्त, भगवान साळुंखे, किरण पावसकर, चरणसिंग सप्रा, चंद्रकांत पाटील, रामदास कदम, राजन तेली, धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 1.30 तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :--

"महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणात वांरवार होणारे बदल, विशेषत: गेल्या तीन वर्षात अकरावी प्रवेशासाठी प्रत्येक वर्षी जाहीर करण्यात आलेली वेगवेगळी धोरणे, सन 2007-2008 मध्ये प्रवेशाचे टक्केवारी प्रमाणे सूत्र "70:30 चे धोरण", सन 2008-2009 मध्ये "90:10 चे धोरण" व नुकतेच जाहीर केलेले "उत्कृष्ट पाच" (बेस्ट ऑफ फाईव्ह) हे नवीन प्रवेश सूत्र, त्यातून निर्माण होणारी महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेतील अनिश्चितता व होणारा विलंब, त्याचप्रमाणे इयत्ता 8 वी पर्यंत परिक्षेची आवश्यकता नसणे अशा प्रकारचे नवीन शैक्षणिक धोरण, या धोरणांचा भविष्यात राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक उपक्रम इत्यादींवर होणारा दुरगामी परिणाम, या सर्व बाबी गंभीर असून अशा बदलत जाणाऱ्या शैक्षणिक धोरणांमुळे शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांमध्ये गैरसमजाचे व संभ्रमाचे पसरलेले वातावरण, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्याला त्यांची माहिती द्यायची असते. आम्ही मुलांना विचारल्यानंतर ते उत्तर देतात. म्हणजे त्या विद्यार्थ्यांना शिक्षकाने घडविले आहे असे दिसते. विद्यार्थ्यांना पाढे यायला पाहिजेत. धडे वाचता आले पाहिजे. कोणत्या इयत्तेपर्यंत त्याला पाढे आले पाहिजे, धडे वाचता आले पाहिजे याचा अभ्यासक्रम आपण तयार केलेला आहे. आज अशी परिस्थिती आहे की, 3 ते 5 टक्के मुलांना पाढे येतात. मुलांकडून पाढे पाठ करून घेणे यामध्येच शिक्षकांची दमछाक असते. हुशार विद्यार्थी असतो त्याला पाच मिनिटामध्ये सगळे काही कळते. दुसऱ्या विद्यार्थ्याला कळत नसेल तर ते त्याला नीट समजावून सांगणे हा शिक्षकांचा गुणधर्म असतो. पण आता काय परिणाम झाला आहे ? आता आपण शाळेमध्ये गेल्यानंतर काय दिसते ? एका वर्गामध्ये किती विद्यार्थी असावेत हा देखील आज महत्त्वाचा विषय झाला आहे. एका वर्गामध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी असल्यामुळे त्याचा परिणाम भयानक झाला आहे. मोठ्या संख्येने असलेल्या विद्यार्थ्यांवर शिक्षक कसे काय लक्ष देणार ? ही खरी व्यथा आज शिक्षकांची आहे. विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत नापास करावयाचे नाही. परीक्षा ही सवय असते. परीक्षेमुळे मुलांवर दडपण असते. आपला मुलगा परीक्षेला बसणार आहे, त्याने अभ्यास केला पाहिजे असे पालकांना देखील वाटत असते. परीक्षा असल्यामुळे अभ्यास केला पाहिजे असे वातावरण विद्यार्थ्यांमध्ये असते. परीक्षा आता देखील होत आहेत. 100 पैकी 100 गुण देख्रील मुलांना मिळतात तर काही विद्यार्थ्यांना तर 35 पेक्षा कमी गुण मिळतात. माझे तर असे मत आहे की, विद्यार्थ्यांनी कसोटीला उतरले पाहिजे. शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर विद्यार्थ्याला जगातील कसोटीला तोंड देता आले पाहिजे. यासाठी परीक्षा असते. आता आपण आठवी पर्यंत परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतला आहे. माझे तर असे मत आहे की, ग्रामीण भागातील शिक्षक ठेकेदारी करीत आहेत. सहावा वेतन आयोग लागू केल्यापासून एका घरात दोन शिक्षक असतील तर ते व्याजाने पैसे लावायला लागले आहेत. आज ग्रामीण भागातील शिक्षक मुख्यालयी रहात नाही. रोज शाळेत गेले पाहिजे, माझा पट भरला पाहिजे एवढेच ते पाहतात. हा विषय मी येथे गांभीर्याने मांडत आहे. हा आठवीपर्यंतचा विषय आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचा विचार केला तर असे दिसून येईल की, ग्रामीण भागातील शिक्षणाचे मातेरे झालेले आहे. यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ SBT/ KTG/ श्री.जुन्नरे... 16:40

श्री.दिवाकर रावते...

ग्रामीण भागातील विद्यार्थीच उद्‌ध्वस्त होईल. आज ग्रामीण भागात शिक्षणाचा बेंडबाजा वाजत आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील शिक्षणाची तुलना करता येत नाही. दोन्ही भागातील विद्यार्थ्यांमध्ये भयानक अंतर असते. शहरी भागातील विद्यार्थ्यांकडे सोयी असतात. मुबलकता असते. यामुळेच त्यांचा शैक्षणिक दर्जा चांगला असतो. ग्रामीण शिक्षणासाठी आपण विस्तार अधिकारी (शिक्षण), गट शिक्षण अधिकारी आणि शिक्षणाधिकारी अशी व्यवस्था आपण केलेली आहे. हा काय प्रकार आहे, असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

यानंतर श्री.गायकवाड.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

एकदा एखाद्या विद्यार्थ्याने शाळेत प्रवेश घेतल्यानंतर त्या विद्यार्थ्याने अभ्यास केला नाही तरी देखील त्याला आठवीपर्यत नापास केले जाणार नाही, ही गोष्ट नक्की आहे. या विद्यार्थ्याचे शिक्षक असे म्हणंतील की, मी त्या विद्यार्थ्याला शिकवले किंवा नाही शिकवले तरी त्याला आठवीपर्यत पास करुन पुढे न्यावयाचे आहे. तेव्हा आठवीपर्यत विद्यार्थ्याला नापास न करण्याच्या निर्णयामुळे नक्की काय घडणार आहे ? राईट टू एज्युकेशन आहे, असे मला मागे चर्चा करीत असतांना कोणी तरी सांगितले होते. परंतु ही बाब राईट टू एज्यकेशनमधील नाही. शिक्षणाचा अधिकार केन्द्र सरकारने दिला आहे. या राज्यामध्ये जन्माला आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणं दिले पाहिजे. तो राईट टू एज्युकेशन आहे. याचा अर्थ असा आहे की, राज्यामध्ये जेवढी मुले जन्माला येतील त्या सर्व मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे त्यांच्या वर्गखोल्यांची व्यवस्था करणे, त्याकरता जो काही निधी लागेल तो निधी राज्य सरकारच्या बजेटमधून उपलब्ध करुन देणे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. केन्द्र सरकारचे किती अनुदान आपल्याला मिळणार आहे, ते केव्हा मिळणार आहे, याबाबतीत राईट टू एज्युकेशनसंबंधीचे विधेयक येईल त्यावेळी आम्ही त्यावर बोलू. राज्य सरकारला हे बिल सभागृहात आणावेच लागेल.

सभापती महोदय, आठवीपर्यतच्या सर्व विद्यार्थ्यांना पास करण्यासबंधीचा जो निर्णय आहे, त्या निर्णयामुळे ग्रामीण आणि शहरी भागामध्ये फार मोठी दरी निर्माण होणार आहे. शहरामध्ये सर्व गोष्टी जाणीवपूर्वक पाहिल्या जातात. परंतु आता आठवीपर्यत परीक्षाच घेण्यात येणार नसल्यामुळे, ग्रामीण भागात हे गांभीर्य अजिबात राहणार नाही. दहावीच्या परीक्षेच्या संदर्भातील जे मुद्दे आहेत त्या बाबतीत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत बोलणार आहे. त्यामुळे या विषयासबंधी मी आता जास्त काही बोलणार नाही. ग्रामीण भागात नापास होणा-या विद्यार्थ्याची चिंता घेऊन मी मराठवाडयातील ग्रामीण भागात फिरलो होतो. मराठवाडयातील ग्रामीण भागात असणा-या शाळांचे निकाल शून्य टक्के लागल्याचे पाहिल्यानंतर मी अस्वस्थ झालो होतो. म्हणूनच आठ जिल्हे मी पिंजून काढले होते. मी आपल्याला अभिमानाने सांगतो की, मराठवाडयामध्ये त्याचा चांगला परिणाम झाला होता. शिक्षण क्षेत्रामध्ये चांगली चर्चा झाली होती आणि चांगला परिणाम झाला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

होता. त्यामुळे शिक्षकांमध्ये इतका चांगला परिणाम झाला की, आता मराठवाडयामध्ये शुन्य निकालाची एकही शाळा राहिली नाही. उलट मुंबईमध्ये शून्य निकालाच्या 28 शाळा निर्माण झाल्या होत्या. शैक्षणिक प्रयोग अत्यंत ताकदीचा आणि सामुदायिक मानसिकता निर्माण करणारा असावा लागतो.

सभापती महोय आठवीपर्यत परीक्षा न घेण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्यामुळे आठवीपर्यत शिक्षणाचे गांभीर्यच संपून गेले आहे. उत्तरपत्रिका सोडविण्यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये मोठा जोश असतो. मला परीक्षा द्यावयाची असल्यामुळे मला अभ्यास केला पाहिजे, जुन्या प्रश्न पत्रिका सोडविल्या पाहिजेत असे त्या विद्यार्थ्यांना वाटत असते परंतु आता परीक्षाच रद्द केल्या असल्यामुळे विद्यार्थ्यामधील जोश संपला आहे. आता परीक्षाच घेण्यात येणार नाहीत, परीक्षा घेण्यात येणार असल्या तरी त्याची काहीही किंमत नाही. त्या सर्व परीक्षा आता नाममात्र झाल्या आहेत. या बाबतीत माननीय मंत्री महोदय कदाचित असे सांगतील की, असा काही निर्णय झालेला नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, परीक्षा असोत की नसोत, परीक्षामध्ये विद्यार्थी पास होवो अथवा न होवो परंतु आता परीक्षाच रद्द करण्यात आल्या असल्यामुळे, परीक्षा देण्यामध्ये विद्यार्थ्यात जो काही जोश असतो तो जोश आता नाहीसा होणार आहे. मला परीक्षा द्यावयाची आहे, त्यासाठी अभ्यास करावयाचा आहे असे त्या विद्यार्थ्यांना आता वाटणार नाही. मी आता नापास होणारच नाही त्यामुळे अभ्यास केला पाहिजे, याबाबतीत विद्यार्थ्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण राहणार नाही. त्याचबरोबर आई वडीलसुध्दा अभ्यास कर, असे सातत्याने त्या विद्यार्थ्याला सांगण्ार नाहीत. पूर्वी परीक्षा घेण्यात येत असल्यामुळे, घरातील वा घराच्या आजूबाजूला राहणारे विद्यार्थी एकत्र येऊन अभ्यास करतात. परंतु आता परीक्षाच घेण्यात येत नसल्यामुळे व स्पर्धाच नसल्यामुळे विद्यार्थी एकत्र येऊन अभ्यास करणार नाहीत. तसेच चर्चा देखील करणार नाहीत. परीक्षाच घेतल्या जाणार नसल्यामुळे, हा अभ्यास तरी कोणासाठी करावयाचा असा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे शाळेतील उपस्थितीवर त्याचा पहिला परिणाम होईल असे मला वाटते. एकदा शाळेत विद्यार्थ्याचे नाव दाखल केले की, तो विद्यार्थी दोन दिवस शाळेत जाईल आणि नंतर तीन दिवस शाळेत जाणार नाही

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

त्यामुळे विद्यार्थी शाळेत मोठया प्रमाणावर अनुपस्थित राहतील. त्यांना असे वाटेल की, मी शाळेत जरी दररोज गेलो नाही तरी ज्या दिवशी निकाल लागेल त्या दिवशी मी पहिलीतून दुसरीमध्ये जाईल व दुसरीमधून तिसरीमध्ये जाईन. पुढच्या वर्षी मी नवीन वर्गातच जाणार आहे, याची खात्री त्या विद्यार्थ्याला असणार आहे. त्यामुळे नित्य नियमाने दररोज शाळेत गेलेच पाहिजे असे त्या विद्यार्थ्याला वाटणार नाही. विद्यार्थ्यांना परीक्षेचा धाक राहणार नाही. परीक्षा देण्यासाठी जी काही तयारी करावयाची असते ती तयारी केली जाणार नाही. त्या तयारीचा त्यांना अंदाज राहणार नाही.मुलाची प्रगती होते किंवा नाही याची माहिती पालकांना तसेच शिक्षकांना मिळणार नाही. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना कोणी वाली राहणार नाही. अनुदान देणा-या शाळांचे मूल्यांकन केले जाते परंतु हे मूल्यांकन कसे केले जाणार आहे ? शाळेच्या कामगिरीच्या आधारावर शासन त्यांना अनुदान देणार आहे. तेव्हा मूल्यांकन कसे केले जाणार आहे ? आता मूल्यांकनाचा विषय राहणार नाही. सर्व मुले प्रत्येक वर्षी पास होणार असल्यामुळे हे मूल्यांकन कशाच्या आधारावर आणि कशाचे करण्यात येणार आहे ? विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती हा फार महत्वाचा भाग आहे.

नंतर कु.थोरात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

इयत्ता चौथी आणि सातवीमध्ये शिष्यवृत्ती परीक्षेला बसण्याचे आणि शिष्यवृत्तीची परीक्षा पास होण्याचे एक फार मोठे आकर्षण असते पण आता ते आकर्षण संपलेले आहे. शिष्यवृत्तीच्या परीक्षेची खास तयारी करण्यात येते. 100 मुलापैंकी 25 निवडक मुले बाजूला काढण्यात येतात. त्या 25 मुलांमध्ये मी असलो पाहिजे असे प्रत्येकाला वाटायचे. मी 25 मुलांमध्ये असलो पाहिजे असे म्हणणाऱ्या 100 मुलापैकी 25 मुलांची निवड करण्यात येत होती आणि त्याच तोडीची मागे राहिलेली आणखी 25 मुले असायची आणि ती देखील सक्षमतने या शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करायची.ती एक चांगली स्पर्धा होती. आता शिष्यवृत्तीची परीक्षा इतक्या गांभीर्याने घेतली जाणार नाही. त्यामुळे परीक्षेतील कामगिरी खलावणार आहे. अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याचे बंधन शिक्षकावर होते ते आता राहणार नाही. एखादा विषय शिकविल्यानंतर तो समजला की नाही याबबातचे काही बंधन त्यावर राहणार नाही. शिक्षकांचे मॉनिटरींग हा विषय असतो. पण आता ती ग्रीप शिक्षण खात्याची राहणार नाही. कारण आता ती आवश्यकताच नाही. शाळा तपासणाऱ्या इन्स्पेक्टरने प्रश्न विचारल्या नंतर त्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना देता आली किंवा देता आली नाही तरी त्या इन्स्पेक्टरला त्या शिक्षकाबद्दल शेरा लिहिता येणार नाही. या प्रतिकूल परिस्थितीत एक मात्र नक्की होईल. अभ्यासाचा बोजा गेला. अभ्यासाची ओढ गेली. अभ्यासाचा दबाव गेला. त्यामुळे आता मी भरपूर खेळलो तरी चालेल. त्यातून पाच-दहा चांगले खेळाडू तयार होतील.

सभापती महोदय, खाजगी शिकवण्या वगैरे सगळे प्रकार आता बंद होतील. खाजगी शिकवण्यांचे कंत्राटदार आणि ठेकेदार आहेत किंवा घरी येऊन शिकविण्याचे पैसे मिळायचे ते आता बंद होईल. इयत्ता आठवीपर्यंत पास होण्याचे फायदे नक्की होतील ते म्हणजे पालकांच्या खिशाला लागणारी चाट संपूर्ण निघून जाईल. शिक्षणातील गैर प्रकार थांबतील परंतु माननीय मंत्रिमहोदयांनी आणखी एका गोष्टीचा अंदाज घ्यावा. इयत्ता आठवी पर्यंत या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे गांभीर्य रहाणार नाही. कुठल्याही परीक्षेला सामारे जाण्याची मानसिक तयारी रहाणार नाही. आता पर्यंत मला परीक्षा दिली पाहिजे अशी अहमहमिका मानसिकरीत्या प्रत्येक विद्यार्थ्याची असायची. मग 'ढ' मुलालाही परीक्षा दिली पाहिजे असे वाटते. इयत्ता आठवी पास झालेला विद्यार्थी जेव्हा इयत्ता नववीत येईल आणि त्यानंतर तो पुढे इयत्ता दहावीत येईल तेव्हा कसले तुमचे पर्सेंटाईल आणि बेस्ट ऑफ

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते....

फाईव्ह घेऊन बसलात आता तोंडी परीक्षेत पूर्णच्या पूर्ण 25 मार्क्स देऊन 100 टक्के मार्क्स मिळाले तरी त्या मुलांची 100 टक्के मार्क्स घेण्याची ताकद आहे काय? त्या सर्व मुलांची परीक्षा घेतली तर त्यांना 50 ते 60 टक्क्याच्या वर मार्क्स मिळणार नाहीत. शाळेने तोंडी परीक्षेत रोखठोक 25 मार्क्स देऊन टाकले. समजा मला लेखी परीक्षेत 20 मार्क्स मिळाले आणि शाळेने तोडी परीक्षेत 18 मार्क्स दिले तर 38 मार्क्स होतात आणि मी पास होतो. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना पास करुन मार्क्स फुगवून दाखविण्याचे जे षडयंत्र निर्माण केलेले आहे त्यातून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक मानसिकता खुंटेल. त्याची असलेली बौध्दिकता खुंटायला लागली तर भविष्यात जगातील स्पर्धेमध्ये तो कसा उतरेल असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करणार आहे. हा विषय माननीय मंत्रिमहोदया प्रा. फौजिया खान यांनाही माहीत आहे मी त्यांचेही अभिनंदन करतो. त्यांनी हा विषय मनावर घेतलेला आहे. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या अनुभवाची जोड शिक्षण खात्याला मिळेल. पण शिक्षण खाते त्याचा किती फायदा करुन घेईल हे मला माहीत नाही. कारण त्या राज्यमंत्री आहेत. राज्य मंत्र्यांना अधिकारच नसतात. सगळे अधिकार मंत्र्यांना असतात.

सभापती महोदय, कॉपी हा विषय भयंकर झालेला आहे. काही विद्यार्थी कॉपी करुन 70 ते 80 मार्क्स मिळवतात आणि महाविद्यालयात प्रवेश घेतात नंतर त्यांचा बँडबाजा वाजतो त्यांची अशी वाट लागते की, त्यांना पुढे काही माहितीच नसते. कॉपीमध्ये कोण-क्ोण सामील असतात? पालक, पोलीस आणि शिक्षक हे सगळेच सामील असतात. आपण आपल्या मुलाला कॉपी करुन पास करुन पुढच्या वर्षात नेले याचे त्यांना कौतुक वाटते.. मग पुढे त्या मुलाचे वाटोळे होते. त्या मुलाचे वाटोळे झाले तर त्या मुलाच्या कर्माने आणि त्याच्या पालकाच्या कर्तृत्वाने झालेले असते. पण या महाराष्ट्रातील एका पिढीचे जेव्हा वाटोळे होते तेव्हा या महाराष्ट्रातील कर्तृत्व शक्तीचे, क्रय शक्तीचे, अध:पतन झालेले असते ते महाराष्ट्राला पिढीजात परवडेल काय? असा प्रश्न निर्माण होतो. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन मी एवढयाचसाठी करतो की, नांदेडमध्ये किनवट, नायगाव वगैरे या तीन भागामध्येच मराठवाडयातील लोक परीक्षा केंद्र मागून घ्यायचे आणि दणादण पास व्हायचे. जिल्हाधिकारी श्री. परदेशी यांना मी पूर्वीपासून ओळखतो.

यानंतर श्री. बरवड...

श्री. दिवाकर रावते ...

त्यांनी निर्धार केला. त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांची परवानगी घेतली आणि तो उपक्रम राबविला. तो उपक्रम राबविल्यानंतर असे चित्र दिसले की, 26 ते 27 टक्केच निकाल लागला. कॉपी झाली नाही आणि पहिल्यांदाच असे घडले की, कॉपी केली म्हणून हजारो मुलांना परीक्षेतून बाद करण्यात आले. प्रा. फौजिया खान मंत्री झाल्यानंतर त्यांच्याशी माझी भेट झाल्यानंतर त्यांनी पहिला विषय हा काढला की, रावते साहेब, मला एवढेच सांगा की, आपण कॉपी कशी थांबवावयाची ? ही विवंचना आहे. मुले पास झाली म्हणून आनंद मानण्यापेक्षा ज्यावेळी मुले संघर्षातून आणि स्पर्धेतून बाहेर येतात त्यावेळी ते तावूनसुलाखून बाहेर आलेले असतात आणि ते समाजाला घडवू शकतात, स्वत:ला घडवू शकतात. मी त्यांना सांगितले की, क्लोज सर्किट टी.व्ही. लावा. आमची सगळी चर्चा झाली. या कॉपीच्या रोगातून आपली जी पिढी बरबाद होत आहे ती उद्या चाणाक्ष दृष्टीने महाराष्ट्राला उभे करु शकत नाही. ग्रामीण भागामध्ये हे प्रकरण एवढे वाढलेले आहे की, शहरातील संपूर्ण मुले पुढे जात आहेत आणि ग्रामीण भागातील मुले मागे पडत आहेत अशी परिस्थिती निर्माण होत आहे. आज महाराष्ट्र 80 टक्के ग्रामीण भागामध्ये आहे. शहरी भागामध्येच भवितव्य घडणार असेल आणि ग्रामीण भागात अशी प्रवृत्ती असेल तर ते योग्य नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना हिरवा सिग्नल दिला आणि त्यांनी ते करुन दाखवले. आमच्या माननीय राज्यमंत्र्यांच्या संकल्पनेमध्ये जर कॉपी थांबली पाहिजे आणि चांगली मुले पास झाली पाहिजेत असा विचार असेल तर आपल्याला तसे जाहीर करण्यास हरकत नाही. कारण माझी आणि त्यांची तशी चर्चा झाली होती. हे कसे करावयाचे हे त्यांच्या मनामध्ये आहे. ते केले पाहिजे.

सभापती महोदय, हे सगळे करीत असताना शिक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांची संख्या काय ठेवणार ? हे कधी तपासावयाचे नाही, बघावयाचे नाही अशी परिस्थिती आहे. गट शिक्षण अधिकारी वगैरे सर्व आपल्याला बघावे लागेल. यासंदर्भातील आपले निश्चित धोरण काय असणार आहे ? ही बरबाद होणारी भविष्यातील पिढी कशी थांबविणार आहात ? आठवीपर्यंत परीक्षा घ्यावयाची नाही हे कोणाच्या डोक्यातून निघाले ? आपण हलक्या परीक्षा घ्या, साध्या परीक्षा घ्या. मुलांच्या मनामध्ये मला कोठे तरी कसोटीला उतरावयाचे आहे ही मानसिकता असणे महत्वाचे आहे. आपण त्यांना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

कठीणातील कठीण गोष्टी विचारुन ते नापास कसे होतील असे न बघता ते पास कसे होतील अशा प्रकारची साधी परीक्षा घ्या. काही तरी परीक्षा घ्या. त्यांच्यावर थोडे तरी दडपण असले पाहिजे. पाच मुले नापास झाली म्हणून काही बिघडत नाही. पण नापासच करावयाचे नाही आणि ज्याला काहीच येत नाही त्याला आठवीपर्यंत नेऊन बसवावयाचे हे कोणत्या संस्कारामध्ये बसते हे मला कळत नाही. कदाचित शिक्षण क्षेत्रातील माझे अज्ञान असेल. आपण बरोबर असू शकाल परंतु मला जे खटकते ते मी प्रांजळपणे या ठिकाणी मांडतो. आणि भविष्यामध्ये आपण उद्ध्वस्ततेला सामोरे जात आहोत अशा प्रकारची जी परिस्थिती आपण निर्माण करीत आहोत ती फार गंभीर आहे.

सभापती महोदय, मी जास्त वेळ घेणार नाही कारण बाकीचा वेळ मला सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना पुढच्या महत्वाच्या विषयाकरिता द्यावयाचा आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपण आज कितीही आनंदात असला तरी आपण न्यायालयामध्ये जिंकलेला नाहीत हे लक्षात ठेवा. आताच्या प्राप्त परिस्थितीमध्ये कोंडी फोडण्यापुरती आपल्याला या वर्षाकरिता आपण जे काही बेस्ट ऑफ फाईव्ह निर्माण केले आहे त्याला परवानगी मिळालेली आहे. आपण बेस्ट ऑफ फाईव्ह म्हणण्यापेक्षा उत्कृष्ट पाच असे का म्हणत नाही. प्रचारामध्ये शब्द आणताना तो इंग्रजीमध्ये कसा आणला जाईल याची काळजी वाहात आहेत. मंत्री बोलणार बेस्ट ऑफ फाईव्ह, इतरही म्हणणार बेस्ट ऑफ फाईव्ह. सर्व मराठी वर्तमानपत्रवाले म्हणणार बेस्ट ऑफ फाईव्ह. आपण जर उत्कृष्ट पाच असे लिहीत गेलो म्हणजे तसे लोकांच्या तोंडात येते. इंग्रजीचा ध्यास मराठी लोकांनी फार घेतलेला आहे. मी आपला जी.आर. बघितला. जी.आर.मध्ये उत्कृष्ट पाच असा उल्लेख केला आहे आणि कंसामध्ये बेस्ट ऑफ फाईव्ह असे म्हटले आहे. कंसामध्ये ते म्हटले नसते तर लोकांच्या तोंडी उत्कृष्ट पाच असेच आले असते. जी.आर.मध्ये उत्कृष्ट पाच असे नमूद केले आहे पण कंसात बेस्ट ऑफ फाईव्ह असे म्हटले आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांकरिता उत्कृष्ट पाच आणि माननीय राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांना समजण्याकरिता बेस्ट ऑफ फाईव्ह असे आहे की काय ? कंसामध्ये लिहिण्याची काही गरज नव्हती. आपण प्रचारामध्ये कसे शब्द आणावयाचे हे ठरवावयाचे असतात आणि आपल्या राज्यभाषेचे शब्द प्रचारात आणण्याकरिता ते

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते ....

अत्यंत कडवटपणे प्रचारात आणावयाचे असतात. समोरच्या माणसाने बेस्ट ऑफ फाईव्ह म्हटल्यानंतर आपण उत्कृष्ट पाच असे म्हटले पाहिजे.

सभापती महोदय, आयसीएसईची जी मिजास आहे ती आपण का उतरवत नाही हा प्रश्न मी विचारतो. हे आयसीएसई कोण आहे ? सीबीएसई हे केंद्र शासनाचे आहे. ते अधिकृत मान्यताप्राप्त आहे. परंतु आयसीएसई कोण आहेत ? कोणे एके काळी केंब्रिज युनिव्हर्सिटी एक्झामिनेशन असोसीएट्स नावाची इंग्लंडमधील खाजगी संस्था इंग्लंड बाहेरच्या लोकांसाठी परीक्षा घेण्यसाठी काढली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यांनी परीक्षा घेणारी संस्था काढली, शिकवणारी नाही. आपले परीक्षा मंडळ अभ्यासक्रम ठरविते, कार्यक्रम ठरविते. पुस्तक ठरविते, पुस्तकातील अभ्यासक्रम ठरविते. आपल्याकडे अभ्यासक्रम कोणते असावेत यासंबंधी 54 विषयाची मंडळे आहेत. आपले मंडळ आहे ते पूर्ण जबाबदारी घेऊन काम करीत आहे. तसे आयसीएसई काम करीत नाही. ते एक परीक्षा घेणारे मंडळ आहे. त्यांच्याकडे तांत्रिक माहिती आजही नाही. भारतातील अँग्लो इंडियन लोकांना अशी परीक्षा देता यावी. म्हणून 1952 साली वरील खाजगी संस्थेने जोडलेली खाजगी संस्था म्हणून इंडियन सर्टिफिकेशन ऑफ स्कूल एक्झामिनेशन ही खाजगी संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदवून स्थापन झाली. दिल्ली केंद्र शासित प्रदेश होता, दिल्ली आता पूर्ण राज्य झाले आहे. राज्य झाल्यानंतर तेथील विधानसभेची तिसरी टर्म असावी. त्यामुळे तेथे नायब राज्यपाल असत. त्यावेळच्या केंद्रशासित प्रदेशामध्ये सरकार नसल्यामुळे आपल्यासारखी कायदा करण्याची व्यवस्था नसल्यामुळे नायब राज्यपालांना आदेश काढावे लागत असत. त्यामुळे 1967 साली दिल्लीमध्ये सरकारने चालविण्याची जबाबदारी घेतलेली ही संस्था नाही. दिल्ली सरकारने दिलेल्या प्रमाणपत्रांना मान्यता नाही. या संस्थेला कोणतीही मान्यता नाही. दिल्लीला राज्याचा दर्जा नव्हता. दिल्लीचे हे स्वतंत्र केंद्रीय मंडळ इतर राज्यात स्थापन करता येत नव्हते. म्हणून केवळ परीक्षा घेणारे मंडळ म्हणून नायब राज्यपालांनी त्याला मान्यता दिली. आजही आयसीएसई हे राज्य मंडळासारखे वैधानिक मंडळ नसून केवळ खाजगी मंडळ आहे. आयसीएसईकडे राज्य मंडळासारखी संलग्न व्यवस्था नाही. केवळ ना हरकत प्रमाणपत्राची सोय आहे. राज्य मंडळ वर्षभर शाळेत काय शिकविते ते मघाशी सांगितले आहे. तशी व्यवस्था आयसीएसईमध्ये नाही. राज्य मंडळ पहिली ते दहावीपर्यंत प्रत्येक वर्षाचा प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम निर्माण करते.

आता आठवीपर्यंत सगळयांना पास केले जाणार आहे. आतापर्यंत पहिलीपासून परीक्षा घेतल्या जात होत्या, यापुढे काय केले जाणार आहे हे मला माहीत नाही. तेही मंत्री महोदयांनी सांगावे. आतापर्यंत आपण संशोधन करीत होतो. आयसीएसईकडे अशी यंत्रणा नाही, मनुष्यबळ नाही अन्य पायाभूत सुविधाही नाहीत. हे केवळ परीक्षा घेणारे मंडळ आहे, त्याला कोणाचीही

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मान्यता नाही, अशा मंडळाला बोडक्यावर घेऊन शासन सुप्रीम कोर्टामध्ये लढत आहे. सार्वभौम घटनेमुळे निर्माण झालेले हे राज्य सरकार आहे. ते कोणच नाहीत. एखाद्याने क्लास चालवावा, अशाप्रकारचे ते बोर्ड आहे. आयसीएसईचा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील मंडळापेक्षा खूपच कमी दर्जाचा आहे. आठवीपर्यंत आयसीएसईशी संलग्न किंवा ना हरकत प्रमाणपत्राच्या संबंधित शाळांना वितरित केले जात नाही. तेथे फक्त नववी व दहावीला अभ्यासक्रमाचा आराखडा दिला जातो. शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात नाही. राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या शाळेत काम करणा-या शिक्षकांची पात्रता तपासून नेमणुकीला मान्यता दिली जाते. अशी व्यवस्था आयसीएसईकडे नाही, जी आपल्याकडे आहे. त्यामुळे आयसीएसईच्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता हा कायम गुलदस्त्यातील प्रकरण आहे. या मंडळाच्या संकेत स्थळावर त्यांच्या पात्रतेचा उल्लेख केलेला नाही. भारतातील लोकांना इंग्रजी नावे व दिल्लीतील गोरागोमटया माणसाला बघितले तर तो परदेशी नागरिक वाटतो. मग तिकडे तो कोणीही असू दे. परंतु आपल्याला गोरा माणूस फॉरेनर वाटतो तसे आयसीएसईबद्दल वाटत आहे.

ॲड.वंदना चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे आयसीएसईवर बोलत असताना तोफ झोडत आहेत. पण आयसीएसईचे स्टॅण्डर्ड दहावीच्या एसएससी स्टॅण्डर्डपेक्षा खूप उच्च आहे. तेथे शेक्सपीअर सुध्दा शिकविला जातो. आपल्याकडील बारावीचा अभ्यासक्रम आहे तो त्यांच्याकडे दहावीला शिकविला जातो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:05

(श्रीमती वंदना चव्हाण...

मी स्वत: आयसीएसई बोर्डाच्या शाळेत शिकले आहे. आपल्या एस.एस.सी. आणि एच.एस.सी. बोर्डाच्या शाळेत आणि कॉलेजमध्ये जे शिकविले जात नाही ते आयसीएसई बोर्डाच्या शाळेत शिकविले जाते.

श्री. दिवाकर रावते : या गोष्टीची आम्हाला खंत वाटते. या महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये असलेल्या सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण ह्या सुविद्य आहेत, वकील आहेत. त्यांना तात्या शिरवाडकरांपेक्षा शेक्सपिअर मोठा वाटतो. आम्हाला शेक्सपिअर हा तात्या शिरवाडकर यांच्या पेक्षा मोठा वाटत नाही. महाराष्ट्रातील आयसीएसई बोर्डाच्या शाळांमधून तात्या शिरवाडकर शिकविले जात नाहीत. आयसीएसई बोर्डाने काल असे जाहीर केले की त्यांच्या शाळातून मराठी शिकविले जाणार नाही...(अडथळा)... सन्माननीय सदस्य इंग्रजांची वकिली का करीत आहेत ? अजूनही सवय जात नाही. या आयसीएसई बोर्डाचा जो काही दर्जा आहे त्याचे मी वर्णन करतो. सहन होत असेल तर आपण ते ऐकावे. आयसीएसई बोर्डाच्या शाळातून 6-7 विषय शिकविले जातात. त्या बोर्डातील विद्यार्थी गणित आणि विज्ञान या दोन महत्वाच्या विषयात नापास झाले आणि अन्य संगीत, चित्रकला अशा 5 विषयामध्ये भरपूर मार्काने पास झाले तरी ते पास होतात आणि त्या मार्काच्या आधारावर आमच्या कॉलेजात विज्ञान शाखेमध्ये प्रवेश मिळवितात. आमच्या एस.एस.सी.बोर्डातील विद्यार्थी सगळया विषयामध्ये पास झाला तरच तो पास होतो. एका विषयात जरी तो नापास झाला तरी तो नापास होतो. आयसीएसई बोर्डाचा विद्यार्थी दोन विषयात नापास झाला तरी तो पास होतो. त्याला संगीत विषयात 80 मार्क्स, चित्रकलेत 90 मार्क्स मिळाले आणि गणित व विज्ञान विषयात नापास झाला तरी त्याला रुईया सारख्या महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळतो. अशा प्रकारचे आयसीएसईचे स्टॅण्डर्ड आहे. सभापती महोदय, कोणत्या गोष्टीचे कौतुक करायचे हे देखील समजले पाहिजे. शेजा-याचा मुलगा गोरागोमटा आणि आपला शेंबडा असला तरी तो आपला मुलगा असतो. आयसीएसई बोर्डाने मराठी शिकविणार नाही असे सांगितले. माननीय मंत्री महोदयायंना मी ठामपणे सांगू इच्छितो की त्या बोर्डाला सरकारी मान्यता नाही. या राज्यात मराठी न शिकविणारे बोर्ड येथे चालणार नाही. अशा प्रकारच्या बोर्डाची काही गरज नाही. आपले बोर्ड फार सक्षम आहे. आपले बोर्ड पारखून, जोखून विद्यार्थी तयार करीत असते. आयसीएसई बोर्डाचा विद्यार्थी शेक्सपिअर शिकून पी.एचडी करील आणि फाडफाड इंग्रजी बोलेल ते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

कळणार नाही. पण सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी त्याचे भाषांतर केले तर शेक्सपिअर मराठीत आल्याचा आम्हाला आनंद होईल....

**उपसभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्ना संबंधी महाराष्ट्रातील सर्वपक्षीय शिष्टमंडळ दिल्लीला माननीय पंतप्रधानाना जाऊन भेटणार आहे. या संदर्भात विधानसभेमध्ये माननीय विधानसभाध्यक्षांच्या संमतीने जो ठराव संमत झालेला आहे तो माननीय उपमुख्यमंत्री या सदनाला अवगत करतील. उद्या शिष्टमंडळ जाणार असल्यामुळे आजच हा ठराव मंजूर होणे आवश्यक आहे. आपल्या सर्वांच्या भावना तेथपर्यन्त जाणे आवश्यक आहे. म्हणून मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना त्यासंदर्भातील ठराव मांडण्याची अनुमती देत आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सीमा भागातील मराठी जनतेवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी केंद्र शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे करणे

मु.शी.: सीमा भागातील मराठी जनतेवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी केंद्र शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे करण्याबाबत माननीय उपमुख्यमंत्री यांचा ठराव

श्री.छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे ठराव मांडतो. कृपया सर्वांनी एकमताने पारीत करावा अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नी माननीय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेमध्ये केंद्र शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रासंबंधात सीमा भागात राहणाऱ्या मराठी भाषिक जनतेच्या तसेच महाराष्ट्रातील जनतेच्या मनात निर्माण झालेला असंतोष, परिणामी सीमा भागात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेता केंद्र शासनाने या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेचा फेरविचार करुन सीमा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत तसेच सीमा भागातील जनतेवर होणारा अन्याय दूर करण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना केंद्र शासनाने तातडीने करावी अशी शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात यावी, असा ठराव ही विधानपरिषद एकमताने संमत करीत आहे.

एकमताने ठराव संमत करण्यात आला.

----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.परशुराम उपरकर)**

**पृ.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम

**मु.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हुसेन दलवाई, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, उल्हास पवार, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री विनोद तावडे, जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री रामनाथ मोते, कपिल पाटील, परशुराम उपरकर, संजय दत्त, भगवान साळुंखे, किरण पावसकर, चरणसिंग सप्रा, चंद्रकांत पाटील, रामदास कदम, राजन तेली, धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दोन विषयात अनुत्तीर्ण झाल्यानंतर सुध्दा अप्रस्तुत विषयांमध्ये अधिक गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रवेश घेणारे आय.सी.एस.ई.चे विद्यार्थी आणि राज्य शिक्षण मंडळाच्या परीक्षेत सर्व अनिवार्य विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय पुढील वर्गात प्रवेश मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून मी माननीय शिक्षणमंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, या दोन्ही बोर्डांना समकक्ष मानू नये. दिलेला समकक्षेचा दर्जा ताबडतोब काढून घ्यावा आणि एस.एस.सी.बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या मुलांना या अडचणीतून मुक्त करावे. शेक्सपीयर कॉलेजमध्ये शिकविता येईल. तात्यासाहेब शिरवाडकर महत्वाचे आहेत.

सभापती महोदय, गेल्या तीन वर्षात जी परिस्थिती निर्माण झाली त्याची कारणे काय आहेत? या राज्याचे कृषिमंत्री शिक्षणात एवढे अडकलेले आहेत की शेतकऱ्यांचा खताच्या विषय गंभीर बनलेला आहे. आम्हाला सन्माननीय श्री.बाळासाहेब थोरात हे कृषिमंत्री म्हणून हवे आहेत. या राज्याला स्वतंत्र शिक्षणमंत्री मिळू नये? माणसांची एवढी वानवा आहे का? शासनाला एकही सक्षम आमदार आढळून येत नाही का? शिक्षण आणि कृषि विभागाला स्वतंत्र मंत्री का मिळत नाही? आदरणीय श्री.बाळासाहेब थोरात हे शिक्षणमंत्री म्हणून चांगले काम करीत असतील तर नवीन कृषिमंत्री नेमण्यात यावेत. शिक्षण खात्याला स्वतंत्र मंत्री नसल्याने सतत आणि सातत्याने

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

कोर्टदरबारी फजिती झालेली आहे. शासनाला कोण सल्ले देतो? कसे सल्ले देतो? सतत शिक्षण खात्याला उताणे पडावे लागत आहे. महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांची, त्यांच्या कुटुंबियांची ससेहोलपट होत आहे. लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबियांची शैक्षणिक आणि मानसिकदृष्टया ससेहोलपट होत आहे. ती असह्य असल्यामुळे निर्धाराने शिक्षण खात्याचे निर्णय घेण्याकरिता पूर्णवेळ शिक्षणमंत्री असणे आवश्यक आहे. परंतु या राज्यात शिक्षण खात्याला पूर्णवेळ शिक्षणमंत्री मिळत नाही. एवढी वानवा या राज्यामध्ये असेल तर निवडून आलेले आमदार ढ असले पाहिजेत, त्यामुळे कोणी सक्षम व्यक्ती उपलब्ध होत नाही असा अर्थ निघतो. शिक्षण आणि कृषि खात्याला स्वतंत्र मंत्री मिळत नाही ही स्थिती या राज्याला हितावह नाही. म्हणून या महाराष्ट्रामध्ये शिक्षण खात्याला स्वतंत्र मंत्री असणे आवश्यक आहे अशाप्रकारची नम्र विनंती करतो.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अनेक मंत्रीमहोदय दोन-दोन विभाग सांभाळीत आहेत. मी स्वत: शिक्षण आणि कृषि विभाग अत्यंत सक्षमपणे सांभाळीत आहे. त्यामध्ये कुठेही कमी पडलेलो नाही. सगळ्या विषयांना न्याय देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यापूर्वी माननीय प्रा.वसंत पुरके हे राज्याचे शिक्षणमंत्री होते. प्रयोगशीलता करता येते का?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांच्या मनात आले ते त्यांनी केले असे ते मंत्री होते. ते गेले आणि नंतर आमचे न्याय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील त्या पदावर शिक्षणमंत्री म्हणून आले. त्यांनी मध्येच कॉलेजप्रमाणे दहावीसाठी एटी/केटी चे ऑपशन्स निर्माण केले. ते सुध्दा अनेक संस्था चालवितात. अशा प्रकारे शिक्षण खात्याच्या संदर्भात राज्यात संपूर्ण गोंधळ चालला आहे. आता माननीय कृषी मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकडे शिक्षण मंत्री म्हणून कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. आपण शिक्षण खात्याचे काम चांगले करीत असला तरी आपल्या कोणत्याही नेत्याने आपल्याला चांगल्या कामाबद्दल प्रमाणपत्र दिलेले नाही. ते राष्ट्रवादीच्या अध्यक्षांनी दिले आहे अशा प्रकारचे हे डावपेच आपण समजून घ्यावे अशी माझी विनंती आहे. आपण कार्यक्षम निश्चितच आहात पण या राज्याला स्वतंत्र शिक्षण मंत्री असणे आवश्यक आहे. ~~ज्याप्रमाणे~~ घटनेनुसार "राईट टू एज्युकेशन" हा अधिकार भारतीय नागरिकांना मिळाला आहे त्यासाठी स्वतंत्र शिक्षण मंत्री मिळाला पाहिजे अशी मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. परशुराम उपरकर)** : आता सन्माननीय सदस्य श्री. हुसैन दलवाई हे या प्रस्तावावर भाषण करतील.

श्री. हुसैन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय.....

डॉ. दीपक सावंत : महोदय, सभागृहात या प्रस्तावावर किती वेळ भाषणे चालणार आहेत ?

श्री. दिवाकर रावते : महोदय, नियम 97 अन्वये सभागृहात प्रस्ताव आलेला असून त्यासाठी कामकाज सल्लागार समितीमध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रस्तावाचे ~~अनुमोदक~~ सूचक म्हणून मी भाषण केले आणि त्यानंतर ~~सूचक~~अनुमोदक म्हणून डॉ. दीपक सावंत यांचे भाषण नियमानुसार व्हायला पाहिजे.

श्री. हुसैन दलवाई : महोदय, आपण जी नावे वाचून दाखविली त्यानुसार दुसऱ्या क्रमांकावर माझे नाव आहे म्हणून मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**तालिका सभापती** : या प्रस्तावाला तीन तासांची वेळ दिलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, सूचकानंतर अनुमोदक ~~नंतर सूचक~~ म्हणून ज्यांचे नाव असते त्यांनीच भाषण करणे आवश्यक असते.

श्री. हुसैन दलवाई : महोदय, नियमानुसार माझे नाव यादीमध्ये आहे. कारण हा प्रस्ताव केवळ विरोधी पक्षाचाच नव्हे तर सत्ताधारी पक्षाची सुध्दा त्याला सहमती आहे म्हणून नावांच्या ~~अग्रक्रमानुसार~~ यादीतील क्रमानुसार भाषण करण्याची संधी दिली पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ KGS/ श्री. खर्चेनंतर... 17:20

श्री. हुसेन दलवाई...

तालिका सभापतींवर आपण अशा प्रकारे प्रेशर आणू नका.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभागृहामध्ये विरोधी पक्षाकडून किंवा सत्ताधारी पक्षाकडून विषय आल्यानंतर तो सत्ताधारी पक्षाचा किंवा विरोधी पक्षाचा प्रस्ताव राहत नाही तर ती सभागृहाची प्रॉपर्टी होत असते. तसेच सभागृहामध्ये चर्चा करण्यासाठी त्या त्या पक्षाच्या सदस्यांची संख्या किती आहे त्यानुसार वेळेचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे या सभागृहात 26 सदस्य असतील, काँग्रेस पक्षाचे 24 सदस्य असतील, शिवसेनेच 8 सदस्य असतील आणि भारतीय जनता पक्षाचे 12 सन्माननीय सदस्य असतील तर त्या त्या पक्षाच्या सदस्यांच्या संख्येनुसार सदस्यांना वेळ दिला गेला पाहिजे, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

तालिका सभापती ( श्री. परशुराम उपरकर ) : नियम 97 अन्वये चर्चा घेण्याचे सर्वानुमते ठरले असल्यामुळे प्रत्येक पक्षाच्या एका एका सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाणार आहे. या चर्चेसाठी तीन तासाची वेळ दिली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रस्ताव मी मांडला असून मला अनुमोदन देणा-या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडण्यास सुरुवात करावी, असे मी नियमाप्रमाणे म्हणालो होतो. या चर्चेवर दुस-या कोणी सदस्याने विचार मांडू नयेत, असे मी म्हणालो नाही.

**तालिका सभापती** : या चर्चेच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिलेला आहे की, माननीय दिवाकर रावते सदर प्रस्ताव मांडतील व इतर सन्माननीय सदस्य त्यावर आपले विचार मांडतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी वेळेच्या नियोजनाच्या संदर्भातील महत्वाचा मुद्दा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ् कुलकर्णी यांनी सांगितले आहे की, ज्यावेळेस एखाद्या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा होते तेव्हा ती सभागृहाची प्रॉपर्टी होत असते व त्यावेळेस निम्मा निम्मा वेळ सत्ताधारी व विरोधी पक्षाला वाटला जात असतो.

श्री. दिवाकर रावते : आपण नेमके कोणत्या पक्षाचे सदस्य आहात ?





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत त्यामुळे ज्येष्ठतेचा मान राखावा. आपण कधीही उठून उभे राहिलात तर आपला अवमान होईल त्यामुळे कृपया आपण अवमान करुन घेऊ नका. पक्षाचा वेळ पक्षाच्या प्रतोदाने आखून द्यावयाचा आहे. जो सदस्य जास्त वेळ घेईल तेवढा वेळ त्या पक्षाच्या सदस्यांचा कमी होईल. एकाच सदस्याने जास्त वेळ विचार मांडले तर त्या पक्षाचा वेळ नियमा प्रमाणे कमी होत असतो. त्यामुळे कृपया आपण सर्व सन्माननीय सदस्यांना पक्षनिहाय वेळ वाटून दिला तर आमचे काही म्हणणे राहणार नाही. केवळ एकाच सदस्याला जास्त वेळ दिला तर ते इतर सदस्यांवर अन्याय करण्यासारखे होईल.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच मी व इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव दिलेला आहे. यासंदर्भात थोडासा वादंग झालेला असला तरी आपण या संदर्भात जो निर्णय दिलेला आहे तो अतिशय योग्य असा निर्णय आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई...

त्याचे मी अभिनंदन करतो आणि माझ्या भाषणाला सुरूवात करतो.

आज या सभागृहामध्ये एकाच वेळी दोन विषय का घेतले हे मला कळत नाही. माझी देखील त्यावर सही आहे. त्यात माझी चूक आहे. आठवी पर्यंत परीक्षेची आवश्यकता नसणे या विषयावर वेगळी चर्चा झाली असती तर त्यात मला देखील आनंद झाला असता. आजचा दिवस आनंदाचा आहे. ज्या विषयाबाबत घोळ झाला होता, पालकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली होती, काय करावे ते कळत नव्हते, विद्यार्थ्यांना आपण कुठल्या कॉलेजमध्ये जाणार याची माहिती नव्हती. गोंधळाची अवस्था निर्माण झाली होती. हा गोंधळ काही लोकांनी तयार केला होता. शासनाने घेतलेल्या चांगल्या निर्णयासंबंधी कोणीही उठते आणि कोर्टात जाते. मी कोर्टाचा पूर्ण आदर करू बोलेन की, कोर्टाने सर्वसामान्यांच्या बाजून निर्णय घेतला आहे. शिक्षण सगळयांपर्यंत पोहोचले पाहिजे, ही शासनाची भूमिका लक्षात घेऊन त्यासंबंधातील निर्णय व्हायला पाहिजे. कोर्टाने शासनाच्या बाजूने निर्णय दिला असल्यामुळे मी खास करून सरकारचे, माननीय शिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन करीन. माननीय शिक्षण मंत्र्यांनी अतिशय चांगला वकील दिला. चांगला वकील दिल्यानंतर काय होते हे लक्षात आले. आज जो निर्णय झालेला आहे आहे तो कायम राहील. पुढेही राहील, अशी मी अपेक्षा करतो. येथे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी चांगले मुद्दे मांडले आहेत. त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु, काही कन्फ्युजन जरूर आहे. S.S.C बोर्ड आणि ICSE बोर्ड आणि CBSE बोर्ड वेगवेगळे आहेत. काही लोकांची मिरासदारी आहे. शिक्षण हे विशिष्ट लोकांपर्यंत मर्यादित रहावे हे या देशामध्ये सातत्याने चालले आहे. हा इतिहास आहे. अगदी अनादीकाळापासून हे चालत आलेले आहे. हा इतिहास आहे. यामुळेच महात्मा जोतिबा फुले यांनी काही झाले तरी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे अशी भूमिका धेतली. ते परिपूर्ण झाले आहे असे नाही.

मी नेहमी उल्लेख करतो. मी जो काही शिकलो तो यशवतंरावजीमुळे. माझी शिक्षण घेण्याची अवस्था नव्हती. मी इराण्याच्या हॉटेलमध्ये कपबश्या धूत होतो. त्याच वर्षी यशवतंरावजी यांनी EBC चे धोरण आणले. ज्या कुटुंबाचे उत्पन्न 900 रूपये असेल अशा मुलांना त्यांनी फी माफ केली म्हणून मी शिकलो. यशवंतराव चव्हाण यांनी सार्वत्रिकीकरण धोरण स्वीकारले होते. परंतु, मधल्या काळात ते थांबले. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

आजही महाराष्ट्रामध्ये 33 टक्के मुले दुर्दैवाने सरस्वती मंदिराच्या बाहेर उभी आहेत. त्यांना दरवाजामध्ये घेतले जात नाही. मुस्लीम समाजाची काय अवस्था आहे हे सच्चर आयोगाने नमूद केले आहे. शिक्षणासंबंधी आपण अतिशय चांगले प्रयत्न केले पाहिजेत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई ....

शिक्षणाला पर्याय नाही आणि या देशात मुलांची आणि तरुणांची संख्या जास्त आहे त्यामुळे त्यांना शिक्षण दिले पाहिजे या दृष्टीने पर्याय काढण्यात आला होता. कै.यशवंतराव चव्हाण नेहमीच असे म्हणत असत की,सगळयापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे.दुर्देवाने केरळ आणि गोवा ही दोन राज्ये सोडल्यास इतर कोणत्याही राज्यात 100 टक्के मुले शाळेत जात नाहीत.महाराष्ट्र राज्याने बिहारशी तुलना करता कामा नये कारण बिहार राज्य शिक्षणाच्या बाबतीत बरेच मागे आहे.दलित ओबीसी, मुस्लिम समाजामध्ये तर शिक्षण नाहीच. एकदा पक्षाने मला बिहार राज्यात काही कामासाठी पाठविले होते तेव्हा मी असे पाहिले होते की, त्या राज्यात शाळेत गेलेली मुले मला पहावयास मिळाली नाहीत त्यावेळी मला फार वाईट वाटले. अनेक मुलापर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही ही बाब फार गंभीर आहे. म्हणूनच महाराष्ट्राने बिहार राज्या बरोबर तुलना न करता केरळ आणि गोवा या राज्याबरोबर तुलना केली पाहिजे.

सभापती महोदय, बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी जो निर्णय घेतला आहे तो निर्णय अतिशय चांगला आहे.मी शेक्सपिअरच्या विरोधी नाही.मी या पूर्वी शेक्सपियरची पुस्तके वाचली आहेत, त्याचबरोबर अजूनही ही पुस्तके मी वाचत आहे.त्याची पुस्तके जरुर वाचली पाहिजेत परंतु आपली मुले संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले यांनी लिहिलेले ग्रंथ वा पुस्तके वाचतात काय ? हे पाहणेसुध्दा तितकेच महत्वाचे आहे.सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई. या दोन बोर्डाचा आणि मराठीचा काहीही सबंध नाही. दुर्देवाची गोष्ट अशी आहे की, मधल्या काळात शिक्षण हे एका विशिष्ट वर्गा पुरतेच मर्यादित राहिले पाहिजे म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्यात आल्या होत्या. त्या शाळांनी मराठीला हद्दपार केले होते आणि या देशातील संस्कृतीलासुध्दा दुर्देवाने हद्दपार केले आणि हा प्रकार आपण सर्वजण बघत राहिलो आहोत.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी माझे एक उदाहरण देऊ इच्छितो माझी मुलगी सेंट झेविअर्स कॉलेजमध्ये गेली होती त्यावेळी काही दिवस ती सतत तक्रार करीत होती की सुरुवातीला तुम्ही मला मराठी माध्यमाच्या शाळेत पाठविले होते त्यामुळे तुम्ही माझे नुकसान केले होते.परंतु काही दिवसानंतर तिने मला असे सागितले की, तुम्ही मला मराठी माध्यमाच्या शाळेत

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई ....

टाकल्यामुळे मी मराठीतील अनेक पुस्तकांचे वाचन के ले. मला समाजा विषयी अधिक माहिती आहे त्याचबरोबर इतिहासासंबंधी मला अधिक जाण आहे. समाजातील बारीक सारीक गोष्टी अधिक चांगल्या प्रकारे कळतात.परंतु इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना मात्र काहीच कळत नाही ही वस्तुस्थिती आहे. जे पढत पंडित असतात त्यांचा आणि समाजाचा तसा सबंध राहत नाही. माननीय मंत्रीमहोदयांबद्दल मी बोलत नाही कारण त्या चांगल्या कुटुबांतून आलेल्या आहेत.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, शेक्सपियरची पुस्तके वाचली पाहिजे त्याने पुस्तकात काय लिहिले आहे ही आपणा सर्वांना समजलेच पाहिजे जर त्याने लिहिलेली इंग्रजी पुस्तके आपल्याला वाचता येत नसतील तर त्या पुस्तकांचा मराठीतून भाषांतर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे आज अनेक शेक्सपियरच्या इंग्रजी नाटकांचे मराठी भाषांतर करुन ती नाटके रंगभूमीवर आलेली आहेत.

सभापती महोदय, बेस्ट ऑफ फाईव्हच्या बाबतीत जो निर्णय घेतला आहे त्या निर्णयाला सुप्रीम कार्टाने मान्यता दिली आहे त्याबद्दल मला आनंद होत आहे.या दहावीच्या परीक्षेमध्ये एकूण सहा विषय असून त्यामध्ये तीन भाषा असतात. विद्यार्थ्यांना भाषेमध्ये कमी मार्क्स पडतात. जी खालच्या समाजातील मुले शाळेत येतात त्यावेळी त्यांना "ण" "ळ" म्हणता येत नाही."ड" चा उच्चार ते "र" करतात. या मुलांना व्यवस्थित शिकवले जात नाही त्यामुळे शुध्द भाषा या मुलापर्यत जात नाही त्यामुळे मराठी चांगले शिकवले गेले तर त्या मुलांना चांगले मार्क्स मिळतील.आज भाषा विषयात मुलांना कमी मार्क्स पडत असल्यामुळे महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतांना अडचण येते. तेव्हा यामध्ये आपले आतापर्यतचे धोरण चुकले असेच म्हणावे लागेल.

नंतर श्रीमती थोरात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई....

या धोरणामध्ये सुधारणा होत असेल तर त्याचे अभिनंदन आणि स्वागत केले पाहिजे. आयसीएसई बोर्डामध्ये सात विषय आहेत आणि दोन भाषा आहेत. इतिहास, नागरिकशास्त्र आणि पर्यावरण हे विषय आहेत. पर्यावरण या विषयामध्ये विद्यार्थ्यांना 100 टक्के मार्क्स मिळतात. एसएससी बोर्डामध्ये 6 विषय कंम्प्लसरी आहेत आणि त्यामध्ये तीन भाषा आहेत. आयसीएसीई बोर्डामध्ये पी.टी.हा विषय आहे. म्हणजे नुसते हात वर केले की, त्या विद्यार्थ्यांना 100 टक्के मार्क्स दिले जातात. त्याशिवाय एखादी फॉरेन लँग्वेज असते. तसेच योगासने व चित्रकला हे विषय देखील आहेत. या गोष्टी असू नयेत असे माझे म्हणणे नाही. गेम्स आहेत. गाणी आहेत. ठीक आहे. ही चांगली गोष्ट आहे. मुलांच्या वाढीसाठी अमुकच विषय असला पाहिजे असे काही नाही. पण विज्ञान हा विषय घेतला नाही किंवा विज्ञान या विषयामध्ये ती मुले नापास झाली तरी त्यांना पास समजण्यात येते आणि त्याना चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो. त्यामुळे एसएससी बोर्डातील मुलांना मार्क्स कमी पडले म्हणून चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही. आयसीएसई बोर्डातील मुले इंजिनियर आणि डॉक्टर्स झाली पाहिजेत असा जो अट्टहास आहे तो चुकीचा आहे. त्यादृष्टीने सरकारने घेतलेल्या धोरणाचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, इयत्ता आठवीपर्यंत परीक्षा न घेण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जे विचार मांडले आहेत त्याच्याशी माझे मतभेद आहेत. दरवर्षी इयत्ता आठवीपर्यंत परीक्षा घेतली तरच तो मुलगा शिकतो हे मानायला मी तयार नाही. मी शिक्षक म्हणून तीन वर्षे काम केलेले आहे. शिक्षकांचा एकंदर दृष्टिकोन काय असतो ते मी पाहिलेले आहे. छबीलदास या शाळेत मी होतो. त्या शाळेत गिरणी कामगारांच्या मुलांना कशासाठी इतक्या अट्टहासाने शिकवता, त्यांचे एक्स्ट्रा वर्ग कां घेता, कशाला मेहनत घेता, ती मुले शिकणार आहेत काय? असा दृष्टिकोन असणारे शिक्षक असतील आणि ते पगार घेत असतील... मी शिक्षकांच्या विरोधात बोलत नाही. त्यांना पगार मिळाले पाहिजेत. इतरांच्या मानाने त्यांचे स्टँडर्ड चांगले असले पाहिजे परंतु काही शिक्षक शिकवत नाहीत. ही जी पध्दत आहे ती परीक्षेने पूर्ण होते असे मानायला मी तयार नाही. परीक्षेमध्ये सगळया मुलांना सहजतेने पास करता येते. त्यामध्ये नवीन काही नाही. कारण पुढचा वर्ग चालवावयाचा असेल तर या वर्गातील इतकी मुले पास झाली पाहिजेत ही जी

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्री. हुसेन दलवाई....

अट आहे तीच मुळी चुकीची आहे. त्याचे ॲसेसमेंट झाले पाहिजे की नाही? तर झाले पाहिजे. मी ज्या शाळेत शिकलो त्या शाळेमध्ये दर आठवडयाला एका तरी विषयाची 20 मार्काची परीक्षा असायची मग वार्षिक परीक्षेला विशेष अभ्यास करण्याची गरज नसायची. आमची रीव्हिजन चांगल्या रीतीने होत रहायची. यासंदर्भात विभागाने एक गोष्ट केली पाहिजे. ती म्हणजे इयत्ता आठवीपर्यंत वार्षिक परीक्षा घेऊन पास करण्याची पध्दती नसली तरी ॲसेसमेंन्ट नियमितपणे होते की नाही हे पाहिले पाहिजे. त्या मुलांना साध्या-साध्या गोष्टी येतात की नाही हे पाहिले पाहिजे. मी मुद्दाम शाळेत जातो आणि इयत्ता पहिली पासून इयत्ता आठवीपर्यंतच्या मुलाना 100 मधून 38 गेले तर किती राहिले असे विचारतो. तेव्हा ते एकदम चुकीचे सांगतात. ते मोजत बसतात. 38 सांगितले होते काय असा प्रश्न विचारतात. मग हातावर मोजायला सुरुवात करतात. याचे कारण गणिताची कन्सेप्ट या मुलांना नीटपणे शिकविली जात नाही. त्यामुळे या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे त्या शिक्षकांनी शिकविले पाहिजे हेही आवश्यक आहे. मी या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री. पावसकर तसेच कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, या शिक्षकांना पगार देण्याच्या संबंधात काही म्हणणे असेल तर त्यासाठी मी लढेल. परंतु शिक्षक शिकवत नाहीत, ही प्रवृत्ती वाढत आहे. फक्त शिक्षकच शिकवत नाहीत असे नाही. या देशामध्ये या तऱ्हेने जे काही झ ालेले आहे त्याबाबतीत आपण स्वत: देखील जबाबदार आहोत. यासंबधात सरकारने कठोर पावले ऊचलली पाहिजेत. मी कामगार चळवळीमध्ये काम करीत असताना दोन गोष्टी सांगायचो. कामचुकारपणा करणे आणि दारु पिऊन कामावर येणे यासंबंधात कोणाचे निलंबन झाले तर मी ती केस घेणार नाही असे सांगायचो. अर्थात मला ती युनियन सोडावी लागली. परंतु हे आपण केले पाहिजे.

सभापती महोदय,माननीय पंतप्रधानांनी केलेले भाषण आपण सगळयांनी लक्षात घेतले पाहिजे. या देशातील 100 टक्के मुले शिकली पाहिजेत. ती शिकत नसतील तर ते चांगले नाही. त्या बाबतीत आपण आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपण सुशिक्षित समाजाला सांगितले पाहिजे. मी मुस्लीम आहे त्यामुळे सलाम करताना उजव्या बाजूला पहा

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई .....

त्यानंतर डाव्या बाजूला पहा, चाळीस-चाळीस घरामध्ये कोणी उपाशी नाही याची खात्री करा आणि नंतरच तुम्ही तोंडामध्ये घास घाला असे सांगितले आहे. मी आता सांगतो की, त्यामध्ये नक्की काही सुधारणा केली पाहिजे. 80 घरामध्ये एकही मुलगा शाळेशिवाय राहणार नाही याची खात्री करा आणि नंतरच तुमच्या मुलाला शाळेत घाला. मी जेव्हा एखादा मुलगा शिकलेला नाही असे पाहतो तेव्हा मला असे वाटते की, माझे काही तरी चुकले. माझ्या मुलांच्या शिक्षणासाठी मी इतका सजग असेल तर त्या मुलांचे शिक्षण न होणे यामध्ये माझे कोठे तरी चुकत आहे. हे समाजाने समजून घेतले पाहिजे, शिक्षकांनी समजून घेतले पाहिजे. शासनाने या संदर्भात नीट दंडक केला पाहिजे. खाजगी शाळेमधील शिक्षकांना ज्या पध्दतीने पगार दिला जातो त्याचा विचार केला पाहिजे. खाजगी शाळेतील शिक्षकांना नीट पगार दिला जात नाही. कॉर्पोरेशनच्या शाळेतील शिक्षकांना चांगला पगार दिला जातो आणि खाजगी शाळेतील शिक्षकांना अतिशय कमी पगार दिला जातो. कॉर्पोरेशनने त्यांची जबाबदारी घेतली पाहिजे. राज्य शासनाने त्यांची जबाबदारी घेतली पाहिजे. त्यांना पगार देण्याच्या संदर्भात, त्यांच्या एकंदर राहणीमानाच्या संदर्भात कोणतेही कॉम्प्रमाईज करु नये. शिक्षकांना थोडे जास्त दिले तरी चालेल. कारण ते आपले गुरुजी आहेत. ते देशाचे भवितव्य घडविणारे आहे. हे करीत असताना शिक्षकांनी आपण मुलांना चांगल्या पध्दतीचे शिक्ष देऊ हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, मी माझ्या गावात एक शाळा चालवितो. दुर्दैवाने आमच्याकडे लोकांनी इंग्रजी माध्यमाची शाळा चालू केली आणि श्रीमंतांची सगळी मुले त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये गेली. मी मराठी माध्यमाची शाळा चालवितो. गेली चार वर्षे सातत्याने त्या शाळेचा निकाल 100 टक्के लागतो. त्या शाळेत जी मुले आहेत त्यातील बरीचशी मुले संध्याकाळी गुरे चारण्यासाठी जातात. आपल्याला माहीत आहे की मुलींना घरामध्ये काम करावे लागते. असे असून सुध्दा आणि सगळी खालच्या समाजातील मुले असून सुध्दा 100 टक्के मुले पास होतात. मला अतिशय अभिमानाने सांगावेसे वाटते की, आमच्या त्या शाळेतील कुणबी समाजातील एका मुलीला यावेळेला 95 टक्के गुण पडले. माझ्या दृष्टीने हे माझे यश आहे असे आपण समजतो. श्रीमंतांच्या मुलांना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. हुसेन दलवाई ....

किंवा ज्यांच्या घरामध्ये पिढ्यानपिढ्या शिक्षण आहे त्यांच्या मुलांना शिकविणे हे आपले कर्तव्य नाही. कीर्ती कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. रेगे यांच्याकडे एक व्यक्ती दलित समाजातील एका मुलाला प्रवेशासाठी घेऊन आल्यानंतर त्यांनी सांगितले की, मला सरांना भेटावयाचे आहे. मी त्यांची भेट घालून दिली. त्यांनी सरांना सांगितले की, आम्ही वेगवेगळ्या शाळेत गेलो पण त्या शाळेत आमच्या मुलाला घेतले नाही, आपण आमच्या मुलाला घ्या. त्यांनी विचारले की, किती टक्के गुण आहेत ? त्या मुलाला 36-37 टक्के गुण मिळाले होते. त्यांनी सरांना सांगितले की, गुण फार कमी आहेत. श्री. रेगे साहेब त्यावेळी असे म्हणाले की, हे तुझे जे गुण आहेत ते ब्राम्हणाच्या मुलाला 90 टक्के गुण मिळतात तेवढे आहेत. मी तुला कॉलेजमध्ये घेतो. त्यांचे पुढे सगळे शिक्षण फ्रीमध्ये होईल हे पाहिले आणि तो चांगल्यारीतीने ग्रॅज्युएट झाला. त्यामुळे सरकार जे प्रयत्न करीत आहे त्याला आपण हातभार लावू या. नुसती परीक्षा घेण्याऐवजी त्यांचे रेग्युलर असेसमेंट होईल आणि मुले चांगल्यारीतीने शिकतील असे बघू या. पुन्हा एकदा मी शासनाचे आणि माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो तसेच आपण सर्वांनी माझे दोन शब्द ऐकून घेतले त्याबद्दल सगळ्यांचे आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात शासन ज्या पध्दतीने प्रयत्न करीत आहे आणि एसएससी बोर्डाच्या लाखो विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहे त्याबद्दल मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करते. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आपण एक पाहिले पाहिजे की, आपली जी परीक्षा पध्दती आहे, जी शिक्षण पध्दती आहे त्यामध्ये अमुलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे. आधीच्या सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे जे स्वप्न होते ते पूर्ण करण्याची वेळ आलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

आपण नेहमी सरस्वतीच्या फोटोला हार घालतो. मी ज्या कार्यक्रमाला जाते त्यावेळी सरस्वतीच्या फोटोला हार घाला, पण त्या फोटोच्या बाजूला सावित्रीबाईंचा फोटो लावण्यास विसरु नका, कारण सावित्रीबाई हया आद्य शिक्षिका आहेत आणि महात्मा फुले हे आद्य शिक्षक आहेत असे सांगत असते. फातिमा शेख सुध्दा आद्य शिक्षिका आहेत. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी सांगितल्याप्रमाणे मागासवर्गीय, अल्पसंख्याक, ओबीसी, भटके, विमुक्त , आदिवासी या सर्व समाजातील मुलांना शिक्षणाच्या बाबतीत समप्रमाणात आणणे गरजेचे आहे. ते आणत असताना महाराष्ट्र शासनाने शिक्षणाचे स्वत:चे धोरण निश्चित करावे अशाप्रकारची आग्रही भूमिका मला मांडावयाची आहे. आपण सामाजिक परिवर्तनाचे स्वप्न पहात आहोत. 1994 साली माननीय श्री.शरदराव पवार हे राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी महिलांचे धोरण जाहीर केले होते. आज त्या धोरणाचा दर तीन वर्षांनी आढावा घेतला जातो. महिलांसंबंधी जे कायदे केले जातात, महिलांसाठी ज्या काही योजना राबविल्या जातात, त्या धोरणाला समोर ठेवून, दिशादर्शक म्हणून त्याचा उपयोग केला जातो. तेव्हा महाराष्ट्र शासनाचे शिक्षण विषयक पुरोगामी धोरण असावयास पाहिजे. ते धोरण सर्वसामान्य मागासवर्गीय, अल्पसंख्याक, ओबीसी, भटके, विमुक्त , आदिवासी आणि महिला या सर्वांना शिक्षणाच्या समान संधी देणारे असले पाहिजे. राईट टू एज्युकेशन हा कायदा मंजूर झालेला आहे. या कायद्यामध्ये 6 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षण देण्याचा विचार करण्यात आलेला आहे. मागील वेळी या सभागृहात चर्चा झालेली आहे. त्यावेळी सुध्दा मी असे म्हटले होते की, राईट टू एज्युकेशन या कायद्यात 6 ते 14 या वयोगटातील मुलांचा विचार केला गेला आहे. परंतु 0 ते 6 या वयोगटातील विद्यार्थ्यांना या राईट टू एज्युकेशन कायद्यापासून दूर ठेवणे म्हणजे ही मोठी गफलत होणार आहे. त्यामुळे 0 ते 6 वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश राईट टू एज्यूकेशन यामध्ये केला गेला पाहिजे. शिक्षणाचे सार्वत्रिकरण करीत असताना किंवा शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या विषयाला हात घालत असताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण भागातील शिक्षण पध्दती व शहरी भागातील शिक्षण पध्दती यामध्ये फरक आहे.

सीबीएसई व आयीएसई व एसएससी बोर्डासंबंधी बोलत असताना सन्माननीय सदस्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

श्रीमती वंदना चव्हाण यांनी हरकत घेतली होती. परंतु या तिन्ही मंडळांचा तौलनिक अभ्यास करणे गरजेचे आहे. आपण कोणत्याही मंडळाला विरोध करीत नाही. आता जागतिकीकरण झालेले आहे. मुक्त अर्थव्यवस्था आहे. आता इंटरनेंटमुळे जग जवळ आलेले आहे, माणसांना जवळ आणलेले आहे, विकासाला जवळ आणलेले आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही मंडळाला बौध्दिकदृष्टया विरोध करणार नाही. परंतु वेगवेगळया मंडळांचा दर्जा आणि त्या मंडळातील विद्यार्थ्यांचा लागणारा निकाल, त्याचा समाजावर होणारा परिणाम याचा तौलनिक अभ्यास करणे ही काळाची गरज आहे. प्रश्न अस्तित्वाचा निर्माण झालेला आहे. या तिन्ही मंडळांच्या गुणदान पध्दतीमध्ये जो फरक आहे तो महत्वाचा आहे. ज्यामुळे एसएससी बोर्डाचे लाखो विद्यार्थी अकरावीच्या प्रवेशापासून महिनाभरापासून वंचित राहिले आहेत. आज त्यांना न्याय मिळाला असेल, तो तात्पुरत्या स्वरुपात मिळाला की कायमचा मिळाला हे माहीत नाही, परंतु भविष्यात अशा परिस्थितीतून मार्ग कसा काढावयाचा हे शासनाने ठरवावे. या तिन्ही मंडळातील गुणदान पध्दतीचा फरक निश्चितपणे विचारात घेतला पाहिजे. किती विद्यार्थी किती विषयांचा अभ्यास करतात ,विद्यार्थ्यांची आकलन शक्ती किती आहे, विद्यार्थी त्यातून सामाजिक दृष्टीने कसा तयार होतो, शिक्षण पध्दतीकडे या सर्व दृष्टीकोनातून बघणे गरजेचे आहे. एकीकडे मराठी, इंग्रजी व हिंदी हे भाषेचे विषय असतील तर या विषयात विद्यार्थ्यांना निश्चितच कमी गुण मिळतात. म्हणून अकरावीच्या प्रवेशापासून एसएससी बोर्डाचे विद्यार्थी वंचित राहतात. ही बाब नाकारुन चालणार नाही. म्हणून त्यादृष्टीकोनातून बेस्ट फाईव्हचा निर्णय घेतला असेल आणि त्या निर्णयाविरुध्द काही पालक न्यायालयात गेले असतील आणि न्यायालयाकडून जो निकाल आला असेल त्या निकालाच्या विरोधात जाणे हे महाराष्ट्र शासनाला क्रमप्राप्त आहे. लाखो विद्यार्थ्यांचे रिप्रेझेंटेशन तेथे केले गेले पाहिजे. यासंबंधी शासनाने योग्य भूमिका घेतली आहे असे माझे मत आहे. न्या.जे.एन.पटेल व न्या.सत्यरंजन धर्माधिकारी यांच्या निकालाच्या विरोधात जाण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तो अत्यंत अभिनंदनीय व परिस्थितीला साजेसा असा आहे असे मला वाटते.

यानंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. उषा दराडे....

हे मत मांडत असताना या सार्वत्रिकरणाच्या संदर्भातील एक धोका मला या सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचा आहे तो असा की, आपण सर्वांनी शिक्षणाच्या दर्जा विषयी गंभीर होणे आवश्यक आहे. 8वी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेण्याचा निर्णय आपण घेतला. आपण या निर्णयाचे स्वागत करु. आपण नवेनवे प्रयोग करीत आहोत. परंतु हा निर्णय केव्हा यशस्वी होईल ? जेव्हा शिक्षण पध्दतीमध्ये आपण आमूलाग्र बदल करु त्यावेळी हा निणर्य यशस्वी होईल. सध्याच्या शिक्षण पध्दतीमध्ये आपण मुलांची गुणवत्ता गुणांवर तपासतो. विद्यार्थ्यांची आकलन शक्ती काय आहे, विद्यार्थ्याला विषय किती समजला आणि तो विषय विद्यार्थ्याला सामाजिक दृष्टीकोनाला अप्लीकेशन करण्यासाठी किती समजलेला आहे, किती अंगिकारलेला आहे हे आपण बघत नाही. तर त्याची स्मरणशक्ती किती आहे हे पाहिले जाते. आमच्या शाळेमध्ये स्मरणशक्ती स्पर्धा व्हायच्या. एका वर्गात अनेक वस्तू मांडल्या जायच्या आणि त्या ठिकाणी आम्हाला नेले जायचे. त्या वस्तू पाहण्यासाठी आम्हाला थोडा वेळ दिला जायचा. त्यानंतर आम्ही वर्गाबाहेर येऊन वस्तू लिहून काढीत असू. सर्वात जास्त वस्तू ज्याच्या स्मरणामध्ये राहातील त्याला स्मरणशक्ती स्पर्धेचे बक्षीस दिले जात असे. ही स्मरणशक्ती परीक्षा आपण बंद केलेली आहे. पण विद्यार्थी 8वी पर्यन्त जात असताना त्याला विषयाचे आकलन झाले आहे किंवा नाही या दृष्टीने आपण शिक्षकांना इन्स्टिगेट करणे, त्या दृष्टीने प्रोत्साहित करणे आणि तो विषय त्या शिक्षकाला समजेल आणि विद्यार्थ्यालाही समजेल अशा गुणग्राहक पध्दतीने शिक्षण पध्दतीमध्ये आपण आमूलाग्र बदल केला आणि आहे ते शिक्षण देण्याचा प्रयत्न केला तर 8वी पर्यन्तच काय, मॅट्रिक पर्यन्त आणि ग्रॅज्युएशन पर्यन्त तुम्ही परीक्षा घेतली नाही तरी त्याला काही हरकत राहाणार नाही. फक्त एकच अट असेल की शिक्षकाने प्रामाणिकपणे शिकविले पाहिजे आणि जो विषय शिकविला जाईल तो विषय समाजोपयोगी असला पाहिजे. आज आपण जे शिकवितो ते त्याने किती ध्यानात ठेवले हे बघितले जाते. म्हणजे शिवाजी महाराज किती साली जन्मले एवढे फक्त त्याला सांगता यावे हे पाहिले जाते. आज आपण एखाद्या विद्यार्थ्याला या देशाच्या स्वातंत्र्याबद्दल 5 मिनिटे भाषण करण्यासाठी सांगितले तर तो ते करु शकणार नाही. परंतु सध्याच्या सिनेमावर त्याला बोलायला सांगितले तर तो एक नाही, दोन नाही तर तीन-तीन तास बोलू शकेल. विद्यार्थ्यांमध्ये या देशाविषयी अस्मिता जागृत करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

आजचा विद्यार्थी हा देशाचा उद्याचा नागरिक आहे. त्याला हा देश पेलायचा आहे. हा देश आर्थिक महासत्ता होऊ पहात आहे आणि तो आर्थिक महासत्ता होत असताना इंग्लंड, अमेरिका, रशिया, चीन, जपान, जर्मनी, फ्रान्स अशा देशांच्या तुलनेमध्ये आपल्याला उद्याचा नागरिक उभा करायचा आहे. तो काय फक्त मुंबई किंवा पुण्याचा उभा करायचा आहे काय ? ज्याच्या पायात चप्पल नाही. ज्याच्या पायाला काटे टोचत आहेत आणि जो अंगणवाडी, बालवाडी आणि शाळेमध्ये जाऊन बसतो असा विद्यार्थी की ज्याला अजून शेंबूड पुसायचे माहीत नाही, ज्याच्या सद-याला अजूनही बटणे नाहीत, ज्याला अजूनही वर्षाकाठी एकच सदरा आणि हाफ पॅण्ट मिळते असे बरेचसे विद्यार्थी शाळेत जातात. हा विद्यार्थी या देशाचा पंतप्रधान कसा होईल ? सगळयात शेवटचा, तळागाळातील घटक आहे त्याच्या शिक्षणाचा आपण विचार केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेला अर्थ प्राप्त झ ााल्यासारखे होईल. म्हणून राईट टू एज्युकेशन, फ्री एज्युकेशन आणि एज्युकेशन फॉर ऑल या दृष्टीने या महाराष्ट्राचे एक शैक्षणिक धोरण असले पाहिजे अशा प्रकारची भावना मी व्यक्त करते. या ठिकाणी म. जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराजांना त्रिवार वंदन करते, त्यांना अभिवादन करते. राज्य शासनाने बेस्ट फाईव्हच्या संदर्भात केलेला प्रयत्न अतिशय चांगला आहे. त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे कौतुक करुन, अभिनंदन करुन मी माझे दोन शब्द संपविते.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, बेस्ट ऑफ फाईव्ह हा जो विषय आहे त्यावरच ख-या अर्थाने ही चर्चा आहे. हे बेस्ट ऑफ फाईव्ह कशामुळे आले ? तर सीबीएसई असेल, आयसीएसई असेल या बोर्डाचे जे विद्यार्थी पास होतात त्यांना मोठया प्रमाणावर मार्क्स मिळतात आणि त्यांच्यामध्येच हा बेस्ट ऑफ फाईव्हचा विषय आहे. त्यामुळे त्या बोर्डाच्या मुलांना पहिल्यांदा कॉलेजमध्ये प्रवेश मिळायचा आणि आपल्या एस.एस.सी. बोर्डाची मुले चांगले मार्क्स मिळवून देखील मागे राहायची. म्हणून हा विषय त्यांनी आणला. त्या बद्दल मला काही म्हणायचे नाही. परंतु या पूर्वी श्री. वसंत पुरके हे शिक्षण मंत्री असताना त्यांनी 70:30चा फार्म्युला आणला, त्यानंतर श्री. राधाकृष्ण विखे-पाटील हे शिक्षण मंत्री होते त्यावेळी त्यांनी 90:10चा फार्म्युला आणला आणि आता श्री. बाळासाहेब थोरात हे शिक्षण मंत्री आहेत. त्यांनी बेस्ट ऑफ फाईव्हचा फॉर्म्युला आणला.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

जेव्हा शासन नव्याने बदल करण्याचा विचार करते तेव्हा हे बदल फेब्रुवारी महिन्यात का केले जातात? आपल्याला कल्पना आहे की, सरकारने कोणताही निर्णय घेतला की, त्या निर्णयाविरुध्द लोक कोर्टात जातात. अशा प्रकारचे निर्णय घेत असताना शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर किंवा जुलै-ऑगस्ट महिन्यामध्ये निर्णय घ्यावेत. जेणेकरुन अशा निर्णयाविरुध्द कोणाला कोर्टात जायचे असले तर जाता येईल. परंतु विद्यार्थ्यांना त्या शैक्षणिक वर्षात स्थिरस्थावर राहता येईल. शासनाने या वर्षी मोठया प्रमाणात पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ केलेला आहे. मोठया प्रमाणात लोकांना संभ्रमात टाकले होते. अशा प्रकारचे निर्णय घेत असताना राज्याचे कायदे सक्षम आहेत का? बेस्ट फाईव्हसंबंधीचा निर्णय घेत असताना नियम तयार करणे आवश्यक होते. त्या माध्यमातून पुढे जायचे होते. कायदेशीर प्रक्रियेमध्ये शासन कमी पडले. शासन म्हणते की, भारतीय राज्य घटनेच्या कलम 14 मधील समानतेच्या तत्वाचा आधार घेण्यात आला. परंतु उच्च न्यायालयाने हे म्हणणे मान्य केले नाही. हा समानतेचा कायदा होऊ शकत नाही असे म्हटले. शासनाने म्हटले की, 1977 मध्ये बेस्ट फाईव्हचा निर्णय घेतला होता, परंतु तो यावर्षी लागू करीत आहोत. या मुद्दा मांडताना शासन कमी पडले. तीन वेळा शासनाचा उच्च न्यायालयात पराभव झाला. आता पूर्ण तयारीनिशी शासनाने सुप्रीम कोर्टात खटला दाखल केला. कदाचित एका वर्षासाठी सुप्रीम कोर्टाने सवलत दिली असली तरी कायद्यात योग्य ते बदल करुन यादृष्टीने कायदा सक्षम करावा. यापुढे अशा प्रकारचे निर्णय घेत असताना विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाबाबत वेठीला धरण्याचे प्रकार थांबविणे आवश्यक आहे. स्पर्धा जरुर असावी.

माननीय प्रा.वसंत पुरके या राज्याचे शिक्षणमंत्री असताना त्यांनी चाचणी परीक्षेचा निर्णय लागू केला. या निर्णयाला शिक्षकांनी विरोध केला. सी.बी.एस.ई.बोर्डाच्या विद्यार्थ्यांची दर महिन्याला चाचणी परीक्षा घेण्यात येते. त्या चाचणी परीक्षेमध्ये मिळणाऱ्या गुणांच्या आधारे ग्रेड निश्चित करण्यात येते. राज्य शासन त्याचे अनुकरण करण्यास निघाले असताना चाचणी परीक्षा घेणार नाही. चाचणी परीक्षांना शिक्षकांनी विरोध केला आहे. परीक्षा सरकारने रद्द केल्या आहेत. परीक्षा झाली असे समजून सर्व विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण केले जाणार आहे. अशा पध्दतीने विद्यार्थी तयार करणार असाल तर ते विद्यार्थी चांगल्या गुणवत्तेचे, चांगल्या विद्वत्तेचे असू शकत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

नाहीत. शासन शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून बेकारांची आणि बेरोजगारांची फौज निर्माण करणार आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. आपल्या देशातील विद्यार्थ्यांनी जगाच्या पाठीवर पहिल्या क्रमांकाचे नाव कमावले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष श्री.बराक ओबामा आज कोणाला घाबरतात? ते भारताला घाबरतात. याचे कारण असे की, भारत देशातील नवीन पिढीची विद्वत्ता प्रचंड आहे. जगात ते कुठेही आपल्या विद्वत्तेवर स्वत:चे स्थान निर्माण करु शकतात. एवढी बौध्दिक विद्वत्ता असल्यामुळे अमेरिकेला सुध्दा वाटू लागले आहे की, भारतातील विद्यार्थी जगामध्ये जाऊन मोठमोठया पदावर विराजमान होतील. त्यामुळे भारताच्या स्पर्धेमध्ये जाणे योग्य नाही. आज आपली शिक्षण पध्दती कोणत्या दर्जाची आहे? परीक्षा घेतल्या तर काय नुकसान होईल? परीक्षा न घेता सरसकट सर्व विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करायचे ठरविले आहे. त्यामुळे शिक्षकांची काय स्थिती आहे? खेडेगावामध्ये एका शाळेत दोन शिक्षक नेमले जातात. एक शिक्षक रजेवर असतो तर दुसऱ्या शिक्षकाने रजेचा अर्ज लिहून ठेवलेला असतो. कोणी चौकशी करण्यास आले तर तो रजा घेत नाही. शिक्षकांची विद्यार्थ्यांना शिकविण्याची इच्छा राहिलेली नाही. आज काय स्थिती आहे? दुपारच्या वेळेला विद्यार्थ्यांना खिचडी देण्याची शासनाने तरतूद केली आहे. ही खिचडी तयार करण्याचे काम शिक्षकांनाच करावे लागते. दुपारी पंगती उठतात. जेवण झाल्यावर मुले झोपतात व शिक्षकही झोप काढतात. त्या वेळेनंतर शाळा पुन्हा सुरु होत नाही. विद्यार्थी घडविताना त्यांना स्पर्धेमध्ये उतरविण्याच्या दृष्टीने तयार करण्याचा विचार केला जात नाही. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तकातील आकडेवारी पाहिल्यानंतर काय दिसून येते? दहावीपर्यंत मोठया प्रमाणात मुले व मुली शिक्षण घेत आहेत. 61 टक्के मुली असून 65 टक्के मुले शिक्षण घेत आहेत.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

नंतर बारावीपर्यंत 30 टक्क्यावर येतात. त्यानंतर मात्र अक्षरश: 10 टक्क्यावर मुलांचे प्रमाण जाते. याचे कारण केवळ आपण मुलांना पास करावयाचे, दहावीपर्यंत स्पर्धेत आणावयाचे असा मर्यादित स्वरुपात विचार करणार असाल तर ते चुकीचे आहे. आपल्याला राज्यात चांगले डॉक्टर्स, चांगले इंजिनियर्स तयार करावयाचे असतील तर इंजिनिअरिंग व मेडिकल तसेच ॲकेडमिक कॉलेजेसची फी प्रथम कमी करणे आवश्यक आहे. कारण इच्छा असताना देखील बरीच मुले आर्थिक परिस्थिती शिकण्यासारखी असूनही शिकू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. 70 टक्के लोक आजही गरिबीत जगत आहेत त्यांची मुले अवाढव्य फी मुळे शिकू शकत नाहीत. सध्याच्या परिस्थितीत दहावी आणि सवलती असतील तर जास्तीत जास्त बारावीपर्यंतच शिकू शकतात त्याच्या पुढे त्यांची मन:स्थिती असताना सुध्दा केवळ आर्थिक परिस्थितीअभावी ते शिकम शकत नाहीत. म्हणून माझी अशी सूचना आहे की, केवळ मुलांना बेस्ट ऑफ फाईव्ह मुळे 95 टक्के मार्क्स मिळत असताना कॉलेज व शाळांची फी देखील कमी करावी तरच देशात चांगली मुले घडू शकतील, यादृष्टीने विचार करावा. 10 टक्के मुले ग्रॅज्युएशनसाठी जात असली तरी 90 टक्के मुले मात्र आजही बारावीच्या पुढे शिकू शकत नाहीत, अशी परिस्थिती या देशात आहे तरी सुध्दा आज आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न बघत आहोत. दुसरे म्हणजे शासनाने मुलांच्या परीक्षा न घेण्यासंबंधीचा निर्णय घेतला आहे तो देखील चुकीचा आहे. शिक्षकांना आपण काय काय कामे सांगतो हा भाग सुध्दा विचार करण्यासारखाच आहे. आमच्या भागात प्रचार सुरु असताना दोन शिक्षक मला रस्त्यावर मोटर सायकल घेऊन उभे असलेले सकाळी दिसले. प्रचार आटोपून मी घरी आले तेव्हा सुध्दा तेच शिक्षक मला दिसले असता मी त्यांना विचारले की, सकाळपासून येथेच आपण उभे आहात. शाळेत वगैरे जायचे नाही काय ? तेव्हा त्यांनी मला सांगितले की, येथे संडासमध्ये किती लोक जातात, त्यात पुरुष किती आणि महिला किती हे मोजण्याचे काम आम्हाला दिलेले आहे म्हणून सकाळपासून आम्ही येथेच उभे आहोत. दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे असे म्हणत असताना अशा प्रकारची कामे शिक्षकांकडून करुन घेत असतील तर राज्यातील शिक्षणाचा दर्जा कसा राहणार आहे ? परंतु आम्ही मात्र मुलांची परीक्षा घेणार नाही, त्यांना नापास करायचे नाही असा प्रकार सुरु केला आहे तो योग्य वाटत नाही. कारण परीक्षेचे दडपण मुलांवर

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

असल्याशिवाय ते अभ्यास करीत नाहीत. परीक्षा जवळ आली म्हटले की आई-बाप सुध्दा त्याच्या मागे लागतात आणि नंतर तो मुलगा अभ्यास करायला लागतो. तसेच बारावीच्या परीक्षेत पास झाल्यानंतर त्याला मार्क्स किती मिळाले यापेक्षा सीईटीच्या परीक्षेत चांगले मार्क्स मिळावेत म्हणून त्याकडे जास्तीत जास्त लक्ष देणे आवश्यक असते. कारण परीक्षेतील 50 मार्क कमीत कमी असले आणि सीईटी मधील जास्तीत जास्त मार्क्स असतील तर त्याला पाहिजे तेथे इंजिनिअरिंग अथवा मेडिकलसाठी ॲडमिशन घेता येते. परंतु शासनाने आठवीपर्यंत परीक्षाच न घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे मुले अभ्यासच करणार नाहीत आणि शिक्षक सुध्दा शिकविणार नाहीत. म्हणून चांगल्या दर्जाचे विद्यार्थी आपल्याला तयार करावयाचे असतील तर शिक्षणाचा दर्जाही चांगला ठेवणे आवश्यक आहे, याची जाणीव शासनाने ठेवावी. स्पर्धेत उतरावयाचे असेल तर त्यासाठी परीक्षा पध्दती असणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने यासंदर्भात सन 1970 मध्ये जो निर्णय घेतला होता त्याचा आधार घेतला आहे पण सन 1977 मध्ये शिक्षणाचा दर्जा किती चांगला होता, किती मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पास होत हाते हे शासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणून माझी अशी सूचना आहे की, असे निर्णय शिक्षणाच्या बाबतीत घेऊन विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळणे बरोबर नाही. चांगले विद्यार्थी तयार करण्यासाठी परीक्षा पध्दती आपल्याला ठेवावीच लागेल त्याचबरोबर चांगले अभ्यासक्रम सुध्दा ठेवावे लागणार आहेत. आजकाल पुस्तकात प्रचंड चुका असतात आणि त्या वर्षभर सुध्दा दुरुस्त होत नाहीत. सायन्सच्या पुस्तकातील डायग्राममध्ये तर असंख्य चुका होत्या व त्या मी तत्कालीन शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांना आणून दाखविल्या होत्या. त्या चुका दुरुस्त करण्यासाठी वर्षभराचा कालावधी लागला. दुसरी व तिसरीच्या पुस्तकात पोळा हा सण दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी असल्याचे सांगितले, अशा भयंकर चुका आढळून येतात. असेच शिक्षण घेऊन ही मुले पुढे जात असतील तर त्यांना ते आयुष्यभर भोगावे लागते. माननीय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके हे असताना पाठ्यपुस्तकाच्या चुकांच्या संदर्भात जी समिती नेमली होती त्या समितीवर मी देखील सदस्य होते. समितीमध्ये अभ्यास मंडळाला विचारणा करण्यात आल की, एवढ्या चुका कोणी केल्या तर त्याचे उत्तर देण्याऐवजी लहान मुलांसारखे त्यातील अधिकारी भांडायला लागले. तेव्हा मी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती देखील केली होती की ही अभ्यास

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

मंडळे बरखास्त करुन टाका आणि कोणी तरी चांगले लोक या मंडळावर आणावेत. कारण आपल्याला शिक्षणाच्या माध्यमातून चांगले विद्यार्थी, चांगले नागरिक घडवावयाचे आहेत, देशाची भावी पिढी घडवायची आहे आणि जगाच्या पाठीवर स्पर्धा करावयाची असेल, चैलेंज करावयाचे असेल तर चांगले शिक्षण मिळाले पाहिजे......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

विद्यार्थ्यांसाठी चाचणी परीक्षा असल्याच पाहिजेत, शिक्षकांचे फालतू लाड करु नये. चाचणी परीक्षा का नको ? चाचणी परीक्षेमुळे विद्यार्थ्याने विषयाचे किती आकलन केले ते कळत असते. विद्याथ्याने काय प्रगती केली हे पाहून त्या प्रगतीप्रमाणे आपण विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतो. केरळमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढण्याचे कारण असे आहे की, शाळा सुटल्यानंतर त्या शाळेतील शिक्षक जे कच्चे विद्यार्थी असतात, ज्या मुलांची शिक्षणाची प्रगती कमी असते अशा मुलांना रोज शाळा सुटल्यानंतर एक तास शिक्षण देतात. त्या ठिकाणी रोज एक तास एक्स्ट्रा शिकवण्याचे कम्पलशन त्या ठिकाणच्या शिक्षकांवर करण्यात आलेले आहे. परंतु आपण तसे सुध्दा केलेले नाही. त्यामुळे शिक्षकांनी चांगले शिकवले पाहिजे, त्यांनी चाचणी परीक्षा घेतल्या तरच चांगल्या दर्जाची मुले तयार होऊ शकतील. स्पर्धा केल्याशिवाय मुले पुढे जाऊच शकणार नाही व इर्षा करुन आपण कधीच पुढे जाऊ शकणार नाही. सीबीएसई , आयसीएससीचा विचार न करता आपल्या शाळेतील मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. राज्य शासनाच्या शाळेत शिक्षण घेणारी मुले ही सर्वसामान्यांच्या धरातील असतात. ही मुले हुशार असतात परंतु त्यांना सवलती नसल्यामुळे त्यांना शिक्षण घेता येत नाही व पर्यायाने त्यांना शिक्षणा पासून वंचित रहावे लागते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मुलांना पुढे आणण्यासाठी शिक्षणामध्ये, शिक्षणाच्या फी मध्ये सवलती देण्याची आवश्यकता आहे. तसेच बेस्ट ऑफ फाईव्ह किंवा त्यासंदर्भातील कोणताही निर्णय घेत असतांना कृपा करुन जानेवारी-फेबुवारीमध्ये निर्णय न घेता हा निर्णय अगोदर घ्या आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळू नका. बेस्ट ऑफ फाईव्हची सवलत तुम्हाला एका वर्षासाठी मिळालेली आहे. परंतु पुढील वर्षात सुध्दा आपल्याला बेस्ट ऑफ फाईव्हचा फायदा झाला पाहिजे यासाठी आतापासूनच कामाला लागले पाहिजे. भविष्यात विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळू नका. चांगली मुले घडवायची असेल तर बेरोजगाराची फौज आपल्याकडे कमी नाही ती अजून वाढवू नका. चांगल्या प्रतीचे विद्यार्थी तयार करुन जगाच्या स्पर्धेत उतरवा एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी ( विधानसभेने निवडलेले ) : आदरणीय सभापती महोदय, आपल्या शिक्षण मंत्र्यांनी बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात जे धोरण स्वीकारलेले आहे त्यासंदर्भात या ठिकाणी चर्चा सुरु आहे. अनेक मान्यवर सन्माननीय सदस्यांनी या विषयावर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. आयसीएससी आणि एसएससी परीक्षा कोणती चांगली आणि कोणती वाईट यामध्ये मी जाणार नाही. आपल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पध्दतीचे शिक्षण द्यावयाचे असेल, त्यांच्यावर योग्य संस्कार घडवावयाचे तर आपल्या शिक्षण पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल केले पाहिजे असे मला वाटते. या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्र्यांनी बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय घेतला तो मला अतिशय महत्वाचा वाटतो कारण यामुळे शिक्षणावर चांगला परिणाम होणार आहे. या ठिकाणी जो ठराव मांडला आहे त्याचे मी अभिनंदन करते आणि मी माझे विचार येथेच थांबविते.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

आजच्या चर्चेचा विषय हा बेस्ट फाईव्हचा होता पंरतु बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात आज दुपारी सुप्रीम कोर्टात निकाल लागल्यामुळे माननीय शिक्षण मंत्रीमहोदयांची तसेच सन्माननीय सदस्यांची् मानसिकता थोडी बदलेली दिसते असे मला वाटते. बेस्ट फाईव्हचा निकाल लागला असला तरी हे एक टेम्पररी सोल्यूशन असून ते पर्मनन्ट सोल्यूशन नाही असे माझे तरी ठाम मत आहे. कारण आज पर्यंत शिक्षण खात्याला कमितकमी 7-8 वेळा बॅकफूटवर जावे लागले आहे. शासनाने दहावीच्या संदर्भात जे काही निर्णय घेतले त्यासंदर्भात शासनाला बॅकफूटवर जावे लागले आहे. शिक्षण विभागाने वेगवेगळा फंडा काढला आहे. एसएससीला मेरीट लागू होणार नाही त्यावेळी सुध्दा शिक्षण विभागाला बॅकफूटवर जावे लागले, पर्सेंटाईलच्या संदर्भात निर्णय घेतला त्यावेळी सुध्दा शासनाला बॅकफूटवर जावे लागले. पर्सेंटाईलच्या धोरणाच्या वेळेस मी आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले होते की, पर्सेंटाईलच्या संदर्भात आपण कर्नाटक राज्यात जाऊन त्या धोरणाचा प्रथम अभ्यास करावा आणि नंतरच हे पर्सेंटाईलचे धोरण स्वीकारावे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

ती पर्सेन्टाईल पद्धती येथे आणली गेली नाही. थातूरमातूर पर्सेन्टाईल पद्धती येथे आणली गेली. गेल्या वर्षीपासून आपण ऑनलाईन प्रवेश देण्यास सुरूवात केली. त्याचे काय झाले हे सर्वांना माहिती आहे. यासाठी आपण अमेरिकेतून सर्व्हर आणला. या विषयावर तेव्हा अडीच तास चर्चा झाली. आता पुन्हा ॲडमिशनचा वाद झाला. 90:10 च्या सूत्रामध्ये देखील आपल्याला बॅकफूटवर जावे लागले. बारावीची मेरीट लिस्ट आपण बंद केली. आता शिक्षणाचा केंद्रीय कायदा आला. यंदाच्या वर्षी आपण बेस्ट ऑफ फाईव्ह हे नवीन सूत्र घोषित केले. गेली दहा वर्षे मी या सदनामध्ये आहे. शिक्षण विभागावर बोलावयाचे म्हटले तर इतक्या गोष्टी घडल्या आहेत की, प्रत्येक वेळेला शासनाला बॅकफूटवर जावे लागले आहे. शहरीकरण वाढल्यामुळे इंग्रजीचे स्तोम वाढले. जागतिकीकरणामुळे इंग्रजी यायला पाहिजे असे सर्वांना वाटू लागले. मोलकरणीला देखील आपला मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकला पाहिजे असे वाटू लागले. शेवटी, आपला मुलगा कुठे शिकावा हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मी 1972 मध्ये SSC झालो आणि पार्ले कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी CBSE च्या मुलांना 5 टक्के गुण वाढवून देऊन प्रवेश दिला जात होता. ही वस्तुस्थिती आहे. आज काय झाले ? आज SSC बोर्डाची 16 लाख मुले गुणवत्तेमध्ये मागे पडत आहेत. रुपारेल सारख्या कॉलेजमध्ये त्यांना ICSE आणि CBSE च्या तुलनेत कमी टक्केवारी असल्यामुळे प्रवेश मिळत नाही. दहावीच्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा रूपारेल सारख्या कॉलेजमध्ये 110 वा क्रमांक असतो. ही वस्तुस्थिती लक्षात आल्यानंतर रान पेटविले गेले. ICSE , CBSE विरूद्ध SSC बोर्ड असे रान उठविले गेले. वस्तुत: हा वाद शिक्षणाला पोषक नव्हता. एकाच इमारतीत राहणारे विद्यार्थी हे ICSE, CBSE तसेच SSC बोर्डाचे असल्यामुळे त्यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाला. आपण 90:10 चे सूत्र घोषित केले. त्यावेळी CBSE चे विद्यार्थी SSC च्या मुलांची हुर्यो उडवित होती. ती मुले यु आर बिलो स्टॅण्डर्ड असे त्यांना चिडवित होती. हे या समाजाला घातक आहे. हा वाद कुठे तरी थांबला पाहिजे. या वादाला वेगवेगळे स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. CBSE चे 500 गुण आहेत, ICSE चे 700 गुण आहेत, तर SSC चे 650 गुण आहेत. ही विषयांच्या गुणातील तफावत आहे. याकडे कोणीही कधी लक्ष दिले नाही. कोर्टाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

वारंवार सांगितले की, समानीकरण करायचे असेल तर आपण प्रपोजल घेऊन यावे. पण राज्य सरकार त्यास कधीही तयार नव्हते. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्ये अधिकाऱ्यांना जाग येते आणि ते सांगतात की, आपण आता प्रपोजल तयार करू या. पर्सेन्टाईलसंबंधी श्री.कुंभकोणी साहेबांनी सांगितले होते. थ्री बेंच जजकडे पर्सेन्टाईलचा मुद्दा पाठविला होता तो पुन्हा टू बेंच जजकडे यायला पाहिजे. पण तो आला नाही. त्यावेळी न्यायदानात चूक झाली होती. आपण वाटल्यास श्री.कुंभकोणी साहेबांना जाऊन विचारावे. ते आपले ॲडव्होकेट जनरल होते. ICSE आणि CBSE च्या 30-40 हजार विद्यार्थ्यांमुळे SSC बोर्डाच्या 16 लाख विद्यार्थ्यांचे पालक वेठीला धरले जात असतील तर ते चुकीचे आहे. 90:10 च्या सूत्रामध्ये आपण अनेक चुका केल्या होत्या. त्यात आपण हरलो आहोत. त्या प्रतिज्ञापत्रात अनेक चुका होत्या. आपण जानेवारीमध्ये जी.आर.काढला. पण त्या जी.आर.साठी आपल्याला शुद्धिपत्रक काढावे लागले. आपले अधिकारी खरोखरच सक्षम असतील तर शुद्धिपत्रक का काढावे लागले आहे ?

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KTG/ 18:15

डॉ.दीपक सावंत ..

आपल्याला वारंवार शुध्दीपत्र्के का काढावी लागत आहेत ?. आतापर्यंत किती वेळा शुध्दीपत्रक काढावे लागले याची सगळी माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. नियम क्रमांक 56, नियम क्रमांक 57 यामध्ये अमुक असे वाचावे, यासबंधी शासनाने शुध्दीपत्रक काढले आहे. सन्माननीय मंत्री महोदयांच्या माहितीसाठी मी पुन्हा एकदा वाचून दाखवू शकतो. नियम क्रमांक 56, 57 आणि 58 मध्ये पुढीलप्रमाणे वाचावे अशा प्रकारचे शुध्दीपत्रक काढण्यात आलेले आहे. ते आपल्याला का काढावे लागले आहे ? प्रतिज्ञा पत्र कक्ष अधिकारी काढतात आणि त्याच्या वरिष्ठ अधिकारी हे त्यावर सहया करीत असतात काय ? या संबंधीची नेमकी पध्दत काय आहे हे मला माहीत नाही शिक्षण खाते जर गांभीर्याने घेणार नसेल तर कोणतीही बाब कोर्टात टिकणार नाही. शासनाने काढलेले जी. आर. तकलादू असल्यामुळे, ते सुध्दा कोर्टात टिकत नाहीत. 70:30 च्या बाबतीत सूत्र ठरविण्यात आले होते. स्थानिक विद्यार्थ्यांना 70 टक्के जागा आणि बाहेरच्या मुलांना 30 टक्के जागा असे सूत्र ठरविल्यानंतर ते का बदलण्यात आले ? यासंबंधीचे नेमके कारण काय होते हे आतापर्यत कोणीही सांगितलेले नाही.

सभापती महोदय, 16 लाख विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा हा प्रश्न आहे, असे वारंवार सांगितले जाते. परंतु प्रवेशाचा प्रश्न फक्त बारा कॉलेजेस साठीच आहे हे माननीय मंत्रीमहोदयाना देखील माहीत आहे. 80 तमे 95 टक्के मार्क्स मिळविणा-या विद्यार्थ्यांच्या बाबतीतच फक्त हा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय काहीही उपयोगाचा नाही. ठाण्याच्या पलीकडील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने देखील हा निर्णय उपयोगाचा नाही. रुईया, विल्सन, सिडनेहॅम्,रुपारेल, साठे महाविद्यालय, मिठीबाई महाविद्यालय ,एन.एम. महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठीच फक्त जास्त स्पर्धा आहे. आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई.च्या विद्यार्थ्यांना स्टॅन्डर्ड महाविद्यालयामध्येच प्रवेश हवा असतो. त्यांना बाकीच्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावयाचा नसतो. त्यामुळे जी बारा तेरा - चांगली महाविद्यालये आहेत, त्याठिकाणीच त्यांना प्रवेश घेण्यासाठी जास्त स्पर्धा असते. सभापती महोदय, -विद्यार्थ्यामध्ये भेदाभाव करुन चालणार नाही. परंतु आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई.च्या मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले जाते, मार्कांचे डिफरेशिंएशन कसे केले जाते, हे सुध्दा पाहण्याची गरज आहे. काही विषयात 50 टक्के थिअरी

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ..

आणि 50 टक्के प्रॅक्टीकलसाठी मार्क्स दिले जातात. तर काही विषयात 80 टक्के थिअरी आणि 20 टक्के इंटर्नलचे मार्क्स दिले जातात. त्यामुळे एस.एस.सी. बोर्डानेसुध्दा या वर्षापासून नवीन फंडा सुरु केला होता आणि या वर्षी मुलांना मुक्त हस्ताने मार्क्स दिले होते. स्पोटर्सचे मार्क्स या मुलांना मिळाल्यामुळे, जवळजवळ 102 टक्के मार्क्स मिळाले आहेत.100 मार्काचा पेपर असूनसुध्दा या विद्यार्थ्यांना 102 टक्के मार्क्स मिळाले आहेत.

एक सन्माननीय सदस्य : याबाबतीत आपण स्वागत केले पाहिजे.

डॉ.दीपक सावंत : त्याचे स्वागत करीत असतांना मुलांची गुणवत्ता टिकवली पाहिजे. जोपर्यत मुलांच्या परीक्षेची गुणवत्ता टिकवत नाही तोपर्यत त्या परीक्षेला काहीही अर्थ राहत नाही मग ती परीक्षा आय.सी.एस.ई.ची असो सी बी एस. ई. ची असो वा एस.एस.सी.बोर्डाची असो. कोणतीही परीक्षा असली तरी गुणवत्ता ही टिकवली गेलीच पाहिजे. पूर्वी एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेमध्ये वेलांटी दिली गेली नसेल तर मार्क कमी दिले जावयाचे, स्वल्पविराम दिला गेला नसेल तर मार्क कमी केले जावयाचे. एखादा शब्द इकडचा तिकडे झाला तर मार्क कमी केले जावयाचे. त्यावेळी मॉडरेटरला असे सागितले जावयाचे की एखाद्या विद्यार्थ्याला जर 80 वा 90 पेक्षा जास्त मार्क मिळत असतील तर त्यातील मार्क कमी करण्यात यावेत. परंतु आताच्या सरकारचे कोणतेही धोरण बरोबर नाही. सभापती महोदय, आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई. मध्ये या विद्यार्थ्यांना का प्रवेश द्यावा लागतो ? विधीमंडळाने संमत केलेला कायदा असा आहे की, मंडळाची मर्यादा नववी ते बारावीचा अभ्यासक्रम संमत करणे एवढी आहे. अकरावीच्या वर्गातील प्रवेशासंबंधीचे निकष मंडळ ठरवू शकत नाही. तरीसुध्दा या मंडळाला पुन्हा पुन्हा जी.आर. काढण्याबाबत शासनाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे कोर्टात प्रकरण गेले की, त्यात आपली हार होत असते. ही बाब सामान्य माणसांना माहीत नसते. ज्या मंडळाला जी.आर. काढण्याचा अधिकारच नाही त्या मंडळाला दोन वेळा जी आर काढण्यास सांगितले गेले होते. त्यामुळे त्यासबंधीचे प्रकरण जर कोर्टात गेले तर तेथे आपली हार होत असते. शासनाचे जे नोकरशाह आहेत त्यांची मुले आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई.च्या शाळेत शिक्षण धेत असतात. त्यामुळे या प्रवेशाच्या संदर्भात जर एखादे प्रकरण कोर्ट्त गेले तर तेथे सरकारची कशी हार होईल, हे जाणीवपूर्वक पाहिले जाते. एखादा जी आर

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ..

कोर्टात कसा टिकणार नाही याबाबतीत नोकरशाह जाणीवपूर्वक पाहतात. मध्यंतरी एक वकील मॅडम होत्या त्यांनी  परसेन्टाईलच्या प्रकरणी आपली बाजू कोर्टात व्यवस्थित मांडली नव्हती. तेव्हा एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी शासनाची आंतरिक इच्छा असेल आणि राजकीय इच्छा शक्ती असेल शासनाने अशी चूक कधीच केली नसती.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

आज केवळ तुटपुंज्या भांडवलावर तुमचा विजय झाला आहे तो टिकणार नाही. त्याबाबतीत आपण मला स्पष्ट करुन सांगावे. ज्या दिवशी विधानपरिषदेच्या जागांसाठी निवडणुका होत्या त्या दिवशी मंत्रिमहोदय आपणास बेस्ट ऑफ फाईव्हसाठी बेस्ट ऑफ लक असे मी सांगितले होते. आपण लॉ ऑफ इक्वॅलिटीच्या माध्यमातून हे केले, परंतु लॉ ऑ इक्वॅलिटी कुठे आहे? परिक्षेच्या विषयांमध्ये इक्वॅलिटी नाही, मार्कांच्या गुणदान पध्दतीमध्ये इक्वॅलिटी नाही? तरमग लॉ ऑफ इक्वॅलिटी कशी ॲप्लिकेबल ठरविणार? ती कोर्टामध्ये कशी काय टिकणार? आपण याबाबतीत किती लोकांची मते घेतली? या लोकांनी किती फार्स केला? 56, 58 व 59 च्या शासन निर्णयामध्ये आपण सुधारणा केली. ती किती तारखेला केली? दि.14.6.2010 रोजी केली. म्हणजे एस.एस.सी. चा निकाल लागल्यानंतर आपण त्या जी.आर. मध्ये सुधारणा केली. त्यानंतर आपण मुंबईमधील 250 लोकांचे ओपिनियन घेतले असे म्हणता. त्यापैकी 189 लोकांचे ओपिनियन बेस्ट ऑफ फाईव्हच्या फेवर होते. एस.एस.सी. च्या परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 16 लाख आहे व आय.सी.एस.इ., सी.बी.एस.इ, च्या परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या काही लाखामध्ये आहे. तुमचे सॅंपल सर्व्हे कोर्टामध्ये टिकले नाही, त्यावर कोर्टाने ताशेरे मारले आहेत. तुम्हाला कोर्टामध्ये हरायचे होते म्हणून तुम्ही हा फार्स केला असा माझा ठाम आरोप आहे. जर तुम्हाला परिपूर्ण जी.आर. काढावयाचा होता तर तुम्ही व्यवस्थित सॅंपल सर्व्हे करणे आवश्यक होते, तो आपण केला नाही. आपण कॉरीजेन्डममध्ये सांगितले आहे की, "इट वॉज टायपोग्राफिकल मिस्टेक." असे आपण कोर्टामध्ये सांगितले, वाहरे व्वा? एस.एस.सी. च्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत हे शासन किती संवेदनशील आहे हे आपण पहा? जर आपल्याला आय.सी.एस.इ. व सी.बी.एस.इ. ला प्राधान्य द्यावयाचे होते तर आय.सी.एस.इ. व सी.बी.एस.इ. च्या नियमानुसार त्यांनी स्वत:चे ज्युनिअर कॉलेज काढले पाहिजे अशी त्यांच्या नियमामध्ये तरतूद आहे. असे असतांना आपण गेली तीन वर्षे ही लढाई सातत्याने लढत आहात. या तीन वर्षामध्ये आय.सी.एस.इ. व सी.बी.एस.इ. च्या एकाही कॉलेजला पत्र पाठवून आपण अकरावी आणि बारावीसाठी ज्युनिअर कॉलेज काढा असे कां सांगितले नाही? आपल्या मंत्रिमंडळातील एका मंत्रिमहोदयांनी मला सांगितले त्यांचे मी याठिकाणी नाव सांगत नाही. त्यांनी सांगितले की, आय.सी.एस.इ. व सी.बी.एस.इ. चे डायरेक्टर आपण बोलाविलेल्या बैठकीला सुध्दा येत नाहीत. ते राज्य सरकारला काऊंट करीत नाहीत. तुमचे मंडळ एवढे सक्षम असतांना अशा लोकांची पालखी, अशा लोकांचे जोडे तुम्ही कां उचलता? तुमच्यापेक्षा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

डॉ. दीपक सावंत...

कर्नाटक राज्य किती तरी बरे. बेस्ट फाईव्हचा मुद्दा असू द्या किंवा कानडी भाषेचा मुद्दा असू द्या त्या सरकारने कोर्टाने दिलेला निर्णय झुगारुन दिला. आणि सांगितले की, आम्ही आमच्या स्थानिक मंडळाच्या विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश देऊ. त्याठिकाणी तिसरी भाषा कानडी ही प्रत्येकाने शिकलीच पाहिजे, तामिळ भाषा शिकलीच पाहिजे असे कोर्टाला त्यांनी ठणकावून सांगितले. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, तुमच्यामध्ये अशी हिंमत असेल तर आपण करुन दाखवा.

सभापती महोदय, ग्रेडिंग सिस्टीम दिली जाते, त्याबद्दल मला कळत नाही. या ग्रेडिंग सिस्टीममध्ये मार्क कसे काऊंट केले जातात? ए 1 ग्रेड कुणाला मिळते? एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी एक अष्टमांश विद्यार्थ्यांना ग्रेड ए 1 मिळते, त्यापुढील एक अष्टमांश विद्यार्थ्यांना ए 2 ग्रेड मिळते, त्यापुढील एक अष्टमांश विद्यार्थ्यांना बी 1 ग्रेड मिळते.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

त्या पुढील पाच विद्यार्थ्यातील सर्वोत्तम एक अष्टमांश विद्यार्थ्यांना बी-2 अशा प्रकारच्या ए,बी,सी,डी,अी. पर्यंतच्या ग्रेड दिल्या जातात.सभापती महोदय, जर ही ग्रेडिंग सिस्टिम असेल तर ते मार्क्स कसे काऊंन्ट करणार? दुसरे असे की, शासनाच्या जी.आर.मध्ये असे म्हटलेले आहे की, विज्ञान शाखेत प्रवेश घ्यावयाचा असेल तर किमान 40 टक्के गुण विज्ञान या विषयात मिळाले पाहिजेत. ज्या सीबीएसई, आयसीएसई च्या विद्यार्थ्यानी विज्ञान हा विषयच घेतलेला नाही. फिजिक्स, केमिस्ट्रि, बायॅालॉजी याला सिलेक्टिव्ह सब्जेक्टमध्ये टाकलेले आहे त्या विद्यार्थ्यांना उद्याच्या निर्णयाप्रमाणे विज्ञान शाखेत प्रवेश कसे देणार? सभापती महोदय, विचार करण्यासारखी गोष्ट आहे. एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना फिजिक्स, केमिस्ट्री, बायॅालॉजी आणि 150 मार्कांचे गणित हे विषय असतात. आणि आयसीएसई आणि सीबीएसईच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शास्त्र आणि इंग्रजी हे कंम्पलसरी विषय घेऊन बाकीचे सगळे विषय ऑप्शनमध्ये टाकून जर त्यांना 90 टक्के मार्क्स मिळत असतील तर ते विज्ञान शाखेत प्रवेश कसा घेतील?आपण त्यांना काय क्रायटेरिया लावणार? ऑन लाईनमध्ये त्याचे रुपांतर कसे करणार? सभापती महोदय, हा मोठा प्रश्न आहे. यामध्ये प्रॅक्टीकल अडचणींचा राज्य शासनाने आज देखील विचार केलेला नाही. ज्यांनी टाईपिंग,अकाऊन्टसी, बुक किपिंग, बिझनेस आणि एलिमेंन्टस ऑफ बिझनेस हे विषय घेतलेले आहेत त्यांच्या बाबतीत मी समजू शकतो की, ते वाणिज्य शाखेत प्रवेश घेतात. पण विज्ञान या विषयाचे काय? ज्यांनी पेंन्टीग आणि म्युझिक हे विषय घेतलेले आहेत त्यांना 100 पैकी 100 मार्क्स मिळतात. मग त्यांचे मार्क्स कसे मोजणार? म्हणजे एसएससीच्या विद्यार्थ्याला गणितात 135 मार्क्स आणि विज्ञान या विषयात 87 मार्क्स मिळाले असले तरी पेंन्टीग आणि म्युझिक विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना 100 पैकी 100 गुण मिळालेले असल्यामुळे त्यांना रुईया आणि रुपारेल महाविद्यालयात प्रवेश मिळेल. त्यामुळे एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना तेथे प्रवेश मिळणार नाही. या बाबतीत काय क्रायटेरिया लावण्यात येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

सभापती महोदय, यासंबंधीच्या जी.आर.मध्ये चुका आहेत. " And to obtain the admission in the Science branch of 11th Standard, the present condition of minimum 40% of the marks in Science subjects will be applicable as before." असे श्री. खोब्रागडे, ॲडिशनल सेक्रेटरी, गव्हर्नमेंन्ट ऑफ महाराष्ट्र

..2..

डॉ. दीपक सावंत...

यांनी जी.आर.मध्ये म्हटलेले आहे. हा शासनाचा जी.आर.आहे मी तो माननीय मंत्रिमहोदयांना देतो. सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, हे विद्यार्थी नेमके किती आहेत? आयसीएसईचे विद्यार्थी किती आहेत, सीबीएसईचे विद्यार्थी किती आहेत,आयजीचे विद्यार्थी किती आहेत,ब्रिटिशचे विद्यार्थी किती आहेत यांची संख्या आज राज्य शासनाकडे नाही असे मी ठामपणे सांगतो जर असेल तर माननीय मंत्रिमहोदयांना माझे आवाहन आहे की, त्यांनी ती या सभागृहामध्ये सांगावी. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, आयसीएसओचा विद्यार्थी सात विषयापैकी सहा विषयामध्ये नापास झाला तरी त्याला पास मानले जाते मग अशा विद्यार्थ्याला विज्ञान किंवा वाणिज्य शाखेमध्ये प्रवेश देणार काय? एस.एस.सी.चा विद्यार्थी एका विषयात नापास झाला तर तो नापास म्हणून गणला जातो ही असमानता नाही काय? सभापती महोदय, या मूलभूत प्रश्नांचा कोणीही विचार केलेला नाही.

सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना एक पत्र लिहिले होते. त्या पत्रामध्ये मी असे लिहिले होते की, जर तुम्हाला खरोखर बेस्ट ऑफ फाईव्ह ठरवायचे असेल तर ते बेस्ट ऑफ फाईव्ह न ठरविता बेस्ट ऑफ थ्री करावे. ज्या विद्यार्थ्याला विज्ञान शाखेत प्रवेश घ्यावयाचा असेल मग तो आयसीएसई, सीबीएसई,एसएससी किंवा अन्य कोणत्याही बोर्डाचा विद्यार्थी असला तरी त्याचे गणित,विज्ञान व इंग्रजी या विषयाचे गुण पकडण्यात यावेत आणि हे तीन विषय बेस्ट ऑफ थ्री पकडण्यात यावेत. जर वाणिज्य शाखेत प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्या विद्यार्थ्याचे वाणिज्य विषय असतील मग त्यामध्ये गणित असेल तर गणिताचे गुण पकडण्यात यावेत. इंग्रजी या विषयाचे गुण पकडण्यात यावेत. त्याचे अकाऊन्टसी किंवा बुक-किपिंगचे गुण पकडण्यात यावेत आणि त्याला वाणिज्य शाखेसाठी पात्र समजण्यात यावे. कला शाखेत प्रवेश घ्यावयाचा असेल तर भाषा विषयाचे गुण पकडण्यात यावेत.

यानंतर श्री. बरवड....

अस्धारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

इंग्रजी हा फॅक्टर कॉमन ठेवा आणि बाकीच्या सब्जेक्ट फॅकल्टीजप्रमाणे तुम्ही ते विषय निवडा. त्याबाबत आजपर्यंत मला उत्तर मिळालेले नाही. माननीय मंत्रिमहोदयांना हे समजावण्यासाठी मी अनेक वेळा बैठक घेण्याची विनंती केली पण आजपर्यंत मला बैठकीसाठी वेळ दिलेला नाही. आज जरी आपणा सर्वांना आनंद होत असेल की राज्य सरकार कोर्टामध्ये जिंकले तरी हा विजय तात्पुरता आहे. या वर्षाची स्टॉपगॅप अरेंजमेंट आहे. त्यामुळे या विजयाने हुरळून जाण्याचे कारण नाही. आपल्याला जर खरोखर काही करावयाचे असेल तर बेस्ट ऑफ थ्री आणा किंवा यासाठी सक्षम कायदा बनवा ही मागणी आम्ही यापूर्वी देखील केली आहे. पालक महासंघाचे लोक सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि माझ्यावर ओरडतात की, सभागृह काय करते, सभागृह कायदा का करीत नाही, आमदार काय करतात ? ही सत्य परिस्थिती आहे. चॅनेलवर आमच्या दोघांची भांडणे झालेली आहेत. आम्ही या ठिकाणी ओरडतो पण या ठिकाणी खडकावर पाणी ओतल्यासारखे आहे. त्या खडकात काहीच रुजणार नाही हे दुर्दैवाने सांगावेसे वाटते. म्हणून माझ ी एकच मागणी आहे की, आपण कायदा बनवा. जर आपल्याला खरोखरच नाव कमवावयाचे असेल, काही करुन दाखवावयाचे असेल तर हे विधिमंडळ कायदा करण्यासाठी सक्षम आहे. आपण तो कायदा बनवावा. आपल्याला तो अधिकार आहे असे श्री. कुंभकोणी साहेबांनी पालकांच्या जाहीर बैठकीमध्ये सांगितलेले आहे. आपण तो कायदा करावा. एसएससी बोर्डाच्या मुलांना झुकते माप द्या असे म्हणत असताना आयसीएसई आणि सीबीएसईच्या मुलांवर देखील अन्याय होऊ नये. पण त्यांनी त्या विषयामध्ये प्राविण्य मिळविले पाहिजे तरच त्या फॅकल्टीला त्या मुलांना प्रवेश द्यावा. एवढे सांगून माझे दोन शब्द संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. आज सुप्रीम कोर्टात जे यश मिळाले आहे ते तात्पुरते यश असले तरी त्याचा आनंद लपविता येणार नाही. म्हणून मी मोकळ्या मनाने माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन यासाठी करतो की, हे पहिले मंत्री आहेत की ज्यांचा निर्णय सुप्रीम कोर्टामध्ये टिकला. परंतु एक प्रश्न ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी केला तो असा आहे की, हायकोर्टामध्ये आपण का हरलो ? हायकोर्टात हरण्याचे जे कारण होते त्यामध्ये नुसत्या जी.आर.चा प्रश्न नव्हता तर आपण वकील बरोबर दिले नव्हते. या राज्याचे ॲडव्होकेट जनरल ज्यांनी आतापर्यंत अनेक प्रश्नांमध्ये या राज्य सरकारला मान खाली घालावयास लावलेली आहे, त्या ॲडव्होकट जनरलचा राजीनामा आपण घेणार आहात काय ? हा माझा पहिला प्रश्न आहे. मी या निमित्ताने मागणी करतो. प्रश्न तुमच्या बदनामीचा नाही. 16 लाख विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला ठेवण्याचे काम ॲडव्होकेट जनरलने केले. आपली बाजू हायकोर्टासमोर मांडली नाही. हायकोर्टाने बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय फेटाळताना असे म्हटले होते की, तुम्ही आम्हाला बाजू समजावून सांगितली नाही. त्यांनी वकिलांवर ठपका ठेवला होता. म्हणून आपण त्यांचा राजीनामा घ्यावा. कारण हा प्रश्न तुमच्या इभ्रतीचा नाही तर 16 लाख मुलांच्या भविष्याचा प्रश्न होता. महिनाभर हे सगळे प्रवेश लांबलेले आहेत. पालक धास्तीमध्ये होते. आज त्यांना थोडी राहत मिळालेली असली तरी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे या पुढच्या काळामध्ये आपण जर जागे झालो नाही तर मात्र पुढच्या काळात सुध्दा ही संकटे येणार आहेत. आज या सभागृहात एका बाजूला आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आणि दुसऱ्या बाजूला सन्माननीय सदस्या ॲड. वंदना चव्हाण अशी दोन टोके आपण पाहिली.

ॲड. वंदना चव्हाण : मला खुलासा करावयाचा आहे. जो निर्णय झालेला आहे त्याबद्दल मी अभिनंदन करते. मी भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी विरोधात नाहीच आहे.

श्री. कपिल पाटील : आपण बेस्ट ऑफ फाईव्हच्या विरोधात नाही याची मला खात्री आहे. परंतु शिरवाडकर विरुध्द शेक्सपियर हा जो वाद घातला आणि त्यामुळे सभागृहात जी अडचण झाली, हा समजुतीचा घोटाळा आहे. आपणा दोघांबद्दल मी आदर राखतो. पण समजुतीचा घोटाळा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. कपिल पाटील .....

आहे. शेक्सपियर मोठाच होता आणि शेक्सपियरला मराठी रंगभूमीवर शिरवाडकरांनीच आणले. या दोन्ही गोष्टी आपण समजून घेतल्या पाहिजेत. त्यामुळे त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत एकदा अहंकार शिवला की मग गडबड होते. आयसीएसईलाही अहंकार बाळगण्याचे कारण नाही आणि एसएससी बोर्डाला सुध्दा अहंकार बाळगण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्या म्हणाल्या तो एक मुद्दा बरोबर आहे की, सीबीएसई आणि आयसीएसईचा दर्जा मोठा आहे आणि त्या दर्जापर्यंत एसएससी बोर्डाला नेले पाहिजे. हा खरा मुद्दा आहे. ती मागणी आपण केली पाहिजे. त्यांच्याशी मी सहमत आहे. मुळात बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय कशासाठी आला ? या राज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत होत्या. त्या पार्श्वभूमीवर आपण हा निर्णय घेतला होता. तो निर्णय प्रवेशाशी जोडला गेला आणि मग घोटाळा झाला. त्या निर्णयामुळे एक झाले की, या वर्षी आत्महत्यांचे प्रमाण अत्यंत कमी झाले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ प्रथम श्री.बरवड 18:35

श्री.कपिल पाटील.....

नाही तर गेल्या वर्षी अगदी भीतीदायक चित्र होते. त्याबद्दल शासनाने चांगला निर्णय घेतला आहे त्याचे स्वागत केले पाहिजे. परंतु पुढे काय उपाय केले पाहिजेत ते विसरुन चालणार नाही.

सन्माननीय शिक्षण राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी या सभागृहात आनंद कुलकर्णी कमिटी स्थापन करण्याची घोषणा केली होती. परंतु दोन महिने उलटले आहेत, परंतु या कमिटीची स्थापना अद्याप झालेली नाही. शासनाचा गलथानपणा, बेफिकीरी, धीम्या गतीमुळे मुलांचे भविष्य टांगणीला लागले आहे. मुलांच्या भविष्याशी हे शासन खेळत आहे. ही बाब जास्त गंभीर आहे असे मला वाटते. प्रश्न निकषाचा आहे. अकरावीच्या प्रवेशासाठी काय निकष लावावयाचे हा प्रश्न आहे. आयसीएसई च्या मंडळामध्ये असलेले ऑप्शन विचारात घेतले पाहिजे. यामध्ये कोणत्याही मंडळाला कमी लेखण्याचा किंवा त्या बोर्डाचे विद्यार्थी आहेत म्हणून त्यांच्यावर अन्याय करण्याचा हा मुद्दा नाही. परंतु हे सर्व ऑप्शन एसएससीच्या विद्यार्थ्यांना का उपलब्ध करुन द्यावयाचे नाहीत ? सभापती महोदय, जुन्या सदस्यांना आठवत असेल की, पूर्वी सीबीएसई व आयसीएसईच्या विद्यार्थ्यांना 5 टक्के ग्रेस मार्कस् दिले जात होते. कारण एसएससी मंडळाचा दर्जा उच्च होता. गेल्या 10 वर्षामध्ये दर्जामध्ये घसरगुंडी झाली आहे. त्या मंडळातील मुलांना 5 गूण अधिक द्यावे लागत होते तेव्हा त्यांना प्रवेश मिळत होता. अन्यथा ती मुले खालच्या पायरीवर असायची. आज ही मुले वरच्या पायरीवर पोहोचली आहेत. याचे कारण असे की, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याने गेल्या 10-15 वर्षामध्ये शिक्षणाचे वाटोळे केले आहे. जी बेफिकीरी दाखविली आहे त्याचे परिणाम आपण भोगत आहोत. प्रश्न अकरावीच्या प्रवेशाचा येतो त्यावेळी पालकांना धास्ती वाटते. त्याच्यातून शोक उत्पन्न होतो. स्पर्धात्मक परीक्षा असोत किंवा पुढील भविष्यातील अनेक वाटा असोत, या सर्व वाटांमध्ये महाराष्ट्रातील मुले मागे का पडतात आणि ती मागे पडू द्यावयाची नसतील तर काय केले पाहिजे हे शोधण्याचा खरा प्रश्न आहे. सीबीएसई व आयसीएसई या दोन बोर्डाच्या तुलनेत महाराष्ट्राचे बोर्ड कोठे आहे ? अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती व गुणदान पध्दती या तिन्हीमध्ये महाराष्ट्र मागे आहे. केंद्रीय मंत्री श्री.कपिल सिब्बल यांनी गेल्या वर्षी सांगितल्यानंतर शासनाने थोडीशी धावपळ सुरु केली आणि बोर्डाच्या समानीकरणासाठी प्रयत्न सुरु केले. हे प्रयत्न यापूर्वी करता आले असते. गेली 4 वर्षे आम्ही सातत्याने सभागृहात सांगत आलो आहे. केवळ बोर्डाचे समानीकरण नाही तर सर्वच अभ्यासक्रमाचे समानीकरण करणे आवश्यक आहे. आपल्या

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.कपिल पाटील.....

महाराष्ट्रातील मुलांना ज्यांची संख्या जास्त आहे. त्यांना त्या बोर्डाच्या बरोबरीने स्पर्धेत आणण्याची गरज आहे. हे समानीकरण कशाकशामध्ये झाले पाहिजे ? केवळ बेस्ट फाईव्ह करुन चालणार नाही तर अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती व गुणदान या तिन्हीच्या बाबतीत शासनाने बदल घडविले नाही आणि योग्य भूमिका घेतली नाही, उदार भूमिका घेतली नाही तर चुकीचे होणार आहे. उदार भूमिका घेणे याचा अर्थ गुणवत्तेशी तडजोड असा होत नाही. गुणवत्तेशी तडजोड न करताही या सर्व गोष्टी करता येतात. लेखी परीक्षा म्हणजेच निकष आहेत असे कोणी सांगितले आहे ? आठवीपर्यंत परीक्षा होणार नाहीत असे नाही. परीक्षा रद्द होणार नाहीत. आठवीपर्यंतच्या मुलांना पास करावयाचे आहे. पण आपण असा समज करुन घेतलेला आहे की, शाळेत आलेल्या मुलाला नापास सुध्दा करावयाचे. नापास करण्याचा अधिकार पूर्वीही आपल्याला नव्हता. आता तो कायद्यात समाविष्ट केल्यामुळे तो समोर आलेला आहे. शाळेत आलेल्या मुलाला पास करण्याचेच कर्तव्य आपल्या हाती सोपविले होते. ती जबाबदारी शासनावर, शिक्षकांवर व शाळांवर आहे. विद्यार्थी पास कसा होत नाही ही जबाबदारी त्या विद्यार्थ्याची नाही. विद्यार्थी पास होत नसेल तर ती जबाबदारी शिक्षकाची, शाळेची व सरकारची आहे. नापास करणे म्हणजे गुणवत्तेचा निकष लावणे जो भ्रम आपल्या डोक्यात आहे तो काढून टाकला पाहिजे. राईट टू एज्युकेशन या कायद्याने हा भ्रम काढून टाकला आहे. ही एक चांगली गोष्ट झाली आहे. या प्रस्तावामध्ये दोन्ही विषय एकत्रित आले आहेत. माझी मंत्री महोदयांकडे मागणी आहे की, राईट टू एज्युकेशनच्या संदर्भात शासनाने स्वतंत्रपणे या सभागृहासमोर येण्याची आवश्यकता आहे. कारण 'राईट ऑफ चाईल्ड टू फ्री ॲण्ड कम्पलसरी एज्युकेशन' हा जो कायदा आहे त्यामध्ये राज्य सरकारला या कायद्याच्या अनुषंगाने निर्णय घ्यावयाचे आहेत. ते विधिमंडळासमोर आणून मान्यता घ्यावयाची आहे. त्याऐवजी शासनाने छोटे छोटे निर्णय घेतले त्यामुळे गोंधळ निर्माण झाला आहे. राईट टू एज्युकेशनमुळे किती जबाबदा-या वाढलेल्या आहेत, त्या सगळया जबाबदा-यांसंबंधी माननीय मंत्री महोदयांनी याच अधिवेशनात सभागृहासमोर यावे. कारण हे अधिवेशन संपल्यावर डिसेंबरमध्ये अधिवेशन होईल. हा विषय इतका लांबवून चालणार नाही. कारण प्राथमिक शिक्षणाचा आठवीपर्यंतचा जो पाया आहे तो सगळयात महत्वाचा आहे. तोच पाया आम्ही भक्कम केला नाही तर माध्यमिक शिक्षणाचा इमला टिकू शकणार नाही. म्हणून त्यासंबंधी पूर्ण कृती कार्यक्रम घेऊन सभागृहासमोर यावे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील ...

हा कार्यक्रम घेतल्यानंतर त्यासंदर्भातील सुधारणा आणि त्यासंदर्भातील तरतूद आपण केली पाहिजे. राईट टू एज्युकेशन याचा अर्थ मुलाला शिकवा असा नाही. तर शिकविण्याची सर्व व्यवस्था निर्माण करायची आहे. शिक्षक द्यायचे आहेत, शाळा द्यायची आहे आणि जी मागे पडणारी मुले आहेत त्यांच्यासाठी व्यवस्था करायची आहे.म्हणजे निधीची व्यवस्था करायची आहे. हा निधी सरकार देणार की नाही, हा खरा प्रश्न आहे. राईट टू एज्युकेशन फक्त 8वी पर्यन्त म्हणजे 14 वर्षाच्या मुलापर्यन्त उपलब्ध आहे. पण त्याच्या पुढच्या शिक्षणाचे काय ? आपण सेकंडरी एज्युकेशन पर्यन्त फ्री आणि कम्पलसरी एज्युकेशन देत आहोत.

मघाशी सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई यांचा उल्लेख केला. या दोघांनी त्या काळात जे निर्णय घेतले त्या निर्णयाना ताकद देण्याची आवश्यकता आहे. केवळ केन्द्र सरकारने राईट टू एज्युकेशनची तरतूद केल्यामुळे आम्ही तेवढे करु असे म्हणून चालणार नाही. उलट त्यामुळे राज्य सरकारचा आर्थिक भार कमी होणार आहे. आठवी पर्यन्तचा केन्द्राचा निधी मोठया प्रमाणावर राज्यात येणार आहे. म्हणजे प्राथमिक शिक्षणाचा राज्य सरकारवरील आर्थिक भार कमी होणार आहे हे गृहीत धरुन राज्य सरकारने माध्यमिक शिक्षणासाठी आणि उच्च माध्यमिक शिक्षणासाठी अधिक आर्थिक भार उचलला पाहिजे. कारण त्यासाठी केन्द्राकडून मिळणारी मदत कमी राहाणार आहे आणि या दोन्हीची जबाबदारी कायद्याने राज्य सरकारवर टाकलेली आहे. नियंत्रणाच्या संदर्भात वाद निर्माण झालेला आहे. या प्रस्तावातील मूळ प्रश्न हा या तीनही बोर्डाच्या समानीकरणाचा आणि या दोन्ही बोर्डाच्या अरेरावीला नियंत्रण घालण्या संबंधीचा आहे. आज खाजगी शाळांचे पेव फुटलेले आहे. याचे कारण फीसाठी राज्य सरकारने त्यांना अनियंत्रित अधिकार दिलेले आहेत. आदिश्री कुलकर्णी-गोपाळ कृष्णन हिची आई तिच्या प्रवेशासाठी भांडली म्हणून शाळेने त्या मुलीला बाहेर काढले. हायकोर्टाने जसे बेस्ट ऑफ फाईव्हमध्ये या राज्याच्या 16 लाख मुलांच्या बाबतीत अत्यंत अन्यायकारक निर्णय दिला त्याप्रमाणे हायकोर्टाने कायदाबाह्य, घटनाबाह्य सल्ला दिला. हायकोर्टाने निर्णय दिला नाही. अशा प्रकारचा सल्ला देण्यास हायकोर्टाला कुणी सांगितले ? कायद्यावर आधारित निर्णय देणे हे हायकोर्टाचे काम आहे. दोन न्यायमूर्तींनी दुस-या शाळेत प्रवेश घेण्याचा सल्ला दिला. एका बाजूला राईट टू

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

एज्युकेशनचा कायदा आहे.कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, कोणत्याही मुलाला किंवा पाल्याला अन्य कोणत्याही कारणासाठी शाळेच्या बाहेर काढता येणार नाही. आदिश्रीची आई फीसाठी भांडली. आईने केलेल्या आंदोलनाची शिक्षा मुलीला दिली गेली आणि हे सरकार ढिम्मपणे हायकोर्टात भांडण्या ऐवजी त्यांना दुस-या शाळेत जाण्यास सांगते. या प्रकरणी हे शासन हायकोर्टात जाणार आहे की नाही हे सांगावे. एकटया आदिश्रीचा हा प्रश्न नाही. मुले शाळेत गेल्यानंतर शेवटपर्यन्त त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याचे अधिकार राईट टू एज्युकेशनने दिलेले आहेत आणि कायद्याने हा अधिकार त्या मुलीला मिळालेला आहे. सर्व मुलांचा हा अधिकार आहे. या शाळांची ही अरेरावी का सुरु झाली ? ही अरेरावी जशी आदिश्रीच्या प्रवेशाच्या संदर्भातील आहे त्याचप्रमाणे ती आज बोर्डाच्या 16 लाख विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. या अरेरावीला नियंत्रित करावयाचे असेल तर कायद्याचा अंमल लागू करण्यासंबंधीचे जे स्कोड आहेत ते स्कोड लागू करण्याची आवश्यकता आहे. राज्य सरकार फक्त एन.ओ.सी.वर निभावून नेते. एन.ओ.सी. दिली की संपले. जी यंत्रणा एस.एस.सी. बोर्डाच्या शाळांचे नियंत्रण करते तीच यंत्रणा त्या बोर्डाच्या शाळांना लागू केली पाहिजे. शिक्षकांच्या मान्यते पासून, त्यांच्या पगारा पासून ते शिक्षणाच्या दर्जापर्यन्त मग ती शाळा कोणत्याही बोर्डाची असो, आयबीची असो, आयजीएसईची असो,आयसीएसईची असो की सीबीएसईची असो, या बोर्डाच्या शाळांना महाराष्ट्राचे कायदे लागू राहातील या दृष्टीने महाराष्ट्र शासन निर्णय घेणार की नाही असा प्रश्न मला विचारायचा आहे.

सभापती महोदय, हे एवढेच करुन भागणार नाही. एका बाजूला राज्य सरकारला त्या शाळांवर नियंत्रण आणावे लागेल आणि दुस-या बाजूला मराठीचा विषय सक्तीचा केला पाहिजे. शेक्सपिअर शिकला पाहिजे. शेक्सपिअर हा केवळ सीबीएसई आणि आयसीएसई शाळेमध्ये का असावा ? तो माझ्या एस.एस.सी.च्या शाळेत का असू नये ? मग आयसीएसई शाळेत फक्त शेक्सपिअरच का, तेथे तुकाराम का नको, तेथे कुसुमाग्रज का नको ? ते तुम्हाला शिकवायचे असतील आणि महाराष्ट्रामध्ये अन्य बोर्डाच्या शाळा उघडायच्या आणि चालवायच्या असतील तर त्या शाळांना मराठी हा विषय सक्तीचा केला पाहिजे. दुस-या बाजूला मराठी शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी तुम्हाला त्या शाळेतील इंग्रजीचा दर्जा वाढवावा लागेल. कारण उच्च शिक्षणाची जी स्पर्धा आहे त्यामध्ये आम्ही फक्त तुकाराम आणि ज्ञानेश्वर वाचू त्यापलीकडे शेक्सपिअर वाचणार

..3..



MSS/ KTG/ SBT/ 18:40

श्री. कपिल पाटील...

नाही असे म्हटले तर चालणार नाही. पुढची पिढी आपल्याला माफ करणार नाही. आपल्याला शेक्सपिअरच नाही तर आईन्स्टाईन वाचावा लागेल, स्टिफन हॉकिन्स देखील माहीत असावा लागेल आणि अशा शिक्षणाची व्यवस्था आपल्याला एस.एस.सी. बोर्डाच्या शाळेत करावी लागेल. म्हणून गणित आणि सायन्स या दोन्ही विषयांचा दर्जा आपल्याला आंतरराष्ट्रीय दर्जाचा करावा लागेल. हा दर्जा आपण केला नाही तर आपल्याला न्यूटन माहीत झालेला नसेल, आईन्स्टाईन माहीत झालेला नसेल, स्टिफन हॉकिन्स माहीत झालेला नसेल. परिणामी आम्ही पुढच्या काळामध्ये कमी पडू आणि आमच्या मुलांवर अन्याय करु.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 18:45

श्री.कपिल पाटील........

हा निर्णय राज्य सरकारला आवर्जून घ्यावा लागेल. एस.एस.सी.बोर्डाच्या संदर्भात आणखी एक गोष्ट करावी लागेल. आय.सी.एस.ई.आणि सी.बी.एस.ई. बोर्डाप्रमाणे ऑप्शन द्यावे लागतील. ठराविक विषयाबाबत ऑप्शन का द्यायचे? अकरावी प्रवेशाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला त्यानुसार कोअर सबजेक्टनुसार प्रवेश दिले जाणार आहेत. त्यामुळे एका अर्थाने संरक्षण मिळणार आहे. सायन्सला प्रवेश हवा असेल तर सायन्स विषयातील गुण गृहित धरले जाणार आहेत. आय.सी.एस.ई.बोर्डाप्रमाणे इतर विषयांचे ऑप्शन्स विचारात घ्यावेत. म्हणजे ज्या मुलांचा खेळाकडे ओढा असेल ते कला शाखेमध्ये प्रवेश घेतील. शासनाने बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय घेतला. त्यामुळे सहावा विषय सोडून दिला. हा सहावा विषय ऑप्शनल करावा. तिसरी भाषा ग्रेडेड करावी. आपण पर्यावरण विषयाला ग्रेड देतो. त्याप्रमाणे तिसऱ्या भाषेला ग्रेड पध्दत लागू करावी आणि सहावा विषय खुला करण्यात यावा. ज्यांना खेळामध्ये इंटरेस्ट असेल ते खेळाकडे वळतील. ज्यांना कलेमध्ये इंटरेस्ट असेल ते कला शाखेकडे वळतील. ज्यांना संगीतामध्ये इंटरेस्ट असेल ते संगीत शाखा निवडतील. उपयोजित विषय असेल, कॉमर्स असेल तो विषय घेता येईल. ही सगळी व्यवस्था असलेल्या शिक्षकांमार्फत राबविता येईल. इतके ऑप्शन्स दिले तर नापासांचे प्रमाण कमी होईल आणि एटीकेटीची गरज भासणार नाही. बेस्ट फाईव्हमध्ये जे पास होतील त्यांचा नापासाचा प्रश्न उरणार नाही. खरे म्हणजे एटीकेटीची गरज नाही. एटीकेटीची गरज नसेल तर एखाद्या विषयात नापास झाले तरी पुढील वर्गात जाता येईल याची काळजी घेण्यासाठी सहावा विषय बहुपर्यायी करण्यात यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो. विविध बोर्डांच्या संदर्भातील वाद हा महाराष्ट्रात आणि प्रामुख्याने मुंबई शहरामध्ये सुरु आहे. या बोर्डांबाबत नियंत्रण करण्यासाठी जिल्हा पातळीवर आणि विभागीय पातळीवर समिती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. एस.एस.सी. बोर्डाप्रमाणे आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई. शाळांसाठी लोकप्रतिनिधींचा सहभाग असलेली समिती निर्माण करण्यात यावी. तरच या शाळांच्या अरेरावीला, अनिर्बंध कारभाराला आणि अवास्तव फी वाढीला नियंत्रणात आणता येईल. अनेक परदेशी कोर्सेस या बोर्डाच्या शाळांमध्ये शिकविले जातात. परंतु शिक्षक क्वालिफाईड नसतात. शेक्सपियरचा धडा असेल परंतु तो शिकविण्याची ताकद शिक्षकामध्ये असेलच असे नाही. आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई.शाळांना देखील दर्जेदार शिक्षक मिळाले पाहिजेत. जिल्हा

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील......

परिषदेच्या आणि राज्यातील महापालिकांच्या शाळांमध्ये क्वालिफाईड शिक्षक आहेत. तेथे गरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात. रायन इंटरनॅशनल स्कूल यासारखी शिक्षण संस्था राजकारणाने पोसलेली आहे. एखादी चांगली शाळा काढली म्हणून वारेमाप शाळा काढण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले जाते. या शाळेमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकाला दरमहा तीन हजार, चार हजार रुपयापेक्षा जास्त वेतन मिळत नाही. तो शिक्षक कोणत्या लायकीचा असेल याचा विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातील शिक्षण पध्दतीचा दर्जा खालावत चालला आहे आणि शिक्षणाची अवहेलना सुरु आहे. माझा मुलगा इंग्रजी शाळेत जातो याचा गरीब पालकांना आनंद वाटतो. परंतु या इंग्रजी शाळांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कायदेशीर तरतूद करण्याची आवश्यकता आहे. असलेले कायदे लागू करण्यासाठी साधे नोटिफिकेशन काढण्याची आवश्यकता आहे. हे काम माननीय शिक्षणमंत्री महोदय करणार आहेत का? असा माझा प्रश्न आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----------

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये आदरणीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेत भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, गेली चार वर्षे या सभागृहात सातत्याने शिक्षण या विषयावर चर्चा झालेली आहे. सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. आणि एस.एस.सी.बोर्डाच्या संदर्भातील वाद सातत्याने उपस्थित होत आहे. एस.एस.सी.बोर्डातील विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय मिळावा या उद्देशाने गेली चार वर्षे या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य प्रयत्न करीत आहेत. शासनाने सुध्दा आपल्या परीने योग्य ते प्रयत्न केले आहेत. याठिकाणी माननीय सदस्यांनी मांडलेल्या विचारातून एक नवीन प्रश्न निर्माण झ ालेला आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ......

हे तीन विषय घेत असताना त्यात प्रथम पर्सेंटाईल नंतर 90:10 आणि आता बेस्ट ऑफ फाईव्ह असे तीन फॉर्म्युले आले. त्यात बेस्ट ऑफ फाईव्हसंबंधीचे प्रकरण कोर्टात गेले, तेथे आपण का यशस्वी झालो नाही ? याचा विचार करणे आवश्यक आहे. वेळोवेळी आपण शिक्षणाच्या बाबतीत वेगवेगळे जी.आर. निर्गमित केले ते आपल्याला बदलण्याची वेळ का आली आणि यामध्ये कोण दोषी आहेत याचा विचार शासन करणार की नाही ? आपण शासन म्हणून, मंत्री म्हणून प्रामाणिकपणे काम करतो, चांगल्या रितीने विभाग हाताळतो तरी देखील कधी पाठ्य पुस्तकातील चुका पुढे येतात आणि दरवेळी शिक्षणाच्या बाबतीत शासनाला तोंड द्यावे लागते. अशा चुका करणारे जे अधिकारी असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार की नाही ? त्याचबरोबर शिक्षणाची जी सध्याची पध्दती आहे त्यासंदर्भात पंचायती राज समितीच्या माध्यमातून राज्यात फिरत असताना काय प्रगती आहे हे लक्षात येते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब एका ठिकाणी बोलले होते की, ग्रामीण भागात गेल्यानंतर सातवीपर्यंतच्या मुलांची शैक्षणिक प्रगती पाहण्याची गरज आहे. आजही तेथे पाचवी ते सातवीपर्यंतच्या मुलांना जोडाक्षर लिहिता येत नाही, इंग्रजीत स्वत:चे नाव सुध्दा लिहू शकत नाही. अशी वस्तुस्थिती असेल तर राज्यातील शिक्षणाची परिस्थिती कशी होणार आहे याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची वेळ आलेली आहे. आज आठवीपर्यंतच्या परीक्षा घेण्याचे रद्द केले आणि एकही विद्यार्थी नापास होता कामा नये हा जो निर्णय शासनाने घेतला आहे त्याचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. मागील काळात देखील सभागृहात चर्चा झालेली आहे. ती म्हणून शिक्षण पध्दतीत बदल करीत असताना विभागवार माहिती, भौगोलिक परिस्थितीची माहिती त्या त्या भागातील मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून मिळाली पाहिजे. उदा. कोकणात फळफळावळे, मच्छिमारी तसेच पर्यटन वगैरे विषय असतील तर असे विषय हाताळले पाहिजेत. त्याचप्रमाणे कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा ज्योतिबा फुले, महर्षि कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच आगरकर यांच्या वैभवशाली महाराष्ट्रातील शिक्षणावर सातत्याने टीका होत असताना आपण नेहमीच पाहतो यामध्ये शासन बदल करणार की नाही ? आज राज्यात शिक्षणासारख्या महत्वाच्या क्षेत्रात शासनाने शिक्षण सेवक ही पध्दती अमलात आणली. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा विचार करता जी शिक्षकांची भरती झाली त्यात या दोन जिल्ह्यातील मुले

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ......

नंदुरबार येथे जाणार तर नंदुरबार मधील मुले या जिल्ह्यात शिक्षक म्हणून येणार. वास्तविक त्या भागातील बोली-भाषा ही वेगळ्या स्वरुपाची असल्याने या भागात ते मुलांना कसे शिकविणार याचाही विचार होणे आवश्यक आहे. तसेच आमच्या कोकणातील शिक्षक, ज्यांची बोलीभाषा वेगळी आहे ते नंदुरबारसारख्या भागात आदिवासी पाड्यांवर जाऊन काय शिकविणार याचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. आता सिंधुदुर्ग जिल्ह्यात 589 शिक्षकांच्या जागा रिक्त दाखविल्या आहेत. मागील वर्षी 216 शिक्षकांना जिल्ह्याच्या बाहेर बदली व्हावी असे वाटते. शिक्षक म्हणून नेमणूक होईपर्यंत कोकण वगैरे सर्वच ठिकाणी त्यांना नियुक्ती चालते परंतु एकदा नंबर लागल्यानंतर मात्र दुसऱ्या दिवसापासूनच त्यांचा बदली करुन घेण्याचा प्रयत्न सुरु होतो. शासन देखील बदलीच्या संदर्भात वेगवेगळे जी.आर. काढत असते परंतु एका वर्षात बदली करा असे आदेश जातात म्हणून आज सिंधुदुर्ग जिल्ह्यात या 589 जागा रिक्त दाखविल्या आहेत. त्यातील 216 लोकांना सोडायचे नाही असा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला तरी हा वाद काही अधिकारीच निर्माण करतात. अशा प्रकारे 1189 विद्यार्थी रत्नागिरी आणि 589 विद्यार्थी सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत परंतु त्यातून फक्त सिंधुदुर्गमधील 26 मुले पास होतात तर रत्नागिरीमधून 36 मुले शिक्षक भरतीसाठी पास होतात. मग स्थानिक मुलांनी कोठे जायचे हा प्रश्न निर्माण होतो. तशीच परिस्थिती पोलीस भरतीची सुध्दा आहे. अशा प्रकारे सर्व गोंधळाची स्थिती निर्माण होत चालली आहे. म्हणून माझी मागणी आहे की, भरतीबाबत विभागीय मंडळे तयार करावीत. पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर ज्याप्रमाणे एक निवड समिती होती. तशीच प्रक्रिया आता देखील सुरु केली तर पुन्हा स्थानिक पातळीवरील भाषेचा समतोल दूर होईल. त्याचबरोबर गट शिक्षणाधिकाऱ्यांचा विचार केला तर गेल्या साडे चार वर्षात आमच्या जिल्ह्याला शिक्षणाधिकारीच नाही. 8 तालुक्यात केवळ 7 गट शिक्षणाधिकारीच हे काम पाहत आहेत.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

बहुतांशी सर्व राज्याची अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे ही पदे आपण कधी भरणार आहात ? गेल्यावेळी शासनाने सांगितले होते की, एमपीएससीची परीक्षा झाल्यानंतर ही पदे लवकरात लवकर भरली जातील. रिझल्ट चांगला लागावा, शिक्षणाचा दर्जा सुधारावा अशा प्रकारची मागणी केली जाते त्यावेळेला रेग्युलर अधिकारी सुध्दा आपण देऊ शकत नाही. त्यामुळे खालचे अधिकारी काय निर्णय घेऊ शकणार आहेत ? जिल्हयाला एक शिक्षण अधिकारी सुध्दा आपण देऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे गट शिक्षण अधिकारी, शिक्षण अधिका-याची नियुक्ती लवकरात लवकर कशी होईल यादृष्टिकोनातून शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

शिक्षण पध्दती सुधारण्यासाठी स्थानिक पातळीवर जे विषय आहेत ते अभ्यास क्रमात कसे घेता येतील यासाठी सुध्दा प्रयत्न करण्याची गरज आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या ठिकाणच्या शाळांमध्ये पर्यटनाचा, फळफळावळांचा, मच्छिमारी या विषयांचा समावेश आहे. आयटीआयच्या माध्यमातून हे विषय आणले गेले. आमच्याकडे पर्यटनाचा विषय आहे परंतु पर्यटनाचा विषय शिकवण्यासाठी शिक्षकाची नेमणूकच करण्यात आलेली नाही. पर्यटनासाठी शिक्षक नसल्यामुळे शाळेमध्ये प्रवेश मिळत नाही. त्यामुळे अशी परिस्थिती पुढील काळात तरी होता कामा नये याची शासनाने खबरदारी घ्यावी. 16 लाख विद्यार्थ्यांचे भले करतांना मी शिक्षण मंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो. आज बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात शासनाच्या बाजूने निर्णय लागलेला आहे. बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात आपण प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे त्यामुळे मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. भविष्य काळात दहावीच्या विद्यार्थ्यांवर व आपल्यावर अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा ओढवणार नाही याची काळजी घ्यावी व त्यासाठी कायदा आणावा अशी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो आणि माझे विचार येथेच थांबवतो.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** :या अल्पकालीन चर्चेवर विचार मांडण्यासाठी 29 सन्माननीय सदस्यांनी बोलण्याची परवानगी मागितली आहे. अजून या अल्पकालीन चर्चेवर 20 ते 22 सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. या अल्पकालीन चर्चेसाठी उत्तरासह 100 मिनिटांचा अवधी दिलेला आहे. ही चर्चा सुरु होऊन दोन तासाचा अवधी उलटून गेलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला असे वाटते की, आता काही सन्माननीय सदस्यांना या चर्चेवर बोलण्याची संधी द्यावी व नंतर सकाळी या विषयाला पुन्हा सुरुवात करावी.

**उपसभापती** : मी सभागृहाचे मत अजमावतो आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय,उद्या सकाळी 11 ते 12 च्या दरम्यान चर्चा धेतली तर या चर्चेला न्याय दिल्यासारखे होईल.

**उपसभापती** : आज नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा घ्यावयाची आहे तसेच दोन विधेयके चर्चेला घ्यावयाची आहेत.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयावर दोन तासापासून चर्चा होत आहे. या विषयावर चांगली चर्चा झालेली आहे. या विषयावर अजून काही सन्माननीय सदस्यांना विचार मांडावयाचे असतील तर माझी त्याला हरकत नाही. माझी उत्तर देण्याची तयारी आहे.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, आम्हाला चर्चाच करु दिली जात नाही व परस्पर निर्णय घेतले जातात. बेस्ट ऑफ फाईव्हचा जो प्रकार झालेला आहे तो घाई घाईने निर्णय घेतल्यामुळेच झालेला आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, उद्या सकाळी चर्चेला सुरुवात झाली तर विधानसभेत 11 वाजता माझ्या विभागाच्या संदर्भात प्रश्नोत्तराचा तास आहे तसेच माझ्या विभागाच्या लक्षवेधी सूचना सुध्दा आहेत. लक्षवेधी सूचनेनंतर उत्तर देण्यास माझी काही हरकत नाही. आज सुध्दा चर्चेला उत्तर देण्याची माझी तयारी आहे तसेच आता सुध्दा चर्चा सुरु राहिली तरी त्याला माझी काही हरकत राहणार नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी आपले विचार मांडण्यास सुरुवात करावी.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद शिक्षक विभाग ) :सभापती महोदय, उत्कृष्ट कृषी मंत्री म्हणून महाराष्ट्रात ज्यांची ख्याती आहे त्यांच्याकडेच शिक्षण विभागाचा चार्ज दिलेला असतांनासुध्दा त्यांनी शिक्षण खात्याकडेही अतिशय मन लावून लक्ष दिले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ KTG/ SBT/ KGS/ जुन्नरे.. 19:00

श्री.विक्रम काळे...

त्यामुळेच आज चर्चा होत आहे. चर्चा सुरू होण्याआधीच सर्वोच्च न्यायालयाने बेस्ट ऑफ फाईव्हसंबंधी निकाल दिला आणि आनंदाचे वातावरण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनात निर्माण झाले आहे. बेस्ट ऑफ फाईव्हमुळे गेले महिनाभर राज्यातील पालक,विद्यार्थी तसेच शिक्षण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अस्थिरता निर्माण झाली होती. दरवर्षी अकरावीच्या प्रवेशाच्या निमित्ताने काहीना काही तर निर्णय घेतला जातो. या निर्णयाला नंतर कोर्टामध्ये आव्हान दिले जाते. त्यामुळे अकरावीच्या प्रवेशाच्या वेळी अस्तिरतेचे वातावरण निर्माण होते. 90:10 चे सूत्र, 70:30 चे धोरण, ए.टी.के.टी.चा निर्णय या सर्वांना कोर्टामध्ये आव्हान देण्यात आले होते. गेली वर्ष-दोन वर्ष विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा विषय पुढे आला. त्या निमित्ताने काही तरी उपाययोजना कराव्यात या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने चांगली पावले उचलली आहेत. शिक्षण विभागाने दहावी व बारावीच्या परीक्षेसंबंधी चांगला निर्णय घेतला. एटीकेटीचा निर्णय घेतला. तसेच 80 टक्के गुण हे थिअरीसाठी आणि 20 टक्के गुण प्रॅक्टीकलसाठी ठेवण्यात आले. बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय शासनाने घेतला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे या वर्षी दहावी-बारावीचा निकाल लागल्यानंतर ज्याप्रमाणात आत्महत्या होत होत्या त्याचे प्रमाण कमी झालेले आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना मदत झाली आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. बेस्ट ऑफ फाईव्ह मुळे दहावी, बारावीचे निकाल चांगले लागले आहेत. आज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनासुद्धा 100 टक्के गुण मिळाले आहेत. बेस्ट ऑफ फाईव्हमुळे ग्रामीण भागातील मुले देखील पुढे आली आहेत. आज ग्रामीण भागातील मुलांची संख्या या सूत्रामुळे हजारोंच्या वर गेलेली आहे. 25 गुण क्रीडेचे धरले तर त्यांची टक्केवारी 100 टक्क्याच्यावर जात आहे. यामुळे SSC बोर्डाच्या 15 लाख विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. SSC बोर्डाच्या विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळणार असल्यामुळे ICSE, CBSE च्या विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये पोटशूळ उठले व ते कोर्टामध्ये गेले. आज या विद्यार्थ्यांची संख्या 8 हजारच्या आसपास आहे. एकीकडे 15 लाख विद्यार्थी आहेत. आता पर्यंत कोर्टाने 8 हजार विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन निर्णय घेतला होता. पण आज सर्वोच्च न्यायालयाने 15 लाख विद्यार्थ्यांचे हित विचारात घेऊन निर्णय दिलेला आहे. त्यामुळे या 15 लाख विद्यार्थ्यांवर जी टांगती तलवार होती ती दूर झालेली आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ KTG/ SBT/ KGS/ जुन्नरे.. 19:00

श्री.विक्रम काळे...

ICSE, CBSE च्या महाराष्ट्रातील शाळांवर राज्य शासनाचे नियंत्रण नसते. हा विषय यापूर्वी देखील सभागृहात चर्चेला आला होता. राज्य शासनाच्या शिक्षणाधिकाऱ्याला या शाळांच्या गेटच्या आत सुद्धा प्रवेश दिला जात नाही. यापेक्षा दुसरी कोणती नामुष्की असू शकेल. या शाळा सरकारच्या निर्णयाला विरोध का करीत आहेत ? या शाळा आज महाराष्ट्रामध्ये आहेत. पण या शाळांमध्ये मराठी भाषा हा विषय का शिकवला जात नाही ? यावर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे. यासाठी शासनाने कडक उपाययोजना केली पाहिजे. या शाळांना ज्युनिअर कॉलेज काढायचे असेल तर ते काढू द्यावे. आज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यांच्यावर प्रवेशाची टांगती तलवार असेल तर ते अत्यंत चुकीचे आहे. बेस्ट ऑफ फाईव्ह संबंधी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. तो अजूनही स्पष्ट झालेला नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.ओटवणेकर 19.05

श्री.विक्रम काळे....

या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचे काम बेस्ट ऑफ फाईव्हच्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे झालेले आहे.राज्यातील पंधरा लाख विद्यार्थ्यांना व जवळजवळ 60 लाख पालकांना एक प्रकारचा आनंद झाला आहे.त्याबद्दल मी माननीय शिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

.सभापती महोदय, ए.टी.के.टी.चा चांगला निर्णय घेण्यात आला होता परंतु ए.टी.के.टी. ज्या विद्यार्थ्यांना मिळालेली आहे त्या विद्यार्थ्यांना अकरावीमध्ये प्रवेश दिला जातो हा प्रवेश दिल्यानंतर विद्यार्थ्यांवर आधारित शिक्षकांचा जो वर्कलोड गृहित धरला जातो परंतु त्यामध्ये त्यांना गणले जात नाही ही अत्यंत चुकीची पध्दत आहे.शासनाने ए.टी.के.टी.चा निर्णय घेतला परंतु त्या विद्यार्थ्यांची संख्या देखील शिक्षकांचा वर्कलोड ठरवत असतांना गृहित धरली पाहिजे व त्या संदर्भात लवकर निर्णय घेणे गरजेचे आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, दहावी आणि बारावीच्या परीक्षा लातूर विभागामध्ये अत्यंत चांगल्या प्रकारे पार पडल्या आहेत.या सर्व परीक्षांचे नियंत्रण पोलीस विभाग आणि जिल्हाधिका-यांच्या महसूल यंत्रणेच्या मार्फत करण्यात आले होते. त्यामुळे लातूर विभागाचा निकाल कमी लागला होता त्याचे मी समर्थन करतो , विरोध करीत नाही. लातूर विभागामध्ये ज्या पध्दतीने परीक्षा घेण्यात आल्या होत्या त्याच पध्दतीने संपूर्ण राज्यातील परीक्षा घेण्यात आल्या पाहिजेत. आम्ही माननीय शिक्षण मंत्र्यांकडे आणि शासनाकडे अशी मागणी केलेली आहे की,राज्यातील दहावी आणि बारावीच्या सर्व परीक्षा पोलीस नियंत्रणाखाली आणि महसूल यंत्रणेच्या नियंत्रणाखाली घेण्यात याव्यात काही ठिकाणी या सदर्भात थोडा फार अतिरेक देखील झाला आहे. काही ठिकाणी आमच्या शिक्षक बांधवांविरुध्द कारवाई करण्यात आली होती तर काही ठिकाणी शिक्षकांना पोलीस स्टेशनवर बसविण्यात आले होते.या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्षभर शिकविण्याचे काम अत्यंत प्रामाणिकपणे केले होते.परंतु परीक्षेच्या निमित्ताने या शिक्षकांवर अविश्वास दाखविला जात असेल तर ते बरोबर नाही.म्हणूनच आम्ही या निमित्ताने अशी मागणी केली आहे की, लातूर विभागात ज्या पध्दतीने परीक्षा घेण्यात आल्या होत्या त्याच पध्दतीने संपूर्ण राज्यात पोलीस यंत्रणा आणि महसूल यंत्रणेच्या नियंत्रणाखाली देखील परीक्षा घेण्यात याव्यात. या शिक्षकांवर पेपर तपासण्याच्या बाबतीत जर विश्वास नसेल तर ते पेपरसुध्दा दुस-या व्यक्तीकडून तपासून घ्यावेत अशी सुध्दा आम्ही मागणी करीत आहोत.त्याबाबतीत आमचे काहीही म्हणणे नाही विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम मात्र हे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षक प्रामाणिकपणे करतील.परंतु शिक्षकाच्या बाबतीत जे काही चुकीच्या पध्दतीने निर्णय घेतले जातात ते थांबविण्यात आले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या हक्कासंबंधी आता चर्चा सुरु झाली आहे. त्याबाबतीत लगेच जी.आर. काढून टाकावा. पहिली ते आठवीपर्यंतच्या कोणत्याही विद्यार्थ्याला ऽआता नापास केले जाणार नाही.सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, ग्रामीण भागात शेतकरी आणि शेतमजुरांची मुले शिक्षण घेत आहेत. शिक्षणाच्या बाबतीत शहरातील पालकांमध्ये मोठया प्रमाणावर अवेअरनेस आहे. शहरातील पालक आपल्या मुलांसाठी पुरेसा वेळ देऊ शकतात.मुलगा शाळेत जातो काय ? मुलाची शाळा किती वाजता आहे? तसेच शाळा किती वाजता सुटणार आहे इत्यादी बाबीची माहिती ते घेत असतात व शाळा सुटण्याच्या अगोदर त्या मुलाची आई शाळेच्या बाहेर हजर असते. इतकेच नव्हे तर त्या मुलाला खाण्यासाठी डब्यात काय द्यावयाचे इत्यादी काळजी देखील शहरातील त्या मुलाची आई घेत असते. परंतु ग्रामीण भागातील पालकांना या सर्व बाबी पाहण्यासाठी वेळ नसतो. आपल्या कुटुंबातील सर्व व्यक्तींना संध्याकाळचे जेवण कसे मिळेल याची विवंचना त्याला असते. ग्रामीण भागातील विद्यार्थी शाळेत प्रवेश घेत होते आणि त्या ठिकाणी परीक्षा घेतल्या जात होत्या.एखादा विद्यार्थी अनुपस्थित राहिला व त्याने परीक्षा दिली नाही तर आपण नापास होऊ अशा प्रकारची भिती काही विद्यार्थ्याच्या मनामध्ये होती. त्या भितीपोटी ग्रामीण् भागातील विद्यार्थी जिल्हा परिषदेची शाळा असो वा खाजगी शाळा असो त्या शाळेमध्ये जाऊन काही ना काही तरी शिक्षण घेण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु आता आठवीपर्यंत परीक्षाच घ्यावयाच्या नाहीत असा निर्णय घेण्यात येत आहे. मला असे सांगावयाचे आहे की, परीक्षा असल्याच पाहिजेत. कोणत्याही कामाचे मूल्यमापन करीत असतांना आपण मोजपट्टी लावत असतो. परंतु परीक्षाच घेतल्या गेल्या नाहीत आणि विद्यार्थ्याला नापास केले गेले नाही तर ग्रामीण भागातील विद्यार्थी शाळेत जाईल किंवा नाही अशा प्रकारची चिंता आमच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे.दुसरी गोष्ट अशी की, ग्रामीण भागातील पालक आपल्या मुलाला शेतीच्या कामासाठी नेऊ शकेल व कदाचित असेही म्हणेल की, आता शाळेत न जाता डायरेक्ट आठवीच्या वर्गात जा. पहिली ते आठवीपर्यंत मात्र वर्गात जाऊ नकोस कारण पहिली ते आठवी पर्यंत परीक्षा घेतल्या जाणार नाहीत आणि

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ 19.05

श्री.विक्रम काळे...

कोणालाही नापास केले जाणार नाही त्यामुळे तू आता डायरेक्ट आठवीच्या वर्गात जा असे सुध्दा काही पालक म्हणू शकतील. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पंगू करणारा हा निर्णय आहे असे जर मी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. तेव्हा या बाबतीत आपल्याला कोणत्या दिशेने पाऊल उचलावयाचे आहे यासुध्दा गांभीर्याने विचार करावयाचा आहे. शिक्षणाच्या हक्का सबंधीचा कायदा या राज्यामध्ये आल्यानंतर त्याची अंमलबलावणी या पुरोगामी राज्यात करीत असतांना गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. दहा टक्के विद्यार्थी शहरी भागातील आहेत आणि 90 टक्के विद्यार्थी ग्रामीण भागातील गोरगरिब कष्टकरी वर्गातील आहेत. पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना नापास करावयाचे नाही, त्यांच्या परीक्षा घ्यावयाच्या नाहीत असा जो निर्णय येऊ घातलेला आहे त्याबाबतीत गांभीर्याने विचार करावयाचा आहे ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला खरोखर शिक्षण द्यावयाचे असेल आणि त्यांना खरोखरच शिक्षणाच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण सुध्दा मिळाले पाहिजे..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे.

यासाठी सुध्दा शिक्षण हक्क कायद्याविषयी अभ्यासपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. या सभागृहामध्ये शिक्षण क्षेत्रावर वारंवार चर्चा होते, शिक्षक प्रतिनिधी म्हणून आम्ही विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या हिताच्या दृष्टीने अनेक प्रश्न मांडीत असतो. ही सर्व यंत्रणा व्यवस्थित चालावी यासाठी जर त्यावर नियंत्रण ठेवायचे असेल तर त्यासाठी अधिकाऱ्यांची रिक्त पदे सुध्दा भरली गेली पाहिजेत. मागील अधिवेशनामध्ये या विषयावर अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून आम्ही चर्चा घडवून आणली. मंत्रालयापासून ते गट शिक्षणाधिकाऱ्यांपर्यंत 50 ते 60 टक्के अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. एवढया मोठया प्रमाणात शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची पदे रिक्त रहाणार असतील तर आपले सनियंत्रण कसे रहाणार? आपली शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढणार? शैक्षणिक गुणवत्ता कोण तपासणार? शाळांची तपासणी कोण करणार? त्यांचे कामकाज नीट चालू आहे की नाही, त्यांनी केलेले काम बरोबर आहे की नाही हे कोण तपासणार? हे एक मोठे आव्हान महाराष्ट्र सरकारपुढे आहे. या माध्यमातून सर्व अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरली गेली पाहिजेत.

सभापती महोदय, आज ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये विद्यार्थी शिक्षण घेतो. मी सुध्दा जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकलो आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा अत्यंत उत्कृष्ट पध्दतीच्या आहेत. त्या शाळांमध्ये गोरगरीब पालकांची लेकरे शिक्षण घेत आहेत. शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची लेकरे शिक्षण घेत आहेत. आज अनेक ठिकाणी जिल्हा परिषदांची हायस्कूल आहेत, ज्युनिअर कॉलेज आहेत त्याठिकाणी विद्यार्थ्यांना शिकवायला शिक्षक नाहीत. माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक नाहीत. मराठी विषयाचा शिक्षक हिंदी विषय शिकवितो, हिंदी विषयाचा शिक्षक इंग्रजी विषय शिकवितो. अशाप्रकारे त्या शाळांमध्ये एकेका शिक्षकाला तीन-तीन विषय शिकवावे लागतात ही वस्तुस्थिती आम्ही या सभागृहामध्ये अनेक वेळा मांडीत असतो. एखाद्या गाडीला जर प्रशिक्षित चालक नसेल तर ती गाडी व्यवस्थित चालू शकणार नाही. आणि म्हणून जर एखाद्या शाळेला मुख्याध्यापकच नसेल तर ती शाळा कशी काय चालणार? महाराष्ट्रातील जवळपास 50 टक्के शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत. पदोन्नती दिल्यानंतर सुध्दा त्या शाळेमध्ये मुख्याध्यापक रुजू होत नसतील तर त्यांची संख्या आपण वाढविली पाहिजे. आणि ती पदे भरली गेली पाहिजेत याकडे सुध्दा शिक्षण विभागाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

श्री. विक्रम काळे....

सभापती महोदय, आज मला याठिकाणी प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते की, जिल्हा परिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजेत त्याबरोबर खाजगी संस्थेच्या शाळा सुध्दा टिकल्या पाहिजेत यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. एखाद्या गावामध्ये इयत्ता 1 ली ते 4 थीपर्यंत जिल्हा परिषदेची शाळा असेल आणि त्याच गावामध्ये इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंत खाजगी शिक्षण संस्थेची शाळा असेल तर त्या खाजगी शिक्षण संस्थेला इयत्ता 1 ली ते 4 थीपर्यंतचे वर्ग उघडण्याची परवानगी देऊ नये. आणि जिल्हा परिषदेने सुध्दा त्या गावात इयत्ता 5 वी ते 10 वीपर्यंतचे वर्ग उघडू नयेत यासंबंधी शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला तर जिल्हा परिषदेच्या शाळा टिकतील व खाजगी संस्थेच्या शाळा सुध्दा टिकतील. आज ग्रामीण भागामध्ये, गाव पातळीवर तुझी शाळा कशी काय चालते? अशाप्रकारचे राजकारण केले जाते. आणि विद्यार्थी संख्येअभावी आहेत त्या शाळासुध्दा बंद पडू लागल्या आहेत. त्यामुळे शिक्षण पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने भविष्य काळात निर्णय घेणे आवश्यक आहे. आम्ही सातत्याने मागणी करुन आणि मोर्चे काढल्यानंतर या सभागृहामध्ये 16 जून 2009 रोजी निर्णय घेण्यात आला. त्यानुसार प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील कायम विना अनुदानितमधील "कायम" हा शब्द वगळण्यात आला. हा एक चांगला निर्णय शासनाने घेतला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु त्याचबरोबर इयत्ता 11 वी आणि 12 वीच्या प्रवेशाबाबत अखंड महाराष्ट्रभर चर्चा सुरु आहे, राज्यामध्ये खळबळ माजली आहे. त्या 11 वी आणि 12 वी च्या कनिष्ठ महाविद्यालयामधील कायम विना अनुदानितमधील "कायम" हा शब्द अजूनपर्यंत निघालेला नाही ही खेदाची बाब आहे. त्यासाठी सुध्दा खऱ्या अर्थाने त्यांना अनुदान देणे गरजेचे आहे. आणि म्हणून 11 वी आणि 12 वीच्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत "कायम विनाअनुदान" हे धोरण रद्द झाले पाहिजे. अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, याठिकाणी बेस्ट ऑफ फाईव्हबाबत शासनाने चांगला निर्णय घेतला असून तो कायम राहिला पाहिजे. मी याबाबतीत शिक्षण विभगाच्या अधिकाऱ्यांना दोष देणार नाही. कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करणे किंवा सरकारची बाजू मांडणे हे अधिकाऱ्यांचे काम नाही. त्याठिकाणी आपण नेमलेल्या कायदे पंडिताची ती जबाबदारी असते. त्यामुळे ते जर योग्य रितीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काम करीत नसतील तर त्यांना बदलण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने खंबीर पावले उचलली पाहिजेत. आपण उच्च न्यायालयामध्ये कां हरलो? याचे आत्मचिंतन केले पाहिजे व त्यामध्ये नेमकी कुणाची चूक झाली आहे हे शोधून काढून त्याला दुरुस्त करण्याचे काम आपण केले पाहिजे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, याठिकाणी जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्ये निर्णय घ्यावेत असे सांगण्यात आले. मी तर असे म्हणेन की, पुढील जूनमध्ये आपल्याला एखादा निर्णय अंमलात आणावयाचे असेल तर त्यासंबंधीचा निर्णय या वर्षीच्या जून महिन्यामध्ये घ्यावा लागेल. त्याची अंमलबजावणी पुढील वर्षीच्या जूनपर्यंत होईल. आणि त्यामुळे कुणीही कोर्टामध्ये गेले तरी तो निर्णय बाद ठरु नये.

(**तालिका सभापतीपदी श्री. चंद्रकांत पाटील**)

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील )**

श्री. विक्रम काळे ...

अशा प्रकारची तयारी सुध्दा निश्चितपणे एक वर्ष अगोदर करावी लागलेली आहे हेच या सर्व निर्णयावरुन दिसून येते. म्हणून बेस्ट ऑफ फाईव्हचा जो निर्णय घेतलेला आहे तो अत्यंत चांगला निर्णय आहे. तो कायम राहिला पाहिजे यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना केली पाहिजे.

सभापती महोदय मी माझ्या शेवटच्या मुद्याकडे वळतो. ग्रामीण भागातील प्रत्येक पालकाला आपला मुलगा शिकला पाहिजे असे वाटते.ग्रामीण भागातील माणूस आज ज्या परिस्थितीमध्ये जीवन जगत आहे त्या परिस्थितीमुळे त्याला असे वाटते की, आपला मुलगा शिकला पाहिजे. कारण शिक्षणामुळे माणसाच्या जीवनामध्ये क्रांती घडते. म्हणूनच संत गाडगे महाराजांनी असे सांगितलेले आहे की, बाबारे जर तुम्ही गरीब असाल आणि तुमच्या मुलाच्या शिक्षणासाठी पैशाची गरज असेल तर तुम्ही तुमच्या जेवणाचे ताट विका आणि हातावर भाकरी खा आणि त्या पैशातून तुमच्या मुलांना शिक्षण देण्याचे काम करा. सभापती महोदय, अशा प्रकारचा महान संदेश संत गाडगे महाराजांनी दिलेला आहे. ग्रामीण भागातील पालकांना सुध्दा आपल्या मुलाने शिकावे असे वाटते. ग्रामीण भागातील मुलांनी शिक्षण घ्यायचे असेल तर या शिक्षण पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले पाहिजेत तसे ते घडवून आणावेत अशी विनंती मी माननीय मंत्री महोदयांना करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

श्री. विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या या अल्पकालीन चर्चेत दोन महत्वाचे मुद्दे आहेत असे मला हा प्रस्ताव वाचल्यानंतर वाटते. पण या प्रस्तावावरील भाषणे ऐकल्यानंतर या प्रस्तावामध्ये बरेच मुद्दे आहेत असे वाटले. पण बेस्ट ऑफ फाईव्ह आणि या संबंधीच्या नवीन कायद्या विषयी बोलले पाहिजे. या विषया संबंधी चौफेर बॅटिंग सुरु असली तरी मी मुद्याला धरुनच बोलणार आहे.

सभापती महोदय, सुरुवातीलाच मनापासून मला असे माडावेसे वाटते की, अकॅडमीक शिक्षणाच्या बाबतीत या सभागृहात चर्चा सुरु असताना या सभागृहात केवळ सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विक्रम काळे आणि भालेराव उपस्थित आहेत. पण बाकीचे सन्माननीय शिक्षक आमदार जे नेहमी शिक्षकांच्या टी.ए., डी.ए. आणि सहाव्या वेतन आयोगाच्या बाबतीत या सभागृहात तावातावाने मुद्दे मांडत असतात ती बाके रिकामी दिसत आहेत म्हणून मनापासून वाईट वाटते.सभापती महोदय, मी ही गोष्ट यापूर्वी कधीही रेकॉर्डवर आणली नव्हती पण ती आज मी ती मुद्दाम रेकॉर्डवर आणीत आहे. 16 लाख विद्यार्थ्यांचा प्रश्न असताना आणि बजेटमधील 17 हजार कोटी रुपये ज्या शिक्षकांच्या पगारावर खर्च होतात त्या शिक्षकांचे प्रतिनिधी या महत्वाच्या शैक्षणिक विषयाच्या चर्चेच्या वेळी अनुपस्थित आहेत ही खंत वाटल्यामुळे मी ही गोष्ट या ठिकाणी मांडत आहे. जे सन्माननीय शिक्षक प्रतिनिधी उपस्थित आहेत त्यांचे मी अभिनंदन करतो. जे विषयाला धरुन बोलले आणि विषयाला सोडून बोलले त्यांचेही मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, माझा मुद्दा एवढाच आहे आहे की, आमच्या लहान वयात आम्ही काही मुले कुणीही यावे आणि टिकली मारन जावे हा खेळ खेळताना बघायचो. माननीय शिक्षण मंत्री श्री. पुरके आले आणि पर्सेंटाईल माथी मारुन गेले. माननीय शिक्षण मंत्री श्री. विखे-पाटील आले आणि 90:10 माथी मारुन गेले. त्यानंतर माननीय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात आले आणि त्यांनी हे बेस्ट ऑफ फाईव्ह माथी मारलले आहे. इयत्ता दहावीच्या परीक्षेला बसणारे विद्यार्थी म्हणजे हाफकिन इन्स्टिटयुटमधील उंदीर आणि प्राणी आहेत असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. म्हणून जो शिक्षणमंत्री येईल तो त्यांच्यावर प्रयोग करीत आहे. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदय श्री. पुरके यांच्यामुळे इयत्ता दहावीच्या एका बॅचवर, माननीय शिक्षणमंत्री श्री. विखे-पाटील यांच्यामुळे दुसऱ्या बॅचवर आणि आता तिसऱ्या बॅचवर परिणाम होत आहे. सभापती महोदय, यामुळे या विद्यार्थ्यांवर काय मानसिक ताण पडत आहे हे या राज्यातील मंत्र्यांना आणि सरकारला जाणवत नाही हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

दुर्दैवाने सांगावेसे वाटते. बेस्ट ऑफ फाईव्ह चा निर्णय योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत मर्यादित अॅकडमिक चर्चा झाली पाहिजे. विद्यार्थी परीक्षार्थी होत चालला आहे. त्याला या बेस्ट ऑफ फाईव्हमुळे आणखी परीक्षार्थी करण्यात येत आहे. म्हणजे त्यांनी परीक्षेत गुण मिळविण्यासाठी किती विषयाचा अभ्यास केला पाहिजे? बेस्ट ऑफ फाईव्हमुळे आपण विद्यार्थी टिकवत आहोत का परीक्षार्थी करीत आहोत. मला माझ्या शालेय शिक्षणाची आठवण याठिकाणी होते. मी इयत्ता चौथी किंवा पाचवीत असताना आमच्या शिक्षिकेने पृथ्वीपासून चंद्राचे अंतर अमुक इतके गुणिले अमुक इतके प्रकाश वर्षे आहे असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही ते लिहून षेतले. माझ्या स्वभावानुसार मी हात वर केला आणि शिक्षिकेला प्रश्न विचारला की, हे अंतर मोजले कसे? त्यावेळी आमच्या शिक्षिकेने असे सांगितले की, खाली बस हा प्रश्न परीक्षेला येणार नाही. म्हणजे आपण विद्यार्थ्यांना ज्ञान देतो की, माहिती देतो.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

बेस्ट ऑफ फाईव्हमध्ये माहितीच्या स्पर्धेकडे आपण नेले आहे त्याची स्वतंत्रपणे आपण वेगळी चर्चा करु.

सभापती महोदय, या वर्षी ज्यावेळी दहावीचा निकाल लागला त्यावेळी अनेक मित्रांच्या मुलामुलींचे फोन आले की, काका, मला 95 टक्के गुण मिळाले, मला 94 टक्के गुण मिळाले, मला 92 टक्के गुण मिळाले. मी त्यांना म्हटले की, आई आणि वडील या दोघांचे गुण मिळवून आपण पास झाला आहात काय ? आपल्यासारखी माणसे 45-45 टक्के गुण घेऊन दोनदा पास होतील एवढे गुण आता मुलांना मिळतात. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील जे म्हणाले त्याच्याशी मी अर्धा सहमत आहे की, या गुणांमुळे निकालाच्या वेळी होणाऱ्या आत्महत्या थांबल्या. या आत्महत्या थांबल्या नाहीत तर निकालाच्या वेळी ज्या आत्महत्या होतात त्या प्रवेशाच्या वेळेपर्यंत पुढे गेल्या आहेत. या आत्महत्या थांबल्या या भ्रमात राहू नका. 93 टक्के, 92 टक्के, 89 टक्के गुण मिळवूनही रुपारेल कॉलेजला, साठे कॉलेजला प्रवेश मिळत नाही. आपण गुण वाढवून दिले. आपण हे सर्व वेळेत जाहीर केले. सीबीएसई, आयसीएसई आणि या बेस्ट ऑफ फाईव्हच्या बाबतीत हा खरोखरच 16 लाख विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे काय ? मुंबईतील प्रमुख कॉलेजेसमध्ये 40 हजार जागांवर दोन्ही बाजूची मुले भांडत आहेत. बाकी 15 लाख 60 हजार मुलांचा हा प्रश्नच नाही. त्यांना महिना दीड महिना प्रवेशासाठी थांबावे लागत आहे. याचा कोठे तरी आपण विचार करणार आहात काय ? हा विशिष्ट भागातील विद्यार्थ्यांचा प्रश्न होता काय ? यामध्ये असा फरक करता येणार नाही, हे वेगळे करता येणार नाही, हे सगळे मान्य आहे परंतु या ठिकाणी भाषण् करताना हा 16 लाख विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे असा उल्लेख झाला. हा जास्तीत जास्त एसएससी बोर्डाच्या 25 हजार आणि सीबीएसई आणि आयसीएसईच्या 25 हजार विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. तरी सुध्दा हा प्रश्न नीट सोडविला पाहिजे. कारण एक जरी विद्यार्थी असला तरी त्याच्या शैक्षणिक करिअरमध्ये अडथळा उत्पन्न होऊ नये याचाही विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सीबीएसई, आयसीएसई यांची परीक्षा पध्दती, त्यांचे विषय यामध्ये तफावत आहे. याबाबत मागच्या अधिवेशनामध्ये 90:10 च्या अनुषंगाने बोलत असताना चर्चा केलेली

...2...

RDB/ KGS/ MMP/

श्री. विनोद तावडे .....

आहे. 100-100 मार्क असले तरी एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना 9 विषयांचे पेपर लिहावे लागतात. सीबीएसई आणि आयसीएसईच्या विद्यार्थ्यांना पाच विषय असतात. एसएससी बोर्डाच्या मुलांना 20 टक्के ऑब्जेक्टीव्हसाठी आणि 80 टक्के सब्जेक्टीव्हसाठी गुण असतात. मार्कीन्ग सिस्टिम, पॅटर्न वगैरे सर्व विषय यामध्ये आलेले आहेत. टी.व्ही. चॅनेलवर माननीय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात सुप्रीम कोर्टाचा निर्ण्य आमच्या बालूने लागला हे सांगत आहेत. मला माननीय मंत्रिमहोदयांना आठवण करुन द्यावयाची आहे की, बालभवनमध्ये याच बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात चर्चा केली गेली होती. त्यावेळी माननीय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात उपस्थित होते. आपल्या अधिकारी श्रीमती बसंती रॉय ज्या निवृत्त झालेल्या आहेत, त्यांनी डीएनएमध्ये याबाबत लिहिले होते. सुप्रीम कोर्टाने आज जे मान्य केले त्याबाबत हायकोर्टाने आपल्या निकालामध्ये पृष्ठ क्रमांक 78 वर असे म्हटले आहे की, "During the course of argument, we are repeatedly called upon Learned Counsel appearing for respondent to take instructions and state as to whether State Government would extend this policy to the student appearing through other boards. The Learned Advocate General stated that the policy cannot be extended to them."

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

शासनाला हायकोर्टाने किंवा सुप्रीम कोर्टाने एक वर्षाचा वेळ दिलेला आहे. त्यावेळी हायकोर्टाने शासनाला वारंवार विचारले होते की, हे जे तत्व लागू करीत आहात ते बाकीच्यांना लागू करणार का ? त्यावेळी असे म्हटले असते की, त्यांचा थ्री ग्रूप आहे त्यातून गार्डनिंग व इतर विषय वगळणार असतील तर आम्ही देण्यास तयार आहोत. परंतु शासनाने ते साफ नाकारले होते. बाल भवन येथील चर्चेमध्ये काही प्राचार्यांनी असे मत मांडले होते. शासनाच्या अधिकारी श्रीमती बसंती रॉय यांनी वर्तमानपत्रात लिहिले होते. आता त्या निवृत्त झाल्या आहेत. परंतु त्यांनी हाच मुद्दा मांडला होता. मला असे म्हणावयाचे आहे की, सुप्रीम कोर्टाकडून आज निर्णय लागला आहे, पण हायकोर्टात जर त्यावेळी शासनाने होकार दिला असता तर पुढील दिवस व खर्च वाचला असता, हा खर्च कशासाठी वाया घालविला ? आज सुप्रीम कोर्टाच्या निकालामुळे फार मोठे मिळविले आहे, इतिहास घडविला आहे असे नाही. यापूर्वी हायकोर्टात मान्य केले असते तर पुढील सर्व प्रक्रिया टाळता आली असती. हायकोर्टाच्या फायनल जज्जमेंटच्या पान क्र.78 वर नमूद केलेले आहे. शासनाने ॲडव्होकेट जनरला विचारावे. फायनल जज्जमेंटच्या आदल्या दिवसाच्या हियरिंगला मी उपस्थित राहिलो होतो. त्यावेळच्या दोन दिवसाच्या ऑर्ग्युमेंटला मी उपस्थित होतो. हा पर्याय शासन देऊ शकते असे लोक हायकोर्टात वारंवार सांगत होते. कारण सीबीएसई व आयसीएसई बोर्डाच्या अभ्यासक्रमाचा ग्रूप थ्री आहे त्यामध्ये स्कोअरिंग करता येते. परंतु शासनाने निर्णय घेतल्यावर काही महाभाग विद्यार्थी व पालक असे आहेत की, त्यांनी सहापैकी एक विषय सरळ ऑप्शनमध्ये टाकला. कारण शासनाने बेस्ट ऑफ फाईव्ह तत्व लागू केले होते. हे तत्व शैक्षणिक दृष्टया किती योग्य किती अयोग्य या चर्चेमध्ये नंतर जाऊ. परंतु अनेक मुलांनी डायरेक्ट एक विषय ऑप्शनमध्ये टाकला होता. जसे महाराष्ट्र शासनाने शिक्षण या खात्याला ऑप्शनमध्ये टाकले आहे. कृषी खात्याबरोबर शिक्षण खाते ऑप्शन म्हणून सांभाळण्यास दिले आहे किंवा कृषी खात्याला ऑप्शनमध्ये टाकले आहे. मंत्री महोदयांनी गेल्या महिन्याचे वेळापत्रक काढावे. कोणत्या खात्यामध्ये किती वेळ गेला ते सांगावे. शिक्षण खाते इतक्या सहजपणे चालणारे नाही. आज सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना फार काही मिळाले आहे असे समजू नये.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.विनोद तावडे.....

आता जो निर्णय लागला हा त्यावेळीच लागला असता. त्यामुळे याला अंतिम उत्तर म्हणजे कायदा करणे हेच आहे. आम्ही याच खुर्चीवरुन बोलत होतो. मग सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत असतील, सन्माननीय शिक्षण राज्यमंत्री तर त्यावेळी सदस्या होत्या. या सगळयांनी कायदा करण्याची मागणी केली होती. पण जे शिक्षण मंत्री येतात ते जादूची कांडी फिरविण्याचा प्रयत्न करु लागतात. त्यातून पर्सेंटाईल, 90 : 10 अशी पध्दत सुरु करण्याची घोषणा करतात. नागपूरच्या अधिवेशनामध्ये बेस्ट ऑफ फाईव्ह संबंधी सुध्दा कायदा करावा, हे तत्व कोर्टात टिकणार नाही असे म्हटले होते. परंतु या विषयावर पीएचडी केलेल्या थाटात उत्तरे येत होती. शेवटी काय झाले ? कारण कोर्ट कॅन इंटरप्रिट लॉ. शासन जो निर्णय घेते त्याबाबत चर्चा करुन कोर्ट निर्णय बदलू शकते. पण कोर्ट कायदा बदलू शकत नाही. त्यामुळे आम्ही सर्वजण कायदा करावा, कायदा करावा असे म्हणत होतो. पण शासन त्याला तयार होत नाही. एक वर्षात शासनाला काही तरी रिलीफ मिळाला आहे ही मेहेरबानी समजावी. हायकोर्टाने शासनाला 20 दिवसापूर्वी विचारले होते आणि हा विषय येथेच संपला असता, पालकांचे व विद्यार्थ्यांचे टेंशन संपले असते. पण शासनाने तसे केले नाही. त्यामुळे आज या चर्चेला उत्तर देताना सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक जगताला स्पष्टपणे वचन दिले पाहिजे की, आम्ही यासंबंधी पुढील अधिवेशनात कायदा मांडू. तरच शासनाला विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळायचे नाही असे दिसेल. त्यातून सरकारचा प्रामाणिकपणा दिसून येईल. हे सरकारचे मत आहे असे वाटेल. अन्यथा पुन्हा दिल्लीत हालचाली होतील. तेथे काय हालचाली होतात, कोण कधी काय बदलेल ते समजणार नाही. त्यामुळे आपल्याला आणखी एक टिकली बसेल.

यानंतर श्री.शिगम......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 19:30

(श्री. विनोद तावडे...

पुढच्या अधिवेशनामध्ये कायदा आणण्याचे स्पष्ट आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी दिले तरच या चर्चेला काही अर्थ प्राप्त होईल. शिक्षणाचा कायदा राज्यात लागू करावयास पाहिजे असे मला मनापासून वाटते. राज्य सरकार घाईघाईने पाहिजे तसे जी.आर. काढीत आहे. कायद्याचे नियम बनविताना दिल्लीतील मॉडेल रुल्सचे ट्रान्सलेशन करु नका. शिक्षण हा विषय कन्करण्ट लिस्टमध्ये आहे. आपल्या महाराष्ट्र राज्याचा शिक्षणाच्या संदर्भात वेगळा स्वतंत्र कायदा असला पाहिजे. म.ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुरोगामी राज्य असे आपण सतत म्हणत असतो. तर मग इतर राज्यांना मार्गदर्शक ठरेल असा आपल्या राज्याचा एक स्वतंत्र कायदा आपण आणूया. राज्य सरकार मात्र वेगवेगळे जी.आर. काढीत आहे. 8वी पर्यन्त विद्यार्थ्यांना नापास करु नये, असा जी.आर. काढला. विद्यार्थ्याला नापास करावयाचे नसेल तर त्या विद्यार्थ्याचे मूल्यमापन कसे करणार ? यासंबंधीच्या गाईड लाईन्स राज्य सरकारने दिल्या नाहीत. त्यानंतर राज्य शासनाने अनधिकृत शाळा ताबडतोबीने बंद करण्यासंबंधीचा दुसरा जी.आर. काढला. कोणतीही अनधिकृत शाळा चालविण्यासाठी तीन वर्षाची मुभा देण्यासंबंधीची तरतूद केन्द्राच्या कायद्यामध्ये आहे. राज्य शासनाने अनधिकृत शाळा ताबडतोब बंद करण्याचा जी.आर. काढला. सभापती महोदय, मूळ कायद्याच्या कलम 38(4)मध्ये म्हटलेले आहे की, या कायद्यांतर्गत केलेले प्रत्येक नियम राज्य सरकारने विधिमंडळासमोर ठेवले पाहिजेत. राज्य शासनाने जे जे जी.आर. काढले ते या विधिमंडळासमोर, आमच्या समोर ठेवले आहेत काय ? हे नियम आमच्या समोर न ठेवणे हा आमच्या विशेषाधिकाराचा भंग आहे. कायद्यांतर्गत केलेले नियम हे विधिमंडळासमोर आणण्याची तरतूद कायद्यात असताना जे अधिकारी तसे करीत नाहीत त्यांच्यावर आम्ही हक्कभंगाचा प्रस्ताव आणायचा काय ? ज्यामुळे शिक्षण खात्याची जरब बसेल अशा प्रकारचे जी.आर. शासनाने काढले. परंतु 30 विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक असला पाहिजे अशा प्रकारचा जी.आर. काढला नाही. सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये असे अनेक वेगवेगळे मुद्दे आहेत की त्या मुद्यांचा विचार नवीन कायद्याचे नियम करताना आपणास करावा लागेल. हे नियम बनविताना आपण अपंग मुलांच्या शिक्षणांच्या गरजांचा विचार करायला पाहिजे. आपल्या राज्यामध्ये ऊस हंगामामध्ये स्थलांतर करणारे ऊस तोडणी कामगार आहेत. अशा कामगारांच्या मुलांना आपल्याला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे...

नियमात आणावे लागेल. अनेक मुले आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थलांतरित होत असतात.आपली तक्रार निवारण यंत्रणा ही राज्यस्तरावर आहे. ती तालुकास्तरावर आणि क्लस्टर स्तरापर्यन्त आणावी लागेल. अशा प्रकारचे नियम केवळ अधिका-यांवर अवलंबून राहून करु नका. या संदर्भात नियम बनविताना राज्यातील शिक्षण क्षेत्रातील 40-50 तज्ज्ञांचे दोन-तीन दिवस वर्कशॉप घ्या. आवश्यक असणारे नियम त्यांना सुचविण्यास सांगा, त्यांची स्क्रुटीनी करा, ते विधिमंडळासमोर ठेवा. शिक्षण विषयक कायद्याचे नियम बनविताना गांभीर्याने विचार करा.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 19:35

श्री.विनोद तावडे..........

केवळ फाईल सरकवायची, चार बदल्यांचे निर्णय घ्यायचे, जी.आर.वर सही केली इतक्या सहजपणे शिक्षण खात्याचा कारभार करु नये. या प्रश्नाचा विचार करताना शिक्षण तज्ज्ञ असतील, काही विद्यार्थी सुध्दा विचार मांडू लागले आहेत, इंटरनेटचे माध्यम उपलब्ध आहे, ग्रामीण भागामध्ये लोक जाऊ शकतात, त्यांची मते घेऊ शकतात याचा विचार व्हावा.

सभापती महोदय, आज शिक्षण खात्याची हुकूमशाही चाललेली आहे. बेस्ट फाईव्ह या विषयामध्ये हा शेवटचा प्रयोग असून यापुढे शासन कायदा आणणार आहे असे शिक्षणमंत्री महोदयांनी जाहीर करावे. आज गोरेगाव येथील विबग्योर या शाळेची मस्ती सुरु आहे. शासन त्या शाळेवर काही कारवाई करु शकत नाही, शासन पूर्णत: हतबल झालेले आहे. जोगेश्वरी येथे शिक्षण निरीक्षकांचे कार्यालय आहे. त्या शिक्षण निरीक्षकांना विबग्योर शाळेच्या आवारात प्रवेश दिला जात नाही. महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्याना त्या शाळेच्या गेटमध्ये घेतले जात नाही. हायकोर्टाने जो निर्णय दिला त्याबद्दल मला खूप आश्चर्य वाटले. तो निर्णय वाचताना संताप येत होता. ती विद्यार्थीनी मेंटल स्ट्रेसमध्ये राहिली हे दिसून आले. त्या शाळेतील मुख्याध्यापक, तेथील शिक्षक तिच्याशी असेच वागणार आहेत. शासनाने तिच्या मेंटल स्ट्रेसचा विचार केला. परंतु त्या शाळेत जे इतर विद्यार्थी शिकत आहेत त्यांना किती स्ट्रेस असेल याचा विचार करणार आहात की नाही? प्रामाणिकपणे एका मुलीच्या आईने संघर्षशील प्रवृत्तीमुळे आवाज उठविला, त्यामुळे त्या मुलीला शाळा सोडावी लागली. त्या शाळेतील एखादी मुलगी आजारी पडली तर तू आज शाळेत जाऊ नकोस, मी शिक्षिकेशी बोलते असे तिची आई म्हणते. ती मुलगी म्हणते तू काही बोलू नकोस, मला शाळेतून काढून टाकतील. या मेंटल स्ट्रेसचा न्या.शहा आणि न्या.धर्माधिकारी यांनी विचार केला नाही का हा खरा प्रश्न आहे. हा निर्णय मान्य होणारच नाही. अशा निर्णयामुळे या बोर्डाची मुजोरी वाढली आहे. तेथील कोर्स वाईट आहेत असे मी म्हणणार नाही. शिक्षणपध्दती चांगली आहे. ज्याला आवडेल त्यांनी ती स्वीकारावी. या शाळेसमोर टॅक्सी किंवा ऑटोरिक्षा थांबविली तर ट्रॅफिक हवालदार दंड करतात. शाळा सुटण्याच्या वेळी आय.ए.एस. आणि आय.पी.एस.अधिकाऱ्यांची वाहने या शाळेच्या बाहेर उभी केली जातात. त्यामुळे सी.डी.देशमुख मार्गावर ट्रॅफिक जाम होतो. शासन याबाबत काही करु शकत नाही. फक्त कायदा करुन या शाळांवर चाप बसविता येऊ शकतो. नियम बनविणे, जी.आर.काढणे ताबडतोब थांबविण्यात यावे.

..2...

13-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4N.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 19:35

श्री.विनोद तावडे........

मंत्रीमहोदयांनी जी.आर.काढण्याचा कारखाना ताबडतोब बंद करावा. सभागृहात चर्चा करावी. शिक्षण तज्ज्ञांना बोलवावे आणि त्यांच्याशी चर्चा करावी. या संदर्भात मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे. तरच महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्र्यांनी काहीतरी चांगले केले याबद्दल राज्यातील विद्यार्थी आपल्याला दुवा देतील एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

**तालिका सभापती** (श्री.चंद्रकांत पाटील) : आता या प्रस्तावावरील चर्चा थांबविण्यात येत आहे. उद्या सकाळी 10.30 ते 12.30 या विशेष बैठकीत या प्रस्तावावरील चर्चा घेण्यात येईल, त्यावेळी उर्वरित सर्व सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडता येतील व मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण होईल.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, उद्या सकाळी 10.30 ते 12.00 या वेळेत माझ्या विभागाशी संबंधित प्रश्नोत्तरे आणि लक्षवेधी सूचना खालच्या सभागृहात चर्चेला असल्यामुळे माननीय राज्यमंत्री महोदय या सभागृहात उपस्थित राहतील. मला याठिकाणी एक निवेदन करावयाचे आहे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्रीमहोदयांना निवेदन करण्याची अनुमती मागितली आहे. माननीय मंत्रीमहोदयांना निवेदन करावे.

------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बेस्ट ऑफ फाईव्ह योजनेबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम निर्णय

**मु.शी.**: बेस्ट ऑफ फाईव्ह योजनेबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम निर्णय यासंबंधी माननीय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन

श्री. बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :--

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. चंद्रकांत पाटील) :** प्रस्तावावरील चर्चा आपण थांबविली असून उर्वरित चर्चा उद्याच्या विशेष बैठकीत घेण्यात येईल. तसेच कार्यक्रम पत्रिकेवरील सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात येत आहे. आता विधेयक क्र. 8 वरील चर्चा घेण्यात येईल.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

**L. C.BILL NO. VIII OF 2010.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.)**

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि.8-महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

महोदय, विद्यापीठाचे कुलगुरु नेमण्याचा अधिकार पूर्णत: कुलपती व माननीय राज्यपाल यांना देण्यात आले आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुचे पद यापूर्वीच रिक्त झाले होते. कुलगुरुच्या पदाकरिता योग्य नांवाची शिफारस करण्यासाठी जी समिती होती त्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी होता. मधल्या काळात अधिवेशन नसल्याने यासंसबंधीचा अध्यादेश काढण्यात आला आणि त्यानुसार कुलगुरुचा कार्यकाल हा 12 महिनेपर्यंत असावा व तोपर्यंत नवीन कुलगुरुची निवड करावी यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्र. 8 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. हे विधेयक पाहिले तर सर्वच विद्यापीठांची राज्यात सर्रास हीच परिस्थिती आहे. कुलगुरु नेमावयाचा असेल मग त्यात मुंबई विद्यापीठ असो, मराठवाडा विद्यापीठ असो अथवा आरोग्य विज्ञान विद्यापीठ असो या सर्व ठिकाणी तीच ओरड आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, एखाद्या कुलपतीच्या पदाची मुदत संपत असेल तर त्यासंदर्भातील माहिती कुलपतींना किंवा राज्यशासनाला नसते काय ? त्यामुळे यासंदर्भात जी काही उपाययोजना करावयाची आहे ती अगोदरच्या सहा महिन्यापासून का केली जात नाही ? आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये डॉ. मृदुला फडके हया व्हाईस चान्सलर होत्या. मी सिनेट मेंबर म्हणून सांगतो आहे की, डॉ. मृदुला फडके व्हीसी असतांना त्यांची मुदत कधी संपते आहे याची माहिती त्यांना होती तसेच सिनेट मेंबर्स म्हणून आम्हाला सुध्दा होती. वास्तविक त्यांनी अशा प्रकारची नेमणूक करावयाची आहे याबाबत त्यांनी कुलपतींना कळवावयास पाहिजे होते त्यामुळे त्यांनी कुलपतींना कायदेशीर पत्र पाठविले होते काय ?

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, एखादा कुलगुरू, व्हाईस चान्सलर पदासाठी कोणाच्याही नावाची शिफारस करु शकतो का ? त्यांनी कुलपतींना पत्र लिहून सांगितले की, डॉ. नीलिमा क्षीरसागर यांची कुलगुरू म्हणून नेमणूक करावी असे जे पत्र लिहिले आहे ते बरोबर आहे काय ? खरे म्हणजे डॉ. नीलिमा क्षीरसागर ही त्यांची सख्खी बहीण आहे. त्यामुळेच नात्यामध्येच कुलगुरू पद वाटून घ्यावयाचे आहे काय? डॉ. नीलिमा क्षीरसागर यांच्या कार्यक्षमतेविषयी माझ्या मनात शंका नाही. त्यांना अनेक इंटरनॅशनल ॲवार्डस् मिळालेले असले तरी काही शिरस्ता असतो. हा शिरस्ता न पाळता त्यांनी आपल्या बहिणीचेच नाव का सुचवले ? कुलपतींना अशा प्रकारची शिफारस केलेली असेल तर आपण सांगून टाका. या ठिकाणी जो सहा महिन्याचा कालावधी आहे त्याला आपण आता एक वर्षाचा करीत आहात. याचा अर्थ एखादे विद्यापीठ एक वर्ष कुलगुरू शिवाय प्रभारी कुलगुरूच्या अखत्यारीत राहू शकते अशा प्रकारचे आपण सांगत आहात ते बरोबर आहे काय ? विद्यापीठाचा कारभार फार मोठा असतो. हा कालावधी सहा महिन्याचा होता तो आता आपण एक वर्षासाठी करीत आहात. ही जी बाब आहे ती माननीय मंत्रीमहोदयांना तरी पटते काय ? आपल्याला जर पटत नसेल तर आपण या ठिकाणी अशा प्रकारचे बील का आणले ? खरे म्हणजे एखाद्या व्यक्तीसाठीची सोय या ठिकाणी होता कामा नये. विद्यापीठ हे विद्यापीठ म्हणून चालले पाहिजे. हे आरोग्य विज्ञान विद्यापीठ आहे. कुठलेही विद्यापीठ असले तर प्रत्येक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

विद्यापीठाला महत्व आहे. या विद्यापीठामध्ये किती पदे प्रभारी आहेत याची माननीय मंत्रीमहोदयांना माहिती आहे काय ? माननीय मंत्रीमहोदया, आपण या आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये कधी गेला होता काय ? मला वाटते आपण या ठिकाणी गेलाच नसाल. या ठिकाणी चार ते पाच पदे प्रभारी असून या मध्ये अजून एका प्रभारी पदाची आपण भर घालत आहात. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा कारभार पाहणे अतिशय कठीण काम आहे. आज या विद्यापीठामध्ये जे कुलगुरू बसलेले आहेत ते मुक्त विद्यापीठाचे आहेत. हे कुलगुरू आरोग्य विद्यापीठामध्ये दोन दिवस बसतात व बाकीचे दिवस मुक्त विद्यापीठात काम करीत असतात. असे जर होणार असेल तर या बिलाला विरोध करण्याशिवाय आम्हाला दुसरा कोणताही पर्याय नाही. आपण वाटेल ते करावयाचे आणि आम्ही बील पास करावयाचे असे चालणार नाही. सहा महिन्यात कुलगुरू नेमण्याची आपली क्षमता नाही काय ? अंडी जशी उबवली जातात तसे हे पद उबवावयाचे असते काय ? या लोकांना या ठिकाणच्या सुविधा एंजॉय करावयच्या असतात. एकदा कुलगुरू पदावर चिकटले की, चिकटले असे होता कामा नये.

या विद्यापीठाचा कारभार अतिशय भोंगळ आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ MMP/ जुन्नरे... 19:50

डॉ.दीपक सावंत ....

आरोग्य विज्ञान विद्यापीठ दर्जेदार असले पाहिजे. त्यातून डॉक्टर, पॅरा मेडिकलचे तज्ज्ञ निर्माण होणार आहेत. त्यामुळे येथे हेळसांड होण्याचे कारण नाही. आपण सहा महिन्याचा कालावधी मागत आहात तो चुकीचा आहे. आज मुंबई विद्यापीठामध्ये काय चालले आहे ? श्री.वेळूकर सरांची कुलगुरू म्हणून नियुक्त झाली आहे. मराठवाडा विद्यापीठामध्ये देखील हीच परिस्थिती आहे. आजूबाजूंच्या विद्यापीठामध्ये देखील अशीच परिस्थिती आहे. बेस्ट ऑफ फाईव्हचे काय केले हे आपल्याला माहिती आहे. बारावीच्या शिक्षणाचे तीन-तेरा वाजले आहेत. तसे आपल्याला उच्च शिक्षणाचे करायचे आहे काय ? आपण नियम करीत असताना काही तरी बंधन घालावे. त्या विद्यापीठाच्या कुलगुरूंनी अगोदर सहा महिने ही प्रक्रिया सुरू करणे बंधनकारक राहील. रक्ताच्या नात्यातील व्यक्तीला अशा प्रकारचे पद देता येईल अशा प्रकारची शिफारस करता येणार नाही, अशा प्रकारची सुधारणा करावी अशी मी विनंती करीत आहे. माझ्या या सूचनेचा आपण विचार करावा. त्या विद्यापीठाला आपण भेट द्यावी. त्या विद्यापीठाचे रजिस्ट्रार येथे आलेले आहेत. त्यांना विचारावे ते कारभार कसा करतात ? आपण नाशिकला कधी तरी जावे. हे विद्यापीठ लांब आहे. कित्येक निवासस्थानाला कुलूप आहेत. तेथे कुत्रा सुद्धा फिरायला सुद्धा जात नाही. मोठे विद्यापीठ आपण बांधता. या विद्यापीठातील निवासस्थानामध्ये कोणीही रहात नाही. सगळे कुलगुरू मुंबईला असतात. त्यांना मुंबईला ऑफिस पाहिजे. ह्या विद्यापीठाच्या विभाजनाचा घाट कोणी तरी घातला होता. तो आम्ही हाणून पाडला. मुंबईला कालिना येथे ते जागा घेत आहेत. मग एवढे मोठे विद्यापीठ तेथे कशाला बांधले ? हा सगळा भोंगळ कारभार आहे. त्यामुळे या विद्यापीठाला शिस्त आणणारा कुलगुरू असला पाहिजे. पायलीला पाचशे कॉलेजेसना परवानगी मिळते. आज MBBS ची कॉलेजेस कमी आहेत. अन्य फॅकल्टीची कॉलेजस भरपूर झाली आहेत. त्यास आळा घालावा. प्रत्येक फॅकल्टीसाठी किती कॉलेजेस असणे आवश्यक आहे यासाठी आपण नियमावली तयार करावी. तेथे कडक कुलगुरू आल्याशिवाय ते शक्य नाही. ही सुधारणा आणत असाल तर आम्ही विचार करू अन्यथा आम्हाला या विधेयकावर मतदान घ्यावे लागेल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.........

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ 1998 चे कलम 14 च्या पोट कलम 7 मधील तरतुदीसंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी विधेयक आणले आहे. हे बिल मांडायला लागणे हीच या सरकारची नाचक्की आहे. आता पर्यंत रोजंदारीवर कामगार काम करीत होते. रोजंदारीवर शिक्षक होते. तासिकेवर प्राध्यापक नेमले होते. पण आता तर आपण रोजंदारीवर कुलगुरू नेमत आहात. त्यामुळे हे विधेयक मांडताना सरकारला खरेच लाज वाटली नाही का हो ? आपल्याकडे प्रा.राम जोशी, टोपे यांच्या सारख्या महान कुलगुरूंची परंपरा आहे. मुंबईचा राजाभाई टॉवर मंत्रालयासमोर मुजरा घालण्यासाठी झुकला त्याचा हा परिणाम आहे. जो पर्यंत थोर परंपरेचे कुलगुरू होते तो पर्यंत राजाभाई टॉवर ताठ होता. त्याची उंची मंत्रालयापेक्षा उंच होती. पण गेल्या काही वर्षात राजाभाई टॉवर मंत्रालयाला मुजरा घालत आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

विद्यापीठ हे स्वायत्त का ठेवले ? महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम 1998 मधील 14(7) कलमामध्ये यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. त्या तरतुदीनुसार एखाद्या विद्यापीठाच्या कुलगुरुंचा अचानक मृत्यू झाला तर ते पद रिक्त राहू नये, म्हणून तातडीने प्रभारी पदावर एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येते. शासनाच्या भोंगळ कारभारासाठी कलम 14(7) वापरता येत नाही. या खात्याचे दोन मंत्री होते तेव्हा हे पद भरण्यासाठी या मंत्र्यांनी माननीय राज्यपालांना किती वेळा आठवण करुन दिली होती ? पुढील सहा महिन्यामध्ये हे पद रिक्त होणार आहे तेव्हा ते पद भरण्यासाठी समिती नेमण्यात यावी असे आपण माननीय राज्यपालांना आठवण करुन दिली होती काय ? माननीय राज्यपालांना कोणत्याही प्रकारची आठवण करुन न देणे हे शासनाचे अपयश नाही काय ? माननीय राज्यपालांच्या शिक्षण सचिवांचे पद गेल्या सहा सात वर्षापासून रिक्तच आहे. शिक्षणाच्या बाबतीत सल्ला देण्यासाठी त्यांच्याकडे सल्लागाराचे एक पद असते. परंतु ते पदच भरले गेले नाही. या संदर्भात इंग्रजांनी पध्दत ठरवून दिलेली आहे, ती पध्दत योग्य आहे की अयोग्य आहे, याबाबतीत माझी काही मते आहेत. माननीय राज्यपाल हे कुलपती असतात त्याप्रमाणे माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे सुध्दा त्यांच्या डिम्ड युनिर्व्हसिटीचे कुलपती आहेत. त्यांचा दर्जा माननीय राज्यपालांच्या बरोबरीचा आहे. त्यांना देखील वर नेऊन बसवले पाहिजे. विद्यापीठ हे स्वायत्त म्हटलेले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कायद्यात त्यांची वेगळी व्यवस्था करता येऊ शकते. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरु पदांच्या नेमणुकीच्या बाबतीत खेळ खंडोबा झाला आहे. एखाद्या शाळेत शिक्षकांची नेमणूक केली जात असतांना जी अवस्था निर्माण होत असते, त्याही पेक्षा मुंबई विद्यापीठाचा कुलगुरु नेमत असतांना वाईट अवस्था झाली होती. त्याच्या बाबतीत राजस्थानमधील एका माणसाने पुन्हा ऑब्जेक्शन्स काढली होती. आजपर्यत कोणत्याही विद्यापीठाच्या कुलगुरुच्या संदर्भात अशा प्रकारची ऑब्जेक्शन्स काढली नाहीत. तेव्हा अशा प्रकारची ऑब्जेक्शन्स का काढली जातात, कशामुळे काढली जातात, आपल्यामध्ये किती दोष आहे, ही सिस्टीम आपण किती खराब करीत आहोत, या सिस्टीमध्ये आपण किती कीड लावत आहोत याचा देखील विचार केला पाहिजे.

सभापती महोदय,हे विधेयक मंजूर होत असतांना उपस्थित राहण्यामध्ये मला अवमान वाटतो. हे विधेयक मंजूर करीत असतांना मला त्याचा भाग व्हावयाचे नाही. या विधेयकामध्ये असे

म्हणावयास पाहिजे होते की , फक्त या वेळेपुरतीच आपण मंजुरी द्या. या नंतर मात्र अशी वेळ येणार नाही. परंतु अशा प्रकारे कोठेही ॅम्हटले गेलेले नाही. अगोदरचे माननीय राज्यपाल वेगळे होते. नंतर ते बदलले गेले असतील तर अगोदरच्या माननीय राज्यपालांची चॉईस एक होती आणि नंतर आलेल्या माननीय राज्यपालांची चॉईस दुसरी असेल तर ते दुस-या व्यक्तीचे नाव सुचवतील. हे बरोबर आहे की चूक आहे, हे मला सांगता येणार नाही. माननीय राज्यपालांकडे जर शिक्षण सचिवांचे पद भरले गेले असते तर असा प्रकार घडलाच नसता. परंतु हे पद सहा -सात वर्षापासून भरले गेले नाही. त्यामुळे हे विधेयक आणत असतांना केवळ अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे, या वेळ पुरतीच आम्ही ही तरतूद करीत आहोत, हे खरे म्हणजे सांगावयास पाहिजे होते. परंतु तसे न सांगता आपण सरसकट परवाना घेत आहे. म्हणजे परदेशी जाण्याचा पासपोर्ट काढला आहे. जेव्हा पाहिजे तेव्हा व्हिसावर ठप्पा मारला जातो. त्याप्रमाणे आपण् करीत आहात. तेव्हा कुलगुरुची पदे भरत असतांना शासनाने अशा प्रकारचा खेळ करु नये. काही पदे ही राजकारणापासून वेगळी आहेत. त्यांचा स्टेटस आणि पावित्र्य वेगळे आहे. ती पावित्र्य आणि स्टेटस टिकवले गेले पाहिजे.

सभापती महोदय, शिवाजीराव पाटील निलंगेकर हे मुख्यमंत्री होते आणि त्यांच्या सुनेच्या प्रकरणामध्ये मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंना राजीनामा द्यावा लागला तसेच त्यांना सुध्दा मुख्यमंत्री पद सोडावे लागले होते . त्यावेळी श्री. कोणा प्रभाकर हे राज्यपाल होते. त्यांना या प्रकरणाची झळ सहन करावी लागली होती. दिल्लीतील आपले हायकमांड या विषयावर इतके सेन्सेटिव्ह होते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. शिक्षणाच्या संदर्भात केन्द्र सरकार मोठया प्रमाणावर चांगले चांगले बदल करीत आहे. हे बदल येत असतांना महाराष्ट्र राज्याने केन्द्राच्या बरोबर किंबहुना केन्द्राच्या पुढे चार पावले जावयास पाहिजे होते. परतु ते सोडून अशा प्रकारचे विधेयक आणून आपण् दहा पावले मागे जात आहोत.

सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असतांना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सागितले की केवळ अपवादात्मक परिस्थिती म्हणून या वेळ पुरतीच ही तरतूद करण्यात येत आहे असे सांगण्यात येईल काय ? अर्थात या विधेयकामध्ये लगेच सुधारणा होणार नाही, हे मला

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

माहीत आहे. परंतु या पध्दतीने जर विधेयकामध्ये मांडणी केली तर बरे होईल. माननीय राज्यपालांच्या पर्यंत सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना पोहोचवा असे मला सांगावयाचे आहे. त्यांनी आपल्याकडे काहीही पाठवून दिले आणि त्यांप्रमाणे आपण त्यांचे ऐकले असे करता कामा नये.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

माननीय राज्यपालांना हा विषय माहित नसेल कारण त्यांच्या खालच्या सचिवांनी त्यांच्याकडे पाठविला नसेल. यामुळे या विधेयकाच्या बाबतीत सभागृहाच्या माध्यमातून मंत्रिमहोदयांनी महाराष्ट्रातील जनतेला व शिक्षण क्षेत्राला स्पष्ट आश्वासन द्यावे की, हे यावेळेपुरते एक्सेप्शनल आहे, असे पुन्हा होणार नाही. तुम्ही पुण्याचे डॉ. एकबोटे यांना प्रकुलगुरु म्हणून नेमले ते दोन महिन्यात उडाले. कारण कुलगुरु बदलल्याबरोबर ते बदलले. तुम्ही दहा वर्षाचा पासपोर्ट घेत आहात, त्यामुळे व्हिसा पाहिजे असेल तर ठप्पा मारुन आणणार अशाप्रकारचे हे विधेयक आहे. आणि म्हणून माननीय राज्यपाल बदलल्यानंतर हे एक्सेप्शनल झाले असे आपण सांगितले तर आम्ही मान्य करु. परंतु त्यामुळे ही स्थिती निर्माण झालेली नाही तर ती कशामुळे निर्माण झाली आहे हे मी तुम्हाला सांगतो. माननीय राज्यपालांचा विषय असल्यामुळे काही गोष्टी सभागृहाच्या पटलावर मला आणावयाच्या नाहीत. मी विद्यार्थी चळवळीमध्ये, शिक्षण क्षेत्रामध्ये काम केलेला कार्यकर्ता आहे. राजाबाई टॉवरला मंत्र्यांची हुजरेगिरी करायला लावू नका. एवढेच आश्वासन आपण जनतेला द्या, त्याचीच आज गरज आहे एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

डॉ. दीपक सावंत : मंत्रिमहोदय, आम्ही सुचविलेली सुधारणा आपण मान्य करावी.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ विधेयक के बारे में मैं अपने विचार प्रकट करने के लिए खड़ा हुआ हूँ. यहां पर बताया गया कि माननीय राज्यपाल महोदय को एक्सेप्शनल केस में वाइस चान्सलर को अपाइंट करने का अधिकार है और वे 6 महीने से ज्यादा अपने पद पर नहीं रह सकते. मंत्री महोदय को एक्सट्रीम सिचुएशन में ऑर्डिनेन्स निकालना पड़ा और यह बिल हम पास कर देते हैं. माननीय सदस्य श्री. दीपक सावंत और श्री. विनोद तावडे का कहना है कि 6 महीने के बाद आप एक साल का संशोधन करेंगी और एक साल के बाद भी आपने अगली बार आपने नहीं किया तो किस की जिम्मेदारी है ? यह शासन की नाकामी है कि आप 6 महीने तक मेडीकल यूनिवर्सिटी में एक वाइस चान्सलर अपाइंट नहीं कर सकते हैं. इसलिए मेरा मंत्री महोदय से अनुरोध है कि आप इस बार तो एक्सेप्शनल कंडीशन में 6 महीने के लिए कर लीजिए, लेकिन यह बंधनकारक होना चाहिए. जो भी वाइस चान्सलर रहते हैं तो उनके रिटायर होने के पहले वह जगह आपको भर लेनी चाहिए. एक्सट्रीम सिचुएशन में वेकेन्सी हो गई, कुछ दुर्घटना हो गई या और कुछ हो गया तो इस प्रकार की विशेष परिस्थिति में आप माननीय राज्यपाल महोदय के अधिकार का उपयोग करें, लेकिन वह 6 महीने से ज्यादा नहीं होना चाहिए और वन टाइम के लिए आर्डिनेन्स को बिल में बदलने की अनुमति होनी चाहिए, ऐसा मेरा शासन से अनुरोध है.

*************

.....4S-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री डॉ.दीपक सावंत, विनोद तावडे, सय्यद जमा यांनी विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना विविध विषयांवर चर्चा केली. यानिमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छिते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियमातील कलम 14(7) नुसार कुलगुरुंच्या निवडीची प्रक्रिया किंवा कुलगुरुंची निवड कुलपती करतात. त्यामुळे मधल्या काळात त्या प्रक्रियेमध्ये बदल करण्यासाठी विधानपरिषदेमध्ये हे विधेयक आणले. त्या प्रक्रियेमध्ये बदल केल्यानंतर कुलगुरुंच्या निवडीचे जे निकष होते, त्यामध्ये त्यांची शैक्षणिक पात्रता व इतर ज्या निकषाच्या गोष्टी होत्या त्यामध्ये मधल्या काळात आपण बदल केला. आपण याठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे डॉ. मृदुला फडके या कुलगुरु होत्या त्यांची निवृत्ती 21 डिसेंबर 2009 ला झाली. त्यामुळे नवीन कुलगुरुंच्या निवडीची प्रक्रिया तीन महिने अगोदरपासून सुरु होते. म्हणून मघाशी सांगितल्याप्रमाणे मधल्या काळामध्ये हे विधेयक आले. त्यामुळे त्या विधेयकातील तरतुदीनुसार कुलगुरुंची निवड प्रक्रिया पार पाडतांना त्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, संशोधन, त्यांचे विविध पब्लिकेशन इत्यादी निवड प्रक्रियेमध्ये झालेले बदल यामुळे एका कुलगुरुचा प्रभार प्र-कुलगुरुंना देण्याचा अधिकार कुलगुरुंना असतो...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या सिनेटवर आहे. त्यामुळे अशाप्रकारे पत्र लिहून एकाच व्यक्तीच्या नावाची शिफारस करण्याची पध्दत आहे काय? याचे आपण उत्तर द्यावे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

आपण रेकॉर्डवर बोलत आहात. अन्यथा मला तुमच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव आणावा लागेल.

प्रा. वर्षा गायकवाड : डॉ. मृदुला फडके या तेथील कुलगुरु होत्या. त्यांनी प्रभारी कुलगुरुचे पद डॉ. नीलिमा क्षीरसागर यांना देण्यासाठी दि. 22 डिसेंबर,2000 ला शिफारस केली. त्यामुळे त्यांची प्रभारी कुलगुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. पण त्यांचीही मुदत दिनांक 21 जून,2010 ला संपली. डॉ. निलीमा क्षीरसागर या डॉ. मृदुला फडके यांच्या भगिनी आहेत हे जेव्हा माननीय राज्यपाल आणि कुलपतींना सांगितले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, यांची आडनांवे वेगळी असली तरी त्या दोघी बहिणी आहेत. त्यामुळे डॉ. नीलिमा क्षीरसागर यांची मुदत दिनांक 21 जून,2010 ला संपली तेव्हा त्यांना मुदतवाढ न देता यशवंतराव विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. कृष्णकुमार यांना या पदाचा चार्ज देण्यात आला. मधल्या काळात ही सगळी प्रोसेस बदलली. या सबंधीचा अध्यादेश दिनांक 30-11-2009 ला काढण्यात आला त्यामध्ये दोन परिपत्रके आली नाहीत. मॅनेजमेंट कौन्सिल आणि अकॅडमिक कौन्सिल यांचा एक सदस्य शोध समितीमध्ये येणार होता. त्याच्या पात्रतेच्या बाबतीत त्या अध्यादेशात काहीही उल्ले्ख नव्हता त्यामुळे माननीय राज्यपालांनी दोन राजपत्रे काढली. त्या राजपत्रामध्ये मॅनेजमेंट कौन्सिल आणि अकॅडमिक कौन्सिलची जी मिटिंग होणार आहे त्यामध्ये येणारा जो प्रतिनिधी आहे त्याचा काय क्रायटेरिया असावा याबाबतीत एक पत्रक काढले. आणि कुलगुरुच्या शैक्षणिक पात्रतेसंबंधी एक परिपत्रक काढले. राजभवनातून ते परिपत्रक दिनांक 9-4-2010 ला आले. त्यामुळे व्हाईस चान्सलरच्या निवडीच्या प्रक्रियेसंबंधीचे पत्र विद्यापीठाला दिनांक 12-5-2010 ला मिळाले. त्यानुसार मिटिंग झाली. आता एक नोटीस जारी केलेली असून दिनांक 27 जुलै,2010 ला अकॅडमिक कौन्सिल आणि मॅनेजमेंन्ट कौन्सिलची मिटिंग होईल. त्यामध्ये एक सदस्य निवडला जाईल. सचिव शोध समितीचे एक सदस्य असतात. त्यानंतर आठ दिवसांनी कुलपती त्या समितीच्या अध्यक्षाची नियुक्त्ी करतील. एकदा शोध समिती गठीत झाली की, मग जाहिराती निघतील. त्यानंतर त्याची स्क्रूटिनि होऊन पाच उमेदवार निवडले जातील. आणि त्यांची निवड कुलपती करतील. या सगळया प्रक्रियेला विलंब होण्याचे खरे कारण निवड प्रक्रियेमध्ये झालेला बदल आणि पात्रतेमध्ये झालेला बदल या दोन निकषामुळे प्रोसेसला थोडा उशीर झाला. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच श्री. विनोद





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

प्रा.वर्षा गायकवाड....

तावडे यांनी या ठिकाणी सांगितले की, कुलगुरु निवडण्याच्या प्रक्रियेमध्ये वारंवार उशीर होतो हे बरोबर नाही ते मला सुध्दा मान्य आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कुलगुरुचा कार्यकाळ संपत असेल तर सहा महिन्यापासून कुलगुरुच्या निवडीची प्रोसेस सुरु केली पाहिजे. ही सभागृहाची भावना माननीय राज्यपालांना आणि कुलपतींना विनंतीपूर्वक सांगितली जाईल. पण मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, याबाबत राज्य शासनाची भावना सकारात्मक आहे. सन्माननीय विरोधी पक्षातील सदस्यांची जी भावना आहे तीच शासनाचीसुध्दा भावना आहे. या विधेयकाचा ऑर्डिनन्स निघालेला असून या विधेयकाला सभागृहाने पाठिंबा द्यावा, अशी मी विनंती करते.

डॉ. दीपक सावंत : आपण आरोग्य राज्यमंत्री असून देखील आपण अद्याप आरोग्य विज्ञान विद्यापीठाला भेट दिलेली नाही ही आपली मोठी चूक आहे. आपण पुढच्या आठवडयात तिकडे जावे आणि प्रत्यक्ष पहावे. त्या ठिकाणी अनेक निवासस्थाने तयार केलेली आहेत आणि त्या सर्वांना लॉक आहेत. ती कोणीही वापरत नाहीत. सगळे मुंबईला रहातात. त्यांनी त्याठिकाणी राहणे गरजेचे आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना बरोबर घेऊन नक्की त्या ठिकाणी भेट देईन आणि त्याठिकाणी असलेल्या निवासस्थानांना लॉक आहेत काय हे देखील बघेन. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करते की, सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**तालिका सभापती** ( श्री. चंद्रकांत पाटील ) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 8 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 8 संमत झाले आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत शैक्षणिक प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा आणि माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 11 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 14 जुलै, 2010 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही